मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्र. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका


मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

युगवाणी
१९८९

जाफेमा, एमेजू, जुऑस, ऑक्टो-ड



अनुक्रमणिका

जाने–फेब्रु–मार्च
एकोणीसशे एकोणनव्वद
वर्ष ४९ : अंक २ ते ३
[महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून अंशतः अनुदान प्राप्त]
मुख्य संपादक : आशा सावदेकर
संपादक : श्रीपाद भालचंद्र जोशी
कार्यकारी संपादक : केशव जोशी
युगवाणी
विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र
संपादक मंडळ : वि. स. जोग, मधुकर वाकोडे, श्रीकान्त तिडके, श्या. वा. खान, प्रकाश खरात

अनुक्रम • • •

■ संपर्क : संपादक युगवाणी, वि. सा. संघ, झाशी राणी चौक, नागपूर १२/ दूरभाष : २१९२९

सपादकीय

'युगवाणी'चा, हा १९८९ सालचा पहिला अंक. तीन वर्षाच्या वाटचालीचा आढावा घेणारा, मागे वळून पाहणारा; आपण काय केले ते तपासू बघणारा असा हा अंक ! 'युगवाणी'च्या डोळ्यावर विशिष्ट पीठाची किंवा संप्रदायाची झापडे नाहीत, म्हणूनच अनाग्रही व सर्वसमावेशक दृष्टीने, विविध मतामतांच्या क्रियाप्रतिक्रियांमधून निर्माण होणाऱ्या सौहार्दपूर्ण वाङ्मयीन वातावरणाकडे 'युगवाणी'चे खरे लक्ष आहे. नव्या वाङ्मयप्रवाहांची दिशा ओळखून वाङ्मयीन वाढीला अनुकूल वातावरण तयार करणे, वाचकाला नव्या वाटा दाखवणे, त्या वाटेवरून चालण्यासाठी त्याला संस्कारित करणे, याबद्दल 'युगवाणी'ला उदंड आस्था आहे.

'युगवाणी' हे खरे वाङ्मयीन नियतकालिक बनावे हा आमचा प्रयत्न आहे. अशा नियतकालिकाचे संपादन हे पोटार्थी नसते. वाङ्मयाभिरुचीची पातळी सांस्कृतिक दृष्टीने वर उचलली जावी म्हणूनच अशी नियतकालिके जन्माला येत असतात. 'युगवाणी' हे एका साहित्यसंस्थेचे मुखपत्र आहे पण त्याचे रूप निव्वळ प्रादेशिक नाही. तत्कालीन आवडीपेक्षा दीर्घकालीन रुची जोपासली जावी असेच 'युगवाणी'ला वाटते. म्हणून ललित आणि वैचारिक वाङ्मयाशी, संशोधनाशी आणि समीक्षेशी, चर्चेशी आणि वैयक्तिक मतांशी आजवर युगवाणी सातत्याने नाते जोडीत आली आहे.

'युगवाणी' समोर असलेला वाचकही वैशिष्टयपूर्ण आहे. तो रसिक आहे आणि मार्मिकही. तो 'युगवाणी' मनोरंजनासाठी वाचत नाही, तर सकस–हिणकस यातील फरक ओळखण्याच्या विवेकबुद्धीने वाचतो. 'युगवाणी'ची आशयघनता अशा वाचकावर आणि त्यातील वैविध्य हे 'युगवाणी'च्या लेखकवर्गावर अवलंबून आहे. नेमक्या विषयांच्या उपयुक्ततेबरोबर समकालीन ताजेपणाचे जे भान 'युगवाणी' जपते त्याचे श्रेय लेखक व वाचक दोघांनाही आहे. म्हणूनच 'युगवाणी' संमकालीन वाङ्मयरूपांचा आरसा ठरले आहे.

आता याच अंकाबरोबर आमचा, या संपादकमंडळाचा कार्यकाळ संपलेला आहे. तेव्हा नव्या अंकात नवे संपादकमंडळ आपल्या भेटीला येईल ! नव्या संपादकांना शुभेच्छा !

अक्षय कावळेकर

अनुक्रमणिका

मानाचे पान

नुकताच ख्यातनाम कथाकार वामन कृष्ण चोरघडे यांनी पंच्याहत्तरीत प्रवेश केला. वामनरावांचा जन्म १६ जुलै १९१४ चा! मराठी आणि अर्थशास्त्र अशा दोन्ही विषयात एम्. ए. ची पदवी मिळवलेले, अध्यापनक्षेत्र, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळाचे संचालन अशा बहुविध अनुभवांमधून समृद्ध झालेले वामनरावांचे व्यक्तित्व गांधीवादाच्या प्रभावातून घडलेले, लोक-साहित्याच्या व्यासंगावर परिपुष्ट झालेले असे आहे. १९७९ साली त्यांना अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदाचा सन्मानही लाभला. ओला दिवस, ओंजळ, ख्याल, वेला, सुषमा, संस्कार अशा कथासंग्रहांमधून चोरघड्यांची कथा फुललेली आहे. 'अतिथी देवो भव', 'संस्कार' या त्यांच्या काही गाजलेल्या कथा. कहाणी ऐका कहाणी भाग १, प्रभावती, चंपाराणी अशा लोकसाहित्याच्या जवळच्या वाटाही त्यांनी साहित्यात निर्मिल्या. 'जडण-घडण' या आत्मचरित्रातून त्यांनी आपल्या व्यक्तित्वाचे सगळे रंग प्रांजळपणे मांडले. साने गुरुजींच्या जीवनावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्नही त्यांनी केला. चोरघड्यांचे बहुविध कार्य हे असे महत्त्वाचे खरे, पण त्यांची महत्त्वाची भूमिका कथाकार हीच आहे यात काही शंका नाही. नवकथेच्या आधी कथेला नवा आकार देण्याचे, सूक्ष्मतेचे वरदान देण्याचे श्रेय कुसुमावती देशपांडे आणि वामन चोरघडे या दोन वैदर्भीय कथाकारांनाच द्यावे लागते. मनाच्या व्यामिश्रतेची आणि सखोलतेची जाणीव त्यांना १९३५ च्याच सुमारास झाली.

वामनरावांच्या या कार्याचा गौरव अनेक वेळा झालेला आहे. त्यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त 'युगवाणी' त्यांना विनम्र अभिवादन करीत आहे.

आशा सावदेकर

अनुक्रमणिका

भाऊराव : एक विसंगती एक सुसंगती

म. ल. वराडपांडे

भाऊसाहेब माडखोलकरांचे व माझे विशेष घनिष्ट म्हणावेत असे संबंध नव्हते इतकेच नव्हे तर त्यांच्या सहवासाचाही लाभ मला फारसा झालेला नव्हता असे मी म्हटले तर कित्येकांना आश्चर्य वाटेल तर कित्येक मला कृतघ्नसुद्धा म्हणतील. एखाद्या विशाल वटवृक्षाच्या सुखद छायेत काही क्षण घालविलेल्या पांथस्थाने पुढच्या प्रवासात त्याचे कृतज्ञतापूर्वक स्मरण करणे योग्यच होय, पण केवळ तेवढ्यावर त्याच्याशी नाते सांगणे हा प्रकार अतिरेकीच म्हणावा लागेल. राजपथावर सहज फिरणाऱ्या भटक्याची समारंभपूर्वक येणाऱ्या सम्राटाशी अवचित नजरानजर व्हावी आणि त्याचा फायदा घेऊन 'तुमच्या सम्राटाची माझी चांगली ओळख आहे' असे त्याने नगरजनांना सांगणे शुद्ध लफंगेपणाचे ठरेल.

नागपुरातच मुळी मी फार काळ नव्हतो. त्यातही भाऊसाहेबांच्या भेटीगाठीचे योगही विशेष आले असे म्हणता येणार नाही. ज्या काही भेटी झाल्या त्यातही सविस्तर, मनमोकळ्या, अंतरंग गोष्टी कधी झाल्याचे मला स्मरत नाही. भाऊसाहेबांच्या घरी माझे बरेच येणे जाणे होते पण त्याचे कारण भाऊसाहेबांच्या भेटीगाठी घेणे हे नसे. माझ्या येण्याची दखल ते मागन्याने घेत. माझी विचारपूस करीत आणि पुन्हा आपल्या वाचन–लेखनात गुंतून जात. पण या स्वल्प औपचारिक क्षणांनीसुद्धा आमच्यात सूक्ष्म आणि अस्पष्ट असे बंध निर्माण झाले असावेत. त्याचे नेमके स्वरूप काय होते हे मलाही सांगता येणार नाही. त्यांनी माझ्यावर जो निष्कारण लोभ केला, जे अनंत उपकार केले ते आम्हा दोघात निर्माण झालेल्या या सूक्ष्म, अनाकलनीय बंधामुळे की सहवासात येणाऱ्या कोणावरही, अगदी अपात्र व्यक्तीवरसुद्धा, उपकार करण्याच्या त्यांच्या सहजात वृत्तीमुळे हे सांगणे कठीण आहे. शीतल जलामुळे तुमचे तृषा–ताप शांत होतात हे खरे परंतु तुमचे तृषा-ताप शांत करण्यासाठी काही पाणी वाहत नसते. तो पाण्याचा सहजधर्म होय. तुम्ही पाणी ग्रहण केले हा योगायोग !

भाऊसाहेब माडखोलकरांशी प्रत्यक्ष परिचय होण्याचा योग आयुष्यात पुष्कळच उशीरा आला. परंतु मराठी साहित्याचे चांगले वाचन असूनसुद्धा लेखक म्हणून त्यांचे अस्तित्व काही फारसे कधी जाणवले नव्हते. याचे कारण भाऊसाहेब माडखोलकर लेखक म्हणून नगण्य होते असा नसून माझी वाचनपद्धतीच मुळी चुकीची होती. साहित्याची गोडी लागली म्हणून वेड्यासारखा वाचन सुटलो पण वाचतो आहे ते पुस्तक कोणाचे आहे याचे काही फारसे भान त्या झपाट्यात रहायचे नाही. एखादा भुकेला मनुष्य पक्वान्नांवर तुटून पडतांना अन्नदाता कोण आहे याची फारशी फिकर करीत नाही. त्याच पद्धतीचे हे वचन होते. शिवाय आमच्या वाचनालयातील जीर्ण पुस्तकांची सुरवातीची

पाने पुष्कळदा अदृश्य असत. याचा विचित्र परिणाम असा झाला की वाचले पुष्कळ गेले पण कोणाचे काय वाचले ह्याचा विवेक काही राहिला नाही. वाचनाच्या झपाट्यात भाऊसाहेब माडखोलकरांच्या कादंबऱ्या नक्कीच वाचनात आल्या असतील परंतु लेखकाचे नाव काही रजिस्टर झाले नाही, येवढे खरे !

त्या भरात मी देखील अचानक लिहायला लागलो आणि मग माझ्यालेखी दुसरा कोणी लेखकच उरला नाही. तशी आमच्या आर्वी गावात लेखक ही दुर्मिळ वस्तू होती. तेव्हा आजूबाजूच्या मंडळींनी औपचारिक का होईना कौतुक केलं, काहींनी जबरदस्तीने केले तर काहींना मी करायला लावले. ज्यांनी टीका करण्याचे यत्किंचितही धारिष्ट्य दाखविले त्यांना तुम्हाला साहित्यातले काय कळते म्हणून चूप बसविले. या सर्व डिंगाण्याच्या मागे साहित्य निर्मिती या नावाने माझ्या नावाने असलेली छापील जमा म्हणजे खेळगडी मासिकात प्रकाशित झालेली एक चार ओळींची बालकथा. आमच्या द्विभाषिक गावात माझ्याच वयाचा हिंदी कवी होता. पंजाबी फॉरेस्ट ऑफिसरच्या देखण्या मुलीला त्याने कुठल्याशा पुस्तकातून एक कविता घालून पाठविली त्याचा जो अभूतपूर्व गोंधळ गावात झाला त्यामुळे त्याची साहित्यसेवा प्रकाशात आली होती. तो माझ्या लिखाणाचे कौतुक करायचा कारण मी त्याला या गोंधळातून वाचवले होते आणि दुसरे व महत्वाचे कारण म्हणजे त्याला मराठी फारसे येत नव्हते. ह्या उपकाराची उदार परतफेड म्हणून मी देखील त्याच्या हिंदी कवितांची मुशायरा पद्धतीने तारीफ करीत असे. इथे कुणाला हिंदी येत होते ?

परंतु लवकरच माझ्या या साहित्यिक उपद्व्यापाला प्रतिस्पर्धी आर्वीत निर्माण झाला. त्याचे लेखन स्वच्छ, गंभीर व सकस असे व त्याला वैचारिकतेची डूब असे. त्याने पुढे महाराष्ट्र शासनाचा पुरस्कारही मिळवला. त्याचे नाव होते नाना ठेंगडी. साहित्य हा आमच्या खोडकर उपद्व्यापांचा भाग होता तर नानाची ती जीवननिष्ठा होती, त्याच्या कथा यशवंत मासिकात छापून येऊ लागल्या आणि आमच्या आसनाला सुरंग लागला.

त्यावेळी यशवंत हे काही सामान्य मासिक नव्हते. तेव्हा नानाचा हा पराक्रम पचवणे जरा जडच गेले. 'त्यात काय आहे ? मी सुद्धा अशा कथा लिहू शकतो' अशा वल्गना दवल्या आवाजात करायला सुरवात करून माझ्या असूयेवर पांघरुण घालायचा प्रयत्न करू लागलो. पण या प्रयत्नाचे दौर्बल्य लक्षात येताच ज्या मंडळींकडून मी जबरदस्तीने कौतुक वसूल केले त्यांनी 'यशवंत तुझ्या कथा नक्कीच छापेल', असे हेटाळणीच्या स्वरात म्हणायला सुरवात केली.

शेवटी हे सर्व जरा असह्यच झाल्यामुळे मीही चांगल्या चार-पाच कथा लिहून काढल्या आणि दिल्या पाठवून 'यशवंत'कडे. त्या जेव्हा एकामागून एक छापून यायल्या लागल्या तेव्हा इतरेजन तर काय मी स्वतःच थक्क झालो. त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. माझा साहित्यिक आत्मविश्वास भलताच वाढला आणि यशवंत मासिक बंद पडले.

तर असा हा एवंगुणविशिष्ट नाना अचानक एके दिवशी 'तरुण-भारता'त उपसंपादक झाला आणि तरुण-भारत, भाऊसाहेब माडखोलकर ही नावे थेट आमच्या वर्तुळापर्यंत येऊन पोचली.

त्याच सुमारास भाऊसाहेब माडखोलकरांच्या वाङ्मयाचा पुसटता परिचय होण्याचा देखील योग आयुष्यात येऊन गेला. त्यांचे 'चिपळूणकर : काल आणि कर्तृत्व' हे पुस्तक अभ्यासक्रमात नेमले होते म्हणून ते वाचण्याची आपत्ती कोसळून आमची अक्षरशः दाणादाण उडाली. त्यांच्या संस्कृतप्रचुर प्रौढ शैलीने भारावून गेलेल्या डॉ. मा. गो. देशमुखांनी ती घोटून आत्मसात करण्याचा प्रयत्न केला तर त्याच शैलीने धामाधूम झाल्यामुळे आम्ही गडवाटा शोधू लागलो. शेवटी एका कल्पक सहाध्यायाने गाईड वाचण्याचा सल्ला देऊन आमचे डीहायड्रेशन होता होता आम्हाला

वाचवले, तेव्हा मला विद्यालयीन आयुष्यातसुद्धा भाऊसाहेबांचा वाङ्मयीन परिचयाचा योग येऊनसुद्धा टळला. तेव्हा त्यांचा ग्रंथ वाचण्याऐवजी 'भाऊसाहेब मेड इझी' वाचून काय निभले याचाच संतोष झाला. मात्र त्यावेळी हा लेखक आशय आणि शैली ह्या दोन्ही दृष्टींनी किती समृद्ध आहे याची ठसका बसण्याइतकी कल्पना अवश्य आली.

तेव्हा सांगायचे म्हणजे नाना तरुण-भारतात गेल्यामुळे पुन्हा आमच्या असूयेला फाटे फुटू लागले. त्यातही 'चिपळूणकर : काळ आणि कर्तृत्व.' अशा जबरदस्त ग्रंथाचा लेखक असलेल्या माडखोलकरांसारख्या संपादकाच्या संपर्कात येऊन त्यांच्यावर तो स्व-कर्तृत्वाची छाप मारण्याच्या स्थितीत आहे ही टोचणी होतीच. तेव्हा आपणही एक गंभीर, प्रौढ लेख लिहून नानापेक्षाही श्रेष्ठ लेखक आर्वीत विद्यमान आहेत हे तरुण-भारताच्या संपादकांना पटवून द्यावे असा विचार मनात गोंधळ घालू लागला.

त्यातूनच रुक्मिणीचे माहेर असलेल्या कुंडिनपुरावरील लेख सिद्ध झाला. हे गाव आर्वीपासून सहा-सात मैलांवरच काय ते होते. तो संपूर्ण परिसर पायाखाली घातला, पौराणिक व ऐतिहासिक संदर्भ गोळा केले, आणि लेखणी सरसावून चांगला बारा कॉलमी लेख लिहिला. या लेखाने अनेक पराक्रम केले एक म्हणजे महामहोपाध्याय मिराशींनी त्यावर चार पाने भरून अनुकूल अभिप्राय लिहिला. त्या लेखात 'वाकाटक' हा शब्द १०-१२ वेळा आल्यामुळे ते प्रसन्न झाले असावेत अशी एक खोडसाळ टीका मित्रांनी केलीच. दुसरा म्हणजे या लेखामुळे नंतर कुंडिनपुरास मोठ्या प्रमाणावर उत्खनन सुरू झाले (यात काही मिळाले नाही हा भाग वेगळा). आणि लवकरच कुंडिनपूर एक की दोन हा वादही सुरू झाला (लेखाच्या यशाचे प्रमाण).

परंतु हा लेख भाऊसाहेबांवर काही प्रभाव पाडू शकला नाही. त्यांचे यासंबंधी आलेले पत्र काही फारसे प्रसन्न नव्हते. लेख चांगला असून ऐतिहासिक महत्त्वाचा आहे म्हणूनच केवळ आम्ही तो छापत आहोत परंतु तुमची कमालीची अशुद्ध भाषा शुद्ध करताना आम्हाला विलक्षण त्रास होत आहे म्हणून त्यांनी तक्रार केली. तुमच्या दहा ओळींच्या कव्हरिंग लेटरमध्ये शुद्धलेखनाच्या २२ चुका आहेत हे लिहूनच ते थांबले नाहीत तर सोबत ते पत्रही चुका लाल शाईने रेखित करून त्यांनी जोडले होते. हे भाऊसाहेब माडखोलकरांचे मला आलेले पहिले पत्र. माझ्या भाषेच्या अशुद्धतेबद्दलचे त्यांचे मत काही पुढेही बदलले नाही. कोल्हटकर आणि हिराबाई ह्या पुस्तकाला त्यांनी जी प्रदीर्घ प्रस्तावना लिहिली त्यातही माझ्या लेखनविषयक या वैगुण्याविषयी त्यांनी परखडपणे लिहिले. या पुस्तकाचा जो प्रकाशन समारंभ मुंबईस झाला त्यात बोलतांना डॉ. मा. गो. देशमुख म्हणाले की वऱ्हाडपांड्याची भाषा असावी तितकी शुद्ध नाही असे श्री. माडखोलकरांना वाटत असेल तर त्याला वस्तुतः मी जबाबदार आहे कारण त्यांना मराठी मी शिकवले होते.

भाषाशुद्धतेविषयी ते किती आग्रही होते याची कल्पना मला एका विलक्षण प्रसंगावरून आली. कोल्हटकर शताब्दीचा सांगता समारंभ कोल्हापुरास होता. त्यावेळी भाऊसाहेबांच्या दिमतीस एक पोरसवदा लेखनिक प्राचार्य भोसल्यांनी दिला होता. त्यामुळे ते खुश होते. आम्ही सर्व गाडीने फिरायला जात असता त्यांचे लक्ष लेखनिकाच्या वहीकडे गेले. त्यावर प्राध्यापक अमुकतमूक असे लिहिले होते. भाऊसाहेबांनी चकित होऊन हे प्राध्यापक कोण ? म्हणून पृच्छा केली. तो मीच हे त्या पोरसवदा गृहस्थाने आपली छाती फुगवून सांगितल्याबरोबर तुम्ही काय शिकवता ? असा प्रश्न भाऊसाहेबांनी केला. 'मराठी' असे उत्तर त्यांनी देताच भाऊसाहेबांच्या चेहऱ्याचे भाव झपाट्याने बदलले. त्यांनी आरडाओरडा करून गाडी थांबवली. 'एका प्रोफेसराकडून मी सेवा घेतली. कोठे फेडू हे पाप' असे म्हणत त्यांनी अक्षरशः गोंधळ मचवून दिला. त्या बिचाऱ्या प्राध्यापकाची घाबरगुंडी उडाली. 'तुम्ही ताबडतोब आपल्या कॉलेजमध्ये परत जा'

असा धोषा त्यांनी लावला. तो बिचारा प्राध्यापक ‘ माझी नोकरी जाईल हो ’ म्हणून केविलवाण्या स्वरात विनवू लागला. ‘ असे काही होणार नाही. पण तुम्ही जा तुमचे विद्यार्थी वाट पहात असतील ’ असे पालुपद भाऊसाहेबांनी लावले. शेवटी तो प्राध्यापक गाडीतून उतरला तेव्हाच भाऊसाहेब शांत झाले. काही वेळाने मी हिंमत धरून तुम्ही असे का केलेत म्हणून विचारले तर ‘ लेखन शुद्ध येणारा मराठीचा प्राध्यापक तुम्ही पाहिला आहात का मनोहरराव ? ’ असा प्रश्न त्यांनी पुन्हा उसळून विचारला.

भाऊसाहेबांच्या मनोज्ञ स्वभावविशेषांवर प्रकाश टाकणाऱ्या एक दोन आठवणी कोल्हापूरच्याच आहेत. भाऊसाहेब जेथे जात तेथे त्यांची व्यवस्था उत्तम होईच व त्यांच्या दर्जाला अनुरूप मानसन्मानही त्यांच्याकडे चालून येत. पण तसाच व्यवहार त्यांच्याबरोबरच्या माणसांशीही व्हावा याविषयी त्यांचा कटाक्ष असे. कोल्हापुरास कोल्हटकर शताब्दी समितीची मिटिंग होती. तेथील मुक्कामात मी त्यांच्यासोबत रहावे अशी इच्छा त्यांनी मला दिल्लीला पत्र पाठवून कळवली होती त्याप्रमाणे मी कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाच्या गेस्ट हाऊसमधे स्वतंत्र खोली घेऊन राहिलो होतो. जेव्हा कुलगुरू भाऊसाहेबांच्या भेटीला आले तेव्हा ते त्यांना घेऊन माझ्या खोलीत आले व कुलगुरुंनी मोठ्या आस्थेने माझीही विचारपूस केली. त्यांनी आमची व्यवस्था पहायला तेथल्या एका महाविद्यालयाच्या प्राचार्यांना सांगितले. त्या प्राचार्यांना पहाताच माझे धाबे दणाणले कारण ते माझे सन्माननीय गुरू असून अमरावतीच्या विदर्भ महाविद्यालयात त्यांनी मला इतिहास शिकवला होता. भाऊसाहेबांचे एक बरे होते. त्यांचा वय, दर्जा याला हे सन्मान योग्य होते. प्राचार्य जेव्हा माझ्या खोलीत विचारपूस करायला आले तेव्हा मी चक्क लपून बसलो.

पण तेवढ्यावर भागले नाही नाही. समितीची मिटिंग एका शाळेत शिक्षणमंत्री श्री. नामजोशी ह्यांच्या अध्यक्षतेखाली होती. रस्ता ओलांडला की पुढेच एक सभागृह होते त्यात सार्वजनिक समारंभ होता. भाऊसाहेब, नामजोशी वगैरे मंडळी गाडीत बसली पायी जाण्याचेच अंतर असल्यामुळे मी रेंगाळलो. तेवढ्यात भाऊसाहेबांनी वराडपांडे कुठे गेले म्हणून अख्खे कोल्हापूर डोक्यावर घेतले. काही कार्यकर्त्यांनी मला शोधून काढून त्यांच्या स्वाधीन केले तेव्हाच मंत्र्यांची गाडी पुढे जाऊ शकली.

भाऊसाहेब मला भाऊसाहेब खांडेकरांकडेसुद्धा घेऊन गेले. मला विलक्षण संकोच वाटत होता कारण त्यांच्या गुरुंच्या व हिराबाईंच्या संबंधात मी जे काही लिहिले त्यामुळे खांडेकरांचा माझ्यावर रोष ओढवलेला होता. त्याची अभिव्यक्ती कोल्हटकरांच्या आत्मवृत्ताच्या नव्या आवृत्तीला त्यांनी जी प्रस्तावना जोडली होती त्यातही झाली होती. खांडेकरांना त्यावेळी दिसत नव्हते. मला त्यांच्यापुढे उभे करून भाऊसाहेब नाटकीपणे म्हणाले, ‘ भाऊसाहेब, तुम्ही एका फार मोठ्या दृष्टीसुखाला मुकला आहात. तुमच्या भेटीला कोण आले आहे याची कल्पना आहे का तुम्हाला ?’ त्यावर खांडेकरांनी ‘ कोण बरं ?’ म्हणून विचारल्यावर भाऊसाहेबांनी त्यांना माझे नाव सांगितले. ते ऐकून खांडेकरांचा चेहरा काही फारसा चांगला झाला नाही. भाऊसाहेब मात्र मिष्किलपणे हसत आपल्या वात्रटपणामुळे उडालेल्या गोंधळाचा आस्वाद घेत होते.

परंतु खांडेकरांच्याबाबतील ते किती हळवे आणि सहृदय आहेत ह्याचा प्रत्ययही त्यापूर्वी मला येऊन गेला होता. कोल्हटकरांच्या आत्मवृत्ताच्या प्रस्तावनेत यांनी जे लिहिले होते त्याचा खरपूस समाचार एक टीकालेख लिहून घेण्याचा माझा मनोदय भाऊसाहेब माडखोलकरांना कळविला तेव्हा त्यांनी फार मोलांचा उपदेश केला. तुमचा टीकालेख मुद्देसूद, साधार, असावा त्याला व्यक्तिद्वेषाचा स्पर्शही असू नये असे त्यांनी मला बजावले. खांडेकराची वृद्धावस्था व विकल प्रकृती लक्षात घेऊन

त्यांच्या मनाला लागेल असे तुम्ही काहीही लिहता कामा नये अशी आज्ञाच त्यांनी मला केली. त्यांच्या मनाची ही ऋजुता विलोभनीय तर खरीच पण टीकालेखनाविषयी काय पथ्ये पाळावी याचाही तो वस्तुपाठ होता.

तुलसीदासाच्या रामायणात एक ओळ आहे–'हरि अनंत हरिकथा अनंता.' त्याप्रमाणे भाऊसाहेबांच्या आठवणी आहेत. अनेक गुणविशेषांनी विनटलेले त्यांचे व्यक्तिमत्व खऱ्या अर्थाने अलौकिक होते. कित्येक परस्परविरोधी वैशिष्टचे त्यांच्या स्वभावात सुखेनैव नांदत त्यामुळे कोणाला ते असे वाटत वर कोणाला तसे. ते नेमके कसे होते हे कोणाला कळले होते की नाही कोण जाणे ! ■

नवी दिल्ली

ग. त्र्यं माडखोलकरांच्या कादंबऱ्यावरील मार्क्सवादाचा परिणाम !

डॉ. श्रीपाल सबनीस, धुळे

मराठी कादंबरीच्या क्षेत्रात ग. त्र्यं. माडखोलकरांचे स्थान एक रंजनवादी कादंबरीकार म्हणून महत्त्वाचे मानले गेले आहे. कलावादाचा उद्‌घोष करता–करता फडके तंत्रवादी कादंबरीकार ठरले आणि जीवनवादाचा पुरस्कार करताना खांडेकरांच्या कादंबऱ्यांनी फडक्यांप्रमाणेच वाचकांचे रंजन केले. माडखोलकरही फडके–खांडेकरांच्याच वाटेने गेले कारण रंजनाच्या कक्षा ओलांडून कलात्मक सामर्थ्य प्रगट करण्याची किमया फडके-खांडेकरांच्याप्रमाणे माडखोलकरानाही फारशी साध्य झाली नाही. अर्थात वाचकांच्या दृष्टीने अशा रंजनवादी कादंबऱ्यांचे महत्त्व कमी मानण्याचे कारण नाही. कलेच्या विश्वात रंजनाच्या प्रेरणा दुय्यम असल्या तरी रंजनवादी साहित्याचे, आशय व अभिव्यक्तीच्यां अंगाने वेगळे महत्त्वपूर्ण योगदान, संपूर्ण कलाविश्वाला लाभतेच !

ग. त्र्यं. माडखोलकरांच्या कादंबऱ्यांचा विचार करताना अनेक टीकाकारांनी असे अभिप्राय नोंदविले आहेत की, माडखोलकर हे एक 'यशस्वी चावट कादंबरीकार' असावेत असा ग्रह वाचकांचा व्हावा. कुसुमावती देशपांडे यांनी माडखोलकरांच्या कादंबऱ्यात 'कामुकतेचा औचित्य-विहीन आविष्कार, स्त्रियांची भडक वर्णने व वैषयिक संबंधाचे उद्वेगजनक चित्रण' असल्याचा निर्वाळा दिला असून रा. शं. वाळिंबे यांनी माडखोलकरांवर केलेल्या 'उत्तेजक शृंगार वर्णनां'च्या संदर्भातील आरोपाचे समर्थनही केले आहे. नरहर कुरुंदकरांनी 'गळयाच्या खाली पोटऱ्यापर्यंतचे क्षेत्र खास माडखोलकरांचे आहे.' असा उपरोधपूर्ण अभिप्राय 'माडखोलकरी देहवर्णना'च्या संदर्भात नोंदवून 'माडखोलकरांचा शृंगार हा भोगाचाच एक प्रकार असतो,' असा दोषारोप ठामपणे केला आहे.

माडखोलकरांच्या कादंबऱ्यातील कलात्मक उणेपणा मान्य करूनही त्यांच्या वाङ्‌मयातील मार्क्सवादी जाणिवांचे सामर्थ्य दुर्लक्षिण्यासारखे नाही. याची नोंद समीक्षकांनी पुरेशा गांभीर्याने घेतलेली दिसत नाही. याचे कारण मराठी समीक्षक माडखोलकरांच्या कादंबरी वाङ्‌मयाचे यथार्थ मूल्यमापन करताना मार्क्सवादी तत्त्वज्ञानाच्या अपुऱ्या ज्ञानामुळे आणि उपेक्षावृत्तीमुळे आकलनाच्या पातळीवर कमी पडले. 'मुक्तात्मा' ते 'अकेला' या कादंबरी विश्वाचा आढावा घेताना वाळिंबे, कुरुंदकर, कुसुमावती देशपांडे यांच्यासह मा. का. देशपांडे–बांदिवडेकरांपर्यंत माडखोलकरांच्या मार्क्सवादी चिंतनाबद्दल कोणीही सम्यक दृष्टीने गौरवोद्‌गार काढले नाहीत. माडखोलकरांच्या कादंबऱ्यांचे मार्क्सवादी दृष्टिकोनातून मूल्यमापन करण्याचा प्रयत्न खऱ्या अर्थाने आजवर झालाच नाही एका ठराविक साच्यातून त्यांच्या कादंबऱ्या तपासल्या गेल्या आणि म्हणूनच त्यातील 'मार्क्सवादी प्रभाव' समीक्षकांच्या दप्तरी नोंदला गेला नाही. कुसुमावती देशपांडे, डॉ. बांदिवडेकर यांनी माडखोलकरांच्या कादंबऱ्यातील राजकीय चर्चेचा आढावा घेताना गांधीवाद,

समाजवाद, व साम्यवाद या अनुषंगाने आपले अभिप्राय नोंदले आहेत पण प्रामुख्याने समाजवाद-साम्यवाद संदर्भातील त्यांचे निष्कर्ष माडखोलकरांच्या वैचारिक भूमिकेला संपूर्ण न्याय देणारे नसून बरेच उथळ व त्रोटकही आहेत, त्याशिवाय कुसुमावतीबाईंना महाराष्ट्रातील एक 'राजकीय कादंबरीकार म्हणून माडखोलकरांच्यात वैगुण्य' दिसले नव्हते. आक्षेप 'वैगुण्य दिसले' याला नसून 'फक्त वैगुण्य दिसले' याला आहे.

मराठी कादंबरी वाङ्मयात माडखोलकरांच्या काही कादंबऱ्या वेगवेगळ्या कारणासाठी बहुचर्चीत ठरल्या आहेत. त्यांच्या एकूण २० कादंबऱ्या असून मार्क्सवादाचा परिणाम शोधण्याच्या दृष्टीने काही मोजक्या कादंबऱ्यांचा अभ्यासच आवश्यक ठरला अर्थात माडखोलकरांच्या कादंबऱ्यातील मार्क्सवादी चिंतनाचे स्वरूप, त्यांच्या नायकांना व व्यक्तिरेखांना असलेली मार्क्सवादी जाणीव, मार्क्सवादाकडे पाहण्याचा लेखकाचा दृष्टिकोन आणि वाचकांवर होणारा या मार्क्सवादी लेखनाचा परिणाम या संदर्भात व कक्षेतच मूल्यमापन केले आहे. हा संदर्भ पूर्णपणे नवा नसला तरी या संदर्भातील माडखोलकरांच्या कादंबऱ्यातील सामर्थ्य वा दोषाबाबतचे मूल्यमापन निश्चितच इतर समीक्षकांच्यापेक्षा वेगळे व नवे असण्याची शक्यता नम्रपणे नोंदविणे आवश्यक आहे. तेव्हा मुक्तात्मा, कांता, चंदनवाडी, भंगलेले देऊळ इत्यादी कादंबऱ्यांचे मूल्यमापन करताना त्यातील व्यक्तिरेखा, संविधान रचना, शैली, संवाद यांच्यातील गुणदोषांची चर्चा या लेखात होणार नाही. त्याचे कारण, या कादंबऱ्यात गुणापेक्षा दोष अधिक आहेत हे नसून या लेखाच्या भूमिकेतील-कक्षेतील हे मुद्दे नव्हेत, हे आहे.

मराठी कादंबरीच्या प्रवाहातील मार्क्सवादी प्रभावचिन्हे शोधतांना वा. म. जोशी, डॉ. केतकर, वरेरकर यांची नावे महत्त्वाची आहेत. माडखोलकरांच्याही अगोदर या कादंबरीकारांनी आपल्या कलाकृतीमधून मार्क्सवादाला सुसंवादी जाणिवांचे अविष्करण केले आहे. त्यांच्या परिणामक्षमतेबाबत वा स्वरुपाबाबत मतभेद शक्य असले तरी मार्क्सवादाची चर्चा त्यांच्या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून मराठी कादंबरीत यांनी प्रथम आणली हे त्यांचे श्रेय आहे.

१९३३ मध्ये प्रकाशीत झालेली माडखोलकरांची 'मुक्तात्मा' ही कादंबरी मार्क्सवादाचा परिणाम शोधण्याच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. मराठी कादंबरीत खालच्या थरातील व्यक्तिरेखेकडे नायकपद देण्याचा प्रयत्न माडखोलकरांच्या पूर्वीही झाला. पण मुक्तात्माने प्रथमच मार्क्सवादी विचारसणीतून समाज बदलविण्यासाठी जीवन वेचणारा साम्यवादी नायक चंद्रशेखरच्या रूपाने वाचकांना दिला. 'माडखोलकरांना सुद्धा मुक्तात्मा नंतर चंद्रशेखर सारखा साम्यवादी नायक नंतरच्या कादंबऱ्यात निर्माण करता आलेला नाही.' या आशयाचा डॉ. वांदिवडेकरानी दिलेला अभिप्राय बोलका आहे. पण प्रश्न केवळ नायकाचा नसून कादंबरीत आविष्कृत झालेल्या जीवनदर्शनाचा आणि जीवनविषयक आकलनाचा आहे. त्यासाठी नायक-नायिका, गौण व्यक्तिरेखा, घटना-प्रसंग इत्यादींच्या आधारे मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा प्रभाव शोधावा लागतो.

चंद्रशेखर हा एका नायिकिणीचा मुलगा असून तो प्रथमपासून शेवटपर्यंत साम्यवादी तत्त्वज्ञानाने भारलेला आहे. त्याच्या साम्यवादी निष्ठा अविचल असून क्रांतिकारी साम्यवादी नेता वीरेंद्र यांचा तो अनुयायी आहे. मुंबईमध्ये कामगार चळवळीत त्याचा प्रमुख सहभाग असून वीरेंद्राचा जाहिरनामा प्रसिद्ध करणे, संपकाळात भूमिगत होणे व शेवटी पोलिसांच्या स्वाधीन होणे एवढीच कृती 'मुक्तात्मा' कादंबरीतील नायकाकडून घडते. साम्यवादी नायकाकडून एवढीच कृती झाल्याबद्दल आणि केवळ 'अनेकांशी वाद घालण्या'बद्दल कुसुमावती देशपांडे यांनी माडखोलकरांच्यावर 'वावदुकपणाचा व कल्पनारम्यतेचा' आरोप केला आहे. हा आरोप पूर्णांशाने खरा नाही.

चंद्रशेखरच्या जीवननिष्ठेचा अविभाज्य भाग बनलेला मार्क्सवाद समाजात रुजवितांना आणि क्रांती करून समाज बदल घडविताना कृतीच्या परंपरा निर्माण कराव्या लागतात याची जाण नायकाला आहेच. मार्क्सवादी दर्शनातील व प्रत्यक्ष व्यवहारातील अनेक निसरड्या जागेवर चंद्रशेखरच्या वाद-विवादातून अनेकवेळा लख्ख प्रकाश पडतो. चिंतनाची खोली व सत्य दिग्दर्शनाची नवी दिशा चंद्रशेखरच्या वक्तव्यातून प्रगट झाल्यामुळे माडखोलकरांचे मार्क्सवाद विषयक ज्ञान निश्चितच प्रगल्भ स्वरूपाचे होते यात शंका नाही.

'समाजसत्तेविषयीच्या तत्वज्ञानाच्या कल्पना आता इतक्या पुढे गेलेल्या आहेत की, मार्क्सला सुद्धा प्रमाण मानण्याची आज पुष्कळांची तयारी नाही.' तत्कालीन जागतिक वास्तवता चंद्रशेखरच्या तोंडून माडखोलकरांनी स्पष्ट केली आहे. अर्थातच परंपरावादी मार्क्सवादी पोथीनिष्ठ असून त्याविरुद्धची प्रतिक्रिया म्हणजे शब्दप्रामाण्यापेक्षा बुद्धिप्रामाण्य महत्त्वाचे मानून मार्क्सचा विचार अंतिम न मानता मार्क्सवादी कसोटीवर मार्क्सचीही तपासणी करण्याची गरज काही विचारवंतांना–नेत्यांना भासली. त्याचे प्रतिबिंब उपरोक्त वक्तव्यात पडले आहे.

महाराष्ट्रातील 'मवाळांच्या नेभळट राजकीय मतामध्ये जखडलेला समाजसत्तावाद हा कधीही विचारक्रांती घडवू शकणार नाही.' कारण मवाळपंथी मंडळी 'सांगून सवरून साम्राज्यवादी'च या चंद्रशेखरच्या अभिप्रायातही स्वातंत्र्यप्राप्तीच्या मवाळपंथी ध्येयवादातील साम्राज्यवादाचे छुपे रूप प्रगट झाले असून वर्गीय क्रांतीला असलेल्या स्वातंत्र्यवादी मवाळपंथीयांच्या धोक्याची जाणीव स्पष्ट होते.

'महाराष्ट्रातील सुधारकांना जातिभेद नको असला तरी वर्गसंघर्षाचे मात्र वावडे आहे.' 'मजुराविषयी या सुधारकांना कळवळा वाटत असला तरी वर्गभेद मात्र त्यांना नको आहे.' चंद्रशेखरचे हे भाष्य जाति-संघर्ष व वर्ग-संघर्ष या आंबेडकरी चळवळ व मार्क्सवादी चळवळीतील वजाबाकीवर लक्ष केंद्रित करते. या दोन्ही चळवळी एकूणच मानवमुक्ती लढ्याच्या गाभ्याच्या चळवळी असूनही महाराष्ट्रात-भारतात जातिअंताची चळवळ व वर्गअंताची चळवळ एकरूप झाली नाही ही कुरूप वास्तवता जेव्हा 'मुक्तात्मा'चा नायक चर्चेत मांडतो तेव्हा भारतीय क्रांती प्रवाहातील विसंवादाचे दर्शन घडल्यावाचून रहात नाही. सुधारकांचे कर्तृत्व त्यांच्या भूतदयावादी चौकटीत मर्यादित झाल्याचे चित्र या चिंतनातून आकार घेते आणि मार्क्सवादी क्रांती या देशात घडविण्यासाठी सर्व क्रांतिवादी प्रवाहाच्या एकजुटीची आवश्यकताही पटू लागते.

या देशातील साम्यवाद्यांना 'म. गांधींनी स्थापन केलेला पंथ व पक्ष प्रथमतः नष्ट करण्याचे कार्य करावे लागेल.' अशी टोकाची भूमिका जेव्हा चंद्रशेखर मांडतो तेव्हा संवेदनाक्षम व विचारी वाचकाला धक्का बसल्यावाचून रहात नाही. गांधींच्या कर्तृत्वाकडे मार्क्सवादी दृष्टीने पाहण्याची आवश्यकता या विधानातून सिद्ध होते. गांधीवाद आणि मार्क्सवाद या दोन्ही दर्शनात गाभ्याचे मतभेद आहेत की तपशिलाचे ? गांधीवाद व मार्क्सवाद या दोन्ही तत्त्वज्ञानांचा केंद्रबिंदू मानवमुक्ती असताना,-अर्थात प्रेरणा एकच असतानाही टोकाचे मतभेद का असावेत ? या आणि असंख्य प्रश्नांची उत्तरे शोधण्याची गरज 'मुक्तात्मा' वाचून वाढते.

गांधींबद्दल माडखोलकरांना काय वाटते ही गोष्ट अलाहिदा ! चंद्रशेखरला मात्र गांधींचा तात्विक राग आहे. "मजुरांना हवेशीर चाळी बांधून दिल्यावर मग टाटा टोलेजंग बंगल्यात राहिला अन् लक्षावधी रुपयाचा नफा त्यानं दाबला तरी गांधींना काही वाटणार नाही." चंद्रशेखरच्या या म्हणण्यात निश्चितच अर्थ आहे. मार्क्सवादी तत्त्वज्ञानाची शास्त्रीय जाण या उद्गारातून स्पष्ट होते. तसेच मानवी हक्काची शास्त्रीय भूमिका आणि भोंगळ भूतदयावादी भूमिका यांच्यातील सूक्ष्म संघर्षही सूचित होतो. प्रश्न काही मजुरांना हवेशीर चाळी बांधून देण्याचा नाहीच, एकूणच समाजजीवनातील

उत्पादन साधनांच्या मालकीतून अव्याहत निर्माण होणाऱ्या नफेखोरीचा, श्रमाच्या चोरीचा आणि माणसाने माणसाच्या केलेल्या शोषणाचा आहे. या मूळ ऐतिहासिक भौतिकवादी, मार्क्सप्रणित सत्यापर्यंत चंद्रशेखर वाचकाला आणून पोहचवितो आणि या सत्याच्या अलिकडील टप्प्यावर थांबलेल्या दार्शनिकतेची आणि व्यवहाराची मर्यादाही लक्षात आणून देतो. टाटाच्या नफेखोरीचा पुरस्कार करणारे गांधी, मजुरांचा कळवळा दाखवूनही साम्यवादी चंद्रशेखरला परवडू शकत नाहीत ही वैचारिक जाण मराठी कादंबरीत 'मुक्तात्मा 'ने प्रथम आणली. कलेच्या परिणामात वैचारिक सामर्थ्याचे योगदान महत्त्वाचे असतेच 'मुक्तात्मा 'चा विचार या योगदानाच्या संदर्भात कोणत्याही समीक्षकाने केला नाही याचे आश्चर्य नोंदविणे भाग आहे.

क्रांतीची आवश्यकता, क्रांतीचे स्वरूप, क्रांतीची तयारी, तिचे परिणाम, तिची संरचना, तत्त्वज्ञान, क्रांतिविरोधी शक्ती, क्रांतिप्रवाहातील परिहार्य–अपरिहार्य विसंवाद, क्रांतीच्या यशाची दिशा या सर्वांचा उहापोह 'मुक्तात्मा 'मध्ये माडखोलकरांनी केला आहे. पण एवढे करूनही माडखोलकरांच्या पदरात समीक्षकांनी त्यांचे श्रेय टाकताना करंटेपणा दाखवला.

सामान्य जनता सहजासहजी क्रांतिसन्मुख होत नाही आणि लोकांच्या कलाने क्रांतीची वाट पहाणे तर वेडेपणाचे ठरते हे दुहेरी सूत्र स्पष्ट करताना मुक्तात्माचा नायक चंद्रशेखर म्हणतो, "लोक काय सुखासुखी कधी तयार होतात का क्रांतीला ? कोणत्याही सुधारणेच्या बाबतीत लोकांच्या तयारीची वाट पहायचं ठरवलं म्हणजे जगाच्या अंतापर्यंत स्वस्थ बसावं लागेल." अर्थात समाजाच्या प्रगतीसाठी सुधारणा आवश्यक असून त्या जनसामान्यांच्या गळी उतरविण्याच्या आटोकाट प्रयत्न व्हायला हवा. जनतेच्या इच्छेवर क्रांतीचे कार्य सोपवून यशाची अपेक्षा करता येत नसते हे चिंतन-सूत्र चंद्रशेखर सारखा साम्यवादी नायक जेव्हा बोलू लागतो तेव्हा मार्क्सवादी क्रांतीच्या अंमलबजावणीच्या व्यावहारिक अडचणीवर मात करण्याचा जालिम उपाय हाताशी लागल्याचे समाधान मिळते.

भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील विविध प्रवाहांच्या संदर्भात चंद्रशेखरने केलेली भाष्ये, भारतीय इतिहासाच्या मूल्यमापनाला नवे परिमाण देणारे आहेत. 'बेझंट बाईंची होमरुल चळवळ ही साम्राज्यनिष्ठ असून' 'इंग्लंडविरुद्ध भडकलेले लोकमत पुन्हा या होमरुल चळवळीमुळंच थाऱ्यावर आलं' आणि "या चळवळीचा पाया सैन्यभरती हा असून ब्रिटिश सत्तेविरुद्ध बिथरलेल्या हिंदुस्थानला या चळवळीने साम्राज्यवादी बनवून टाकलं." मुक्तात्माचा नायक साम्यवादी तत्वाचा पुरस्कर्ता असल्यानेच भारतीय स्वातंत्र्यमूल्याच्या आड लपलेल्या साम्राज्यवादी परिणामाचेच गुपित खुले करण्याचे महत्कार्य केले. चंद्रशेखरने बेझंटबाईंना चक्क 'साम्राज्यवादिनी' ठरवून 'ब्रह्मविद्येच्या नावाखाली साम्राज्यवादाचा प्रसार केल्याचा' आरोप त्याने बाईवर ठेवला आहे.

भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाच्या इतिहासाचे हे नवे मूल्यमापन ऐतिहासिक भौतिकवादाच्या सूत्रानुसार केले असल्याने रूढ ऐतिहासिक निष्कर्ष फोल ठरून या संदर्भात नवीन मांडामांड करणे आवश्यक असल्याचे लक्षात येते. रूढ समज या नव्या आकलनामुळे बाद ठरत आहेत आणि इतिहासाचे चूक विश्लेषण दुरुस्त करून भारताचा नवा इतिहास निर्माण करताना या नव्या मूलभूत चिंतनाची नितांत गरज सिद्ध झाली आहे.

धर्म आणि साम्राज्यवाद यांचे नाते जवळचे असून शोषण-प्रक्रिया कायम ठेवण्यास या नात्यातील अर्थपूर्णता कशी कारणीभूत ठरते याचा ठसा खालील विधानात उमटलेला आहे. ललिता आणि चंद्रशेखर यांच्यात झालेल्या चर्चेत "धर्माचा व साम्राज्याचा काय संबंध ?" या ललिताच्या प्रश्नाला उत्तर देताना चंद्रशेखर म्हणतो, "धर्माच्या व साम्राज्यासंबंधाची जिवंत स्मारकं मी तुम्हाला हवी तितकी दाखवतो. ख्रिस्ती राष्ट्रांनी धर्मप्रसार हे साम्राज्य विस्ताराचेच एक साधन करून ठेवलं

आहे." 'धर्म ही अफूची गोळी आहे.' असे मार्क्स का म्हणाला; याचे उत्तर धर्म ही एक पवित्र शोषण संस्था आहे, या अपवित्र वास्तवतेत सापडते. जागतिक सत्तासंघर्षातील साम्राज्यवादी बड्या सत्ता विकसनशील देशात जमातवादी-धर्मांध शक्तींना का पोसतात, याचे उत्तरही चंद्रशेखरच्या उक्तीमध्ये सापडते 'एका हातात बंदुक आणि एका हातात बायबल घेऊन पोर्तुगीजांनी साष्टी बेटात हैदोस घातला' हे चंद्रशेखरचे ऐतिहासिक निरीक्षण जगातील सर्वच धर्मांना लहान-मोठ्या संदर्भात लागू होईल एवढे कटु सत्य आहे.

चंद्रशेखरने केलेल्या चर्चा या निष्फळ व अर्थहीन नसून त्यातील चिंतनाचा आवाका मोठा आहे. ही चिंतन-सूत्रे १९३३ नंतर नंतर आज १९८८ मध्येही भारतीय अर्थकारणाला-राजकारणालाच नव्हे तर संपूर्ण जगातील साम्राज्यवादी व साम्राज्यवाद-विरोधी राजकारणाला समजून घ्यायला व नव्या दिशेने क्रांतीची मांडणी करायला उपयुक्त आहेत यातच माडखोलकरांच्या वैचारिक भूमिकेचे व कादंबरीकार म्हणून यश सामावले आहे.

केशव आणि चंद्रशेखर या मित्रांचे अनेक संवाद साम्यवादाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकणारे आहेत. या संवादात आयर्लंडच्या क्रांतीकारकापासून महाराष्ट्राच्या क्रांतीकारकापर्यंतचे अर्थपूर्ण उल्लेख पेरले आहेत. 'श्रमजीवी वर्गाची संघटना करणे आणि साम्यवादाच्या प्रसारासाठी अभ्यास मंडळ काढणे' या मर्यादेपर्यंत मार्क्सवादी क्रांतीचे तत्त्वज्ञान पचवलेला केशव 'डायरेक्ट ॲक्शन'चा विरोध करून 'योग्यवेळी आपोआप वर्गयुद्ध घडून येईल.' असे विचार प्रकट करतो. किंबहुना स्थित्यंतर घडविण्यासाठी वर्गयुद्ध खरोखर झालंच पाहिजे असं केशवला मुळी वाटतच नाही. कारण 'समाजसत्तेचे एक एक तत्त्व जग आज इतक्या झपाट्यानं न कळत अमलात आणीत आहे की, रक्ताचा एक थेंबही न पडता कालांतरानं सर्व राष्ट्र समाजसत्तावादी होतील' हे 'दादा'चं मत केशवला पटलेलं आहे. 'इंग्लंड-अमेरिकेतील पुढील क्रांत्या लोकशाही मार्गाने साम्यवाद प्रस्थापित करू शकतील' हे मार्क्सचे प्रसिद्ध भाकीत हिंसात्मक रक्तरंजित क्रांतीची अनावश्यकता प्रतिपादून लोकशाही व साम्यवाद यांच्या गाभ्यातील मूल्यात्मक सुसंवादांचे दिग्दर्शन करते, याची आठवण इथे झाल्यावाचून राहात नाही.

परंतु 'काळ आपोआप क्रांती घडवून आणील' या 'विकासवादावर' चंद्रशेखरचा विश्वास नाही कारण हा 'विकासवाद म्हणजे देववादाची सुधारलेली आवृत्तीच' असल्याचे त्याचे मत आहे. तेव्हा 'कालांतरानं सर्व जग समाजसत्तावादी होईल.' हे संपूर्ण खरे असले तरी काळाच्या गुलामीत मानवी कर्तृत्व कुजत ठेवुन मुक्ती लांबवण्याचा मूर्खपणा चंद्रशेखरला मान्य नाही. म्हणूनच तो प्रत्यक्ष साम्यवादी क्रांतीच्या चळवळीत स्वत:ला झोकून देतो.

माडखोलकरांच्या कादंबऱ्यातील 'वैचारिक चर्चा कधीच चिंतनाच्या स्वरूपाच्या नाहीत' व 'या चर्चांचे स्वरूप नुसतेच वादपटुत्वाचे आहे.' या नरहर कुरुंदकरांच्या दोषारोपात तथ्य नसल्याचे उपरोक्त विवेचन पुरावा आहे. उलट माडखोलकरांच्या कादंबऱ्यातील राजकीय चर्चा या अत्यंत सखोल चिंतनाने परिपूर्ण आहेत असाच पुरावा आहे.

माडखोलकरांनी त्यांच्या कादंबऱ्यात 'समाजवादाचा अंधुक पुरस्कार केला' असल्याची टीका कुसुमावती देशपांडे यांनी केली आहे. हा आरोपसुद्धा 'मुक्तात्मा'मधील नायकाच्या संदर्भातच नव्हे तर चंदनवाडी, कांता, प्रमद्वरा इ. कादंबऱ्यातील मार्क्सवादी जाणिवांचे स्वरूप लक्षात घेता अनाठायी ठरतो. कुसुमावतीबाईंनी माडखोलकरांना 'प्रतिगामी'ही ठरविले आहे. लेखक म्हणून पुरोगामी आहे की प्रतिगामी हा प्रश्न लेखनाच्या संदर्भात निर्णायक महत्त्वाचा ठरू नये. शिवाय माडखोलकरांनी निर्माण केलेल्या अनेक व्यक्तिरेखा या साम्यवादी जीवननिष्ठा जगताना दिसतात. अवधुत, केशव, चंद्रशेखर, जयंत चितळे, जयसिंग ही त्याची बोलकी उदाहरणे होत.

अनुक्रमणिका

'मुक्तात्मा'मधील साम्यवादी वीरेंद्राच्या जाहिरनाम्यात 'शेतकरी आणि कामकरी यांची प्रभावी संघटना निर्माण झाल्याशिवाय कोणत्याही प्रकारची सामुदायिक उठावणी शक्य नाही' असे म्हटले आहे. आज भारतीय दलित-शोषितांच्या भवितव्याचा विचार करताना शेतकरी व कामकरी यांच्या एकजुटीच्या प्रबळ संघटनेची गरज प्रामुख्याने जाणवते. अर्थात वीरेंद्र चक्रवर्तीचा जाहिरनामा हा भारतीय शोषितांच्या मुक्तीचाच जाहिरनामा ठरतो आणि शेतकऱ्यांच्या व मजुर-कामगारांच्या वेगवेगळ्या संघटना केल्याने क्रांतीची बीजे कुजवली जातात. या सत्याचेही दिग्दर्शन करतो. वीरेंद्राने तत्कालीन भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील गांधींच्या खिलापत चळवळीलाही विरोध केला आहे. कारण खिलापतमुळे धर्मवेड वाढले. आणि धर्माचा शिरकाव राजकारणात बाधा निर्माण करतो. तेव्हा 'हिंदुस्थानचे सर्व विकट प्रश्न साम्यवादानेच सुटतील त्याशिवाय तरणोपाय नाही. साम्यवादाच्या पायावर राष्ट्रीय सभेची पुनर्घटना केली पाहिजे' असा वीरेंद्राच्या जाहिरनाम्याचा भारतीय जनतेला संदेश आहे. आजही भारताच्या विकट प्रश्नावर वीरेंद्राचाच तोडगा लागू आहे याची खात्री असंख्य बुद्धिवाद्यांना झाली आहे. तेव्हा माडखोलकरांच्या साम्यवादी तत्त्वमीमांसेचा आवाका आजही सुबुद्ध वाचकाला स्तिमित करतो आणि त्यांचे मार्क्सवादी चिंतन केवळ कादंबरीपुरते मर्यादित न राहता प्रत्यक्षातील शोषितांच्या अनेक प्रश्नांनी अस्वस्थ झालेल्या संवेदनशील मनाला दिलासा देतो– मार्ग दाखवतो. कुणाला पटो वा न पटो माडखोलकरांचे हे वैचारिक क्षेत्रातील मार्क्सवादी चिंतन त्यांच्या कादंबरी वाङ्मयाचे सामर्थ्य ठरते. निदान या एका कारणासाठी तरी त्यांची कादंबरी निश्चित श्रेष्ठ साहित्यकृती ठरायला हरकत नसावी.

'भांडवलशाहीच्या पोलादी टाचेखाली दडपल्या गेलेल्या तीव्र आकांक्षा……आणि सामाजिक विषमतेमुळे दुखावलेली मानी हृदयं–' हे साम्यवादाला अनुकूल कार्यक्षेत्र असले तरी 'मार्क्सचं क्रांतिकारी तत्त्वज्ञान मजुरवर्गात सरकार फैलावू देणार नाही' कारण 'सरकारलाच त्याच्यापासून भय जास्त आहे' हे विचारसूत्र भगवंतरावांच्या तोंडून ऐकतांना माडखोलकरांच्या मार्क्सवादी विचार-व्यवहाराच्या व्यासंगाचे कौतुक वाटल्याविना राहात नाही.

मार्क्सचे वर्गसंघर्षाचे तत्त्वज्ञान प्रमाण मानणारा चंद्रशेखर 'शस्त्राच्या धारेनेच कलह तुटेल' असे मात्र मानत नाही. तसेच 'ज्या देशातल्या मजुरांना संघटनेचा अजून ओनामादेखील माहीत नाही, त्या देशात मार्क्सच्या व लेनिनच्या कार्यपद्धतीचा अवलंब करण्याच्या गोष्टी बोलणं नादानपणाचे' असल्याचे मत चंद्रशेखने व्यक्त केले आहे आणि युरोपातल्या कामगार चळवळी पाहून जशीच्या तशी त्यांची तत्त्व हिंदुस्थानला लागू करण्याऐवजी 'शक्याशक्यतेच्या दृष्टीनेच इथल्या साम्यवाद्यांनी आपला मार्ग आखला पाहिजे' हे सतत उपयुक्त ठरणारे धोरणही चंद्रशेखरने स्पष्ट केले आहे, आजही मार्क्सवादी दर्शन प्रमाण मानून भारतीय क्रांतीचा आराखडा प्रत्यक्षात उतरवण्यासाठी कंबर कसलेले भारतीय कम्युनिष्ठ पक्ष, मार्क्सवादी कम्युनिष्ठ पक्ष, लाल निशाण पक्ष, श्रमिक संघटना, श्रमिक मुक्ती दल, नक्षलवादी गट इ. राष्ट्रीय व प्रादेशिक पातळीवरील संघटनांच्या समोर कळीचा प्रश्न हाच आहे की मार्क्सवादी तत्त्वज्ञान जसेच्यातसे भारतीय स्थितीला लावायचे की येथील संस्कृती, वातावरण लक्षात घेऊन त्यात बदल करून ते स्वीकारायचे? मार्क्सवादी चिंतनातील हा गाभ्याचा प्रश्न माडखोलकरांनी मुक्तात्मामध्ये चर्चेच्या ओघात सहजपणे आणला असून त्यावर साधक-बाधक चर्चा केली आहे. अर्थातच ही चर्चा उद्बोधक ठरते.

"साम्यवादाशिवाय दुसर काही देशोद्धाराचा मार्गच नाही का?" या केशवच्या प्रश्नाला "तेवढा एकच मार्ग आता आपल्याला उरला आहे" असे बिनतोड उत्तर चंद्रशेखर जेव्हा देतो तेव्हा मराठीतील पहिल्या साम्यवादी नायकाच्या अविचल निष्ठांबद्दल व त्याच्या क्रांतिकारक तत्त्वज्ञानाबद्दलही आदर वाटू लागतो. चंद्रशेखर असा मार्क्सवादाच्या वस्तुनिष्ठ अभ्यासावर व चिवट श्रद्धेवर

उभा आहे. साम्यवादी चळवळीतील त्यांचे प्रत्यक्ष कार्य हे कृतीच्या पातळीवर किती व उक्तीच्या पातळीवर किती हा मोजमाप इतर समीक्षक करोत. चंद्रशेखरने वेळोवेळी केलेल्या चर्चेतील चिंतनाच्या नव्या दिशा मार्क्सवादी तत्व व व्यवहार यांच्या दृष्टीने मोलाच्या आहेत आणि चंद्रशेखरची उक्ती ही सुद्धा एक श्रेष्ठ कृतीच आहे या निष्कर्षाला मी आलो आहे.

कम्युनिस्टांबद्दल जगात सर्वदूर पसरलेल्या व पसरवलेल्या अनेक गैरसमजुतींना प्राणपणाने जपणाऱ्या सर्व व्यक्तींची एक प्रतिनिधी 'मुक्तात्मा'त ललिताच्या रूपाने उभी आहे. एका प्रसंगात ती म्हणते, "ज्याना कोणत्याच प्रकारची परंपरा नाही अन ज्यांच्या जीवनात अभिमान वाटण्यासारखेही काही नाही त्यांना उन्नत अन पवित्र भावनांवर नांगर फिरविणारा साम्यवाद आवडावा हे स्वाभाविक आहे."

चंद्रशेखरचे साम्यवादी तत्वाला वाहिलेले आयुष्य जवळून पाहणारी लता चंद्रशेखरला म्हणते, "देशोन्नतीबद्दलची तुमची मतं अन देशसेवेच्या तुमच्या कल्पना भयंकर आहेत." संबंध मानवमुक्तीचा शास्त्रीय विचार जगाला देणारा साम्यवाद राष्ट्राच्या उन्नतीच्या विरुद्ध अंतिम अर्थाने नसतोच. साम्यवादाला अभिप्रेत असणारा शास्त्रीय मानवतावाद राष्ट्रीय उन्नतीच्या अटीतूनच जन्म घेतो. या तत्वज्ञानाची ही पवित्र व्यापकता न पेलल्यामुळे क्रांतीच्या मार्गात अनेक गैरसमजुती बाधा म्हणून उभ्या आहेत. उपरोक्त विधान याचे द्योतक आहे.

'चंदनवाडी'चा नायक अवधूत हा समाजवादी आहे. 'माडखोलकरांच्या सर्व नायकांपेक्षा अवधूतच्या व्यक्तिरेखेत राजकीय भूमिका व व्यक्तिचित्रण यांचा समन्वय अधिक सुसंगत घडत आल्याचा' अभिप्राय कुसुमावती देशपांडे यांनी नोंदवूनही 'व्यक्तिरेखा दुसऱ्या कोणत्याही नायकापेक्षा विकासनशीलही असल्याचे' म्हटले आहे. चंदन या 'प्रकृतिकन्ये'ला अवधूतविषयी आकर्षण आहे. परंतु अवधूतला मान्य असणाऱ्या समाजवादी तत्वज्ञानापेक्षा चंदनची मावशी— 'सिस्टर'चा मानवतावादी सुधारणावाद तिला अधिक 'अपील' होतो.

अवधूतच्या लढ्यात भाग घेण्यास चंदन तयार होते ते त्याच्या समाजवादी तत्वज्ञानाच्या निष्ठेने की त्याच्याविषयीच्या आत्मीयतेने हा प्रश्न तसा अनिर्णित राहिला तरी समाजवादी नायकावर प्रेम करणारी मराठी नायिका या कादंबरीत प्रभावी ठरते यात शंका नाही. चंदनवाडीच्या नायकाच्या राजकीय जीवनात उत्क्रांती असल्याने त्याची समाजवादी भूमिका वाचकांवर परिणाम करते. हिंदुस्थानच्या सर्व समस्या राष्ट्रीय क्रांतीशिवाय सुटणार नसून समाजवाद हा या क्रांतीला पोषक आहे तसेच समाजवादाला सुसंगत अशी राष्ट्रीय क्रांतीच नवी मानवी संस्कृती जगात जन्माला घालील ही अवधूतची वैचारिक भूमिका आहे. टिळक आणि गांधी पर्वाचे अवधूतने केलेले मूल्यमापन एवढे परखड आणि मूलभूत आहे की भारतीय इतिहासाचे नवे आकलनच इथे नोंदले गेले आहे.

टिळकांनी क्रांतिवादाचे तत्व धार्मिक व सामाजिक विषमतेला लागू न केल्यामुळे राष्ट्रीय चळवळीला क्रांतीचे विशाल रूप मिळाले नाही. गांधींनी मात्र अस्पृश्यता निर्मूलनासारखे अनेक प्रश्न राष्ट्रीय चळवळीच्या कक्षेत आणून राष्ट्रीय क्रांतिवादाचे जनकत्व सिद्ध केले. परंतु धार्मिक व अनेक संदर्भातील ट्रस्टीशिपच्या तत्वज्ञानामुळे धार्मिक व आर्थिक विषमतेचा पुरस्कार गांधीकडून झाल्यामुळे भारतात समाजवादी तत्वज्ञानाला डोके वर काढायला जागा मिळाली. राष्ट्रीय क्रांतिवादासाठी 'गरज पडेल तर हिंसेनेही सर्व प्रकारचे पारतंत्र्य व विषमता नष्ट करण्याची गरज' अवधूतने प्रतिपादिली आहे.

अवधूतचा अस्पृश्य मित्र अभिमन्यू, याने "विश्वक्रांतीच्या दृष्टीनं समाजवाद तुला अपुरा वाटतो का?" हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न विचारला आहे. अवधूत हा समाजवादी असला तरी भौतिक कक्षेतील समाजवादाचे महत्व मान्य करूनही माणसाचा आत्मा, अध्यात्म, संस्कृती,

राष्ट्रीयता या संदर्भातील समाजवादाची भूमिका अवधूतला मान्य नाही. तसेच "लोकसत्ताक राष्ट्रीय क्रांतीवादच जगात विश्वसंघ आणि आंतरराष्ट्रीय शांतता" स्थापन करील. 'ते कार्य समाजसत्तावाद करू शकणार नाही' असा निर्वाळा अवधूतने दिला आहे. लोकशाही, समाजवाद आणि साम्यवाद या तत्वज्ञानातील सुसंवाद लक्षात न घेता चिंतनाच्या पातळीवर कशा गफलती होतात व त्यामुळे परस्परपूरक असणाऱ्या तत्वप्रणालीतसुद्धा व्याजसंघर्ष कसे उभे राहतात याची प्रचिती अवधूतच्या या वैचारिक भूमिकेतून प्रत्ययाला येते.

'चंदनवाडी'तील युद्धकालीन परिस्थितीचे दर्शन मार्क्सवादी सिद्धांताची प्रत्यक्ष प्रचिती घडविते. महागाई, संप, कामगारांचे हाल, युद्धजन्य परिस्थिती या 'सर्वांचे' चित्रण बोलके आहे. माडखोलकरांच्याच 'नवे संसार' पेक्षा 'चंदनवाडी'तील युद्धकालीन स्थितीचित्रण अधिक परिणाम-कारक आहे. हा कुसुमावतीबाईंचा अभिप्राय यथार्थ म्हटला पाहिजे. चंदनवाडीतील येसू, "पोटातल्या आगी सारखा जगात दुसरा प्रलय नाही" असे जेव्हा सुनेला सांगू लागते तेव्हा ती नकळत अन्नक्षुधेच्या प्रेरणेवर आधारित मार्क्सचे शास्त्रीय तत्वज्ञानच बोलत असते. "जगातील निढळाच्या घामानं भाकर कमावणारे लोक वेळ येताच श्रीमंतांच्या भरलेल्या कोठ्या व चैन पाहात स्वस्थ बसणार नाहीत."

येसूचा हा आवाज जगातील सर्वच 'नाहीरे' पंथातील कष्टकरी जनतेचा असून 'आहेरे' या प्रस्थापित गटाविरुद्धचा आहे. मार्क्सवादी जाणीव लेखकाच्या प्रतिभेतून कशी आकार घेते याचा माडखोलकरांच्या संदर्भातील हा उत्तम पुरावा आहे.

युद्धकालीन परिस्थितीचे दर्शन घडविताना माडखोलकरांच्या निवेदनातून मार्क्सवादी सिद्धातांचा रम्य आविष्कार झालेला आहे. 'समाजात खालच्या थरात धुमसणाऱ्या असंतोषाचा स्फोट कामगार चळवळीच्या रूपाने प्रथम झाला' ही वास्तवता सांगताना गिरणी कामगारवर्ग हा इतर श्रमजीवी वर्गापेक्षा संघटित व झगडण्याच्या कलेत मुरलेला होता, कारण 'आर्थिक समता-तत्वाच्या सतत उद्घोषाने भविष्याचा अदम्य आशेचा जोष त्यांच्या जीवनात संचारला होता.' अशी मार्क्सवादी तत्वज्ञानाची प्रभावी जाणीव माडखोलकरांनी प्रगट केली आहे.

चळवळीत भाग घेणाऱ्या अवधूतने समाजातले सर्व श्रमजीवी वर्ग-कारकूनापासून ते मेहतरा-पर्यंत एकत्र आणण्याचा प्रयत्न केला आहे. कारण गिरणीकामगारापुरतीच कोणतीही चळवळ मर्यादित ठेवून चालणार नाही असे त्यांचे मत होते. अवधूत समाजसत्तावादी नसला तरी त्याच्या या धोरणात मार्क्सवादी विचार-व्यवहार यांची चिन्हे जरूर आहेत. कारण साम्यवादी क्रांती ही केवळ गिरणी कामगार करणार नसून 'सर्व सर्वहारा वर्गच' या क्रांतीचा पाईक ठरणार आहे हा मार्क्सचाच सिद्धान्त आहे.

अभिमन्यूच्या निमित्ताने अस्पृश्यांच्या प्रश्नावर माडखोलकरांनी सर्व बाजूंनी 'चंदनवाडी'त विचार मांडले आहेत. 'महार मेला न् विटाळ गेला' या वृत्तीने हिंदू अस्पृश्याकडे पहातात मग राजकीय लढ्यात खांद्याला खांदा लावून उभे राहण्याची अपेक्षा त्यांनी अस्पृश्यांकडून का करावी ? हा मर्मभेदक प्रश्न अभिमन्यूने उभा केला आहे. या प्रश्नात आंबेडकरी राजकारणाचे सूत्र आहे. 'हिंदुस्थानच्या अधोगतीस वरिष्ठ जातीचे हिंदूच कारण आहेत.' या विधानातही डॉ. आंबेडकरांचा प्रसिद्ध ऐतिहासिक सिद्धांत उतरला आहे. 'महागाईसारख्या आर्थिक प्रश्नात' अभिमन्यूने जात आणावी हे अवधूतला दुर्दैव वाटते. आर्थिक-समतेच्या लढ्यात जातीय दृष्टी बाधक आहे हे अवधूतचे मत आजही चिंतनीय ठरते. पण अभिमन्यूचे दुःखही खोटे नाहीच.

कारण अभिमन्यूच्या मते अस्पृश्य समाजाच्या उन्नतीचा प्रश्न केवळ आर्थिक नाही व निव्वळ सामाजिकही नाही किंवा निव्वळ धार्मिकही नाही. त्या सर्वांची विचित्र गुंतागुंत सोडवायला

समाजवाद समर्थ होणार नाही ' या अभिमन्यूच्या उद्‌गारामध्ये डॉ. आंबेडकरच बोलत आहेत. कारण आंबेडकरांच्या सिद्धांतानुसार जातीव्यवस्थेचा प्रश्न या समाजव्यवस्थेचा कळीचा प्रश्न असून मार्क्सवादाकडे याचे उत्तर नाही म्हणूनच अभिमन्यू दलितांचा प्रश्न हा "समाजवादासारख्या कोणत्याही साचेबंद आणि ठोकळेबाज तोडग्यानं सुटण्यासारखा नाही" असे अवधूतला ठामपणे सांगतो.

या चर्चेत माडखोलकरांनी आर्थिक सत्तेवर भर देणारी मार्क्सवादी चळवळ व सामाजिक समतेवर भर देणारी आंबेडकरी चळवळ यांच्या आपसातील संघर्ष स्वरूपावर प्रकाश टाकला आहे. मार्क्सवाद आणि आंबेडकरवाद यांच्यातील साम्य व विरोध आज राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक कारणांसाठी गाजत आहे. क्रांतीवादी प्रवाहातील आजचा कळीचा प्रश्न म्हणून त्याच्याकडे पाहिले जाते. अशा प्रश्नावर माडखोलकरांनी त्यांच्या व्यक्तिरेखांतून सखोल व सर्वांगीण चिंतन प्रगट केले आहे.

'तत्वतः हिंदी व विदेशी भांडवलशाही एकच असली तरी हिंदी मजूर वर्ग व विदेशी मजूर वर्गाच्या हितसंबंधात फरक आहे. ब्रिटिश मजुरपक्षानेही साम्राज्यवादी प्रतिगामी धोरणाचा पुरस्कार केला. तेव्हा जगातील सर्व कामगारवर्गांचे आर्थिक हितसंबंध एक नाहीत. समाज हितसंबंधाचे खूळ ही लवाड अर्थशास्त्रज्ञांची निर्मिती आहे.' या अभिमन्यूच्या अभिप्रायातील वास्तवता मार्क्सवादी चिंतनाला धक्का देते व मार्क्सवादी सिद्धान्तानुसार व्यवहार पडताळून पाहण्यासाठी विचारवंतांनाही अस्वस्थ करते. माडखोलकरांच्या चिंतनातील सूक्ष्मतेची, त्यांच्या व्यासंगाची, मार्मिकतेची, विलक्षणतेची इथे साक्ष पटते.

मार्क्सवादी सिद्धान्ताच्या क्रांतिकारकतेविषयी व अंतिम यशाविषयी 'कांता' कादंबरीतील पंडितजीनी प्रियदर्शनशी केलेल्या चर्चेत संशय व्यक्त केला आहे. पंडितजी म्हणतात, "साम्यवादाच्या लाल झेंडयाखाली जगाला आणण्याची रशियाची जी आकांक्षा आहे. ती सुद्धा साम्राज्यवादाचाच एक प्रकार नाही काय?" अमेरिका इंग्लंड सारख्या भांडवलशाहीप्रधान अर्थ व्यवस्थेच्या राष्ट्रांचाच साम्राज्यवाद अस्तित्वात आहे एवढेच जागतिक सत्य नसून साम्यवादी रशियाचाही साम्राज्यवाद आहेच. फक्त तो मार्क्सवादाचा टिळा लावून जगात पसरतो आहे. ही आंतरराष्ट्रीय वास्तवता मार्क्सवादी दर्शनाबद्दल उलट सुलट विचार करायला भाग पाडते. किंबहुना भांडवलशाहीवादी राजकारणी व विचारवंतांनी साम्यवादी रशियाच्या विस्तारवादावर साम्राज्य-वादाचाच आरोप जाणीवपूर्वक केला आहे. अर्थात तत्वज्ञानाचे कुंकू कोणतेही असो जागतिक बडया सत्तांचे राजकारण हे साम्राज्यवादीच आहे, असा याचा सरळ अर्थ काढला जातो. त्यामुळे जगातल्या पहिल्या साम्यवादी रशियाच्या व्यावहारिक धोरणामुळे विश्वाच्या मुक्तीशी कटिबद्ध असलेला मार्क्सवाद बदनाम झाला की मार्क्सवादीतत्त्वमीमांसेनुसारच रशियाची आंतरराष्ट्रीय वाटचाल चालू आहे ? या प्रश्नांची उत्तरे सोपी नसली तरी विश्वमानवाला शोधावीच लागणार आहेत. या शोध-प्रक्रियेची प्रेरणा 'कांता'मधील साम्यवाद, गांधीवाद विषयक चर्चेतून मिळते. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्या नंतर अंतर्गत युद्धाचा प्रसंग येऊ नये म्हणूनच भारतातील समाजवाद्यांनी, समाजसत्तावादाच्या पायावर राष्ट्रीय चळवळीची पुनर्घटना करण्याचा आग्रह धरला होता. त्याचे समर्थन करताना प्रियदर्शनने 'उत्पादनशक्तीचा समान उपभोग प्रत्येक माणसाला घेता येईल अशी समाजरचना जोपर्यंत आपण करीत नाही तोपर्यंत देश स्वतंत्र झाला असे म्हणणं शक्य नाही' अशी शुद्ध साम्यवादी भूमिका विशद केली आहे. अर्थात स्वातंत्र्य या मूल्याचा प्रत्यक्षातील उपभोग हा आर्थिक व सामाजिक सांस्कृतिक–शोषणाच्या समाप्तीनंतरच शक्य आहे. म्हणून समाजसत्तावाद आणि स्वातंत्र्य यांच्यातील

विरोध हा मुळातला नसून तो हितसंबंधीयांनी व गैरसमजुतकारांनी निर्माण केलेला आहे हा सूचित अर्थ–प्रियदर्शनाच्या विचारातून अभिव्यक्त होतो.

गांधीवाद आणि समाजवाद यांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन भिन्न भिन्न असल्याने 'कोणताही सोशॅलिस्ट गांधीचा अनुयायी होऊ शकत नाही!' या मताचा प्रतिवाद करताना "हिंदुस्थानपुढील आजचा निकडीचा प्रश्न सोशॅलिझम नाही तर स्वातंत्र्य हा आहे–" अशी भूमिका प्रियदर्शन मांडतो. अर्थातच भारताच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी गांधी आवश्यकच आहेत पण तेवढ्याने भागणार नसून स्त्री, दास्य, शूद्रांच्या बेड्या तोडण्यासाठी समाजवादी क्रांतीची गरज, त्यानंतर आहेच. साम्यवादी चळवळीत या डोळसपणाचे मूल्य महान आहे. माडखोलकरांच्या चिंतनात हे तात्विक शहाणपण पदोपदी प्रत्ययाला येते. या कादंबरीत म. गांधींच्या कामगारद्रोही ध्येयधोरणावर प्रखर टीका असून "टाटा–बिर्लांच्या सहकार्यावर पोसलेला 'भांडवलशाहीचा हस्तक', अशी संभावना गांधींच्या वाटचाला आली आहे. साम्यवादी दृष्टीने पहाता हे मूल्यमापन कठोर असले तरी न्याय्य आहे.

'म. गांधींचे तत्वज्ञान हे भौतिकप्रगती विरोधी असून वर्गकलहच नव्हे तर वर्गभेदाची जाणीव सुद्धा उत्पन्न करण्याच्या चळवळीला विरोधी असल्याने, आहे त्या स्थितीत जग कायम ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे' अशी सडेतोड मीमांसा डॅ. गुप्तांच्या द्वारे माडखोलकरांनी केली असून मार्क्सवाद विरोधी असलेल्या गांधीवादी तत्वज्ञानातील प्रतिगामीत्व सिद्ध केले आहे. या तत्वमीमांसेत म. गांधीचा तिरस्कार किंवा त्यांच्या तत्वज्ञानाची कुचेष्टा नसून सैद्धान्तिक पातळीवरील गांधीवादाची मर्यादाच जबाबदारीने स्पष्ट केली गेली आहे. गांधींना दोष दिल्याबद्दल, नरहर कुरुंदकर, कुसुमावतीबाई देशपांडे सारख्या श्रेष्ठ टीकाकारांनी माडखोलकरांना विनाकारण गुन्हेगार ठरविले आहे. वस्तुस्थिती पहाता, माडखोलकरांनी समाजवाद, गांधीवाद या तत्वप्रणालींची प्रत्यक्ष व्यावहारिक प्रश्नांच्या संदर्भात तपशीलाने व बारकाईने मार्मिक तपासणी केल्याचेच सिद्ध होते. गांधीप्रणित चातुर्वर्ण्यमान्यता, जमीनदारीच्या उच्छेदाला असलेला त्यांचा विरोध व वर्गयुद्धाऐवजी वर्गसमन्वयाचे समर्थन या मुद्यावर गांधीवाद हा साम्यवादी क्रांतीचा विरोधक तर ठरतोच पण विश्वमानवाच्या सर्वांगीण कल्याणाचाही विरोधक ठरतो. हे कटु सत्य पचविण्यासाठी मार्क्सवादांचा मुळातून शुद्ध अभ्यास हवा असतो आणि एका विशिष्ट मर्यादितील म. गांधींचे मोठेपण मान्य करूनही पुढच्या टप्प्यावर गांधीवादाची अनावश्यकता–बाधकता लक्षात घ्यावीच लागते. माडखोलकरांच्या कादंबऱ्यांनी, भारतीय इतिहासातील विविध महापुरुष व त्यांच्या तत्वप्रणालीचे अत्यंत परखड व सम्यक् मूल्यमापन केल्यामुळे तात्विक गुंते सुटण्याची शक्यता उपलब्ध झाली, हे श्रेय माडखोलकरांना द्यायलाच हवे.

'जमीनदारी आणि भांडवलशाही यांची उभारणीच श्रमजीवीकांच्या कष्टांचा अन्याय्य फायदा घेऊन त्यांच्या पिळवणूकीवर झाली असून' 'किसान आणि कामगार यांनी झगडा न करता या अत्याचारी वर्गाशी तडजोड करावी' म्हणणारे गांधी मार्क्सवादी क्रांतीचे विरोधक ठरले तर नवल नाही. म्हणून 'कांता' कादंबरीतील पंडितजी मार्क्सवादी तत्वज्ञानाचा पुरस्कार करताना म्हणतात, "कारण स्वातंत्र्य हे अहिंसेपेक्षाही मला प्रिय आहे व ते संपादन करण्यासाठी कोणत्याही मार्गांचा अवलंब करायला मी कचरणार नाही." पंडितजींना सशस्त्र क्रांतीचे वावडे नाही फक्त त्या क्रांतीमध्ये 'बहुजन समाज जास्तीत जास्त सहभागी झाला पाहिजे.' आणि यासाठीच ते म्हणतात "त्यादृष्टीनं कम्युनिष्टांचं क्रांतीचं तत्वज्ञान मला अधिक सोयीचं वाटतं."

कम्युनिस्ट क्रांतीचे आकर्षण माडखोलकरांना केवळ 'बौद्धिक खुराकापुरतं मर्यादित होतं' हा समीक्षकांचा आरोप खरा मानला तरी माडखोलकरांच्या अनेक व्यक्तिरेखांच्या जीवननिष्ठा मात्र मार्क्सवादाला अर्पण झालेल्या आहे, ही गोष्ट आपण लक्षात घ्यायला हवी. वाचकांचा संबंध लेखकांच्या जीवननिष्ठांशी नसून तो कलाकृतीमधील पात्रांच्या जीवननिष्टेशी असतो कारण त्या पात्रांचाच प्रभाव वाचकांवर पडत असतो. तेव्हा माडखोलकरांनी निर्माण केलेल्या मार्क्सवादी पात्रसृष्टीचे योगदान मराठी वाचकांच्या क्रांतीकारी प्रबोधनाच्या दृष्टीने उपयुक्त ठरले आहे.

माडखोलकरांच्या 'शाप' या कथेमधील 'सुशील युवक' हा प्रथम सत्याग्रह आणि बॉम्ब फेक वैगरे मार्गाचा अनुभव घेऊन नंतर त्यावरील विश्वास उडाल्याने तो साम्यवादाकडे वळतांना दिसतो. तुरुंगामध्ये मार्क्स आणि लेनिन यांचे साहित्य वाचल्यामुळे 'साम्यवादानेच हिंदुस्थानाचे प्रश्न सुटतील' हा विश्वास त्याने मित्राजवळ व्यक्त केला आहे. याच कादंबरीतील निशिकांत डोळस वृत्तीचा असून त्याला 'हिंदुस्थानच्या परिस्थितीला लागू पडणारा साम्यवाद हवा आहे' या सर्व चित्रणातून मार्क्सवादी सिद्धान्ताशी हिंदुस्थानचे भवितव्य अपरिहार्यपणे जोडले जाते आणि मार्क्सवादाच्या एकूण यशाचा वाचकांच्या मनावर ठसा कायम उमटत राहतो.

'प्रमद्वारा' कादंबरीची नायिका कम्युनिस्टधार्जिण्या वकील नवऱ्याशी संसार करतांना माडखोलकरांनी साकार केली आहे. अर्थातच तिची जीवनकथासुद्धा मार्क्सवादी प्रभावापासुन मुक्त नाही.

स्त्रीमुक्तीची प्रेरणासुद्धा मार्क्सवादी सिद्धान्तातून मिळालेली असून तिचे प्रत्यंतर 'भंगलेले देऊळ' या कादंबरीत येते. एके ठिकाणी नायिका अनू म्हणते, "नवऱ्याने तुडवलेली ती जगाने तुडविलेली, नवऱ्यानं टाकलेली, ती जगानं टाकलेली, अशी अवस्था आहे आज आम्हा स्त्रियांची. या दुर्गंधीतून बाहेर पडण्याकरिता स्त्रियांना घटस्फोटाचा हक्क पाहिजे."

मार्क्सवादी सिद्धान्ताच्या प्रभावानेच स्त्रिया पुरुषांविरुद्ध हक्काची भाषा बोलायला लागल्या आणि यांतूनच श्रमिकांच्या मुक्ती लढयांशी, स्त्री–मुक्तीचे अतूट नाते सिद्ध झाले. "प्रौढ प्रेमिकांनी एकमेकांच्या पूर्वायुष्याची चिकित्सा फारसे खोलात जाऊन करू नये" हा 'भंगलेले देऊळ' मध्ये व्यक्त झालेला नवा विचार स्त्रियांच्या पावित्र्याच्या प्रतिगामी कल्पनेविरुद्धचा आहे. म्हणूनच अनु म्हणते, "प्रौढ विवाहाच्या या काळात अनाघ्रात पुरुषांची अपेक्षा करणे हे असमंजसपणाचे नाही का ?" पुरुषप्रधान संस्कृतीमधील भोगदासी स्त्रीचे शोषण मार्क्सवाद क्रांतीतून संपणार आहे. म्हणूनच स्त्री–मुक्तीचा हुंकार हा साम्यवादी क्रांतीचा एक पदर आहे. स्त्रीच्या श्रमातूनही वरकडमूल्यांची निर्मिती होऊन ती शोषित ठरते. तसेच लिंगवर्चस्वाची ती बळी ठरते म्हणून तिच्या मुक्तीशिवाय मानवमुक्तीची कल्पना मार्क्सवाद मान्यच करत नाही. स्त्रीची ही जागृती–जाणीव श्रमीकांच्या लढयाची शिलावार ठरावी, एवढे तिचे महत्व आहे.

श्रमिक मुक्ती, स्त्रीमुक्ती आणि दलितमुक्ती या संदर्भातील वैचारिक संपदा माडखोलकरांच्या नावावर विपुलपणे नोंदलेली आहे एकूण कलाक्षेत्राला आणि चिंतनविश्वाला माडखोलकरांचे लाभलेले हे वैचारिक योगदान ऐतिहासिकदृष्टया महत्वाचे आहे. माडखोलकरांना मार्क्सवाद आणि सशस्त्र क्रांती यांचे आकर्षण कसे आणि किती होते यांचे हिशेब समीक्षकांनी मांडले आहेत. प्रश्न लेखकाच्या आकर्षणाचा नाहीच. माडखोलकरांच्या बहुसंख्य कादंबऱ्यातून समाजवादी विचारांची भाणसं पेटून उठलेली–निदान मार्क्सवादी चर्चा करत राहणारी, अशी अभिव्यक्त आली आहेत. जगातील सर्व 'इझम'च्या संदर्भात आणि राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय ज्वलंत प्रश्नावर या व्यक्तिरेखा विविध अंगानी चर्चा करीत राहतात. त्या चर्चेमध्ये मार्क्सवादाची फेरतपासणी

आणि मार्क्सवादाचे क्रांतिकारकत्व, हाच केंद्रबिंदू राहिलेला आहे. मराठी कादंबरीच्या आशय-स्तरावर मार्क्सवादी जाणिवांचा कायम ठसा माडखोलकरी कादंबरीनेच उमटवला, याचे भान वाचकांनी ठेवले नाही तरी समीक्षकांनी ठेवणे भाग आहे. माडखोलकरांच्या मार्क्सवादी व्यक्तीरेखांची, त्यांच्या सर्व कादंबऱ्यातील संख्या तर मोठी आहेच परंतु माडखोलकरांच्या या मानपुत्राची मार्क्सवादाचे काठिन्य आणि शास्त्रीयता पचवून या श्रेष्ठ आणि क्रांतीकारी तत्वज्ञानाचे सम्यक् आकलन केल्यामुळे यांचा गुणात्मक दर्जाही मोठा आहे. एवढ्या विपुल प्रमाणात मार्क्सवादी दर्शनाचे अनेक तपशील आणि कंगोरे, व्यक्तीचित्रणाच्या माध्यमातून, प्रसंगवर्णन आणि जीवनदर्शना-तून, मराठी कादंबरीत प्रथम माडखोलकरांनीच अभिव्यक्त केले. त्यापूर्वी संख्यात्मक आणि गुणात्मक दोन्ही दृष्टीने मार्क्सवादी व्यक्तिचित्रे आणि प्रसंग मराठी कादंबरीने स्वीकारलेले दिसत नाहीत; मग पचण्याचा प्रश्न दूरच राहिला.

माडखोलकरांच्यावरील मार्क्सवादाच्या प्रभावाची इतकी विस्तृत नोंद घेतल्यानंतर त्यांचे कादंबरीवाङ्मय साम्यवादी बांधीलकीतून सिद्ध झाल्याचा निष्कर्ष कोणीही काढू शकेल पण असा निष्कर्ष काढता येणार नाही कारण कोणत्याही एका तत्त्वप्रणालीच्या चौकटीतून माडखोलकरांनी कादंबरीलेखन केलेले नाही. तसे करणे त्यांना अयोग्य वाटते. हे त्यांनी, 'मी आणि माझे साहित्य' या लेखात स्पष्ट केले आहे.

मराठी लेखक बहुसंख्येने मार्क्सवादाकडे वळले पण हा 'इझम' पचवून कलाकृती निर्माण करणे त्यांना पेलले नाही. या लेखकांचे साम्यवादी आकर्षण फक्त बौद्धिक पातळीपर्यंत राहिले, वि. वा. हडप आणि गीता साने यांनी मात्र मार्क्सवादी कादंबरी लिहिण्याचा प्रयोग केला. दलित साहित्यानेही काही प्रमाणात मार्क्सवादाशी आपला घरोबा केला. मार्क्सवादाच्या संस्कारामुळे मराठी कादंबरीची कल्पनारम्यतेच्या जाळ्यातून काहीशी सुटका झाली आणि तिला वास्तवाचे भान आले. अण्णाभाऊ साठे, उद्धव शेळके हे लेखक ह्या भानाचे साक्षीदार ठरतात. वरिष्ठवर्गीय पात्रांच्या जागा कनिष्ठवर्गीय पात्रांनी घ्यायला सुरुवात केली हा परिणाम अर्थातच अर्ध्या जगावर राज्य करणाऱ्या साम्यवादाचा होता.

राजकीय कादंबरीचे प्रयोग करताना माडखोलकरांनी इतर तत्वप्रणालीप्रमाणेच मार्क्सवादाचाही कलेच्या अंगाने आविष्कार घडविला. त्यांच्या राजकीय चर्चा या अर्थहीन आणि उथळ नसून तात्विक तपशीलाने आणि जीवननिष्ठेच्या प्रखर धारेने ओतप्रोत आहेत. महाराष्ट्राच्या वैचारिक प्रबोधनात मार्क्सवादाचे प्राथमिक घडे पा. वा. गाडगीळांनी देऊन इतिहास घडविला तर मराठी कादंबरीच्या प्रवाहात मार्क्सवादी विचार–जाणिवांचा मुक्त आणि बहुरंगी वापर माडखोलकरांनी करून एकूणच कलाविश्व समृद्ध केले. त्यामुळे विश्वकल्याण आणि मार्क्सवाद यांच्या नात्यामधील अर्थपूर्णता मराठी वाचकाच्या मनाला भिडली. मार्क्सवादासंबंधीचे अनेक गैरसमज दूर होऊन या क्रांतिकारी तत्वज्ञानाचे संस्कार महाराष्ट्रीय संस्कृतीत रुजले याचे संपूर्ण कलात्मक श्रेय माडखोलकरांचे आहे. या योगदानाची नोंद मा. का. देशपांडे, कुसुमावती देशपांडे, वाळिंबे, कुरुंदकर यांच्यापासून ते डॉ. बांदिवडेकरापर्यंतच्या सर्व समीक्षकांनी विशेष गांभीर्याने घेतली नाही. उलट माडखोलकरांचे वैचारिक सामर्थ्य विशेषत: त्यांचे मार्क्सवादाचे आकलन वजा करून त्यांच्या कादंबऱ्यांचे मूल्यमापन केले. त्यामुळे अपुरे आणि अन्याय्य निष्कर्ष जन्माला आले. या पार्श्वभूमीवर माडखोलकरांचे मार्क्सवादी चिंतनातील सामर्थ्य पुराव्यांसह तपशिलाने नोंदविणे आवश्यक होते. यांतून माडखोल-करांच्यापेक्षा मराठी वाचकालाच उशीरा का होईना न्याय मिळणार आहे.

पत्रकारितेचा चौफेर अनुभव, वैचारिक चिंतनाची आवड आणि जबरदस्त व्यासंग यामुळे वैचारिकदृष्ट्या माडखोलकरांचे कादंबरीलेखन समृद्ध झाले आहे. इतर तत्त्वप्रणालींच्या तुलनेने मार्क्सवादी जाणिवांना त्यांच्या कादंबऱ्यात मध्यवर्ती स्थान मिळाले आहे. अर्थातच त्याचा परिणाम वाचकावर होत राहील. अनेक दिशांनी माडखोलकरांच्या कादंबऱ्यांचा अभ्यास करणे अद्यापही आवश्यक आहे. 'मार्क्सवादी तत्त्वप्रणालीचा त्यांच्या कादंबऱ्यातील परिणाम' ही एक दिशा इथे स्पष्ट केली आहे. ■

विद्यावर्धिनी कॉलेज, धुळे

'युगवाणी' मिळत नाही ?

युगवाणीचा अंक पोस्टाने पाठविल्यानंतर तो मिळत नसल्याच्या अनेक तक्रारी येतात. तसेच अपुऱ्या पत्त्यामुळे / पत्ता बदलल्यामुळेही बरेच अंक परत येत असतात. परिणामी बराच डाकव्यय वाया जाऊन संस्थेला भुर्दंड सोसावा लागतो. सर्व सभासदांना / वर्गणीदारांना युगवाणीचा अंक नियमित पाठविला जात आहे, याची विशेष काळजी आम्ही आमच्याकडून घेत आहोच. तुमच्याकडून कृपया पुढील सहकार्य मिळावे.

- ज्या तीन महिन्याचा अंक असतो त्याच्या पुढील महिन्याच्या पंधरा तारखेपर्यंत तो आपल्याला मिळावा ही अपेक्षा असते. तरीही अनेकदा पोस्टाच्या दिरंगाईमुळे तो आपल्यापर्यंत पोहोचण्यास बराच वेळ लागतो. तेव्हा त्या महिन्याच्या पंधरा तारखेपर्यंत थांबूनही आपल्याला अंक न मिळाल्यास, **प्रथम** तुमच्या गावच्या / विभागाच्या पोस्टात चौकशी करा–लेखी तक्रार द्या व तिची एक प्रत पुढील कार्यवाहीसाठी आम्हाला पाठवा.
- **अंक शिल्लक असल्यास आपल्याला तो आवर्जून पाठविण्यात येईल.**
- आपण आपला पत्ता पूर्ण व अचूक नोंदला आहे काय ? पत्त्यात झालेला बदल, कार्यालयाला त्वरित कळविण्याची आपण कृपया खबरदारी घ्यावी. शक्यतोवर घरचाच पत्ता द्यावा. संस्थेचा / कार्यालयाचा देऊ नये.
- तुमची वर्गणी संपलेली नाही ना ? तुमचे नाव नियमित सभासदांच्या / वर्गणीदारांच्या नोंदीत आहे याची खात्री करून घ्यावी.
- पत्ता बदलल्यामुळे परत आलेला व पुढील अंक सभासद / वर्गणीदारांकडून कार्यालयाला नवीन पत्त्यांची रीतसर सूचना मिळेपर्यंत पुन्हा पाठविले जात नाहीत.

मनोहर म्हैसाळकर
सरचिटणीस
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

माडखोलकर आणि अग्रलेख

चंद्रशेखर फडणीस

"श्री. भाऊसाहेब माडखोलकर हे मराठी वृत्तपत्रसृष्टीतील परशुराम होते," असे जे वर्णन त्यांच्या मृत्यूनंतर श्री. प्रभाकर पाध्ये यांनी केले, ते प्रथम लक्षात घेतले पाहिजे. परशुरामाचे वर्णन "अग्रतश्चतुरो वेदा: । पृष्ठत: सशरं धनु: । इदं ब्राह्मिदं क्षात्रं । शापादपि शरादपि" असे केले जाते, ते माडखोलकरांसाठी यथार्थ ठरते. ते कमालीचे बुद्धिमान असले, तरी त्या बुद्धीत लेशभरही दुष्टपणा नव्हता, होता तो मिष्किलपणा आणि खट्याळपणा. बुद्धीशी खेळ खेळण्यात त्यांना कमालीचा आनंद वाटत असे. हाच चित्ताल्हादक खेळ त्यांच्या अग्रलेखातून बघावयाला मिळत असे. मात्र हा खेळ खेळत असताही त्यांनी आपल्या पाठीवरील धनुष्यबाणाकडे कधीही दुर्लक्ष होऊ दिले नाही. अघटित किंवा विपरीत काही घडले की त्यांचे शरसंधान सुरू व्हावयाचे व त्याच्या टणत्काराने भल्याभल्यांना कापरे सुटावयाचे !

सारेच विस्मयजनक

माडखोलकरांच्या अग्रलेखांचा आजही महाराष्ट्रात आवर्जून उल्लेख होतो. त्यांच्या लेखणीला जे असाधारण सामर्थ्य प्राप्त झाले होते. ते त्यांच्या चौफेर संपर्कामुळे, सूक्ष्म व चिकित्सक निरीक्षणामुळे, विस्मयजनक स्मरणशक्तीमुळे व या सर्वांच्या जोडीला असलेल्या अद्भुत भाषाप्रभुत्वामुळे ! त्यांचे कोणत्याही स्वरूपाचे लिखाण असो, त्यांच्या विशिष्ट शैलीमुळे ते उठून दिसत असे. आवश्यकतेनुसार त्या लेखनाला सौष्ठव वा धार लाभत असे. त्यांनी लिहिलेले सारेच मृत्युलेख किंवा नाना प्रसंगांनी त्यांनी लिहिलेले व्यक्तिचित्रणात्मक लेख यांचे आगळेपण सर्वांनीच मान्य केलेले आहे. श्री. ना. सी. फडके तर अनेकदा म्हणत असत, "भाऊसाहेब, मी तुमच्या आधी मरणार ! कारण माझ्यावर तुम्हीच मृत्युलेख लिहावा ही माझी एकच इच्छा उरली आहे." माडखोलकरांचा लेखनविषय बनलेल्या माणसांची नामावली जर कोणी पाहिली, तर त्यातील सर्वसमावेशकता पाहून थक्क व्हावे लागते. श्री. कृपाशंकर नियोगी यांच्यासारख्या एखाद्या सामान्य कार्यकर्त्यापासून तो राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, कलात्मक, वाङ्मयीन अशा विविध क्षेत्रातील सानथोर मंडळींचा परामर्श भाऊसाहेबांनी अत्यंत तत्परतेने व तितक्याच सहृदयतेने घेतलेला आहे. काही काळ असे वाटावयाचे की, इतके संतमहंत, इतके राजकारणी व समाजकारणी, इतके सरंजामदार व संस्थानिक, इतके लेखक, गायक वा अन्य कलावंत यांच्याशी भाऊसाहेबांचा संपर्क आला तरी केव्हा ? त्यांच्या व्यक्तिमत्वाच, इतक्या बारकाव्याने त्यांनी अभ्यास तरी केला केव्हा ? हे सगळे करीत असता राजकीय चर्चा, साहित्यिक व्यासंग, विपुल लेखन व त्यासाठी लागणारे चिंतन यांना वेळ मिळाला तरी केव्हा ? त्यांच्या कामाचा झपाटा, त्यांची घटनांच्या विश्लेषणाची क्षमता, क्षुरधारेसारखी बुद्धिमत्ता आणि हे सारे ध्यानात ठेवून योग्य वेळी लिखाणात त्या त्या अनुभवांचा वापर करण्याची शक्ती या साऱ्याच गोष्टी विस्मयजनक होत्या.

मोरोपंतांचा आदर्श

आंतरिक रसिकता, चिरतरुण वृत्ती, मानसिक उमेद आणि सततोद्योगशीलता ही भाऊसाहेबांची वैशिष्ट्ये होती. जीवनात घेतलेल्या बऱ्यावाईट विविध अनुभवांचे समृद्ध वैभव, त्याला चिंतनाची जोड देऊन, ते सदैव मुक्तहस्ताने उधळत राहिले. वृत्तपत्रातील अग्रलेख म्हणजे खरे तर नित्याची कटकट असते. माडखोलकरांचा मात्र तो धर्म होऊन बसला होता. त्यांची संग्राहकता आणि योजकता, बुद्धिमत्ता आणि प्रतिभासंपन्नता, रसिकता आणि निरलसता यांचे सुरेख प्रतिबिंब त्यांच्या प्रत्येकच अग्रलेखात पडलेले आढळते.

कामचलाऊ किंवा वेळ निभवून नेण्यासाठी त्यांनी कधीच लेखन केले नाही. अचूकता हे त्यांच्या अग्रलेखाचे खास वैशिष्ट्य होते. 'कालपरवा, पाचपन्नास, सुमारास, अंदाजे' या वाक्प्रचारांचा त्यांना कमालीचा तिटकारा होता. लेखनात नेमकेपणा येण्यासाठी माडखोलकर जेवढी काळजी घेत, तेवढी काळजी दैनिकाच्या रामरगाडचात क्वचितच कोणी घेत असेल. मोरोपंतांच्या आर्या म्हणजे भाषागौरव भोगण्याचा आनंद असल्याची त्यांची भावना होती. ते नेहमी म्हणत, "ज्याला शब्दनिर्मितीची विद्या अवगत करावयाची असेल, त्याला मोरोपंतांविना गती नाही. मोरोपंतांचे ऋण केवळ मराठी कवितेवरच नव्हे, तर गद्यावरही आहे." माडखोलकरांची भाषाशैलीही मोरोपंतांप्रमाणे संपन्न, अर्थवाही आणि नादमधुर आहे. प्रमाथी, पृथगात्म इत्यादि अनेक संस्कृतप्रचुर शब्द अग्रलेखाद्वारे माडखोलकरांनीच मराठीत रूढ केले.

प्रचंड कामगिरी

माडखोलकरांच्या लेखणीने म्हणजेच अग्रलेखांनी राजकारणाचा फार मोठा कालखंड व्यापलेला आहे. नरीमन प्रकरण, देशगौरव सुभाष प्रकरण, रा. कृ. पाटील प्रकरण ही झाली केवळ प्रकरणेच! शुक्ला–मिश्रांची जुन्या मध्यप्रदेशाची संपूर्ण राजवट माडखोलकरांच्या वृत्तपत्रीय अमदानीतच उदयाला आली आणि अस्ताला गेली. पक्षोपपक्षांच्या राजकारणाचाही आलेख काढावयाचा म्हटले तर, आता ज्या गोष्टी शिकवल्यावाचून समजणेही अशक्य अशी होमरूल चळवळ, फेर–नाफेर वाद, हिंदुमहासभेचे राजकारण हा सगळा काळ नागपूर विदर्भाच्या संदर्भात अभ्यासता येईल, एवढे प्रचंड लेखन अग्रलेखांच्या रूपाने माडखोलकरांनी केलेले आहे. मुंजे–अभ्यंकर वादात त्यांच्या लेखणीला किती धार चढली होती आणि एकदा एक बाजू घेतली म्हणजे आप्तांवरही तुटून पडण्यासाठी त्यांना अलिप्त वृत्ती कशी जोपासता येत होती याचा अनुभव मागच्या पिढीतील लोकांनी घेतला आहे. ब्रिटिश गव्हर्नर गोवन, कार्यकारी गव्हर्नर ई. राघवेन्द्र राव, खरे मंत्रिमंडळ, शुक्ला–मिश्रांची राजवट, यशवंतराव चव्हाणांचा मुख्यमंत्रिपदाचा काळ, त्यानंतर कन्नमवार आणि वसंतराव नाईक अशा अनेक राजवटी आणि कारकीर्दी यांची नोंद माडखोलकरांच्या अग्रलेखांनी घेतली आहे. ख्रिश्चनांनी चालविलेल्या धर्मान्तराच्या उपद्व्यापाची चौकशी करण्यासाठी जुन्या मध्यप्रदेश सरकारने नियोगी कमिशन नेमले, त्या वेळी भाऊसाहेबांनी या कमिशनच्या आडोशाने ब्रिटिश राज्यकर्त्यांची अक्षरशः ऐसीतैसी करून टाकली होती.

'महाखोडकर'

नागपूर–विदर्भाच्या वृत्तपत्रसृष्टीत माडखोलकरांचे स्थान एकमेवाद्वितीय मानावे लागेल. त्यांनी मराठी वृत्तसृष्टी अक्षरशः गर्जून आणि गाजवून सोडली. त्याचे वर्णन 'बहुत नृपति ते आले गेले. परि मनाला यदुवर गमला मंत्र महान' असेच करावे लागेल. आपल्या शैलीने त्यांनी इतक्या विविध विषयावर अग्रलेख लिहिले आहेत की, त्यांचा तो झपाटा बघून विस्मयच वाटावा. त्यांनी अनेकदा आपल्या मुद्यांनी, विधानांनी वादाचे नुसते मोहोळच नव्हे तर प्रसंगी वारूळेही उठविली. त्या मोहोळातून पिसाळून उठलेल्या माशा व वारूळातून फणत–फुत्कारत आलेले नाग यांचे डसणेही त्यांना सहन करावे लागले. पण ते सर्व त्यांनी लीलया सहन केले. मात्र वारूळी मोहळांना हात घालण्याचा त्यांचा स्वभाव अखेरपर्यंत बदलला नाही. अग्रलेख किती मोठा असावा, याबाबत कोणतेही बंधन त्यांनी कधी पाळले नाही. त्यामुळे कधीकधी तर ७–७, ८–८ कॉलमी अग्रलेख उमटायचे! मात्र त्यांची खासियत अशी की, लांबण असली तरी त्यांचा एकही अग्रलेख कधी कंटाळवाणा झाला नाही. अग्रलेखातील टीका घणाघाती तर असेच, पण त्यामध्ये कमालीचा उपरोध आणि उपहास आढळे. भाषाशैलीचा तो चमत्कार अविस्मरणीयच आहे. कोणाची तरी खिल्ली उडवायची, टिंगल–टवाळी करावयाची हा माडखोलकरांचा स्वभावच होता. श्री. त्र्यं. गो. देशमुख त्यांना 'महाखोडकर' म्हणत असत, ते काही उगाच नाही.

अग्रलेखांची वैशिष्टये

एक छोटेसे उदाहरण सांगतो. श्री. रिखबचंद शर्मा यांनी महानगरपालिकेच्या एका बैठकीत नागपुरात माशा खूप वाढल्या असल्याची तक्रार करताना जेवतेवेळी आपल्या वाटीत माशी मरून पडल्याचे सांगितले. माडखोलकरांना झकास संधी मिळाली. त्यांनी त्या विषयावर अग्रलेखच लिहून टाकला. त्याचा सारांश असा : 'थुलथुलीत शरीराच्या रिखबचंदजींनी चमचमीत भोजनावर ताव मारीत असता, आपली, गुबगुबीत बोटे बासुंदीच्या कटोऱ्यात घातली आणि ओशटपणा-मुळे चुबचुबीत झालेल्या त्यांच्या हाताला हौतात्म्य पत्करून लिबलिबीत झालेली माशी तेवढी लागली." साऱ्या अग्रलेखभर हीच बहार होती. साक्षी-पुराव्याशिवाय आपण लेखन करीत नाही असे माडखोलकर म्हणावयाचे पण मौज अशी, या साक्षी प्रामुख्याने मृत व्यक्तींच्या असत. त्याबद्दल त्यांच्यावर टीका काही कमी झाली नाही, पण त्यांनी आपला खाक्या मात्र सोडला नाही. आचार्य अत्रे, डॉ. ना. भा. खरे, त्र्यं. गो. देशमुख यांच्या-पासून तो ना. रा. शेंडे, वामनराव गावंडे यांच्या-पर्यंत अनेकांचे शिव्याशाप माडखोलकरांना सहन करावे लागले. त्याचप्रमाणे त्यांनीही या मंडळींवर वेळप्रसंगी कठोर टीका केली. असे असले तरी योग्य वेळेस त्या व्यक्तीच्या कार्याची लेखणी भरून प्रशंसा करण्यास माडखोलकर कधी चुकले नाहीत. त्यांचे एक फार मोठे ऋण असे की, नागपूर-विदर्भातील वाचकांमध्ये त्यांनी अग्रलेख वाचण्याची आवड निर्माण केली. श्रीमंत बाबुरावजी देशमुख यांनी एकदा तक्रारीच्या सुरात म्हटले होते, "भाऊसाहेब, तुमचे अग्रलेख चांगले असतात, पण पिवळा कागद आणि जुनाट टाईप यामुळे धडपणे ते वाचताव येत नाहीत." त्यावर माडखोलकर उत्तरले होते, "माझे अग्रलेख गोणपाटावर छापले, तरी लोक ते आवडीने वाचतील!"

महाराष्ट्राचे एकीकरण

माडखोलकरांना जुन्याचा जसा आदर होता, तशीच नव्याबद्दल आपुलकी होती त्यामुळे जुन्या-नव्याचा फार सुंदर समतोल साधून त्यांच्याशी ते समरस होत. आयुष्यभर ते शिकत आणि वढलत राहिले, त्याचा सुरेख प्रत्यय त्यांच्या अग्रलेखातून येत असे. लोकमान्य टिळकांच्या जन्मशताब्दीच्या वेळी त्यांनी 'श्रीशाय जनतात्मने' शीर्षकाचा अग्रलेख लिहिला, त्यात गीतारहस्यातील निष्काम कर्मयोग मोठ्या कौशल्याने समजावून सांगितला होता. माडखोलकरांनी सर्वप्रथम संयुक्त महा-राष्ट्राचे मानचित्र रेखाटले आणि त्यासाठी सातत्याने त्यांनी आपली वाणी लेखणी झिजविली. १९४६ मध्ये बेळगाव येथे भरलेल्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून समस्त मराठी-भाषिकांना हाक देताना माडखोलकर म्हणाले होते, "महाराष्ट्रापुढे आज जो मुख्य प्रश्न आहे, तो मराठी भाषेच्या लालनाचा आणि मंडनाचा नव्हे, तर रक्षणाचा आणि भवितव्याचा आहे. नर्मदेपासून तुंगभद्रेपर्यंत पसरलेल्या महाराष्ट्राचे जोपर्यंत एकीकरण होत नाही, तोपर्यंत मराठी भाषा आणि साहित्य यांचा सर्वांगीण उत्कर्ष होणे अशक्य आहे. म्हणूनच साहित्याच्या या अग्रासना-वरून फोडलेली ही हाक नर्मदेपासून तुंगभद्रेपर्यंत सर्व महाराष्ट्रात दुमदुमेल. सह्याद्रीच्या आणि सातपुड्याच्या साऱ्या दऱ्याखोऱ्यात तिचे प्रतिध्वनी उफाळून उठतील."

गाजलेले अग्रलेख

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीला १५-२० दिवस उरले असता, १० एप्रिल १९६० रोजी पं. जवाहरलाल नेहरू महाराष्ट्राला राष्ट्रवाद शिकवू लागले, तेव्हा संतापातिरेकाने माडखोल-करांची लेखणी गरजली होती, 'या उपदेशाची महाराष्ट्राला गरज नाही!' त्या अग्रलेखात महाराष्ट्राच्या राष्ट्रवादी परंपरेचे मोठे मनोज्ञ दर्शन त्यांनी घडविले होते. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर, श्री. यशवंतराव चव्हाण यांच्याशी जाहीर संभाषण करणारा अग्रलेख त्यांनी लिहिला होता. त्याचे शीर्षक होते, 'संयुक्त महाराष्ट्र हे मराठी राज्य की मराठा राज्य?' श्री. यशवंतराव चव्हाण यांनी सांगली येथील भाषणात त्याला उत्तर देताना म्हटले होते, "हे मराठी राज्यच राहील. आम्ही आमच्या जनतेला तसे वचन दिले

आहे. आम्ही जनतेशी प्रतिज्ञाबद्ध आहोत. हे राज्य मराठीच राहील.". काँग्रेसश्रेष्ठींनी-विशेषत: पं. नेहरूंनी द्विभाषिकाचा निर्णय घेतला, तेव्हा माडखोलकरांचे मन अगदी पेटून उठले. त्यावर त्यांनी 'या निर्णयाचे स्वागत करा' या शीर्षकाचा अग्रलेख लिहिला. हा जळजळीत अग्रलेख उपहासाने ओतप्रोत भरलेला असला तरी त्यातून जे आसूड ओढले गेले, त्यामुळे काँग्रेस-श्रेष्ठींचा जीव अगदी घाबराघुबरा होऊन गेला होता. पंढरपूरच्या पांडुरंगाची महापूजा बंद केल्याबद्दल महाराष्ट्र सरकारची त्यांनी एका अग्रलेखातून उपरोधिक आणि उद्वेग उत्पन्न करणारी पूजा बांधली आणि तसा सल्ला देणाऱ्या तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी या महापंडिताची अक्षरश: शोभा केली.

मृत्युलेखांचे महत्त्व

माडखोलकरांनी लिहिलेले व्यक्तिचित्रणात्मक लेख किंवा मृत्युलेख यांचे महाराष्ट्राच्या भावजीवनात अनन्यसाधारण स्थान आहे. गोळवलकर गुरुजी यांच्याबद्दल संघेतरांच्या मनात अबोध अशी गूढता होती. पण माडखोलकरांनी त्यांच्यावर जो मृत्युलेख लिहिला, तो वाचल्यानंतर आम्हाला गोळवलकर गुरुजी उमगले, अशी कबुली श्री. यदुनाथ थत्ते यांनी माझ्याजवळ दिलेली आहे. आचार्य अत्रे, मामा वरेरकर, काकासाहेब गाडगीळ, लोकनायक अणे, बालगंधर्व, बाबुरावजी देशमुख, बाळशास्त्री हरदास, तुकडोजी महाराज, प्रतापसिंगराव भोसले, डॉ. ल. वा. परांजपे, भाऊजी दप्तरी, पंजाबराव देशमुख, डॉ. ना. भा. खरे आदींवरील त्यांचे मृत्युलेख म्हणजे महाराष्ट्राला लाभलेले अमोल विचारधन आहे. ज्यांनी सतत अर्धशतक हे विचारधन उधळले. त्या शैलीकार माडखोलकरांना महाराष्ट्र विसरू शकत नाही हेच खरे !

करुणाजनक अखेर

या युयुत्सु पत्रमहर्षींची अखेर मात्र करुणाजनक होती. देशावर आणिबाणी लादली गेली, सर्व स्वातंत्र्याचा संकोच झाला आणि माडखोलकर पेटून निघाले. ज्यांच्या अग्रलेखांचे एक साम्राज्य निर्माण झाले होते, त्या साम्राज्यालाच तडा गेला. माडखोलकरांच्या पायाशी बसण्याची ज्यांची योग्यता नव्हती, असे दीड दमडीचे सनदी नोकर त्यांच्या अग्रलेखांचे पूर्वपरीक्षण करू लागले. उंदराने गणपतीला अक्कल शिकविण्यासारखाच तो आचरट आणि मनस्ताप वाढविणारा प्रकार होता. तत्कालीन विधीमंत्री श्री. हरिभाऊ गोखले यांच्याकडे केन्द्र सरकारच्या निषेधाची अनेक पत्रे भाऊसाहेबांनी पाठविली, पण एकाचेही उत्तर म्हणून नाही. कान असून बहिरे आणि डोळे असून आंधळे अशी साऱ्यांची अवस्था होऊन गेली. वाणी आणि लेखणीचा हा जीवघेणा संकोच पाहून माडखोलकर हादरून गेले, कळवळले. अग्रलेख रद्द करावा लागला म्हणजे त्यांचे अंत:करण अक्षरश: पिळवटून जात असे. त्यांच्या जीवनातील गोडीच संपून गेली, जीवनरस पूर्णपणे आटून जाऊन ते शुष्क बनले आणि त्याच अवस्थेत आयुष्यभर धगधगत राहिलेला त्यांचा शब्दयज्ञ संपून गेला. ■

बी. २०४ उज्ज्वल फ्लॅट्स
रहाटे कॉलनी वर्धा रोड, नागपूर

अनुक्रमणिका

माडखोलकरांच्या काव्यसमीक्षेतील राष्ट्रीयता

राजेन्द्र डोळके

माडखोलकरांनी काव्य, टीकालेखन, लघुकथा, प्रबंध, कादंबरी इत्यादी विविध वाङ्मयप्रांतात विहार केलेला असला तरीही कादंबरी आणि टीकालेखन यामध्ये त्यांची कामगिरी विशेष आहे. त्यातही टीकाकार म्हणून त्यांचे स्थान विशेष महत्त्वाचे आहे. मराठी वाङ्मयाच्या इतिहासात एक सृजनशील टीकाकार म्हणून त्यांचे नाव सदैव स्मरणात राहील.

माडखोलकर हे मराठीतले प्रमुख राजकीय कादंबरीकार आहेत, त्यांच्या कादंबऱ्यात सर्वत्र राजकारण चर्चा आढळून येते अशी भाषा त्यांच्यांवद्दलच्या अनेक समालोचनात्मक ग्रंथांतून आणि आणि लेखांतून आपल्याला वाचावयास मिळते. एवढेच नव्हे तर त्यांच्या एकूणच संपूर्ण वाङ्मयातून त्यांच्यातली राष्ट्रीयता दिसून येते अशीही भाषा आपल्याला वाचावयास मिळते. माडखोलकरांच्या 'अवशेष'चे प्रस्तावनाकार श्री. वि. ह. कुळकर्णी म्हणतात, "प्रस्तुत पुस्तकातील लेख वाचताना जर कोणती गोष्ट प्रामुख्याने माझ्या नजरेस पडली असेल तर ती ही की, माडखोलकरांच्या आजच्या लिखाणातूनच नव्हे, तर साहित्य क्षेत्रात त्यांनी पदार्पण केल्यापासून राजकीय स्वातंत्र्याचा पुरस्कार त्यांनी ह्या नाही त्या स्वरूपात केलेला आढळून येतो." ('अवशेष', प्रस्ता. पृ. ७). माडखोलकरांच्या समग्र वाङ्मयाचे परिशीलन करणारे प्रा. मा का. देशपांडे म्हणतात, "त्यांची जी त्रोटक कविता आहे, तिच्यात त्यांचे अवखळ देशप्रेम स्पष्टपणे उमटलेले आहे. ज्या राष्ट्रभक्तीचा प्रवाह त्यांच्या एकंदर पुढील वाङ्मय संभारात दृष्टीस पडतो, त्याची सूक्ष्म सुरुवात त्यांच्या होतकरू कविता लेखनात दृष्टीस पडते यावरून त्यांचे एकंदर वाङ्मयीन जीवन हे तीव्र देशप्रेमातून निर्माण झाले आहे, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही." ("माडखोलकर–वाङ्मय आणि व्यक्तिमत्त्व" पृ. ८). एवढेच नव्हे तर, खुद्द माडखोलकरांनीही स्वतःच्या वाङ्मयाविषयी "१९१८ पासून गेल्या वीस वर्षात मी जे निरनिराळ्या प्रकारचे लेखन केले, त्याचे स्वरूप मुख्यतः राजकीय राहिले आहे...अर्थात जीविताकडे पाहण्याची माझी दृष्टी सर्वथैव राजकीय आहे." ('अवशेष', पृ. ९८). हे जे उद्गार काढले आहेत, त्यावरून माडखोलकर हे सर्वथैव राष्ट्रीय लेखक असावे, त्यांच्या वाङ्मयातून सर्वत्र राष्ट्रीयतेचाच प्रवाह खळखळत असेल अशीच कुणाचीही समजूत होईल.

माडखोलकरांच्या लिखाणातून राष्ट्रीयता, त्यांची देशभक्ती दिसते याविषयी शंका नाही. त्यांनी सुरुवातीच्या काळात रचलेल्या 'कालचा महाराष्ट्र' या कवितेतील

> झाला लुप्त तुझा स्वभावच महाराष्ट्र ! कसा आज तो
> तेजोभंग न राष्ट्र मानधन जे त्याला असा साजतो
> तेजोभंग तुझा असा परि कसा झाला न काही कळे,
> कोणाचा तुज शाप भोवुनि तुझी तेजस्विता मावळे ।

स्वातंत्र्याविण जे जिणे विफल ते तेव्हा तुला वाटले
स्वातंत्र्योत्कट दिव्य भार तर ते सारेच कां आटले ?

या ओजस्वी ओळीतून त्यांचा स्वातंत्र्याभिमान स्पष्टच दिसतो. एवढेच नव्हे तर 'शिवराज्याभिषेक', 'महाराष्ट्रशारदा', 'महाराष्ट्रास' या कवितांच्या केवळ शीर्षकांवरून देखील माडखोलकरांनी या कवितांत आपली राष्ट्रभावना प्रगट केली असेल असाच तर्क कोणीही करील. माडखोलकरांच्या टीकालेखनात देखील राष्ट्रीयता कमीअधिक प्रमाणात डोकावते. तेव्हा माडखोलकरांचे लिखाण राजकीय विचारांनी परिपूर्ण आहे असाच कुणाचाही समज होईल.

पण, माडखोलकरांना राष्ट्रवादी लेखक म्हणणारे काही टीकाकार जसे आहेत तसेच माडखोलकर हे राष्ट्रवादी लेखक नाहीत असेही म्हणणारे काही टीकाकार आहेत. त्यात डॉ. रा. शं. वाळिंबे ('मुक्तात्म्यापासून प्रमद्वरेपर्यंत'), दा. न. शिखरे ('मराठीचा परिमल'), डॉ. सुरेश डोळके ('मराठी साहित्य–दर्शन श्री. ग. त्र्यं. माडखोलकर', प्रस्तावना), डॉ. अ. ना. देशपांडे ('आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास') इत्यादी टीकाकारांची नावे सांगता येतील. या सर्व लेखकांनी माडखोलकरांच्या राष्ट्रीयत्वाचा मागोवा त्यांच्या केवळ कादंबऱ्यांच्याच अनुषंगाने घेण्याचा प्रयत्न केला आहे.

माडखोलकरांच्या कादंबऱ्यात राजकीय वातावरण असून देखील त्यांना राजकीय म्हणावे का ? हा संशय ज्याप्रमाणे ह्या टीकाकारांच्या मनात आला तोच संशय त्यांचे टीकालेखन वाचल्यानंतर देखील मनात येतो. माडखोलकरांची केवळ काव्यविषयक समीक्षा लक्षात घेऊन त्यांचा राष्ट्रीयवाद शोधण्याचा प्रयत्न आपण थोडक्यात करू.

माडखोलकरांचा प्रवेश वाङ्मयप्रांतात कवी या नात्यानेच झाला. रविकिरणमंडळातील ते एक प्रमुख सदस्य होते. शिवाय, आधुनिक मराठी काव्यक्षेत्रातील अनेक नावाजलेल्या कवींचे जीवन त्यांनी जवळून पाहिले होते. इंग्रजी काव्याचाही त्यांचा अभ्यास दांडगा होता. या सर्वांचा परिणाम त्यांच्या काव्यसमीक्षेवर झाला आहे. स्वतःच्या ठिकाणी असलेल्या आत्मौपम्यबुद्धीने कवींच्या अंतःकरणाशी समरस होऊन त्यांच्या कवितेतील सौंदर्य माडखोलकर उलगडून दाखवितात. त्याचप्रमाणे काव्याचे समालोचन करताना केवळ परीक्षा–काव्यावरच आपली दृष्टी न ठेवता त्याच्या अनुषंगाने सुचलेली मते व ज्ञान ते विस्तृत रीतीने प्रगट करतात. ह्या पद्धतीने काव्यात मूळात नसलेल्या अनेक अतिरिक्त गोष्टींचे ज्ञान वाचकाला होते खरे पण, कधीकधी माडखोलकरांची ही पद्धती अकारण व पाल्हाळिक वाटते. माडखोलकर हे व्यक्तिचित्र रेखाटण्यातही वाकबगार असल्याने कवितेचे समीक्षण करीत असताना त्यांना माहीत असलेल्या व्यक्तींचे स्वभाववर्णनही ते उत्कृष्ट रीतीने करतात. श्री. रा. बोवडे ('माझे आवडते कवि', पृ. ९४ ते ९६), यशवंत (तत्रैव, पृ. ३८–४७), मा. त्रि. पटवर्धन ('वाङ्मय–विलास', पृ. ५५ ते ७५), इत्यादींवरील समीक्षण लेख याचे उदाहरण म्हणून देता येतील. अशा नानाविध वैशिष्ट्यांनी युक्त असलेली माडखोलकरांची काव्यसमीक्षा शैली आहे.

माडखोलकरांच्या काव्यसमीक्षेत कवीच्या राष्ट्रीय वृत्तीचा शोध घेण्याचा प्रयत्न काही प्रमाणात साधारणतः सर्वत्र दिसतो. पण, कवीच्या राष्ट्रीय वृत्तीपेक्षा त्याच्या काव्य गुणांनीच ते जास्त प्रभावित झालेले दिसतात. उदाहरण म्हणून त्यांच्या 'यशोधन' या लेखाचा उल्लेख करता येईल. ('वाङ्मय–विलास', पृ. १०८ ते १३१). माडखोलकरांच्या मते ज्यांना खरोखरी राष्ट्रीय कविता म्हणता येईल, अशा पुरत्या दहा सुद्धा कविता यशवंतांनी लिहिलेल्या नाहीत आणि त्या सुद्धा अतिशय आत्मपर ! शिवाय, कविप्रतिभेच्या सामर्थ्याने जे सुंदर वर्णन त्यांनी केले आहे, त्याचा यत्किंचितही प्रत्यय त्यांच्या स्वतःच्या राष्ट्रीय कवितेत येत नाही, असे माडखोलकर म्हणतात

(पृ. १२२). पुन्हा, तिच्यात अतृप्त वैयक्तिक आकांक्षांची तडफड भरलेली दिसते ती वेगळीच ! पण, माडखोलकरांसारख्या राष्ट्रीय वृत्तीच्या समीक्षकाला 'आत्मपर' अशा खरोखर राष्ट्रीय न म्हणता येणाऱ्या व कविप्रतिभेचा आढळ यत्किंचितही न होणाऱ्या यशवंतांच्या भावगीताइतकी विविध व उत्कृष्ट भावगीते नवीन पिढीतील दुसऱ्या कोणत्याही कवीने लिहिलेली आढळत नाहीत. (पृ. १३०), 'यशोधन'मध्ये त्यांना जे बुद्धिवैभव आढळते, ते विद्वत्तेचे नव्हे तर केवळ कल्पकतेचे आणि त्यांच्या मते यशवंतांच्या कल्पनाशक्तीला बहुवसपणाला निदान समकालीन कवीत तरी खचित जोड नाही. (पृ. १२७). आणि शेवटी तर ते लिहितात, "विस्मृतीच्या गर्तेत खोल गाडलेले त्यांच्या जात-मृत काव्यांचे मुडदे शब्दसृष्टीतील जन्ममृत्यूंची नोंद ठेवणारे इतिहासकार जेव्हा उकरण्याच्या उद्योगात असतील, त्या वेळी मराठी वाङ्मयाच्या क्षितिजावर यशवंतांचे यशःशरीर मात्र प्रभातदूताप्रमाणे आपल्या उज्ज्वल तेजाने तळपत असलेले जगाच्या दृष्टीस पडेल, (पृ. १३०-१३१).

माडखोलकरांच्या काव्यसमीक्षेतून याप्रमाणे त्यांची रसिकता व थोडीबहुत राष्ट्रीयतेची चर्चा आपल्याला प्रायः सर्वच काव्यसमीक्षा लेखांतून आढळते, पण, असे म्हणण्यापेक्षा त्यांची काव्य समीक्षा त्यांच्या चिकित्सक रसिकतेनेच न्हाऊन निघाली आहे असे म्हणणेच जास्त योग्य होईल. माडखोलकरांची राष्ट्रीयता ही त्यांच्या रसिकतेत जवळ जवळ संपूर्ण बुडून गेल्यासारखी दिसते. माडखोलकर राष्ट्रीयतेचा उच्चार केवळ मुखाने करतात परंतु वृत्तीने मात्र ते कवींच्या काव्यउद्यानातील रमणीय वातावरणातच रमतात.

कवींच्या केवळ काव्यगुणांवर लुब्ध होऊन माडखोलकरांनी काव्यसमीक्षा केलेलीही उदाहरणे आहेत. ह्यात रेंदाळकर, चंद्रशेखर, शुक्ल (कुमुदबांधव), गिरीश इत्यादींची नावे घेता येईल. चंद्रशेखरांची कविता वाचताना माडखोलकरांना "शरद ऋतूंतील पुनवेच्या रात्री, देवळातील घंटांचे मधुर नाद ऐकत किंवा प्रासादांच्या शिखरांवरील मनोहर दीपराजी पहात, तिच्या पात्रांतून नौकाविहार करीत असताना ज्या प्रकारचे सुख होते, त्याच प्रकारचा आनंद त्यांची अभिजात कविता वाचताना मनाला होतो." ('माझे आवडते कवि' पृ. १५२) त्याचप्रमाणे, "चंद्रशेखरांचे शब्द इतके मृदु आणि रसगर्भ असतात की, त्यांचे सौष्ठव पाहून कमळांची कांती हरपावी; त्यांची रचना इतकी घोटीव असते की, तिच्या आरस्पानी अंगांतून ध्वन्यर्थांच्या छटा विविधतेने झळाळतात; व वागर्थांचे अद्वैत त्यांच्या कवितेत इतके सुंदर साधलेले असते की, त्याच्या मानाने भारवीचे क्लिष्ट अर्थगौरव साहजिकच रूक्ष वाटते," असे माडखोलकर म्हणतात. (तत्रैव, पृ. १५४).

रेंदाळकरांच्या कवितेबद्दल ते म्हणतात, "रेंदाळकरांच्या कवितेत जाण, मोरोपंत आणि केशवसुत यांच्या लेखन शैलीचे मोठे मनोहर मिश्रण पहावयाला मिळते. गजराजीप्रमाणे भव्य अशी समासश्रेणीप्रमाणे पाहून संतुष्ट होणाऱ्या साहित्य पंडितापासून तो घरगुती भाषेत लिहिलेले कवन गोडीने वाचणाऱ्या सामान्य वाचकांपर्यंत सर्वांची सोय त्यांच्या कवितेत झाली आहे. मखमलीवर केलेल्या जरीच्या कलाबतूपासून तो पांढऱ्या सुताच्या साध्या कशिद्यापर्यंत हर तऱ्हेचे भरदार बेडौल अगर बारीक विणकाम त्यांच्या काव्यात आढळून येते," (पृ. १६५), आणि रेंदाळकरांनी निर्यमक कविता मराठीत रूढ करण्याचे साहस दाखविले म्हणून "आज निर्यमक कविता मराठीत रूढ झालेली आपण पहात आहोत. त्यांच्या या साहसाचा गौरव समकालीनांनी केलेला नसला तरी भावी कवी त्याबद्दल त्यांना धन्यवाद देतील." या शब्दात त्यांचे कौतुक केले आहे. (पृ. १८०). याच संदर्भात माडखोलकरांनी कवी शुक्लांच्या कवितेविषयी काढलेले उद्गार लक्षात घेणेही मोठे मनोरंजक आहे. ते लिहितात, "त्यांच्या कवितांतील भावना खोल किंवा व्यापक नाहीत. व त्यांना जरी थिल्लर म्हणता न आले, तरी उथळ म्हटल्यास ते गैर होणार नाही." ('मा. आ. क.' पृ. १८५). पण, लगेच "या प्रकारची रचना करणारे कवी जरी पहिल्या प्रतीच्या कलावंतात न मोडले, तरी

त्यांची कारागिरी पुष्कळच कौतुकास्पद असते. जगात काही गुणी लोक आपण असे पहातो की, त्यांची वादनाच्या कलेत पूर्ण गती नसली, तरी हर एक चीज ते अशा हिकमतीने वाजवतात की, ती ऐकताना मन अगदी गुंग होऊन जाते. या कवींची रचनाही तशाच तऱ्हेची असते." (पृ. १८७). असे उद्गार काढून शुक्लांच्या 'ठिमूळ' पण 'बहुतेक चांगल्या भावगीतांना' (पृ. १८७) त्यांनी 'कौतुकास्पद' म्हटले आहे.

राष्ट्रीय नसलेल्या किंवा माडखोलकरांना राष्ट्रीय वाटत नसलेल्या या कवींबद्दलच्या माडखोलकरांच्या वरील उद्गारावरून त्यांची कलोपासक वृत्ती आपल्या लक्षात येते. राष्ट्रीय समीक्षण करण्याऐवजी माडखोलकर ह्या कवींच्या काव्यपुष्पातील परागकण शोधण्यातच दंग झालेले दिसतात. स्वतःच्या राष्ट्रीयवृत्तीचा पूर्णपणे विसर पडून माडखोलकर काव्याचा आस्वाद घेण्यात गुंग झालेले आहेत कारण माडखोलकरांची वृत्तीच मुळात कलोपासक आहे.

काही कवींच्या बाबतीत तर याहीपेक्षा वेगळे उदाहरण आढळते. राष्ट्रीयता यत्किंचितही दिसून येत नसताना देखील, ती उणीव त्यांनी काव्यदृष्ट्या इतर उत्कृष्ट कविता निर्माण केल्याबद्दल माडखोलकर त्यांची पाठ थोपटताना दिसतात. राजकीय विचार वगैरेशी न आढळणाऱ्या गोविंदाग्रजांच्या कवितेबद्दल माडखोलकर म्हणत, "राष्ट्रीय कवने त्यांची जवळ जवळ मुळीच नाहीत, समाजाशी त्यांना कधीच तद्रूप होता आले नाही...त्यांच्या मनाचा ओढाच तिकडे नव्हता व त्यामुळे त्यांना राष्ट्राशी उत्कटतेने कधीच तद्रूप होता आले नाही ... हा दोष नव्हे. सगळ्या भावनांचे सारखे वर्णन एकाच कवीला साधणे शक्य नाही. आणि म्हणूनच गोविंदाग्रजांच्या कवित्वाला या उणेपणाने बाध येत नाही." ('आधुनिक कविपंचक, पृ. १२९). "वस्तुतः महाराष्ट्रातील आधुनिक कवींना महाराष्ट्राच्या कालच्या व आजच्या चळवळीशिवाय दुसरे काहीही सुचता कामा नये." (तत्रैव. पृ. ८९) असे म्हणणाऱ्या माडखोलकरांनी गोविंदाग्रजांच्या कवितेबद्दल असे उद्गार काढावे याचे आश्चर्य वाटते. पण, गोविंदाग्रजांनी जी काही थोडीबहुत राष्ट्रीय कविता लिहिली आहे त्याबद्दलचे माडखोलकरांचे उद्गार वाचून याहीपेक्षा आश्चर्य वाटते. ते म्हणतात, "पानिपतचा फटका या रेखीव रचनेला चेतनेची जोड मुळीच मिळालेली नाही...राष्ट्रीय सभेतील बखेड्यांशी ही पानिपतच्या युद्धांची तुलना अत्यंत हास्यास्पद व पुन्हा उद्वेगजनक आहे, त्यात देशभक्ती दिसून येत असेल. परंतु औचित्य खास दिसत नाही." (पृ. ११७) गोविंदाग्रजांच्या या कवितेत औचित्य नसेल, चेतनाही नसेल तरीदेखील देशभक्ति प्रामाणिकपणे व्यक्त करण्याचा प्रयत्न म्हणून माडखोलकरांसारख्या राष्ट्रीय विचाराच्या समीक्षकाकडून गोविंदाग्रजांचे कौतुक याठिकाणी अपेक्षित होते.

हाच प्रकार बालकवींबद्दलही आपल्याला आढळतो "संध्यातारक या उत्कृष्ट गीतावर एक प्रकारच्या गोड करुणरसाची छाया पडली असल्यामुळे हे गीत हृदयंगम झाले आहे." ('आधुनिक कविपंचक' पृ. १५३), 'दौलतरावांची मंजुळा' ह्या अत्यंत अतीव हृदयद्रावक खंडकाव्यातील अश्रूंच्या महत्त्वाचे अतिशय सुंदर वर्णन वाचून "हे अश्रूंचे महिम्नस्तोत्र कोणाला पटणार नाही!" (पृ. १५९) असे अभिप्राय व्यक्त करून "बालकवींची कोणतीही उत्कृष्ट कविता वाचताना मनाला अगदी विशुद्ध आनंदाचा लाभ होतो." असे ते म्हणतात (पृ. १६५). अशा या निसर्गास्वादक कवीच्या राष्ट्रीय कवितेबद्दल "राष्ट्रीय कविता बालकवींनी लिहिलीच नाही म्हटले तरी चालेल." (पृ. १६७) असे म्हणून त्यांनी राष्ट्रीय कविता न लिहिल्याचे समर्थन ते "त्यांच्या अंतःकरणात जे विचार घोळत होते त्यांचा उच्चार करावयाला काळ अनुकूल नव्हता, हेच होय!" या शब्दात करतात. माडखोलकरांच्या या उद्गारांवर श्री. मा. का. देशपांडे यांनी "जणू काय कवी हा अनुकूल कालाचा पाठिंबा असल्याशिवाय धिटाईने राष्ट्रीय गीते गाऊच शकत नाही!" (माडखोलकर : वाङ्मय आणि व्यक्तिमत्त्व, पृ. १२) हा जो उपरोधिक अभिप्राय व्यक्त केला आहे तो यथार्थ वाटतो.

माडखोलकरांच्या काव्यसमीक्षेतील राष्ट्रीयतेचे स्वरूप याप्रमाणे आहे. माडखोलकर राष्ट्रीयतां-रूपी मृत्तिका घेऊन आपल्या काव्यसमीक्षेची मूर्ती घडवायाला बसले आहेत असा भास होतो खरा, पण त्यांच्या वृत्तीतील काव्यात्मकतेचे अभिषिंचन सतत ह्या मूर्तीवर होत असल्यामुळे ही मूर्ती विरघळतच असताना आपल्या दृष्टीस पडते. काव्य समीक्षण करता करता त्यांची काव्यात्मकता इतकी प्रभावी होते की प्रत्येक कवीचे इतर आधुनिक कवीत न आढळणारे सर्वोत्कृष्ट वैशिष्टय सांगून ते मोकळे होतात. "रेंदाळकरांच्या रचनेइतकी सुश्लिष्ट, सावेश आणि सालंकार रचना दुसऱ्या कोणत्याही मराठी कवीची असेल", असे माडखोलकरांना वाटत नाही. ('माझे आवडते कवि', पृ. १६४), तर गोविंदाग्रजांच्या 'राजहंस'च्या तोडीचे करुणगीत मराठी काव्यवाङ्मयात दुसरे क्वचितच आढळेल, असे ते म्हणतात. ('आधुनिक कविपंचक' पृ. ११७), बालकवींच्या 'निर्झर' या कवितेत उत्कृष्ट वाद व उत्कृष्ट ध्वनी यांचा इतका सुंदर मिलाफ त्यांना दुसऱ्या कोणत्याही आधुनिक गीतात झालेला आढळत नाही. (तत्रैव, पृ. १७५) व यशवंतांच्या भावगीतां-इतकी विविध व उत्कृष्ट भावगीतेही त्यांना नवीन पिढीतील दुसऱ्या कोणत्याही कवीने लिहिलेली आढळत नाहीत, ('वाङ्मय-विलास, पृ. १३०). माडखोलकरांच्या काव्यसमीक्षेतून अशा प्रकारची उदाहरणे अनेक काढून दाखविता येतील.

माडखोलकर धर्माभिमानी आहेत. टिळकांच्या कवितेच्या पर्यालोचनातून त्यांच्यातील हा धर्माभिनिवेश आपल्याला जाणवतो. पण, माडखोलकरांच्या काव्यात्मकतेने ज्याप्रमाणे त्यांच्या राष्ट्रवादाचे रूपांतर कल्पनारंजनात करून टाकले आहे त्याचप्रमाणे या धर्माभिमानाचेही स्वरूप स्वप्नरंजनात करून टाकले आहे. विचारांतून उत्पन्न झालेल्या तत्त्वांचे अधिष्ठान त्यांच्या धर्माभि-मानाला दिसत नाही तर आंधळ्या उत्कटतेतून त्यांचा हा धर्माभिमान उत्पन्न झाला आहे असे वाटते. एकीकडे ते लिहितात, "राष्ट्राभिमान व धर्माभिमान यांचा तरतमभाव दाखविणाऱ्या या भिन्न कविता वाचताना आजच्या अत्यंत परधर्मसहिष्णु असलेल्या राष्ट्रभिमानी सुशिक्षिताला उद्वेग व संताप आल्याशिवाय खचित रहाणार नाही." (आ. क. पं., पृ. ४५) तर दुसरीकडे ते टिळकांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारून मराठी भाषेला ख्रिस्ती पेहराव चढविल्याबद्दल त्यांच्या प्रतिभेचा गुणगौरव करतात. ते लिहितात, "टिळकांच्या प्रतिभेने ख्रिस्तपुराणाला अस्सल देशीकार लेणे चढविले, टिळकांच्या प्रतिभेने ख्रिस्ती धर्माला महाराष्ट्राच्या हृदयात अभंगवाणीचे अढळपद प्राप्त करून दिले, टिळकांच्या प्रतिभेने ख्रिस्ती सारस्वतांत महाराष्ट्र-भाषेला महत्त्वाचे स्थान मिळवून दिले; आणि आणि टिळकांच्याच प्रतिभेने स्वदेशाला व स्वभाषेला मुकलेल्या ख्रिस्ती समाजाच्या अंतःकरणात स्वभाषेचा व स्वदेशाचा अभिमान उत्पन्न केला." (पृ. २३). माडखोलकरांचा धर्माभिमानही त्यांच्या चिकित्सक आस्वादकतेखाली असा गुदमरून गेलेला आहे.

माडखोलकरांनी वऱ्हंशी राष्ट्रीय दृष्टिकोणातून मूल्यमापन केलेले तीनच कवी आहेत. कवी गोविंद, विनायक व स्वा. सावरकर. या कवींबद्दल स्वतंत्र लेख लिहून तर त्यांना राष्ट्रीय ठरविले आहेच परंतु आपली पूर्वीची वऱ्हंशी मते बदलवून लिहिलेल्या 'गेल्या साठ वर्षातील मराठी कविता' या लेखातही या तीन कवींबद्दलचे मत कायम ठेवले आहे. या तीनही कवीत आणि एकूणच आधुनिक मराठी कवींमध्ये ते स्वा. सावरकरांना सर्वश्रेष्ठ ठरवितात. "आधुनिक मराठी कवींच्या मालिकेत सावरकरांचे स्थान सर्वोच्च आहे." असे म्हणतात (मा. आ. क., पृ. ७८). या तीनही कवींना माडखोलकरांनी राष्ट्रीय ठरवून त्यांचे स्थान आधुनिक मराठी कवीत उच्च ठरविले आहे याबद्दल विशेष आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. हे तीनही कवी राष्ट्रीयच होते. त्यांच्याबद्दल एखाद्या राष्ट्रीयताशून्य टीकाकाराने जरी लिहायचे ठरविले असते तरी हे तीन कवी राष्ट्रीय आहे असाच निर्वाळा त्याला द्यावा लागला असता. माडखोलकरांच्या अंगी राष्ट्रवाद पूर्ण मुरला असल्यामुळे त्यांनी ह्या कवींची स्तुतिस्तोत्रे गाईली असावीत असे समजण्याचे काहीही कारण नाही. त्यांच्या

मनात राष्ट्रीयता मधूनमधून केवळ लुकलुकत असल्यामुळे ह्या कवींचे समीक्षण करताना संधी सापडताच त्यांनी जाणूनबुजून अभिनिवेश धारण केला आहे एवढेच ! शिवाय या राष्ट्रवादी कवींची "विनायक आणि गोविंद यांची राष्ट्रीय कविता जरी प्रतिभागुणाने मंडित असली, तरी ती अगदीच त्रुटित आहे; तिच्यात विशालता किंवा ध्येयदर्शित्व नाही." (मा. आ. क. पृ. ३३०) अशी चिकित्सा करायलाही ते विसरले नाहीत.

'गेल्या साठ वर्षातील मराठी कविता' ह्या माडखोलकरांच्या विस्तृत लेखाचे परीक्षण हा स्वतंत्र लेखाचा विषय आहे, यात माडखोलकरांचा राष्ट्राभिमान, विचारपरिवर्तन, मतपरिवर्तन, विसंगती इत्यादींचे मोठे गमतीदार मिश्रण आढळते. या लेखात त्यांनी केशवसुती कवितेने प्रवर्तित केलेल्या युगाला 'स्त्रैण' ठरविले आहे. केशवसुतांबद्दलची त्यांनी आपली पूर्वीची बहुतेक मते बदलविली आहेत. पूर्वी माडखोलकरांना केशवसुतांच्या वाणीत विलक्षण ओज दिसले. ते म्हणतात, "केशवसुतांच्या वाणीत विलक्षण ओज होते; आणि त्यांच्या वाणीतील या ओजस्वितेला राष्ट्रीय भावनांचे वर्णन करताना अगदी भरती येत असे." ('आ. क. पं.' पृ. ६४). ह्याच केशवसुतांच्या कवितेबद्दल नंतर त्यांनी 'कामविकाराने फसफसलेली विरहवैणिके' ('मा. आ. क.' पृ. ३०९) असे उद्गार काढले आहेत. पूर्वी केशवसुतांचे काव्य दिसावयाला जरी थोडे असले तरी स्फूर्ती देण्याची देण्याची विलक्षण शक्ती माडखोलकरांना त्यात दिसली ('मा. आ. क.' पृ. १०), आणि नंतर त्यांच्या कवितेतील ओळीओळीतून विषादाचा सूर केकाटताना माडखोलकरांना ऐकू आला (तत्रैव, पृ. ३००). केशवसुतांच्या 'नैऋत्येकडील वारा' आणि 'निशाणाची प्रशंसा' या कवितेवर त्यांच्या जाज्वल्य देशभक्तीची छाया पडलेली ज्या माडखोलकरांना पूर्वी आढळली त्यांनाच नंतर केशवसुत आणि इतर आधुनिक कवींच्या काव्यातून स्वातंत्र्याकांक्षेची तळमळच काय पण, तिचा असाही पडसाद कुठे दिसला नाही. (पृ. ३२२).

या मतपरिवर्तनाबद्दल स्वतः माडखोलकरच स्पष्टीकरण देतात. ते म्हणतात, "या दोन लेखांतील मतवैचित्र्य किंबहुना मतविरोध पाहून वाचकांना अचंबा वाटल्याविना राहणार नाही... १९१९ साली जे केशवसुत मला क्रांतिकारी आणि प्रभावशाली वाटले, तेच केशवसुत १९३५ साली मला स्त्रैण आणि क्षीणशक्ती वाटले. ही घटना वैचारिक प्रगतीची निदर्शक आहे की नाही, हे वाचकांनीच ठरवावे." ('मा. आ. क." प्रस्ता. पृ. ७). सुरुवातीच्या मतप्रदर्शनाच्या उतावळ्या घाईतून निर्माण झालेली मते नंतर माडखोलकरांनी बदलविली याबद्दल कोणाचाही आक्षेप असण्याचे कारण नाही. पण, हा मतविरोध डोळस आणि कृतिशील राष्ट्रवादातून निर्माण झाला आहे असे मात्र कुणी म्हणणार नाही. ज्या 'तुतारी'तून देशाचे दैन्य पाहून रात्रंदिवस तडफडणाऱ्या केशवसुतांच्या अंतःकरणाची धडधड माडखोलकरांना ऐकू आली त्याच 'तुतारी'तून स्वातंत्र्याच्या ध्येयाची ललकारी नंतर झडलेली दिसत नाही. तर नैराश्याच्या घुबडांचे घूत्कारच त्यांच्या कवितेतून नंतर त्यांच्या कानावर येतात. सुरुवातीला जे केशवसुत त्यांना 'स्वतंत्रतेचा शाहीर' वाटतात तेच केशवसुत नंतर त्यांना प्रणयपीडित, गलितोत्साह व स्त्रैण वाटतात, यावरून त्यांचा राष्ट्रवादच अतिशय ठिसूळ आहे असे वाटते. कवितेकडे निरनिराळ्या दृष्टिकोणातूत पाहून माडखोलकर बुद्धि-विलास करतात. आणि ही बुद्धिविलासाची हौस भागविण्याकरिता प्रत्येक वेळी नवीनच शोध लावून त्या शोधविषयक चर्चा करण्यात ते रंगून जातात. त्यांच्या राष्ट्रवादाला खंबीरतेचीही जोड नाही व सखोल विचारांचीही जोड नाही.

माडखोलकरांच्या काव्यसमीक्षेमागील कलावंत असा आहे .:. त्यांची बऱ्हंशी काव्यसमीक्षा ही त्यांच्या चिकित्सक आणि रसिक काव्यात्मकतेच्या वर्तुळात फिरत असल्यामुळे खरी राष्ट्रीयवादी काव्यसमीक्षा ते निर्माणच करू शकले नाहीत. माडखोलकरांनी एका ठिकाणी म्हटले आहे. "राजकीय कादंबरीत समाज हाच जीवनाचे केंद्र असतो; व व्यक्ती या समाजाच्या घटक या दृष्टीने त्यांचे

चित्रण केले जाते." ('मी आणि माझे साहित्य', पृ. १६१). माडखोलकरांच्याच या सिद्धान्तानुसार राष्ट्रीय काव्यसमीक्षेमध्ये कवी हा राष्ट्राचा एक घटक म्हणून त्याचे मूल्यमापन सर्वांशाने अपेक्षित असल्यास ते चूक ठरू नये ! पण, माडखोलकरांच्या काव्यसमीक्षेत असा प्रकार आढळत नाही. राष्ट्रीय ध्येयवाद हा एकमेव निकष लावून त्यांनी आपली काव्यसमीक्षा केली आहे, असे वाटत नाही. 'गेल्या साठ वर्षातील मराठी कविता' या लेखात थोडाफार असा प्रयत्न त्यांनी केलेला दिसतो, पण, हा लेख अतिशय वादग्रस्त आहे. केशवसुती कवितेचे युग स्त्रैण आहे हे ठरविण्याकरिता त्यांनी विलक्षण एकांगी दृष्टी स्वीकारलेली दिसते. या लेखातील विधानांचा परामर्श आजपर्यंत अनेक विमर्शकांनी घेतलेला आहे. त्याचा विचार करण्याचे हे स्थळ नव्हे. तथापि, याही लेखातून राष्ट्रीय-तेच्या अंतःस्रोत्रापासून ते फार दूर राहिलेले दिसतात, असे निश्चितपणे म्हणता येते. चिपळूणकर, लो. टिळक किंवा सावरकर यांच्या वाङ्मयातील शब्दाशब्दातून ज्याप्रमाणे त्यांची देशभक्ती आणि राष्ट्रीयता आपल्याला धगधगलेली जाणवते ती देशभक्ती, ती राष्ट्रीयता आपल्याला माडखोलकरांच्या काव्यसमीक्षेत अजिबात आढळत नाही. पुरामुळे नदीचा ओघ ज्याप्रमाणे धरण फोडून वेगाने बाहेर पडतो त्याप्रमाणे माडखोलकरांच्या काव्यसमीक्षेतून त्यांची राष्ट्रीयता ओसंडून वाहात असलेली आपल्याला दिसत नसून त्यांच्या काव्यसमीक्षेवर राष्ट्रीयतेचे केवळ बुडबुडे उठले आहेत असेच म्हणावेसे वाटते. ■

बँक ऑफ महाराष्ट्र, लोहारा शाखा, जि. चंद्रपूर

अनुक्रमणिका

कादंबरीकार माडखोलकर

ना. ल. वैद्य

विसाव्या शतकाच्या तिसऱ्या व चौथ्या दशकात मराठी साहित्याचे दालन अतिशय प्रतिभासंपन्न कादंबरीकारांनी समृद्ध केले. या युगास फडके–खांडेकर युग म्हणण्याची प्रथा असली तरी फडके–खांडेकरांप्रमाणेच प्रतिभासंपन्न व काही बाबतीत त्यांचेहूनही अधिक समर्थ कादंबरी लेखक या काळात झाले. हरिभाऊ आपटयांसारखा कादंबरीच्या क्षेत्रात तळपणारा सूर्य १९१९ साली अस्तंगत झाल्यावर मराठी साहित्यात कादंबरी क्षेत्रात अंधार पसरतो की काय अशी भीती वाटत होती. वामन मल्हार जोशींची पुढे खूप प्रसिद्धीस पावलेली "रागिणी" अनेकांकडून साभार परत येत होती. आणि १९१५ साली ती प्रसिद्ध होऊन समाजातील वरच्या थरातील बुद्धिजीवी लोकांनी तिचे स्वागत केले, तरी ना. ह. आपटयांची "पहाटेपूर्वीचा काळोख" ही कादंबरी १९२६ साली प्रसिद्ध होईपर्यंत हरिभाऊंच्या मृत्यूनंतर निर्जीव बोधवाद, रटाळ कथानके व नीरस पात्ररेखाटण यांच्या जंजाळात मराठी कादंबरी सापडली होती; आणि, पु. य. देशपांडे यांची "बंधनाच्या पलिकडे" ही कादंबरी १९२७ साली प्रसिद्ध होताच मराठी साहित्यक्षेत्रात खळबळ उडाली. तत्पूर्वी १९२५ साली ना. सी. फडक्यांची "कुलाव्याची दांडी" प्रसिद्ध झाली होती, परंतु पुढील अनन्यसाधारण कादंबरीकार म्हणून फडक्यांना यश मिळायचे होते. त्यांच्या १९२८ साली प्रसिद्ध झालेल्या "जादूगार" कादंबरीने, आणि त्यानंतर मराठी साहित्यात कादंबरीचे दालन अलंकृत करणारे, असे एकाहून एक प्रतिभासंपन्न आपापल्या वैशिष्टयपूर्ण शैलीने कादंबरीप्रांत समृद्ध करणारे लेखक निर्माण झाले. वा. म. जोशी, केतकर, भा. वि. वरेरकर, फडके, खांडेकर, पु. य. देशपांडे, वोकील, ग. त्र्यं. माडखोलकर, हे ते मानकरी होत. प्रत्येकाची शैली वेगळी, प्रतिमेची चमक वेगळी, आशय वेगळा,—आणि लक्षात ठेवण्याजोगी गोष्ट म्हणजे या लेखकांच्या शैलीचे अनुकरण करणे मुष्कील होते. खांडेकरांच्या शैलीत त्यांचे गुरू गडकरी व परात्पर गुरु कोल्हटकर यांच्या शैलीचा परिणाम प्रारंभी झालेला दिसून आला तरी खांडेकरांच्या शैलीचे अनुकरण कुणी करू शकले नाही.

१९३४–३५ साल हे मराठी कादंबरीचे वैभवपर्व म्हणता येईल. ना. ह. आपटयांची "आम्ही दोघं", वामन मल्हार जोशींची "इंदू काळे व सरला भोळे", फडके यांची "कलंकशोभा", वरेरकरांची "परतभेट", विभावरी शिरूरकर यांची "हिंदोळयावर" आणि माडखोलकरांची "भंगलेले देऊळ" या सर्व महत्त्वपूर्ण कादंबऱ्या याच काळातील. माडखोलकरांची पहिली कादंबरी "मुक्तात्मा" १९३३ साली प्रसिद्ध झाली, व महाराष्ट्रातील वाचकांचे लक्ष या विदर्भातील 'महाराष्ट्र' दैनिकात काम करणाऱ्या लेखकाने वेधून घेतले खरे. तत्पूर्वी "आधुनिक कविपंचक" आणि "विष्णुशास्त्री चिपळूणकरां"वरील निबंधांनी एक नवोदित अभ्यासू टीकाकार म्हणून माडखोलकर महाराष्ट्राला परिचित होते; परंतु "भंगलेले देऊळ" १९३४ साली प्रसिद्ध होताच त्यांनी महाराष्ट्रास जिंकले व फडके–खांडेकर यांच्या पंक्तीस त्यांना नेऊन बसविले.

माडखोलकरांच्या कादंबऱ्यांवर लिहिणे एका दृष्टीने सोपे आहे; कारण आपल्या साहित्यविषयक कल्पना त्यांनी "दोन तपे" या आत्मवृत्तातून, तसेच "भंगलेले देऊळ", "चंदनवाडी" या कादंबऱ्यांना लिहिलेल्या प्रस्तावनातून स्पष्टपणे मांडल्या आहेत; त्या निकषावर त्यांच्या कादंबऱ्या तपासून पाहाणे हेच टीकाकाराचे कर्तव्य; त्या दृष्टीने हे कर्तव्य सोपे आहे.

पण अवघडही अतिशय आहे; कारण माडखोलकरांनी ठिकठिकाणी आपल्याच सिद्धा-

अनुक्रमणिका

न्तांचा आणि प्रमेयांचा भंग केला; त्यामुळे टीकाकार अथवा समीक्षक गोंधळून जातो आणि माडखोलकरांच्या "दुहेरी जीवनाचा" मेळ घालणे एक अवघड कार्य होऊन बसते.

अर्थात् काही ठिकाणी त्यांनी आपल्या कादंबऱ्यांच्या लेखनाबद्दल जे लिहिले आहे ते त्यांच्या कादंबऱ्यातून उत्कटत्वाने जाणवते. त्यांची अगदी पहिलीच कादंबरी 'मुक्तात्मा' याची साक्ष पटवते.

'मुक्तात्मा' कादंबरीत अंतःकरणात खोल रुजवलेल्या अनुभवांचे, क्रांतिकारकांच्या आकर्षणाचे, तत्कालीन राजकीय दादांचे प्रतिबिंब पडलेले आढळते; त्याचबरोबर ऐन तारुण्यात रोगग्रस्त झालेल्या त्यांच्या आईसाठी संस्कृत काव्यवाचन व तिच्या शिस्तीमुळे झालेले संस्कृतसाहित्याचे संस्कार इतके खोलवर त्यांच्या मनावर रुजले होते की त्यांच्या प्रत्येक साहित्यकृतीतच नव्हे तर कोणत्याही लिखाणात आणि व्याख्यानातून सुद्धा भाषेवरील संस्कृतची डौलदार छटा आढळून येते. या संस्कृतप्रचुरभाषेची लागण 'भंगलेले देऊळ' या सारख्या कोमल आणि नाजूक कादंबरीवरही झाली आहे असे ते स्वतःच कबूल करतात. "येथेही माझ्या संस्कृतप्रचुर शैलीने माझा घात केला." ("भंगलेले देऊळ आणि मी" पृ. १६७). 'मुक्तात्मा' ही माडखोलकरांची पहिलीच कादंबरी असल्याने ती अगदी ऐसपैसच नव्हे तर अस्ताव्यस्त म्हणुन विस्कळित झाली आहे. एखाद्या मेजवानीत मुख्य पक्वान्नाऐवजी चटण्याकोशिंबिरीच अधिक भाव खाऊन जातात त्याप्रमाणे 'मुक्तात्मा'त भुजंगराव देशमुख यांचे व्यक्तिचित्र व प्रमिलाबाईंच्या दिवाणखान्यातील मैफलीच वाचकांच्या मनावर शेवटपर्यंत रेंगाळतात.

माडखोलकरांनी स्वतःच्या लेखनप्रकृतीबद्दल जे म्हटले आहे ते सारांशाने पुढीलप्रमाणे आहे :–

१. आपले सगळे लेखन हेतुपूर्वक लिहिलेले आहे. ('दोन तपे'– पृ. १५२)
२. वाङ्मय हे साध्य नसून साधन आहे. (तत्रैव– पृ. २५१).
३. उद्बोधन हे ललित वाङ्मयाचे कार्य आहे. (मंडलेश्वर येथील अध्यक्षीय भाषण).
४. लेखक हा समाजजीवनाचा टीकाकार आहे.
५. "जीवनाकडे पाहाण्याची माझी दृष्टी सर्वथैव राजकीय आहे, त्यामुळे वाङ्मय हे मला जीवितसंगरातील केवळ एक शस्त्र, एक हत्यार वाटते; ते हत्यार जास्तीत जास्त परिणामकारक आणि प्रभावी होण्यासाठी कलेची मदत काय घ्यावी लागेल तेवढीच" ("अवशेष"– पृ. ९८).
६. "माझ्या ठिकाणी कल्पकता अगदी नाही. स्वतःच्या अवलोकनात किंवा अनुभवात ज्या घटना आल्या, त्याची जमेल तशी जुळणी करून आणि त्याबरोबरच कोणालाही अन्याय न होईल अशी दक्षता घेऊन, मी माझे सर्व ललित वाङ्मय लिहिलेले आहे. माझ्या समजुतीने त्यात जशी कल्पकता नाही तसेच कौशल्यही नाही." ('चंदनवाडी'ची पार्श्वभूमी पृ. २६)
७. "माझे सगळे ललित लेखन हे वास्तवाच्या विश्लेषणातून स्फुरले आहे. . . . मग ते कुणाला कितीहि अवास्तव, अप्रस्तुत, अनिष्ट अप्रिय, अश्लील किंवा अभद्र वाटो." (तत्रैव– पृ. २८).

माडखोलकरांनी स्वतःच्या कादंबरी लेखनाबद्दल जे विचार व्यक्त केले आहेत त्या निकषावर त्यांच्या कादंबऱ्या तपासून पाहाता, त्यात पुष्कळ तथ्य आहे असे आपल्याला आढळून येते; आणि विनयामुळे त्यांच्या कादंबरी लेखनातले जे ओजस्वी गुण आहेत ते त्यांनी सांगितले नसले तरी रसिक वाचक आणि समीक्षक जाणून आहेत. त्यांची संस्कृतप्रचुर भाषा काही ठिकाणी कृत्रिम वाटते परंतु त्या भाषेतील माधुर्य पाहण्याजोगे आहे. त्यांच्या काही कादंबऱ्या अगदी हीन रुचीच्या व पातळीवर असल्या तरी त्यात भाषेची गोडी आहे. नागकन्या, प्रमद्वरा, कांता, इ. त्यांच्या कादंबऱ्या त्यांनीच मांडलेल्या सिद्धान्तांपासून दूर गेलेल्या आहेत. 'नागकन्ये'त रंगा आणि मदिरा यांनी एक रात्र तापी नदीच्या काठी प्रणयोन्मादात घालविली, आणि ती घालवीत असता पाश्चात्त्य आणि पौर्वात्य संस्कृतीविषयी दोघेही व्याख्याने झोडतात हे मुळीच पटत नाही. कोणतीही पूर्वीची ओळख

नसलेली मदिरा-रंगा ज्या तऱ्हेने वागतात ते कुठल्या वास्तवाला धरून आहे? वाचकांची ही टीका होईल हे जाणून माडखोलकरांनी मदिराला मलायात जन्मलेली पण अमेरिकन नागरिकत्व असलेली दाखविली आहे. माडखोलकरांच्या अनुभवात किंवा अवलोकनात असल्या घटना आल्या असतील किंवा नाही हे सांगणे कठीण आहे; माडखोलकरांच्या अनेक कादंबऱ्यांतून अशा अवास्तव घटना आढळतील. पण तरीही त्या वाचाव्याशा वाटतात; कारण माडखोलकरांची प्रासादिक, सुसंस्कृत, लज्जतदार शैली.

माडखोलकरांचे वैशिष्ट्य जसे त्यांच्या भाषाशैलीत, तसेच त्यांच्या व्यक्तिचित्रणात आहे. त्यांनी अनेक ठिकाणी लिहिले आहे की ज्या घटनांबद्दल त्यांना उत्कटतेने वाटते, त्यांचे चित्रण तितक्याच उत्कटतेने ते करतात. त्यामुळे पुष्कळवेळा दुय्यम पात्रेही भाव खाऊन जातात. 'मुक्तात्मा'मधले उदाहरण दिलेच आहे. त्याचप्रमाणे 'उर्मिला'मधे कृष्णरावचे व्यक्तित्वही अविस्मरणीय आहे; म्हणजे कृष्णरावचे काका 'महाराज' यांच्यापेक्षाही कृष्णरावचे पात्र उठावदार आहे. वस्तुतः 'महाराज' कादंबरीतले नायक, व कृष्णराव अनेक उपपात्रांपैकी एक. 'उर्मिला' कादंबरीत अशी अनेक उपपात्रे आहेत की वाचक त्यांना विसरत नाही. तसेच, 'चंदनवाडी' कादंबरीत येसू, रखमा, चंदन, मिशन मधल्या सिस्टर्स, या सर्वांची पात्रे लेखकाने तन्मयतेने रंगविली आहेत. त्यामानाने अवधूत, अभिमन्यू, सिराज, ही पात्रे इतकी उत्कटतेने रंगविलेली नाहीत. माडखोलकरांची पत्नी शांताबाई यांनी 'चंदनवाडी'च्या प्रस्तावनेत याचसाठी लिहिले असावे की 'चंदनवाडी' स्त्रीप्रधान कादंबरी आहे. 'कांता' मधील सर महादेव ठाकुर हे व्यक्तिचित्र 'कांता' पेक्षाही ठसठशीत आहे.

काही वेळा हे व्यक्तिचित्रण वस्तुस्थितीच्या इतक्या जवळ जाते की वास्तवातील तत्सदृश व्यक्तींची चटकन् आठवण व्हावी. 'अनघा'मधील प्रो. अभय यांना विद्यार्थिनीवर प्रेम केले म्हणून काढून टाकले. या प्रोफेसरांचे नाव तत्कालीन महाराष्ट्रीला माहीत होते. 'मुक्तात्मा'मधील भुजंगराव देशमुख व प्रमिलाबाईंची पण ओळख नागपुरकरांना चटकन पटे. 'मुखवटे' मधील 'प्रियदर्शन' सर्वांनाच ओळखू येतो; त्याचप्रमाणे 'उर्मिला'मधील दादाजी, मुख्यमंत्री, आय. सी. एस. सेक्रेटरी, माजी गृहमंत्री ही पात्रेही ओळखू येतात.

या व्यक्तिचित्रणांचे बाबतीत एक दोष असा दिसून येईल की कादंबरीत अनेक पात्रांवर सारखेच रंग भरल्यामुळे मुख्यपात्रे व गौणपात्रे हा फरक फारच थोडा शिल्लक उरतो. दुसरा एक तांत्रिक दोष म्हणजे मुख्यपात्र कादंबरीत खूप उशीरा येतो. 'मुक्तात्मा'मध्ये चंद्रशेखर १०० पानानंतर येतो. तत्पूर्वी केशव-ललिता येऊन जातात. 'चंदनवाडी' मध्ये अवधूतही खूप उशीरा येतो. पण त्याला मुख्य पात्र म्हणायचे की नाही? पण तो 'चंदन'चा प्रियकर आहे व त्याच्यापासून चंदनला लग्न न करताच गर्भ राहतो व त्यामुळेच तिची आई रखमा तिला विष देऊन ठार मारते, तेव्हा अवधूतला नायक मानावेच लागेल.

माडखोलकरांनी अनेक ठिकाणी स्पष्ट केले आहे की त्यांच्या कादंबऱ्यांवर राजकारणाचा फार प्रभाव पडला आहे व त्यांच्या बऱ्याच कादंबऱ्या "राजकीय" नावाखाली गणल्या जातात. त्यांची पहिलीच कादंबरी "मुक्तात्मा". या कादंबरीत तत्कालीन राजकारणाचे पडसाद चांगलेच पडले आहेत; आणि राजकारणाची चर्चा अनेक ठिकाणी आहे, पण यात केवळ वावदूकपणा व पांडित्यप्रदर्शन दिसून येते. मूळ कथानकाशी राजकारणातील घडामोडी पार्श्वभूमी म्हणून सुद्धा जुळत नाही. या कादंबरीतील चित्रणावर व कथानकावर वारंवार घेतला जाणारा मुख्य आक्षेप म्हणजे नायक कर्तव्यशून्यच वाटतात. माडखोलकरांच्या ज्या कादंबऱ्यांतून राजकारण आणले गेले आहे, त्या बहुतेकांबद्दल असेच म्हणता येतील की प्रणयाचे चित्रण ज्या तद्रूपतेने उत्कटत्वाने माडखोलकर करतात, तसे त्यातील राजकीय प्रसंगाबद्दल नाही. अर्थात फडक्यांनी ज्याप्रमाणे राजकारणाची ठिगळे कथानकाला लावून आपल्या प्रणयी युग्मांच्या चित्रणाला बेरंग आणला तितका माडखोलकरांचे

लेखनात नाही. पण राजकारण नसते आणले तरी चालले असते असे मात्र वाटते. 'शाप' ही कादंबरी त्यातील उत्तान आणि कामुक वर्णना· साठी अधिक प्रसिद्ध आहे, त्यातील क्रांतिकारक विचारांमुळे नाही. कारण माडखोलकरांना राजकारणाचे, क्रांतीचे आकर्पण असले तरी राजकारण वा क्रांतिकारकता शृंगाराशी निगडित करून त्यातील क्रांतिकारकता पोखरली जाते. 'शाप' मधील निशिकांताची यामुळेच केविलवाणी अवस्था झाली आहे. 'कांता' कादंबरीत जयसिंग, उमाकांत इत्यादी तरुण क्रांतिकारकांच्याविषयी लेखकाचा दृष्टिकोण कसा आहे हे सांगणे अवघड आहे. 'कांता'मध्ये फडके स्टाईल रहस्याचीही योजना माडखोलकरांनी केली आहे. 'अनघा' कादंबरीत गांधीवधानंतर ब्राह्मण वर्गावर ज्या आपत्ती कोसळल्या, त्यातील एक म्हणजे ब्राह्मणांची घरे जाळणे, ह्याचे वर्णन आले आहे. प्रो. अभयची लायब्ररी आणि घर यांना आगी लावण्यात येतात. अभयच्या जीवावरही बेतले होते, पण त्याला गुपचूप त्या घरातून आडमार्गाने काढून लपविण्यात येते. घर आणि लायब्ररी जाळल्याचा प्रसंग खुद माडखोल· करांच्याच बाबतीत घडलाआहे आणि त्यावर 'एका निर्वासिताची कहाणी' ही एक लघु कादंबरी पण माडखोलकरांनी लिहिली तेव्हा 'अनघा' मध्ये हा प्रसंग मूळ कथानकाला कुठल्याही तऱ्हेने उठाव देत नाही. 'नवे संसार' एक शुद्ध प्रपंचकथा म्हणून लिहायला घेतली आणि त्यांत पत्नीच्या व प्रकाशकाच्या आग्रहामुळे राजकारण घुसडून दिले; पण राजकारणाऐवजी कादंबरीतील विद्याधर, मीरा; मुक्ता यांच्या व्यक्तिचित्रणांनी वाचक मोहून जातो. मुक्ताचे पात्र तर अतिशय संयमाने व उठावदारपणे रंगविले आहे. त्यात औचित्य-भंगाचा लवलेशही नाही. 'नवे संसार'मध्ये विद्याधराची क्रांतिकारक ओढ उथळ वाटते, पण मुक्ताची आध्यात्मिक वृत्ती परिणाम करून जाते. माडखोलकरांच्या आणखी महत्त्वाच्या राजकीय कादंबऱ्या म्हणजे 'चंदनवाडी' व 'ऊर्मिला.' 'चंदनवाडी' ही माडखोलकरांची कादंबरी "भंगलेले देऊळ"च्या खालोखाल लोकप्रिय ठरली. राजकीय भूमिका व व्यक्तिचित्रण यांचा समन्वय माडखोलकरांना कधी जमला नाही तो या कादंबरीत अवधूतच्या व्यक्तित्वात सुरेख साधला आहे. परंतु राजकारणापेक्षा प्रणयाला विशेपत: वैषयिक व उपभोगात्मक प्रणयाला प्रत्येक कादंबरीत प्राधान्य देण्याच्या माडखोलकरी वृत्तीने, इथेही अवधूतच्या जीवनात प्रणय आणून कादंबरीचा शेवट नाटकी व दुःखान्त केला आहे. कादंबरीत 'चंदन' अवधूतचा गर्भ धारण केलेली असता विषबाधेमुळे मरते यावर अनेकांनी टीका करून माडखोलकरांना प्रतिगामी सुद्धा ठरविले आहे; परंतु, आपण केलेला शेवट वास्तवतेला धरून होता असे खुद्द माडखोलकरच 'चंदनवाडी'च्या 'पार्श्वभूमीत' लिहितात–परंतु ध्येयवाद व वैषयिकता यांची सांगड घालून माडखोलकरांनी आपल्या अनेक कादंबऱ्या त्यांच्या 'राष्ट्रीयवाद', 'क्रांतिकारकता', 'समाजवाद', 'कामगार संघटना' इत्यादी घोषणांपासून दूर तर ठेवल्याच, पण त्यांना हीन पातळीवर आणले. याचे कारण स्पष्टपणे असे म्हणावेसे वाटते की माडखोलकरांचा मूळ पिंड हा राजकारणाचा नव्हेच. "पैसे मिळण्यासाठी मी कादंबऱ्या लिहितो व त्यामुळे लोकांची रुची मला ध्यानात घ्यावी लागते." हे त्यांचे समर्थन लंगडे आटते. काँग्रेसच्या कोणत्याही चळवळीशी लेखक समरस झालेला नाही. गांधी आणि गांधीवाधाबद्दल आस्था नाही. 'दुहेरी जीवन' मधील सुलोचना गांधींबद्दल जे बोलते ते फारच बोलके आहे! कम्युनिझम, सोशॅलिझम्, कामगार चळवळ, इत्यादीबद्दल त्यातील काही मित्रांमुळे आकर्षण, ते केवळ "बौद्धिक" स्तरावर. लेखक कोणत्याही चळवळीत समरस झालेला नाही, त्यामुळे राजकीय पार्श्वभूमीवर प्रणयजीवनात पात्रांना बुडवून काढणे हाच एक मार्ग शिल्लक उरतो. 'उर्मिला'मधे 'चंदनवाडी' प्रमाणे माल-गुजारांची संक्रमणावस्था दाखवायची असते की तत्कालीन राजकारणात ध्येयनिष्ठ माणसाचा कसा चुराडा होतो हे दाखवायचे होते हे अखेरपर्यंत स्पष्ट होत नाही; त्यामुळे वाचकांच्या मनावर एकसंघ परिणाम होत नाही. कादंबरीचे नाव 'उर्मिला' आहे; परंतु उर्मिलेवरच प्रकाशझोत

अधिक टाकून तिला वाचकांच्या मनात केंद्रस्थान लेखकाला देता आले नाही. हा दोष माडखोलकरांच्या बहुतेक सर्व कादंबऱ्यातून आहे. मागे म्हटल्याप्रमाणे, याही कादंबरीत दुय्यम पात्रे (कृष्णराव, दादाजी, एडविना, फ्रेंच नर्तकी, इ.) चमकून जातात. शिवाय महाराज आणि फ्रेंच नर्तिका यांचा प्रणय-संगम चितारण्यात कथानकाला कुठलीही पुष्टी मिळत नाही. त्या फ्रेंच नर्तकीच्या उन्मादक शरीराचे विषयासक्त वर्णन करण्यात माडखोलकरांची लेखणी पण रमली आहे. अतिशय आजारी होऊन संपूर्ण पथ्यावर राहणाऱ्या महाराजांना त्या फ्रेंच नर्तिकेच्या घरी जाऊन प्रकृतीला साक्षात् हलाहल असलेल्या मदिरेचे सेवन आणि त्यानंतर त्या फ्रेंच नर्तकीबरोबर रात्रभर रतिक्रीडा दाखवून महाराजांचा मृत्यू लवकर ओढवण्यात माडखोलकरांचा उद्देशही समजत नाही. उलट महाराजांविषयी वाचकांचे मत थोडे कलुषित होते. आणि आपल्या पतीला, म्हणजे महाराजांना, त्या फ्रेंच नर्तिकेचे बोलावणे आल्यावर त्यांना जायला परवानगी देण्यात उर्मिलेचे व्यक्तित्त्व मुळीच उजळून निघत नाही. नर्तिकेकडे जाण्याने आपल्या पतीच्या, महाराजांच्या प्रकृतीला अपाय होणार आहे हे माहीत असूनही दुसऱ्या दिवशी सकाळी महाराज ब्रेकफास्ट घेत व, 'तू मला उगीच परवानगी दिलीस' असे ते म्हणाले असता, उर्मिला त्यांना म्हणते, 'तिची भेट झाली असता आपण किती बेचैन होऊन गेलेले होता, हे पाहात होते मी सारखे-म्हणून मी ठरवून टाकलं की काय वाटेल ते झालं तरी चालेल, पण एकदा तृप्ती होऊ दे आपल्या मनाची-' यावरून उर्मिला खूप पतिव्रता होती असे सिद्ध होत नाही !

तिच्या पातिव्रत्याबद्दल कृष्णरावने अतिप्रसंग करायचा प्रयत्न केल्यावर उर्मिला जे वागली, किंवा अमेरिकेत राजकुमारांबरोबर सिनेमात चारुदत्ताच्या पत्नीची भूमिका करायची नाकारण्यात तिने जी कठोर पतिनिष्ठा दाखविली, यावरून उर्मिलेच्या तेजस्वी, अव्यभिचारी स्वभावाची कल्पना वाचकांना झालेलीच आहे. मग तो तेजस्वीपणा इथे कसा लुप्त झाला ?

"उर्मिला" कादंबरीत उर्मिलाचे व्यक्तिचित्र अगदीच मिळमिळीत वाटते; ज्या प्रमाणे 'अनघा' कादंबरीत अनघाचे वाटते ! 'उर्मिला' कादंबरीतही राजकारण आणलेले आहे व महाराजांचा बाणेदारपणा दाखविला आहे. या राजकारणात त्या 'घडामोडी'च्या वर्णनांनी उर्मिला मागे पडते आणि महाराज अमेरिकेला गेल्यावर राजकारण मागे पडते. तात्पर्य, माडखोलकरांनी राजकारणाची पेरणी आपल्या कादंबऱ्यातील कथानकातून केलेली असली तरी त्याला पीक येत नाही.

या ठिकाणी एक महत्त्वाचा मुद्दा मला इथे मांडायचा आहे व तो आजपर्यंत कोणत्याही टीकाकाराने मांडलेला नाही. कुसुमावती देशपांडे, वा. ल. कुळकर्णी, या सारख्या मर्मज्ञ, रसिक, आणि निःपक्षपाती टीकाकारांच्या सुद्धा नजरेतून ही गोष्ट निसटलेली आहे. माडखोलकरांनी 'उर्मिला' ही कादंबरी १९६३ साली लिहिली; म्हणजे गांधीवध होऊन १५ वर्षे झाली होती. माडखोलकरांना गांधीवधानंतर महाराष्ट्रात ब्राह्मणांवर जे अत्याचार झाले त्याची झळ चांगलीच लागली होती. त्यांनी 'तरुण-भारत'चे संपादकत्व पत्करले होते. 'तरुणभारत' दैनिकाचा कल हिंदुत्ववादी संघवादी होता व अजूनही आहे. माडखोलकर ज्यावेळी नागपूरला स्थायिक झाले त्यावेळी संघाला कॉंग्रेसवादी सुद्धा देशभक्तांची संघटना मानीत. 'तरुण-भारत'चे पुरस्कर्ते, नरकेसरीचे संस्थापक व एकंदर सगळा गोतावळा संघवादी. अशा परिस्थितीत माडखोलकरांनी संघावर कादंबरी लिहू नये याचे आश्चर्य वाटते. त्यांच्या एकाही कादंबरीत संघाविषयी उल्लेख सुद्धा नाही. दुसरी एक गोष्ट नजरेला येते, ती म्हणजे 'चंदनवाडी'मध्ये त्यांनी ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या कार्याची खूप तारीफ केली आहे. म्हणूनच अनेक मिशनऱ्यांना 'चंदनवाडी' खूपच आवडली; तसेच 'दुहेरी जीवन'मधे डॉ. क्षमा देशपांडे ही ख्रिश्चन नव्हती पण ख्रिश्चनांनी तिला वाढविली होती आणि क्षमाच्या खोलीत येशूची व मेरीची चित्रे होती. आश्चर्य हे की मिशनऱ्यांच्या कृष्णकारस्थानांविषयी त्यांच्या कादंबरीत चित्रण

नाही. मिशनऱ्यांच्या बाटवाबाटवीच्या कारवाया सारख्या कानांवर येऊन पं रविशंकर शुक्लाने जस्टिस नियोगी कमिशन मिशनऱ्यांच्या कार्याचे अवलोकन करण्यासाठी नेमले होते व तो नियोगी रिपोर्ट मिशनऱ्यांच्या कारवायांवर झगझगीत प्रकाश पाडतो. माडखोलकरांसारख्या प्रतिभासंपन्न कादंबरीकाराने इकडे दुर्लक्ष करावे ? मग 'प्रबोधन', 'समाजजीवनाचा टीकाकार', या थापाच वाटतात व 'मी पैशासाठी लिहितो', आणि, 'ज्या व्यक्ती व जे प्रसंग उत्कटत्वाने माझ्यावर परिणाम करतात त्यांचे चित्रण माझ्या कादंबऱ्यांतून होते.' ही माडखोलकरांची प्रांजळ कबुली तेवढी खरी वाटते.

आणि, तेवढाच उद्देश आपण ध्यानी धरला तरी माडखोलकरांनी आपल्या कादंबऱ्यांतून जीवनाचे अनेक रंग, अनेक भावछटा, अनेक प्रकारच्या व्यक्ती यांचे हृद्य आणि अविस्मरणीय चित्रण केले आहे. 'माझ्यात कल्पनाशक्ती मुळीच नाही' असे त्यांनी एके ठिकाणी म्हटले आहे ('चंदनवाडीची' पार्श्वभूमी–पृ. २७), पण 'भंगलेले देऊळ' या १९३४ साली प्रसिद्ध झालेल्या कादंबरीसंबंधी लिहिताना, 'केवळ कल्पनेने लिहिलेली ती एक कृत्रिम कथा आहे.' ('भंगलेले देऊळ' आणि 'मी' पृ. १६५) अशी कबुली त्यांनी दिली आहे. 'मुक्तात्मा' ही तंत्र-दृष्ट्या दोषपूर्ण आणि कथानकाच्या दृष्टीने विस्कळित अशी कादंबरी (पहिलीच कादंबरी) १९३३ साली प्रसिद्ध झाल्यानंतर काही महिन्या-नंतरच 'भंगलेले देऊळ' ही विलक्षण कादंबरी लेखकाने लिहावी यातच त्यांच्या प्रतिभेचे श्रेष्ठत्व दिसून येते. या कादंबरीला ४५ पानांची विस्तृत प्रस्तावना डॉ. वि. भि. कोलते यांनी लिहिली. उच्च अभिरुचीचे साहित्यश्रेष्ठ वा. म. जोशी यांनी कादंबरी प्रसिद्ध होताच 'विविधज्ञान विस्तार' या मासिकांतून तिचे परीक्षण केले व त्यात लिहिले आहे, भाषा स्वाभाविक, रसयुक्त आहे. ती अतिशय चांगली, किंवहुना आदर्शभूत आहे असेही मी म्हटले असते, पण स्वाभाविकतेच्या नादी लागून क्रियापदाच्या पुढे कर्ता, कर्म, विशेषणे वगैरे घालण्याच्या लकबीचा त्यांनी अतिरेक केला आहे.' 'एक गोड कादंबरी' असे शेवटी वा. म. जोशी म्हणतात.

"भंगलेले देऊळ" आणि त्यानंतर माडखोल-करांच्या ज्या कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या त्यात प्रणय प्रसंगांची आणि तरुणीच्या शरीराच्या अंगप्रत्यंगांची उत्तान व कामुक वर्णने करण्यात माडखोलकरांनी अपकीर्ती संपादन केली, वा. ल. कुळकर्णी त्याला "स्वप्नरंजन" म्हणतात. अधिक कठोर शब्द वापरायचे म्हटले तर मी "इच्छा-पूर्ती" हा शब्द वापरीन. हिंदी सिनेमातील प्रणयचाळे, द्वंद्वगीते, नृत्ये, याचा हिंदी जीवनाशी काडीमात्र संबंध नसतो; परंतु, प्रेक्षकांच्या "इच्छापूर्ती" साठी दिग्दर्शक हा सगळा मसाला घालतो. नायकाच्या ठिकाणी प्रेक्षक स्वतःला कल्पितो आणि "आत्मौपम्य भूमिकेने" त्याचा आस्वाद घेतो. वासनांचे "सब्लीमेशन"ही होत असावे. फडके, खांडेकर, माडखोलकर यांनी वाचकांच्या चवीसाठी हेच केले असे मला वाटते, माडखोलकरांच्या उत्तान शैलीवर टीका करताना फडक्यांनी "खेळणी" कादंबरीत विकृत लैंगिक भावनांचे चित्रण केले आहे, त्याचे विस्मरण झाले आहे काय ? दुसरी गोष्ट, ज्या प्रसंगाचे वर्णन माडखोलकर त्या क्षणी करीत आहेत, त्याक्षणी तसे वर्णन केल्याखेरीज उठावच येणार नाही. उदा. 'उर्मिला' कादंबरीत महाराज फ्रेंच नर्तिकेकडे आले असता, मदनज्वालेने पीडित झालेल्या त्या नर्तिकेच्या पोशाखाचे व अंगो-पांगांचे जे वर्णन माडखोलकरांनी केले आहे ते त्याठिकाणी अवश्यच आहे; कारण, नर्तिकेमुळे उद्दीपित होऊन तिच्या बरोबर महाराज मद्य घेतात (त्यांच्या प्रकृतीच्या दृष्टीने ते जहर असताना सुद्धा) आणि नृत्य करतात. महाराजांनी त्या प्रसंगाने मृत्यूला घाईघाईचे आमंत्रणच दिले होते. तो प्रसंग व महाराजांचा तसा मृत्यू जवळ आणणे यावर टीका होऊ शकते, पण वर्णनांवर टीका करता येत नाही.

माडखोलकर ज्या प्रसंगाचे वर्णन करतात, यासाठी तशी भाषा वापरणे आवश्यकच होते

असे माझे स्पष्ट मत आहे. तसे प्रसंग आणण्याची आवश्यकताच काय यावर टीका होऊ शकते व तशी टीका मीही केली आहे.

खरं म्हणजे, माडखोलकरांच्या प्रतिभेचे सुंदर लेणे म्हणजे त्यांची भाषाशैली. 'भंगलेले देऊळ' या कादंबरीत अनिरुद्ध अगदीच पुचाट दाखविला आहे; त्याची मनोवृत्ती विकृत वाटते व त्याचे व्यक्तिचित्रण वाचकांना पटत नाही हे खरे; पण 'भंगलेले देऊळ' इतक्या वर्षांनंतर (५४ वर्षा-नंतर) ही वाचावीशी वाटते हे माडखोलकरांच्या प्रतिभेचे सामर्थ्य नाही का ? 'चंदनवाडी' मधेही ज्या तऱ्हेने प्रणय प्रसंग चितारले आहेत ते नसते चितारले तर चालले असते. तरीही "चंदन-वाडी"चे आकर्षण अजूनही तितकेच आहे.

माडखोलकरांच्या 'भंगलेले देऊळ', 'चंदन-वाडी', 'मुक्तात्मा', 'नागकन्या', 'दुहेरी-जीवन', 'उर्मिला', 'कांता' इ. त्यांच्या अनेक दोषांसह अजूनही वाचाव्याशा वाटतात. हातात घेतल्यानंतर पुस्तक संपल्याखेरीज खाली ठेववत नाही हे प्रतिभेचे सामर्थ्य कमी आहे काय ? माडखोलकरांचे श्रेष्ठत्व हेच आहे. ■

८२, मालवीय नगर, भोपाळ ३

लेखकांसाठी सूचना

१. मजकूर कागदाच्या एका बाजूने लिहिलेला व सुवाच्य असावा.

२. पुरेसे पोस्टेज नसलेले लेखन परत केले जाणार नाही. स्थळप्रत ठेवावी, नाहीतर पुरेसे पोस्टेज पाठवावे.

३. कवितेची पोच दिली जात नाही. निर्णयही दिला जाणार नाही. तीन अंकापर्यंत कविता न आल्यास ती अस्वीकृत आहे असे समजावे. कवितेसंबंधी कुठलाही पत्रव्यवहार करणे शक्य होणार नाही.

४. अनाहूत लेख, कथा, ललित वा वैचारिक निबंध ह्याबाबत निर्णय हवा असल्यास पत्ता लिहिलेले एक पोस्ट कार्ड पाठवावे. गद्याबाबत निर्णय कळवल्यानंतरही, ताबडतोब प्रसिद्ध होईलच असे नाही. यथावकाश प्रसिद्ध होईल.

५. अनाहूत समीक्षणे प्रसिद्ध होणार नाहीत. 'युगवाणी'-कडून मागवली गेलेली समीक्षणेच प्रसिद्ध होतात.

६. 'युगवाणी' साहित्यप्रेमाला, साहित्याला मोकळी वाट देते. पण ते साहित्य अभिरुचीसंपन्न असावे.

क | वि | ता

यात्रा / अनंत अमदाबादकर

मी दूर सारतो अंधाराचे अडसर
कवटाळून चाललो सत्याचा तपासलेपणा
व्याधपणीची अचूकता तीक्ष्ण रोखून
आळवित एकांताचे भैरवी आलाप
आपलेपणाच्या राहुट्या मोडून मी चाललो.

मी ओणवलो माझ्याच संध्याविलंबित सावल्यांवर
सोडवून घेतोय मुळं परक्या मातीतून
बहराच्या सुगंधाने भरलेला एकेक श्वास खुणेचा
तुझ्यासाठी राखून मी चाललो
आप्तांचे तरबेज पहारे चुकवून मी चाललो.

आता मी आनंदयात्री
माझे क्षितिजगामी अस्तित्व झाले आहे उत्कट
मी निसर्गाच्या विराट समागमातली एक उर्मी
आणि मी रुजवून घतलाय
शाश्वत वसंत माझ्या श्वासात
मी झालो आहे सृष्टीच्या बहरण्याच्या
आकांक्षेचे प्रतिक.

□ □

ऋतु / लक्ष्मीकांत तांबोळी

ऋतु पाखराचा
नभा झोंबण्याचा,
इवल्या ऊरात—
नभ कोंडण्याचा !

एकदाच असे—
पाखरू झुंजते,
अवघे आभाळ
पंख पंख होते !

□ □

प्राची / नीलकृष्ण देशपांडे

सूर्याची स्रवती प्रकाशकिरणे या संथ पाण्यावरी
सोन्याचा गहिरा मुलायम चढे तो वर्ख की केशरी.
डोकावून बघे रुपास अपुल्या आभाळ तेही निळे
लेवोनी रूपरंग ते जल अता वेडावलेले खुळ.
होता सैल दिठी कळ्या उमलती गंधात ही गुंतती
रंगांचे फुलपंख ते विलगती वाऱ्यासवे डोलती.
प्राचीच्या क्षितिजी प्रभात समयी रंगावली रंगता
तेजःपुंज उषा गुलाल उधळी तेजोनिधी स्वागता.
येता सर्व चराचरी तरतरी चैतन्य चेतोहरम्
ओलेता स्वर मुग्ध तो उमटतो सत्यं शिवं सुंदरम्.

□ □

गच्च रुतून बसलेत ऋतू / नीलकृष्ण देशपांडे

मोरपंखी झाले आभाळ
खुणावताहेत डोळे
गच्च रुतून बसलेत ऋतू
आतल्या आत सूर्य जळे.

पिसाटला रानवारा
उरातही चक्रीवादळ
काळ्याभिन्न ढगावरती
बिजलींचे उठे वळ.

झरझर झरे पाऊस
थेंब थेंब झेले माती
शहारले अंग आणि
झाडे झाली ऋतुमती.

थेंबामध्ये गुंते ऋतु
विसरूनी देहभान
फाटून जावी झोळी सारी
नको देऊ असे दान.

□ □

नाळासाठी / नामदेव चं. कांवळे

मी इथे : मन तिथे
मी तिथे : मन इथे
मी इथे–तिथे
मी इकडे नाही
मी तिकडेही नाही
फक्त माझे स्थलांतर !

आताशी मी सर्वार्थाने
तुझा राहू शकत नाही
पण माझा मी होतो कधी ?
गाव; शीव; शीवार; माती
नाळासाठी मी शोधिले मोती !

मी कुठे ! मी कुठे ! मी कुठे ?

झाकली द्रौपदीची थाळी
कृष्णसख्यांनी कोरला
अंधार तुझा भाळी
मी इकडे : तू तिकडे
घरटे उदासवाणे
भिरभिराया लागले
पक्षी तेंव्हाचे शहाणे.

मी फिनीक्स पक्षी
अद्यापही नाळ जपतो
माती मापतो
घरट्यावर डोळा ठेवून उडतो
मी जातो–येतो दूर
इकडे पूर : तिकडे पूर
काना मनात साठले परंतु
तुझ्या पायीचे नुपूर !

□ □

लेणे / नामदेव चं. कांवळे

तुझे हसणे पाऊस गाणे
रुसणे तुझे समंजस, शहाणे
तुझे रुपडे असे की
वेरुळ अजिंठ्याचे लेणे !
तुझ्या डोळ्यांत माझा विरह
तुझ्या अंगांपिंडावर,
दिवस रात्रीचा शकुन
तुझ्या तळकप्यात,
माझी प्रतिक्षा म्हणून !
मी भरकटलोही तुझ्याचमुळे
पण तूच सावरलेस मला
माझ्या गात्रा गात्रात संचारून
विकसलीस तू अन्
फुलविले माझे मला.
माझ्या जीवनातील खाच खळग्यांनी
मी कंपायमान होताच
तूही हेलकावतेस आत आत,
माझ्या डोळ्यात झाकून
'मी इथे !' म्हणत
लपंडावाची करतेस सुरवात.
तू रुसतेस, धुसफुसतेस
माझा कण न कण अस्वस्थ
वरून संथ डोहही
डहुळत येतो काठापर्यंत.
तुझे सायाळ काटे झटकून
ओसंडतात तुझे अमृत कुंभ,
तू हसतेस
मला कवेत घेतेस तू
माझ्या कळत नकळत
आभाळभरच्या सहप्रवासाची
सुरवातही करतेस तू !

□ □

मृत्युंजय / ववन सराडकर

स्वप्नांच्या या ढासळल्या बुरुजास एवढ्या
थकलेल्या मन–देहाने काय सावरावे ?
आणि कधीचे विस्कटलेले अंबर आता
एक–एकट्या चोचीने काय आवरावे ?

लोचन माझे कितीकितीदा समुद्र झाले
...पहाटताना पक्ष्यांसाठी प्राची झालो
वळणावळणावरी भोगला जन्म असा की—
जगता जगता मरणाने मृत्युंजय झालो !

□ □

३. झाडाच्या कविता / नामदेव चं. कांबळे

— १ —

झाड शहाणे
अंगी उखाणे
फांदीची छडी
डोक्यात घडी
कोंबड्याची बांग
झाड म्हणे
मागाहून जाग
उठ रे उठ
उघड डोळा
उजाडण्या आधी
रेख ! सूर्याचा गोळा.

— २ —

झाडाची हुकुमशाही
वागडण्याची
हसण्याची
झाडाखाली भनाई
पोरे झाली मोठी
झाडाची उन्हाची कमाई !

— ३ —

मध्यान्हीचा भर ओसरला
सूर्य ढळला
दूर...दूर
डोंगराच्या खाली,
ओघळले झाडाचे अश्रू
झाडाच्या खाली !

— ४ —

ताड,
माड
उंच झाड
मुळे रडती
माती आड !
फुले आली
फळे आली
उघडे झाड
आभाळाखाली
झाड इथे
झाड तिथे
फळही झाले
वेडेपिसे !
पायी माती
मनाची माती
झाड धरे त्याची
मातीच माती !

— ५ —

झाड नव्हते असे तसे,
झाड डोळस शालीन जसे.
पारध्याने पारध केली
झाड झाले उफराटे !
तुटली मुळे
तुटला नाल
खोऽऽखो हसले
वरती आभाळ.
नाते ना ते झाडाचे
भुई; आभाळ; माती
पारध्याचा फास
पुनः पुनः झाडाभोवती !

□ □

४. प्रतिकाच्या कविता / नामदेव चं. कांबळे

— १ —

तू, मी एकजिनशी
अजिंठ्याच्या परिसरातील
शिल्पांसारखे
आल्यागेल्यांना
उत्कट प्रेमाचे
प्रतिक वाटणारे !

— २ —

तू नूरजहाँपेक्षा श्रेष्ठ
मीही शहाजहाँपेक्षा मुळीच कमी नसे
कारण
तुझ्या स्मृतीत मी
कुठलेच मंदिर न बांधता
मनमंदिरच भक्कम करावे

असे तुला वाटते
मलाही दगडी वास्तु अन्
प्रेमाच्या निर्जीव प्रदर्शनापेक्षा
एकमेकांचे होऊन
जगण्या मरण्यातच
तर
धन्यता वाटते !

— ३ —

तुझा माझा देह
राव विभोर
पण मनात भय
तू की मी ?
असे
असेच, असे !

— ४ —

पार्वतीची पिंड
शंकराचे लिंग
तसा जमिनीत फाळ
पाण्याचा अभिषेक
ढगांचा सुकाळ
बीज रुजले
अंकुरले
पण तो
फक्त तो !

— ५ —

माझे प्रतिबिंब पाहिले मी तुझ्यात
पण तुझी छबी
अद्यापही धूसर अस्पष्ट
माझ्यातून
नाहीच साकारलीस तू
मी, तू धडपडून सुद्धा !

— ६ —

डोळे माझे
मन तुझे
तुझ्या माझ्यातून
साकारतीस तू
तर मी सांगत सुटलो असतो
हीच ही ऽऽऽ
माझे प्रेरणास्रोत
वात्सल्याची गंगोत्री
माझ्या मनात
रूपा, गुणात बावरगारी
आदिम शक्ती
हीच, ही !

□ □

उन्हाळा / नामदेव चं. कांबळे

मी सर्व व्यापी; सर्व साक्षी; मी निराकार,
मी ईश्वराचा अंशही असेन.
पण मला साकार केले त्यांनी
आपल्या वासना माझ्यात पेरून.
मी चेतनयुक्त होताच
त्यांनी मला स्वतःच्या नाळाशी जोडून घेतले
आणि 'ह्या शिल्पाचे तेच ते... जनक !'
म्हणून त्यांचे गौरव—सत्कार होवू लागले.
मी मान्य करतो
त्यांच्या छन्नी—हातोडीचे
त्यांच्या वासनांचे, गर्भदानाचे,
मला साकार करण्यासाठी घडलेल्या
घटना घटितांचे ऋण !
पण त्यांनीच मला उघड्यावर टाकून
माझ्या आयुष्यभराचा उन्हाळा केला,
वळवाचा ढगसुद्धा मायेसाठी
माझ्या दिशेने नाहीच फिरकला
मी विसरू शकतो काही (?)
माझ्या चेहऱ्यातही ते कुणीच शोधत नाही.
पांथस्थ माझ्याकडे येऊ लागले
माझ्या जवळून जातांना वळून वळून पाहू लागले
शब्दवेडे माझ्या शिल्पाचे अर्थही शोधू लागले
पण त्यांना काय ठाऊक ?
माझ्या रंध्रारंध्रात जे उगवते आहे
ते माझ्या बैत्रीच्या देठांनीच पेरून ठेवले आहे.
माझ्या सर्वांगावरील अंकुर
आल्या गेल्यांना लागले हाकारू
पण अद्यापही माझा उन्हाळा सुरूच सुरू !

□ □

पाषाणाशी भिडता / नामदेव चं. कांवळे

लेणे एक अल्वार;
अनिवार, संगमोत्सुक
मिठीदिठी
प्राजक्त सांडला
अंगोपांगी, गर्द राई
मनामधी.
मलमली धून छेडून छेडून
भिरभिरे,
मनचोर छचोर
पायातळी
भरजरी पीसे
अन् बिंदू टपोर !
उंच; उंच कडा
बोलका बोलका
मधोमध पाथरट
तिथे विसावण्याचा जसा
घातला घाट.
घन, घायाळ डोळे
धूर्त-भोळे
व्याकुळ शुष्क ओठ
मनाची शंभर शकले
सावली पाठोपाठ.
पाषाणाशी भिडता
तुटला हातोडा,
क्षणार्ध वेडा
पाहता पाहता !

□ □

मेणाचं घर / जोगिन्दर कौर महाजन

मेणाच्या घरात
राहता येत नाही फार दिवस
ती वितळणारच !
आपल्याला उघड्यावर टाकून.
पण काय बिघडलं त्यात ?
रचता येईल नवीन घरकुल
वेळ आली की,
बदलायलाच हवी
वास्तव्याची जागा
न कुरकुरता !

□ □

सत्य / जोगिन्दरकौर महाजन

सावल्यांना भुलून जाऊन
त्यांचीच देवाणघेवाण करणाऱ्या
बाजारपेठा भरत असतात
गावागावातून, घराघरातून
कधी कोणी आलाच सत्य घेऊन,
तर माथेफिरू म्हणून
फेकले जातात त्याच्यावर
दगडधोंडे !
पण त्याने तरी कां व्हावे
असे बेभान ?
सत्य असतं का कुठे
विक्रीसाठी तयार वस्तूत सामिल !

□ □

आयुष्याच्या आळीमध्ये / सुखदेव ढाणके

आयुष्याच्या आळीमध्ये
उरले थोडे आंबुस पाणी
वाहुन जाईल पिकेल तेव्हा
अंगावरती हिरवी गाणी.

उदास पाला विषण्णतेचा
झडून येईल नवा धुमारा
जिनगानीचा चिन्वट कोळी
गुंफिल पुन्हा सांद कोपरा.

□ □

२. एक मुक्तक / सुखदेव ढाणके

ह्या देहाला दार न खिडकी
असेल कुठले त्याला कुंपण
जख्ख सनातन तुला पहारा
अन् शपथांचे मला आलिंगन.

□ □

अनन्त वेलणकर नावाच्या
कॅरेक्टरला उद्देशून / शांताराम टेळकीकर

वेलणकर,
ईथल्या क्रूर मतलबी यंत्रणेला
हवी आहेत पोटभरू माणसं
मुकाट राबणारी, लाळ घोटणारी
कशाबद्दलच आक्षेप न घेणारी
स्वतःच काहीच म्हणणे नसणारी—

× × ×

माणसांची प्रचंड पैदास चालते या देशात
आणि त्यांना पाहिजेत त्या प्रकारची माणसं
पैशाला पासरी मिळतात–

× × ×

वलणकर तू एक अपवाद
मात्र तुलाही सहन करावे लागले
प्रस्थापितांचे फटके
अन् माणसामाणसातल्या संबंधांचे चटके

× × ×

तू धाडस केलस् रामा शेट्टीचा गळा घोटण्याचं
अभिनंदन वेलणकर–जाहीर अभिनंदन !
मला माहीत आहे
तुझं जाहीर अभिनंदन केल्याचं
त्यांना आवडणार नाही—

× × ×

मी एवढं करीन
तुझ्यावर अन्याय करणाऱ्यांविरुद्ध
चारचौघात बोंब मारीन
तुझा गौरव करण्यासाठी
एक प्रामाणिक कविता लिहीन—

× × ×

पिकायला घातलेल्या आंब्याच्या आढीतला
एक जरी आंबा सडका / नासका असेल
तर सगळेच आंबे सडतात / नासतात
म्हणून सडके आंबे बाजूला काढतात
अरे माणसाचं पण असंच असतं कां ?

× × ×

मी पाहतोय माझ्या भोवताली
दलदलीत सडलेली माणसं—
कोण कोणाला काढून फेकणार ?
हाच प्रश्न तुझाही आहे अन् माझाही.

× × ×

मटन कोंबडी खाऊन
दारूबिरू पिऊन बायकापोरी भोगुन
पैसाबिसा कमावुन
सुखात लोळणारा तुझा बॉस हल्ली मला
सगळीकडे दिसतोय्
आणि
तू ज्या रामाशट्टीचा गळा घोटलास त्याची
माजलेली पिलावळ
गावोगांव धुडगुस घालतेय—
आणि
तुला तर माहीतच असेल वेलणकर
जेव्हा बाहेर रस्त्यावर
कायदा आणि सुव्यवस्था
कुण्यातरी मग्रुर हातानी जखमी होऊन
विव्हळत पडलेली असते
तेव्हा लोक बंद घराघरातून
'रामायण' पाहत असतात.

□ □

कविता / सुधाकर नेर्लेकर

डोळ्यात कुणाच्या मी ते
आभाळ पेरले होते
साऱ्याच दिशांना तेव्हा
त्यांचेच चेहरे होते.

कळते न मला का झाले
परकेच ऋतु हे सारे
उमजे ना काय कुणाचे
हसण्यावर जन्म पहारे.

ही फसगत आयुष्याची
अश्रुंनी घात करावा
आजन्म कसा मृत्यूने
देहातच वास करावा—

□ □

कविता / सुधीर देव

– १ –

ज्याने जीवनच द्यायचे ठरविले
हौतात्म्यप्राप्तीसाठी,
परंतु हौतात्म्यालाही असतो संदर्भ.
ठरविलेले जीव देणे ठरते केवळ—
आत्मघात किंवा न चुकणारे मरण !

– २ –

कफनीतला साधू
माझे मनगट आवळून म्हणाला,
" पाडलास तूच डाग
वस्त्रावर माझ्या
निघणार नाही याची चिंता ! "

– ३ –

इसापनीति वा कुठलीही रीति
समजण्यापूर्वी—
व्हायला हवी ओळख
अनीतिची वगैरे वगैरे...
तसे जवळपास
किंवा तसेच;
मित्र मिळविण्यापूर्वी
शत्रूच मिळायचा हवा
जवळचा !

□ □

येशू / अमर रामटेके

येशू येणार आहे म्हणे...
पण कुठल्या झोपडपट्टीत
हे तरी किमान सांगा
तुम्हीच ज्याला क्रुसावर टांगले
आणि आता पसरविता आग
जेरुसलेमपासून धारावीपर्यंत
करता राख येणारी सारी नवीन मूल्ये
पण या राखेतील स्वप्ने
मी त्याला दान देणार आहे
कारण तो फक्त माणसांचा दोस्त आहे. ॥

□ □

सूर्यसाक्षी / अमर रामटेके

एखाद्या भरदुपारी
रस्ते जसे खामोश असतात
तसे या शहराचे हाल.
लांबपर्यंत कुणीही माणूस नाही
तसे हलायला हलतात
मांसाचे दगड इथे–तिथे
पण श्वासांचे शिल्प कोरणारा कुणी नाही
जिथे बलात्कारनिष्ठांना मूल्यांचे पांघरुण असते
तिथे आपण तोंड घालू नये.
घुबडांच्या छावणीत
माणसाने काहीच बोलू नये.

□ □

धर्मशाळा /लक्ष्मीकान्त घुमे

ही पाखरांची धर्मशाळा बांधली गेलीय
जीर्ण वृक्षांच्या फांद्यांवर
तेव्हापासून पक्षी संध्याकाळच्या किरणांचे
बोट धरून
जलद गतीने धावत जातात एकाच दिशेने
काळोखात होतात पक्षीचर्चा–विचार मंथन
किती युगापासून
अलिकडे वृक्ष अतिशय जीर्ण झालाय
धर्मशाळाही गेली कंटाळून
त्याहीपेक्षा वैतागून गेले आहेत पक्षी
आणि त्यांचे जीर्ण जुनाट गाणे
पक्षी निघू पाहतील आता
दुसऱ्या नव्या क्षितिजाकडे सूर्य निरोप घेत
धर्मशाळा कोसळून पडेस्तोवर
वाट पाहायची आपणही एकमेकांची
किंवा आपणच कोसळवून टाकू या
हा जीर्ण वृक्ष आणि त्यावरची धर्मशाळा
आपण पक्ष्यांनी आता एकेक घरटं बांधायचंय
अलगद टिपायच्या काड्या
अन् इथून उडायचंय भूर्रकन !

□ □

जी. ए. कुलकर्णी / प्रतिमा कामत

सायप्रस वृक्षओळींच्या घनदाट मंद सावल्यांमधून
त्याचा अमेय आत्मा अखेरच्या प्रवासास निघाला
तेंव्हा सर्वदूर एक थरथरता संधिप्रकाश
दाटून होता...
सगळे पानपक्षी पंख-मिटल्या मंद लयींत
निरोपाचे अनिवार्य शब्द जुळवीत होते...

पांढऱ्याशुभ्र वर्फाचे थर सांचू लागले होते रानभर
पांढुरका चांदवा उमटला होता
फिकट ठिपक्यासारखा आभाळांत
अशावेळीं त्याच्या स्वप्नांचा थवा
निखळला दूर रानांत...

मी पाहिलेही नाही त्याला जाताना
मात्र एका पुसट क्षणी
धुंद गाताना पाहिल्याचे स्मरते
अवकाशाच्या उंच मनोऱ्यावर उचंबळून येऊन.

एकांताच्या भव्य मध्यरात्री
सोनकेवड्याचा दरवळ तसे त्याचे शब्द
कविता बनून रुमझुमले माझ्या मनांत
हे त्याला कधीच कळले नाही...

अन् आता तर मावळून गेला तो
कधीही न उगवण्यासाठी...
सायंकाळ गर्द गर्द होताना...

□ □

उत्खनन / प्रभू राजगडकर

कधी कधी स्वतःवर
उत्खनन करावं
आडवे उभे शब्द कोरावे
मोड तोड करावी
थोडं मोजून घ्यावं
जमलं तर राखूनही ठेवावं
करता करता स्वतःला
पुनः
इतिहासात न्यावे.

□ □

ओढ / प्रभू राजगडकर

माझ्या डोळ्यात साठवलेला समुद्र
समुद्राचे गाणे गा वादळ होऊन
होतील कधी चढउतार / हेलकावे
शब्दांना वाहवत जाऊ देऊ नको
इथे होतात शब्दावरच प्रयोग
कधी प्रयोगावर शब्दच डागले
तसं धडकी देऊन किनाऱ्याला
पुन्हा धडकी, ही ओढ सतत—

□ □

साक्षात्कार / वाळ राणे

निस्तब्ध, उजाड माळरानावर
प्रचंड शिळा होऊन पडलं आहे दुःख
किती वर्षे... युगे लोटली
कुणास ठाऊक...
उन-पाऊस थंडी
सारं सारं सहन करीत
आपल्या उद्धारकर्त्याची वाट पाहते आहे
वत्सा,
कुणी दिला तुला हा असा शाप ?
थांब,
आता मला साक्षात्कार झाला आहे
माझी पावलं तुझ्याकडेच वळली आहेत
तुझ्या उद्धाराचा क्षण जवळ आहे
पण तुला एक विनंती आहे
विनंती नव्हे... प्रार्थना
माझ्याशिवाय कुणालाही
तू कधी कधीच स्पर्श करू नकोस !
असं म्हणतात
यमुनेच्या जळाला अजून राधेची बाधा आहे
वृंदावनात अजूनही कृष्णाचा पावा घुमतो
मला सुद्धा अशी
फक्त तुझीच बाधा झाली आहे
प्राणाप्राणातून तुझाच पावा घुमतो आहे
तूच माझी राधा...
तूच माझा कृष्ण...
मी तर आहे
कुणालाच न उमजलेले
काळाचे चिरंतन, स्थितप्रज्ञ रूप !

□ □

तुझी अजस्र पावलं / बाळ राणे

हे दुःखा,
तुझी अजस्र पावलं
माझ्या देहावर पडताहेत
प्रत्येक पावलागणिक
देहाचा चुराडा होतो आहे
चूर्ण चूर्ण होतं आहे...

परंतु
तुला ठाऊक आहे का
माझ्या मनाला
तू कधी
स्पर्शसुद्धा करू शकणार नाहीस !
ते तुझ्यापासून दूर आहे
लक्ष लक्ष योजने !
तुझे एखादे पाऊल
त्यावर कधी चुकून पडलेच
तर तूच ठेच लागून खाली कोसळशील !
त्याही अवस्थेत
माझ्या मनातून बाहेर पडलेले शब्द
तुझ्या कानावर पडतील,
बाळा,
फार लागलं का रे ?

□ □

माझ्या मायेच्या कुशीत / बाळ राणे

सुखाची आरती गाताना
दुःख निरांजनी तेवले
सुखाचा दिग्विजय करता
दुःख हे अश्वमेध झाले !
° °
दुःख माझे संगमरवरी
चांदरातीचा ताजमहाल
दुःख माझे कलाकुसरी
अजिंठ्याचे लेणे विशाल !
° °
दुःख माझे लडिवाळ
जशी डोळ्यांत बाहुली
भरविण्या दूधभात
हाती द्रौपदीची थाळी !
° ° °
मीच केली मरणाची
आरास कणाकणात
आज निघाली वैकुंठी
माझ्या दुःखाची वरात !
° ° °

□ □

रानकेवड्यांनो ! आतातरी शहाणे व्हा ! उषाकिरण डी. अत्राम

ह्या महाकाय नगरातले सुगंधी वारे
कधीच पोचले नाहीत—रानकडाकपारीत
बंदिस्त आदिमांच्या बंद दरवाज्यापलीकडे.
रानकेवडा रानात फुलतो
विषारी नागांच्या विळख्यात
रानकेवड्यांच्या सुगंधी थापा
पिकतात मात्र फुलबागेत
तुकडा फेकणं, आणि फेकला म्हणून
महानगरीत ढोल आणि ढोंग पसरविणं
किती सहज सोपं मोठेपणाचं असतं;
आर्टगॅलरीत नग्न शोपीस पाहून;
आदिमांच्या नकली गाथा गातांना
माना डोलतात आणि भेट देतात
रेला ऽऽ ढेमसा पाहतांना
अर्धनग्न केवड्यांना टिपतात
कागदी हिरव्या नोटा—हीनबुद्धीनं करकरतात
"रानकेवड्यांनो ! आतातरी शहाणे व्हा !"
रानात फुलू नका, नागाच्या विळख्यात
जखडू नका
या ! इथे असे या !! महाकाय नगरातल्या
बकुलमोगऱ्याजवळ या !
अन्यथा— रानफुलव्याला अर्थ नाही,
'फुलायचेच असेल तर बकुलबागेत फुला'
बंद दरवाज्याला लाथ मारून—
महाकाय नगरीच्या सुगंधी वाऱ्यांत मिसळा...

□ □

वर्तुळ / शिवा राऊत

आसवांचे मूळ कोठे ना कळे
आतल्याआतून सारे उन्मळे
कां उन्हाची वाळवीच्या सारखी
लोचनाते कोरणारी वारुळे.

संपणाऱ्या सावल्यांची हूल आता
वाळवंटाच्या उराचे आर्त झाली
साहवे ना आणखी आसावणारी
मृगजळाने शापलेली वादळे.

एकट्याचे मरण असते मोकळे
एवढे कळले अभागी आर्जवांना
यापुढे मी शपथमोलाच्या फुलांनी
कोरडी पुजणार नाही राउळे.

दुःखलुब्धा तू तरी वणव्यात थोडा
अव्दशब्दांच्या सरींचा ओत पाऱ्हा
हा अकाली अंत धैर्याने पहाया
खोड माझ्या संभ्रमाची वर्तुळे.

□ □

कविते ! / विजय सोरते

— १ —

कविते...
तुझी मेंदीभरली पावलं
माझ्या सुनसान क्षितिजावर
नक्षी कोरून गुणगुणायला लागलीयत्.
दमलेल्या पाखरांनो
या क्षितिजावर चोच बोथट करू नये.
कविते...
पलिकडे दिलेल्या भावी शुभेच्छा
तळहातावरून निसटल्या नाही म्हणजे झालं,
निव्वळ
धुक्यावर कुंचला फिरवून
चित्राचा उदय होत नसतो.
कविते...
आता एक करायचं ठरवलंय—
या सुनसान क्षितिजाला
मेंदीचं कुंपण करून
कवितांची बाग फुलवावी म्हणतोय,
पण
पावसानं माझ्याशी फितूर होऊ नये.

— २ —

कविते...
विसरून जा माझ्या क्षितिजाचे रक्ताळलेले बाहू
आपल्या हसऱ्या खुणा तर केव्हांच मिटल्यात;
नि त्या क्षितिजावर
माझं सरण पेटत आहे.
क्षणातच तुला—
पाखरांच्या चोंचीतून बातमी मिळेल—
कोण्या एका कवीनं
पेटता गुलमोहर छातीशी कवटाळलाय म्हणून !
कविते...
माझ्या पेटत्या सरणाकडे येतांना
माणसांची गर्दी पुरेपूर ओसरू दे
आणि तुझ्या पाऱ्हावलेल्या डोळ्यातून
माझ्या कवितेची एक एक ओळ
सतत वाहू दे !
म्हणजे, तुझ्यातून उतरलेले
प्रत्येक शिल्प
स्वतःभोवती जत्रा भरवून जाईल.

□ □

आधार / सुलभा हेर्लेकर

कित्येकदा स्वतःचेच घर
परके वाटावे आणि
साऱ्या अर्थांचेच किनारे
घुसमटून जावे...

नदीकाठच्या वाळूत
पाय रुतवणाऱ्या पावलात
जेवढे पाणी मावेल
तितकेच आपले क्षण...

अशा समजुतीत
एखादे वाळूत बांधलेले
सुबकसे मातीचे घरच मग
माझ्या कवितेला आधार देत राहते...

□ □

आता उघडायलाच हवेत / नीरजा

अंगभर पावसाळा सांडून जातो
तेव्हा मी अपराधी
उतू गेलेल्या सुखाचे डाग
टिपून घेते पदरात.
तो निघून गेल्यानंतरचा
ढळढळीत उजेड
घायाळ करतो चारही बाजूंनी
अन् मग घराची एक एक भिंत
पुढे येते
सावल्या सावल्यांनी
जाब विचारत.

कबूल आहे
मी बांधून घेतलं आहे स्वतःला
ह्या घराशी
विश्वासाच्या सात धाग्यांनी
पण म्हणून
कोठवर सोसायची
ह्याची कडी नजर
रखवालदाराची.

आता उघडायलाच हवेत
सारे झरोके ह्या घराचे
ओल्या मातीचा सुगंध
श्वासात साठवताना
आता ह्या खिडक्यांना
पडदे लावून शोभिवंत
मी लपवणार नाही
माझे जडावलेले श्वास
की झुगारणार नाही
पहाटवेड्या वाऱ्याचा
मोकळा स्पर्श.

□ □

तू गेल्यापासून / नीरजा

साऱ्या अंगभर हुंदका फुटावा
असे चार शब्द बोलून गेली असतीस
तर आज मी अशी
असहाय
तळ हरवलेल्या पारदर्शक पाण्यात
तुला हुडकत बसले नसते.
तुला नाही सजविले अलंकारांनी
की प्रेमधुंद शब्दांनी;
तुझ्या प्रत्येक शब्दातून
फुटावा आक्रोश
अन् जागवावी मेलेली मनं
हा माझा प्रयत्न
तुला रुचला नाही हे कबूल
पण म्हणून माझ्या डोळ्यातली
वेदनाच ओरबडून न्यायची ?
तुला माहीत नाही
रिकामे शब्द निश्चेष्ट पडून आहेत
माझ्या मनाच्या कानाकोपऱ्यात.
तू गेल्यापासून मीही अस्वस्थ
वांझ प्रतिमांच्या महापुरात.

□ □

स्वच्छ सूर्योदय / सुलभा हेर्लेकर

शीतल चांदण्यातले दोन कवडसे
मी खुडून आणले आहेत सखी,
दिवसाच्या तप्त अंगारी, आंधळ्या
माणुसकीचे घाव असह्य होताहेत म्हणून.
त्यांना फक्त पेटणेच माहीत आहे
दिव्याची शांत ज्योत त्यांच्या डोळ्यात
कधी तेवलीच नाही म्हणून
ह्या दोन कवडशांना सखे,
तुझ्यात अंकुरू दे उद्याच्या
नितळ आणि स्वच्छ सूर्योदयासाठी.

□ □

पानधरण / सुलभा हेर्लेकर

झाडावरून पानं गळताहेत...
गळणारे पान—
झाडावरून सुटलेल्या नि जमिनीवर
स्थिरावलेल्या
अंतरातली एक लोंबकळणारी अवस्था !
किती तरल, भावुक, थर्थरणारी,
वाटतंय् की कुठल्या तरी वनातला
मुरलीरव भरलाय् या पोकळीत
की नादब्रह्माचे सूर ओंकारताहेत
या संवेदन अंतराळी लहरीवर...
भिरभिरणाऱ्या पतझडीतले हे अधीरणे...
पाऊल सुटणे...कुठल्या सुपीक जमिनीवर
घेऊन जाणारेय्
पाचोळ्याला निदान निर्जीव चुरचुरणारे
अस्तित्व तरी बहाल असते,
माझ्यातल्या 'मी'ची पानगळ
कुठल्या 'स्व'च्या झुल्यावर झुलवू ?
की त्याचे शेकडो लयकार
कुणा व्यर्थतेवर कायमचे पानधरण बांधेल ?

□ □

देणे / सुलभा हेर्लेकर

आपल्याच माणसाने आपल्यासमोर
सतत चेहरे बदलत रहावे
आणि त्या जवळपणाचे ओझे
सतत पेलून धरावे, अशा
आभाळाचे देणे मला कर्ज मिळाले आहे
मनातल्या दुःखाला सामोरे जाताना
शरणपूर्वक मान तुकवून ऋतुंचे नजराणे घेत
आता कर्जाच्या मुदतीतून मुक्त होताना
तू असा परत फुललेल्या पळसात
समोर नको होतास...

□ □

विळखा / चंद्रकांत मोरे

गावाच्या प्रत्येक गल्लीत
बसलेत आता
सक्त नजरेचे तांत्रिक पहारे.
याच गावात
कुणी तरी सांगत होतं
ससेही निर्धास्त होते
आणि त्यांच्या रक्षणासाठी
सज्जनांचे मोर्चे होते.
पण कुणातरी माथेफिरूने
गल्लीत खेळणाऱ्या हरणांवर गोळ्या झाडल्या
आणि चिचकत जगणाऱ्या
मोरांच्या मनातल्या जखमा
जास्तच भळभळल्या
त्यांनी आपल्या
जगण्याच्या उमेदीच गाडल्या.
इथल्या हरेक गल्लीत आता
तळपताहेत नागड्या संगिनी
आणि जाई-जुईच्या कंठात पडताहेत
वासनांचे जीवघेणे फास
सारा गाव काळरात्रीत बुडालेला
आणि सौजन्याभोवती
गच्च आडदांड विळखा आवळलेला.

□ □

सत्य

रवीन्द्र के. शोभणे

दुपारी बारा वाजता मी माझ्या दैनिकाच्या कचेरीत गेलो. टेबलवर जाण्यापूर्वी टेलिप्रिंटरचा रोल नजरेखालून घातला. फारशा महत्त्वाच्या बातम्या नाहीत असं पाहून मी शांतपणे माझ्या खुर्चीत बसलो. या आधीचा रोल जगदाळेंनी नजरेखालून घातला होता आणि त्यातल्या एका महत्त्वाच्या बातमीवर ते विशेष वृत्त लिहीत होते. एवढ्यात एडिटोरिअल सेक्शनचा चपराशी माझ्याजवळ येऊन म्हणाला, "साहेब, तुम्हाला भेटायला कुणी बाई आली आहे."

"पाठवून द्या." टेबलवरचा अंक चाळत मी म्हणालो.

वर्तमानपत्राच्या कचेरीत बाई येणं ही गोष्ट फारशी नवीन नव्हती म्हणून मी अगदी निश्चितपणे बसलो होतो. जगदाळेंशी मधून मधून चर्चाही सुरू होती. जगदाळे टेलिप्रिंटरवरच्या बातमी विषयी बोलत होते. एवढ्यात एक बाई माझ्या समोर येऊन उभी राहिली. विस्कटलेले केस, आसवांनी धुवून काढल्यासारखे ओले, सुजलेले डोळे. उतरलेला चेहरा. मी त्या बाईकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहत होतो. तिचा तो अवतार मला विचित्रच वाटत होता. माझ्या डोळ्याला डोळा देत रोखून पाहत ती मला विचारू लागली,

"निरंजन काकडे कोण आहे ?"

"मीच. बोला काय काम आहे आपलं ?"

"माझ्या नवऱ्याच्या अपघाताची बातमी काल तुम्हीच लिहिलीत ना तुमच्या पेपरमधून ?"

"होय. तुम्ही मिसेस भगत का ?"

"हो..."

"आधी बसा. मग बोला काय काम आहे ते."

मिसेस भगत खुर्चीत बसल्या. त्यांनी एक क्षण आजूबाजूला पाहिलं. मग माझ्याकडे पाहत त्या मला सांगू लागल्या, "माझ्या नवऱ्याची ती बातमी खोटी आहे."

"म्हणजे ? तुमचे पती जिवंत आहे तर ?" मी आश्चर्यानं विचारलं.

"नाही. त्यांचा मृत्यू झाला. पण तो अपघाती मृत्यू नव्हता."

"तर...?"

"त्यांचा खून झाला आहे." थंडपणे त्यांनी सांगितलं.

"खून ? कोणी केला ?"

"एका षडयंत्रानं." माझ्याकडे शुष्कपणे पाहत त्या सांगू लागल्या, "माझ्या नवऱ्याचा खून एकट्या माणसानं केलेला नाहीय. त्यांच्या खुनामागे अनेकांचे हात गुंतलेले आहेत. सगळ्यांनी त्यांना कोंडीत पकडून ठार केलं; आणि मग अपघात झाल्याचा आभास निर्माण केला. त्यांचं प्रेत वाहतुकीच्या रस्त्यावर आणल्या गेलं. त्यांच्या डोक्याचा पार चेंदामेंदा झाला. आणि मग त्यांचा अपघाती मृत्यू झाला म्हणून सर्वत्र गवगवा करण्यात आला."

मिसेस भगत सांगत होत्या ते मी सुन्नपणे ऐकत होतो. माझी मती बधिरल्यागत झाली होती. कालच्या अंकातून पहिल्या पानावर 'रामदास भगतचा भीषण अपघात' म्हणून मीच बातमी दिली होती. आणि आज ही बाई त्यासंबंधी वेगळंच काही सांगत आहे . कदाचित ती नवऱ्याच्या मृत्यूमुळे भ्रमिष्ट वगैरे झाली असावी आणि म्हणून अशाप्रकारची विधाने करीत असावी अशी मला शंका आली; पण तिचं बोलणं कुठेच विसंगत वाटत नव्हतं, त्यामुळे मी नेमकं काहीच समजू शकत नव्हतो; तथापि माझ्या काही शंकांचं निरसन करण्याकरिता मी काही प्रश्न विचारायचं ठरवलं.

"बाई, तुमच्या पतीचा खून झाला हे तुम्ही सिद्ध करू शकता ?"

"माझी शंका निराधार आहे, असा समज आहे तुमचा?" त्यांच्या विचारण्यात निग्रहपूर्वकता होती.

"मला तशी शंका आहे. तुम्ही कशाप्रकारे हे सिद्ध करू शकता? आणि पुराव्याशिवाय सिद्ध न करता कुणावर कसेही आरोप करणं एवढं सोपं नाही."

"मी काही पुरावे देऊ शकते. आणि माझा ठाम विश्वास आहे, माझ्या पतीचा खूनच झाला आहे म्हणून."

"तशी तुम्ही पोलिसात तक्रार करा मग."

"पोलिसांपर्यंत जायला हातात पैसा लागतो साहेब. आणि माझ्याजवळ पैसा नाही. मी गरीब आहे. माझ्या या अन्यायाला तुम्ही वाचा फोडावी अशी माझी तुम्हाला विनंती आहे.

मिसेस भगत मला क्षणाक्षणाला अडचणीत पकडत होत्या. या अडचणीतून वाट काढीत नेमका मुद्दा पकडून मी त्यांना विचारलं,

"म्हणजे तुमच्याकरिता नेमकं मी काय करावं अशी तुमची इच्छा आहे?"

"माझ्या नवऱ्याचा मृत्यू हा अपघात नसून खून आहे ही बातमी तुम्ही तुमच्या वृत्तपत्रातून प्रकाशित करावी."

"पण पुरावे नजरेखालून घातल्याशिवाय आम्हाला अशाप्रकारे काहीही करता येणार नाही."

"मी तुम्हाला पुरावे पुरवू शकते. शिवाय मला तुमच्याशी स्वतंत्रपणे काही महत्त्वाचं बोलायचंसुद्धा आहे. तुम्ही माझ्या घरी येऊ शकाल?"

"नाही. मला तेवढा वेळ नाही. ते पुरावे घेऊन तुम्हीच इथं या हवं तर."

"सर्वसामान्यांच्या दुःखाला वाचा फोडणे, त्यांना न्याय देणे हे तुमच्या वृत्तपत्राचं ब्रीदवाक्य आहे ना? आणि समजा माझ्यावर जो प्रसंग आला आहे तोच उद्या तुमच्या बायकोवर आला, तुमची मुलं उघड्यावर पडली तर?"

त्यांच्या त्या बोलण्यानं मी खाड्कन भानावरच आलो. मला त्यांचा राग सुद्धा आला. पण तिथे मी काहीही बोलू शकलो नाही. मला हिम्मतच झाली नाही. आमच्या सेक्शनमधील सगळेच त्यांच्याकडे पाहू लागले होते. त्यांनी मला अचानक असा प्रश्न विचारल्यामुळे माझा चेहरा उतरला होता. मलाच कसंतरी वाटत होतं. शेवटी मी ते सगळं टाळतच मिसेस भगतना म्हणालो,

"यावर मी विचार करतो."

त्यांनी माझ्याकडे शुष्कपणे पाहत एका चिटोऱ्यावर स्वतःचा पत्ता खरडला आणि मग काही न बोलता त्या निघून गेल्या.

त्या बाईंच्या बोलण्यानं मी सर्द झालो होतो. रामदास भगत हा डाव्या विचारसरणीचं नेतृत्व करणाऱ्यांपैकीचा एक कार्यकर्ता होता. त्याचा अपघात झाला म्हणून सर्वच दैनिकांमधून पहिल्या पानावर फोटोसह बातमी आली. पहिल्या पानावर त्याच्या मृत्यूची बातमी आणि त्याचा फोटो छापून येणं हे त्यानं कमावलेल्या पुण्याईचं फळ होतं.

मिसेस भगतच्या बोलण्यानं मी अस्वस्थ झालो होतो. त्यांच्या जागी मला माझी बायको आणि माझा मुलगा दिसू लागला. माझ्यासमोरच्या कागदाच्या चिटोऱ्याकडे मी क्षणभर पाहतच राहिलो.

मिसेस भगतचा तो अवतार मी विसरू शकत नव्हतो. त्या बाई आपल्याला काय मागायला आल्या? त्यांचं मागणं अखेर आपलं कर्तव्यच ठरतं ना? यापेक्षा तर आपण त्यांना अधिक काहीच देऊ शकत नाही . . .

रात्रभर मी विचार करीत होतो.

दुसऱ्या दिवशी माझी नाइट शिफ्ट होती. मी मिसेस भगतच्या घरी जायचं निश्चित करून दुपारी निघालो. पत्ता शोधीत त्यांच्या घरी गेलो. त्यांचं घर एका गजबजलेल्या, जुन्या वस्तीत होतं. जुनाट बांधणीचं. मी दारावर थाप मारताच चार वर्षांची चिमुरडी दार उघडून माझ्यासमोर उभी राहिली. पाठोपाठ मिसेस भगतसुद्धा दारात आल्या. त्यांनी माझं स्वागत करीत मला बसायला खुर्ची दिली. ती चिमुरडी पोर काहीशा अनोळखी नजरेनं माझ्याकडे पाहत होती. तिच्या नजरेच्या तळाशी भीती जाणवत होती. तिच्याकडे कौतुकाने पाहत मी मिसेस भगतना विचारलं,

"हूंऽ मला घरी बोलावलं होतं त्यांनी. त्यांच्या कडूनच सरळ प्रेसमध्ये येतो आहे मी. तिच्या नवऱ्याचा अपघात झाला नसावा. तो खूनच असावा याबद्दल माझी खात्री झाली आहे."

"कशावरून ?"

"मिसेस भगतनी माझ्यासमोर सादर केलेले पुरावे सबळ आहेत. मी तुम्हाला एकच प्रश्न विचारतो जगदाळे–एवढा मोठा अपघात होतो; रामदास भगतच्या डोक्याचा ट्रकच्या चाकाखाली चेंदामेदा होतो आणि त्याची सायकल मात्र त्या स्पॉटपासून पाच ते सात फुटावर राहते ? आणि तिचे फक्त तीन स्पोक तुटतात ? यापेक्षा सायकलचं कोणतंही नुकसान होत नाही. तुम्ही कल्पना करू शकाल ?"

विचारातून जागे झाल्याप्रमाणे जगदाळे म्हणाले,

"हूंऽ या मुद्यात अगदीच तथ्य नाही असं आपण म्हणू शकत नाही."

"तेच मला म्हणायचं आहे. एखादा माणूस डाव्या विचारसरणीचा पुरस्कर्ता आहे, कामगार चळवळीशी त्यांचा संबंध आहे, पोलिटिकल रूलिंग पार्टीशी तो निर्भीडपणे दोन हात करतो, म्हणून त्याचा खून व्हावा ? आजच्या या लोकशाही देशात हे कितपत सयुक्तिक आहे ?"

जगदाळे माझ्याकडे पाहू लागले. न रहावल्यामुळं मीच पुढं सांगू लागलो.

"रामदास भगतची तरुण बायको विधवा झाली. तिनं पुरतं आयुष्य कसं असतं हे सुद्धा पाहिलं नाही. त्याची चार वर्षांची गोड छोकरी उघड्यावर पडली. तुम्ही तत्त्वानं भांडता की जिवाशी खेळता ?"

बोलता बोलता आपण खूप गुंतावळ्यात सापडत आहोत, आत्यंतिक होत आहोत याची जाणीव मला दुसऱ्याच क्षणी झाली. मग क्षणभर मी काहीच बोललो नाही. खिशातून सिगारेट काढून पेटवीत मी म्हणालो,

"या प्रकरणाचा पूर्ण छडा मला लावायचा आहे जगदाळे."

"विश यू बेस्ट ऑफ लक !"

आणि मग मी प्रेसमध्ये परतलो.

शिफ्ट संपेपर्यंत डोक्यात फक्त रामदासचेच विचार होते. ट्रकखाली चेंगरल्यामुळे त्याचं चेंदामेंदा झालेलं डोकं माझ्यासमोर मधून मधून नाचत होतं. त्यांच्या बायकोची असहायता, त्या चिमुरड्या पोरीची दयनीयता माझ्या काळजाला चिरत होती. मी यांत्रिकपणे टेबलावरच्या बातम्या कंपोजिंग सेक्शनकडे देत होतो. मधूनच टेलिप्रिंटरचा रोल न्याहाळत होतो.

टेलिप्रिंटरची थडथड एकदाची थांबली. दिवसभराच्या कामाने थकून गेल्याप्रमाणे टेलिप्रिंटर सुस्तावला होता. बातम्यांची शेवटची भेंडोळी मी नजरेखालून घातली. प्रिऑरिटीच्या बातम्यांवर पुन्हा एकदा नजर टाकली. फारशा महत्त्वाच्या बातम्या वाटल्या नाहीत म्हणून कंपोजिंग सेक्शनकडे गेलो. फ्रंट पेजचं मॅटर सगळं तयार होतं. सोबतीला नारायण बोबडे होता. अर्धा तास पेज बांधण्यात गेलं.

मशिनवर पेज चढवून मी पहिला अंक तपासून पाहिला. मग ओ. के. करून प्रेसच्या बाहेर पडलो तेव्हा पहाटेचे तीन वाजले होते.

आठरस्ता चौकाच्या दिशेनं मी सायकल घेऊन निघालो. पहाटेचा गारवा हवेत भिनला होता. वाऱ्याची एखादी थंडगार झुळूक संपूर्ण अंगाला स्पर्शून निघून जायची. सायकल चालवताना फुटणारा घाम वारा वरच्यावर चाटून घेत होता. रस्ता कापत असताना मध्येच रामदासचा खून झाला ती जागा आली. मागाहून ट्रकचा आवाज आला. एक ट्रक भरधाव वेगाने येत होता. क्षणभर आपणच रामदास आहोत ही भावना मला धक्का देऊन गेली. ट्रकच्या कर्कश हॉर्नने मी भानावर येऊन रस्त्याच्या बाजूला झालो. ट्रकचे मागचे लाल दिवे वाकुल्या दाखवल्याप्रमाणे वळणावरून अदृश्य झाले.

रामदासचा खून झाला त्या जागेवर मी क्षणभर थांबलो. आजूबाजूला चौकसपणे पाहू लागलो. रामदासचे मारेकरी कुठून आले असतील, त्यांनी त्याला कुठे अडवले असेल ह्या गोष्टींचा अंदाज मी आपल्या मनाशी बांधत होतो.

घरी परतलो तेव्हा शुक्राची चांदणी डोक्यावर आली होती.

रामदास भगतचा खून झाला त्यादिवशी त्याची मिलमध्ये दुसरी शिफ्ट होती. कामावर जाण्यापूर्वी कार्पोरेशनच्या सभासदांची दुपारी मीटिंग होती. नंतर तो मीटिंग आटोपून परस्पर मिलमध्ये गेला होता. मीटिंगमध्ये त्याचं कुणाशी काही भांडण झालं असावं, त्यानं कुणाची अंडीपिल्ली बाहेर काढली असावी म्हणून त्याचा खून झाला असावा किंवा मिलमध्ये कुणाशी त्याचं भांडण झालं असावं. कदाचित जुन्या वैमनस्यावरून कुणी त्याला एकटं घरी जाताना पाहून त्याचा खून केला असत्रा.

रामदासच्या खुनामागच्या शक्यता शोधताना त्या मारुतीच्या शेपटीसारख्या वाढतच होत्या.

प्रेसमध्ये जाण्यापूर्वी कार्पोरेशनच्या ऑफिसात जाऊन घेण्याचं मी ठरवलं. महापौराला भेटून त्या दिवशीच्या मीटिंगमधली स्थिती मला समजून घ्यायची होती. तिथे पोहचलो तेव्हा महापौर कुठेतरी बाहेर निघून गेले होते. शेवटी मला तिथल्या चपराशाला पकडावं लागलं.

"रामदास भगतला तुम्ही ओळखता ?"

"वा वा ! वळखता म्हणजे काय सायेऽत्र ? रामदासभाऊ आमच्या चांगले वळखीचे होते. पन बिचाऱ्याचा असा एक्सिडन झाला."

"रामदासचा अपघात झाला नाही, खून झाला असावा, अशी आम्हाला दाट शंका आहे,"

"खून ?" हबकून त्यानं विचारलं.

"होय. त्याच्या पत्नीची आणि आमचीही अशी खात्री आहे, की त्याचा खूनच झाला असावा. आणि मी त्या संदर्भातच इथे चौकशी करायला आलो आहे."

"तुमी कोन आहा ?"

"मी पत्रकार आहे. मला तुमच्याकडून काही माहिती हवी आहे."

"वा वा ! आपल्याले माह्यती हाये तेवढं तं आपून सांगनारच जीऽ ?"

"त्या दिवशी मीटिंग झाली तेव्हा तुम्ही होता ?"

"हौ ऽ परत्येक मिटिंगीची वेवस्था मलेच करावं लागते."

"त्या मीटिंगमध्ये रामदास भगत कुणाशी भांडला होता का ?"

"हो. परत्येक मीटिंगमध्ये रामदासभाऊचं भांडन व्हाचं कोनासंग तरी."

"त्यातल्या त्यात त्याचं भांडण नेहमी कुणाशी व्हायचं ?"

"खुरानासायवाशी."

"खुराना कोण आहेत ?"

"मुन्सिपाल्टीचे मेंबर."

"त्या दिवशी खुराना आणि रामदासचं भांडण कशाप्रकारे झालं होतं ?"

"नळ योजनेवरतून काही बोलनं झालं व्हतं. रामदासभाऊच्या मोहल्ल्यात नळाचं पानी रेगुलर येत नाई, रातच्या वक्ती उशिरा येते आन् लौकरच चाल्ले जाते म्हून रामदासभाऊ मिटिंगीत सांगत व्हते."

"मीटिंग सुरू असताना रामदासचं आणि खुरानाचं भांडण झालं तेव्हा महापौर काय करीत होते ?"

"महापौरसायबानं दोघाइंलेबी अलग अलग केलं आन् मंग रामदासभाऊ मिटिंगीआगुदर निघून गेले."

खुराना हे शहरातलं बडं प्रस्थ असल्याचं मी ऐकून होतो. या प्रकरणात मिळालेल्या माहितीच्या आधाराने खुरानाचा संबंध मी शोधू लागलो.

आवश्यक ती माहिती घेऊन मी तडक प्रेसमध्ये आलो.

संध्याकाळी प्रेसमधून मी सरळ घरी न जाता मिलकडे वळलो.

मी पत्रकार आहे आणि रामदासच्या मृत्यूच्या संदर्भात चौकशी करायला आलो आहे, हे कळताच काही मिलमजूर माझ्या आजूबाजूला गोळा झाले. रामदासचा मृत्यू हा अपघाती मृत्यू नसून त्याचा योजनाबद्धरीत्या खूनच करण्यात आला हे माझं विधान ऐकून सगळे हबकूनच गेले. तिथे रामदासचा एक मित्र माझ्यासमोर आला. पावळे नावाचा. मला हवी असणारी माहिती मी पावळेला विचारू लागलो.

"त्या दिवशी रामदासची आणि तुमची भेट झाली होती का ?"

"हो. आमची दोघांचीही एकच पाळी होती."

"रामदासचे आणि तुमचे संबंध कसे होते ?"

"अतिशय चांगले. मैत्रीचेच."

"त्या दिवशी रामदासचा कुणाशी वाद झाला होता ?"

"हो शिफ्ट कंट्रोलरनं एका चपराशाचे सुट्या-मधले पैसे कापल्यामुळे तो रामदासकडे तक्रार घेऊन आला. रामदास कामगार संघटनेचा सेक्रेटरी होता, त्यामुळे त्याच्याकडे अशाप्रकारच्या तक्रारी नेहमीच यायच्या.".

"रामदासचा कुणाशी वाद झाला होता.?"

"शिफ्ट कंट्रोलरशीच. नंतर ते प्रकरण डायरेक्टरपर्यंत गेलं."

"डायरेक्टरचे आणि रामदासचे संबंध कसे होते ?"

"फारसे चांगले नव्हतेच."

तिथल्या कामगारांच्या बोलण्यावरून रामदास-विषयी त्यांच्या मनामध्ये आदरच होता. शिवाय रामदासचा अशाप्रकारे मृत्यू झाल्यामुळे सगळे हळहळत होते.

मेन गेटच्या चपराशाला मला काही विचारा-वसं वाटलं म्हणून मी त्याच्याजवळ आलो.

"त्या दिवशी रामदास या गेटमधून किती वाजता बाहेर पडला ?"

"रात्री दोन वाजता."

"त्याची शिफ्ट किती वाजता संपत होती ?"

"रात्री दहानंतर. पण बाबुराव चपराशाच्या भानगडीमुळं तो थांबला होता. शिवाय आमच्या युनियनच्या कामासाठी तो शिफ्ट संपल्यानंतर नेहमीच थांबायचा."

माझं लक्ष समोरच्या पानठेल्याकडे गेलं. त्यासंबंधी मी चौकशी करू लागलो.

"हे पानाचं दुकान रात्रभर उघडं असतं ?"

"हो."

"त्या दिवशीसुद्धा उघडंच होतं ?"

"हो "

"रामदास जेव्हा घरी परतला तेव्हा या पानठेल्यावर किती माणसं उभी होती ?

"तीन–चार."

"काय वयाची ?"

"पस्तीसचाळीसच्या आसपास."

"रामदास आणि त्यांचं काही बोलणं झालं होतं का ?"

"नाही. पण रामदास गेटमधून बाहेर निघाला तेव्हा ती सगळी माणसं त्याच्याकडे एकटक पाहत होती. आणि रामदासच्या पाठोपाठ ते सगळेच निघून गेले."

"किती वेळापासून ती तिथे उभी होती ?"

"एखाद्या तासापासून."

मला हवे असलेले सगळे धागे बरोबर गवसत होते.

घरी परतायला रात्रीचे नऊ वाजले. शैला माझी वाट पाहून थकली होती. अभय केव्हाच झोपी गेला होता. पत्रकाराची बायको होणारी स्त्री त्याच्या उशिरा परत येण्याशी नेहमीचीच ओळखीची झाली असते. तरीही शैलानं मला विचारलंच.

"एवढा उशीर का झाला आज परतायला ?"

"रामदास भगतच्या प्रकरणात गळ्यापर्यंत बुडालो आहे."

तिनं माझ्याकडे एक कटाक्ष टाकला. रामदासच्या प्रकरणाशी तीही आता परिचित झाली होती. मी खांद्यावरची शबनम बॅग टेबलवर ठेवून पाणी प्यालो. शैला मला म्हणू लागली,

"तुम्ही या प्रकरणात एवढे बुडून गेलात. रात्रंदिवस तुम्हाला या रामदास प्रकरणाशिवाय काहीच दिसत नाही. हे सगळं करून फार फार तर एखादी खळबळजनक बातमी देण्यापलीकडे तुम्हाला आणखी काय मिळणार आहे ?"

"खळबळजनक बातम्यांचा वगैरे मला मोह नाही. इथं तो प्रश्नच उद्भवत नाही."

"मग ही सगळी यातायात करून तुम्हाला काय मिळणार आहे ? तसा तुमचा या प्रकरणाशी काय संबंध आहे ?"

शैलाच्या या बोलण्याचा मी क्षणभर विचार केला. खरंच, आपला तसा या गोष्टींशी, घटनेशी काय संबंध आहे ? रामदास भगतचं आणि आपलं असं कोणतं नातं आहे ? पत्रकार म्हणून आपण हे सगळं करायला समोर आलोय्; पण पत्रकार म्हणून आपण एकटेच आहोत का ? इतर पत्रकार-सुद्धा आहेत . . . क्षणभर मी गोंधळल्यागत झालो. आपण हे कशाकरिता करीत आहोत याचं नेमकं उत्तरच मला सापडत नव्हतं; तथापि शैलाच्या प्रश्नाचं उत्तर देण्याचा प्रयत्न करीत मी म्हणालो,

"काही मिळेल किंवा नाही, या गोष्टींचा मी कधी विचारच केला नाही. मी फक्त सोशल कमिटमेंट मानतो. आणि या सोशल कमिटमेंट-मध्ये मला ही गोष्ट महत्त्वाची वाटली. माणूस जगताना तो समाजात जगत असतो, समाजाचा एक घटक म्हणून जगत असतो."

माझं बोलणं तिला भाषणबाजीसारखं वाटलं असावं. माझ्या बोलण्यावर कुठलीही प्रतिक्रिया व्यक्त न करता ती आपल्या कामाला लागली.

रामदासच्या मृत्यूच्या संदर्भातील मला आवश्यक ती माहिती मिळाली होती. त्या माहिती-वरून रामदासचा मृत्यू हा अपघाती मृत्यू नसून तो योजनाबद्धरीत्या घडवून आणलेला खूनच होता हे मी सिद्ध करवून देऊ शकत होतो.

या सगळ्या माहितीवरून मी बातमी तयार करू लागलो. रात्री एक वाजेपर्यंत मी लिहीत होतो,

दुसऱ्या दिवशी प्रेसमध्ये जाताना आधी रामदासच्या घरी येलो. मिसेस भगत घरीच होत्या. नेहमीच्या पद्धतीनं त्यांनी माझं स्वागत केलं. रामदासच्या खुनाच्या संदर्भातील सगळे पुरावे मी त्यांना दाखवले. त्यांना समाधान झाल्याचं मला जाणवलं.

"काकडेसाहेब माझी शंका खोटी नव्हती"

"म्हणून तर मी यामागे लागलो. उद्याच्या अंकात फ्रंट पेजवर ही बातमी टाकायची आहे. रामदासचा एखादा फोटोही द्या. बातमीसोबत फोटोही देऊ."

मिसेस भगतनी रामदासचा फोटो माझ्याजवळ दिला.

मी परतलो तेव्हा त्या कृतज्ञतेने भारावल्यागत म्हणाल्या,

"काकडेसाहेब, तुम्हचे उपकार कोणत्या शब्दात मानायचे तेच कळत नाही."

मिसेस भगतच्या बोलण्यानं माझ्या अंगावर मूठभर मास चढलं होतं.

सायकलवर टांग टाकून मी प्रेसकडे निघालो, आठरस्ता चौकातून जाताना एखाद्या हुतात्म्याच्या समाधीला नमस्कार करावा, तसा मी रामदासच्या त्या जागेपुढे मनातल्या मनात नतमस्तक झालो. आणि बातमी अधिक स्टंट कशी होईल याचा विचार करीत मी प्रेसमध्ये आलो.

रामदास भगत प्रकरणात मी पूर्णपणे गुंतल्याचं संपादक विभागातील बहुतेकांना माहीत होते. मधूनमधून बहुतेक सहकारी चौकशी करायचे. 'काऽय भगत प्रकरण कुठवर ?' म्हणून जगदाळे दररोज चौकशी करायचे. आजही जगदाळे गेल्या-गेल्या मला काहीतरी विचारतील असं वाटत होतं, आज आपणही एखाद्या विजयी वीराप्रमाणे सगळी बातमीच त्यांच्या समोर ठेवायची . . . या एवढ्या कठीण प्रसंगातील नेमकं सत्य फक्त निरंजन काकडेच शोधून काढू शकतो म्हणून संपादक विभाग आपल्या कर्तबगारीवर शिक्का-मोर्तब करील.

सिटी न्यूजच्या टेबलवर जगदाळे होतेच. त्यांच्या नजरेला नजर भिडताच मी विजयी स्मित केलं.

"तुम्हाला बापूसाहेबांनी भेटायला सांगितलं काकडे."

मी तसाच संपादकांच्या केबिनमध्ये गेलो. हे प्रकरण बापूसाहेबांपर्यंतही पोहचलं असेल, आणि त्यांनी आपल्या या धडाडीचं, परिश्रमाचं कौतुक करण्यासाठीच तर कदाचित आपल्याला बोलावलं नसेल? मी स्वतःवरच खूष होतो.

"बसा."

मी बापूसाहेबांकडे एकटक पाहत त्यांच्या टेबलजवळ बसलो. बापूसाहेब उद्याच्या अंकाचा अग्रलेख तयार करीत होते. पेशवे डिक्टेशन घेत होते. मध्येच अग्रलेख थांबवून बापूसाहेबांनी मला विचारलं,

" काय काकडे, कोणत्या सेन्सेशनल न्यूजमधे गुंतले आहात ?"

" रामदास भगतच्या. तीन दिवसांपासून पायाला चक्री लागल्यागत पुरावे गोळा करण्याकरिता फिरतो आहे."

" आवश्यक ते पुरावे मिळालेत ?"

" हो. आज मी त्यासंबंधी बातमीही तयार करून आणली उद्याच्या अंकासाठी "

" ट्रस्टींचा फोन आलाय् त्या संदर्भात–"

" कसा काय ?"

" तूर्तास भगतच्या संदर्भातली कुठलीही बातमी प्रकाशित करू नका म्हणून–"

मला एकदम धक्काच बसला. 'का' म्हणून विचारण्याची माझी हिम्मतच झाली नाही. बापूसाहेब पुढे म्हणाले,

" कशाला या फंदात पडून स्वत:च्या पायावर दगड पाडून घेता ? काकडे ? टेलिप्रिंटरच्या बातम्या काय कमी आहेत ? त्याच भाषांतरित करून पेपर भरवा. आपल्याला नोकरी करायची आहे."

बापूसाहेबांच्या बोलण्यातला सूर माझ्या लक्षात आला. ही बातमी द्यायला ट्रस्टींचा विरोध का असावा हेही मला स्पष्टपणे कळू शकत होत. पण ह्या सगळ्यांना विरोध करून हे सत्य समोर आणायला आपण दंड थोपाटले तर . . . आपल्याला इथल्या नोकरीला मुकावं लागेल. इथली बारा वर्षांची सिनिऑरिटी, इथले काही फायदे, आपसूक चालून येणारी संधी किंवा आपणच रामदास भगत होऊ. आपला मुडदा एखाद्या जड वाहनाच्या चाकाखाली चेंदामेंदा होईल; आणि आपली बायको आपल्या पतीच्या मृत्यूला न्याय मिळावा म्हणून आपल्या गोजिरवाण्या पोराला घेऊन अशीच वृत्तपत्रांच्या कचेरीचे उंबरठे झिजवीत राहील.

यांत्रिकपणे मी बापूसाहेबांच्या कचेरीतून बाहेर आलो आणि जिन्याच्या पायऱ्या उतरू लागलो. मध्येच थबकून मी रामदास भगतची बातमी बॅगमधून बाहेर काढली. आजूबाजूला कुणी नाही याची खात्री केली आणि शक्य तेवढे बारीक तुकडे करून मी ती बातमी कचऱ्याच्या टोपलीत टाकून दिली.

टेबलवर आल्यावर जगदाळेंनी माझ्याकडे पाहिलं. सहेतुकपणे. षंढाकडे एखाद्या पुरुषानं पहावं असं. जणूकाही आपल्याला सगळं माहीत आहे अशी त्याची नजर होती.

मुळापासून उचकटून टाकल्याप्रमाणे मी टेलिप्रिंटरचा रोल फाडला. मदतीला इंग्रजी–मराठी शब्दकोश घेतला आणि सिगारेटच्या धुरकट धुरानं एकेक बातमी मी तपासू लागलो, प्रॉयरिटी ... दि लीडिंग न्यूज फॉर हेड लाईन

दोन दिवसानंतर मिसेस भगत पुन्हा कार्यालयात आल्या. अपेक्षित बातमी त्यांनी कालच्या अंकात काळजीपूर्वक शोधली असेल. आणि निराशपणे पुन्हा इथली वाट धरली असावी.

मिसेस भगतकडे लक्ष गेल्याबरोबर मी कामात गढून गेलो. उद्याच्या अंकाकरिता मस्तपैकी सेन्शेशनल न्यूज. वाचकांच्या उड्या पडतील अशी.

माझ्यावर एक अस्पष्टशी सावली पडली. त्या सावलीपाठोपाठ आवाज.

" काकडेसाहेब–"

" येस ? बोला."

मी त्यांच्याकडे क्षणभर पाहिलं. मी त्यांच्या नजरेला नजर देऊ शकत नव्हतो. माझ्यातली लाचारता, अगतिकता एखाद्या अपराध्यासारखी या बाईच्या पायाजवळ कोलमडून पडली. पण त्याची जाणीव मलाही नव्हती.

" मी कालचा अंक पाहिला . . . "

माझ्यासमोर त्यांनी प्रश्न फेकला होता. मी उत्तराकरिता नपुंसक झालो होतो.

" माफ करा मिसेस भगत. पण..."

आणि मी त्यांची नजर टाळून पुन्हा लिहू लागलो.

काहीही न बोलता मिसेस भगत वळल्या आणि ताठ मानेनं निघून गेल्या. मी टेलिप्रिंटरची धडधड ऐकू शकत होतो. निर्जीव, नि:सत्व. ■

२७६, C/O हरीश पाटील
छत्रपतीनगर, नागपूर.

सुधारकाग्रणी आगरकर

स. ग. मालशे

एकोणिसाव्या शतकाचे नेमके वर्णन करायला कुणी सांगितले तर मी म्हणेन, 'कलह–शतक'! शतकाच्या प्रारंभीच इंग्रजांचे 'नवी विटी, नवे राज्य' आले. पाश्चात्य संस्कृतीशी आपला संपर्कच नव्हे तर; संघर्ष सुरू झाला. नवे सार्वत्रिक शिक्षण, नव्याने आलेली औद्योगिक क्रांती, नवे कायदे कानू, दळणवळणाची नवी साधने यांच्यामुळे आपली सामाजिक परिस्थिती झपाट्याने पालटू लागली. नोकरपेशांचा नवा मध्यमवर्ग हळूहळू उदयाला येऊन महत्त्व पावला. या वर्गाच्या पूर्वापार चालत आलेल्या धर्मकल्पनांना आणि आचारविचारांना हादरे बसू लागले. साहजिकच या वर्गातील नवशिक्षितांच्या मनात विचारमंथन सुरू झाले. समाजसुधारणेची चळवळ मूळ धरू लागली तद्वतच, पुनरुज्जीवनवादी सनातनी राष्ट्रीयत्वही फोफावू लागले. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात या उभय प्रवृत्तीत झगडाही सुरू झाला. समाज सुधारणेचा कैवार घेणाऱ्या नेत्यांची जी नावे ठळकपणे डोळ्यासमोर येतात, ती म्हणजे लोकहितवादी, फुले, रानडे, आगरकर, कर्वे ही होत. त्यातही सर्वंकष विचारमंथनाच्या दृष्टीने डोळ्यात भरते ते आगरकरांचे नाव. १८८१ पासून 'केसरी'मधून आणि १८८८ नंतर स्वतःच्या 'सुधारक' पत्रातून आगरकरांनी समाजसुधारणेचा जो हिरीरीने प्रचार केला, त्याला दुसरी तोड सापडणार नाही.

तसे पाहिले तर आगरकरांची राजकीय मते सामाजिक मतांइतकीच जहाल होती; पण 'केसरी' चालविण्याच्या ध्येयधोरणासंबंधी 'आधी राजकीय की आधी सामाजिक' असा प्रश्न उपस्थित झाला. त्यातून 'आधी राजकीय' म्हणणाऱ्या लो. टिळकांसारख्या मातब्बर सहकाऱ्या-बरोबरचे आगरकरांचे मतभेद विकोपाला गेले. सामाजिक सुधारणांचा मनासारखा प्रचार करण्याबाबत 'केसरी'मध्ये बंधने येऊ लागली. आणि त्यामुळेच आगरकरांनी 'सुधारक' पत्र सुरू केले. पहिल्याच अंकातील अग्रलेखातून–म्हणजे 'सुधारक काढण्याच्या हेतू'मधून त्यांचे उद्दिष्ट अगदी स्पष्ट झालेले आहे. भारतीय संस्कृती म्हणजे जीर्ण शीर्ण असे जरठ झाड आहे. त्याला चांगलेच खच्ची केले पाहिजे आणि मूळ आर्य भारतीयत्व न सोडता, त्याला पाश्चात्य कल्पनांचे भरपूर खतपाणी दिले पाहिजे. असे केले तरच या जरठ वृक्षाला काही भवितव्य आहे.

इंग्रजी राजवटीमुळे पाश्चात्य सुधारणावादाशी नवशिक्षितांचा परिचय होताना, आगरकरांच्या पिढीवर हर्बर्ट स्पेन्सर आणि जॉन स्टुअर्ट मिल या तत्त्वज्ञान्यांच्या विचारांचा जबरदस्त पगडा होता. आगरकरांनी तर हर्बर्ट स्पेन्सरची 'ज्ञेयाज्ञेयमीमांसा' आणि मिलची 'स्त्रियांची गुलामगिरी' उत्तम पचविली होती. अज्ञेय हे अखेर गूढच; ते बुद्धिगम्य कधीच असत नाही. साहजिकच बुद्धिवादी आगरकर अज्ञेयवादी बनले होते. अर्थात त्यांनी ज्ञेयावर आपले लक्ष विशेष केंद्रित केले. त्यामुळेच त्यांचा भर विज्ञाननिष्ठेवर राहिला. त्यांच्या विचारसरणीत विकासवादाला अथवा उत्क्रांतीच्या

तत्त्वांना महत्त्वाचे स्थान मिळाले. ‘ जीवनार्थ कलह आणि सुधारणा ’ या त्यांच्या निबंधात त्याचे पडसाद उमटले आहेत. ‘ वडिलपणाचे हक्क ’ या लेखावर जॉन मोर्ले यांच्या ‘ ऑन कॉम्प्रोमाइज ’ या छोटेखानी निबंधाचा प्रभाव जाणवतो. प्लेटो, ॲरिस्टॉटल आणि फ्रेंच तत्त्वज्ञानी कॉंत यांचेही उल्लेख त्यांच्या लेखनात येतात. मात्र आगरकरांनी हे पाश्चात्य विचार पोथीनिष्ठपणे किंवा साचेबंदपणे स्वीकारले नाहीत. अज्ञेयवादी मते मांडीत असताना भारतीय परिस्थितीचे त्यांचे भान कधीही सुटले नाही. ‘ मानुषतेच्या ऐहिक सुखवर्धना ’ला त्यांनी महत्त्व दिले असले तरी त्यांची मते बेजबाबदार चार्वाकपंथी किंवा केवळ सुखवादी नव्हती; विवेकवादीच होती. धार्मिक मिथ्याचाराचे बंड मोडून इहवादाची ध्वजा उंच फडकत ठेवण्याची त्यांची धडपड होती.

‘ गुलामांचे राष्ट्र ’ या मथळ्याचा त्यांचा एक महत्त्वाचा प्रदीर्घ लेख आहे. नव्या विचाराला आमचे लोक भितात, असे सांगून त्यांनी जे प्रश्न उपस्थित केले आहेत, त्यावरून भावी क्रांतदर्शी समाजरचनेचा एक आराखडाच त्यांच्या नजरेसमोर असावा असे वाटते. प्रश्न असे आहेत : देव आहे की नाही ? वेद पौरुषेय की अपौरुषेय ? जातिभेद कसे निर्माण झाले ते नष्ट केल्यास काय होईल ? मुंज–लग्नादी संस्कार कसे निर्माण झाले ? ते नष्ट केल्यास कसे ? हवे त्याच्याशी लग्न करता का येऊ नये ? पुरुषांप्रमाणे स्त्रियांनी अविवाहित का राहू नये वा वाटेल तेव्हा विवाह का करू नये ? पुरुषांप्रमाणे स्त्रियांना राजकीय हक्क का नसावे ? पुरुषांना बहुपत्नीकत्व आहे तर स्त्रियांना बहुपतित्वाचा हक्क का नसावा ? अति रोगट मुलांना किंवा असाध्य रोग्यांना मारून का टाकू नये ? व्यक्तीचा किंवा कुटुंबाचा संपत्तीवरील खाजगी हक्क नाहीसा करून समाईक मालकी का नसावी ? सर्वच लोकास उच्च–नीच सर्व प्रकारची कामे का देऊ नये ? लोकसत्ताक राज्यपद्धतीखेरीज बाकीच्या बरखास्त का करू नये ?–या प्रश्नांचा आवाका ध्यानात घेतल्यास आगरकरांची विचारसरणी अगदी देवधर्मापासून ते साम्यवादापर्यंत व्यापक तत्त्वांना पालाण घालणारी कशी होती हे स्पष्ट होते.

‘ आजची सामाजिक असमता ’ या लेखात असेच साम्यवादाशी सदृश असे विचार त्यांनी व्यक्त केले आहेत : बुद्धिजीवी, सुखपरायण आणि कष्टकरी असे तीन सामाजिक वर्ग कल्पून पहिले दोन वर्ग कष्टकऱ्याच्या श्रमाचा फायदा उठवितात, यातून असमतेची परमावधी होते आणि मोठे स्थित्यंतर म्हणजे क्रांती घडून येते. ‘ उपायन, कर व बलिदान ’ या निबंधात सुधारलेल्या देशात उत्तरोत्तर समता वाढत जाते, असा त्यांनी विश्वास प्रकट केलेला असून ‘ लोकात ज्ञानाचा आणि संपत्तीचा बराच प्रसार झाला म्हणजे बलात्कार तत्त्व लयास जाऊन संमतितत्त्व तत्स्थानापन्न होते आणि तसे झाले म्हणजे सामाजिक व राजकीय विचारास समतेचे वळण लागते. ’

‘ सुधारका ’तून त्यांनी राजकीय आर्थिक प्रश्नही कारणपरत्वे चर्चिले असले तरी त्यांचा मुख्य भर समाजसुधारणेवरच राहिला. वास्तविक धर्माला ग्लानी आलेली असताना तो जणू धर्माचा परमोत्कर्ष आहे असे समजले जात होते. देव, दैव, यज्ञयाग; कर्मसिद्धांत, पूर्वजन्म, पुनर्जन्म, पाप–पुण्याच्या कल्पना, मूर्तिपूजा, जातिभेद, वर्णसंकर, सोवळे–ओवळे या सर्व गोष्टींत कर्मठ मिथ्याचारांचे प्राबल्य होते. आपले डोळे सदा आकाशाकडे म्हणजे परलोकाकडे लागलेले होते. जनमानसावर निवृत्तिवादाचा प्रभाव अनिर्बंध होता, म्हणून आगरकरांना आपल्या धर्मकल्पनांवर सर्वात प्रखर तडाके हाणावे लागले आणि इहवादी विचारांचे मंडण करावे लागले. हे तडाके हाणताना किंवा इहवादाचे मंडण करताना त्यांनी बुद्धिप्रामाण्य आणि व्यक्तिस्वातंत्र्य या कसोट्या मानल्या होत्या. त्या काळी ‘ बाबा वाक्यं प्रमाणं ’ हे शब्दप्रामाण्य आणि त्याहीपेक्षा ‘ शास्त्रात् रूढिर्बलीयसी ’ हे रूढीप्रामाण्य विशेष जारी होते. सुधारणेची आवश्यकता पटली, तरी सुद्धा जातिबहिष्काराच्या भीतीमुळे सुबुद्ध लोकही रूढी–विरुद्ध वागण्याचे मनोधैर्य दाखवीत नसत. शब्दप्रामाण्य आणि रूढी-

प्रामाण्याच्या जोडीने ग्रंथप्रामाण्य किंवा पोथीनिष्ठा त्याकाळी बलवत्तर होती. अमूक गोष्ट चांगली का ?-तर ती देवाला आवडते म्हणून, देवाला आवडते कशावरून ?-तर वेदात, बायबलात व कुराणात सांगितले आहे म्हणून; हे ग्रंथ प्रमाण का मानायचे ?-तर ते ईश्वरप्रणीत आहेत म्हणून; आणि ते ईश्वरप्रणीत का मानायचे ?-तर तसे त्या ग्रंथांत सांगितले आहे म्हणून-असे हे अन्योन्याश्रयी समर्थन आगरकरांना बिलकूल मान्य नव्हते. ते म्हणतात, 'एका ऋषी विरुद्ध दुसरा ऋषी हुडकीत बसण्यात अर्थ नाही.' धर्म आधी की नीती आणि सदाचार आधी ?-या बाबतीतली आगरकरांची मते मूलभूत होती. सत्यनिष्ठा, समबुद्धी, करुणा हे नैतिक सद् विचार धर्माच्या आधीपासूनचे आहेत असे ते मानतात. धार्मिक विधिनिषेध आणि नैतिक ध्येये ही भिन्न असतात, आवश्यकताच वाटत असेल तर माणसांनी धर्मभावना कायम ठेवावी; पण तिची लुडबूड सामाजिक कार्यात नसावी असे त्यांचे परखड मत होते.

समाजरचनेत व्यक्तिस्वातंत्र्याला वाव असला पाहिजे. सामाजिक व्यवहारात संयम, संमती, अनुरोध, रुकार, पसंती या गोष्टी इष्ट असून सक्ती, बलात्कार, बळजोरी या गोष्टी वर्ज्य केल्या पाहिजेत. सुधारणेचा आरंभ सांगताना ते म्हणतात, 'सचेतन व अचेतन सृष्टीचा दास मी नाही. तर तिला दास करण्याचा, निदान तिच्या बरोबरीने वागण्याचा हक्क किंवा अधिकार मला आहे. असा विचार मनुष्याच्या अंतःकरणात वागू लागला म्हणजे खऱ्या सुधारणेस प्रारंभ होतो.' तसेच व्यक्तीच्या वागण्याने समाजाचे नुकसान होत नसेल, तर तसे वागणे खुद्द त्या व्यक्तीस जरी घातक असले तरी ते आचरणात आणण्याचा तिला अधिकार आहे. समाजाने त्याबाबतीत सक्ती करता कामा नये असे ते मानीत. तरीही व्यक्तिस्वातंत्र्य आणि समाजबंधन या दोहोंनाही रास्त मर्यादा असतात आणि त्या पाळणे व्यक्तीचे कर्तव्य आहे, असे त्यांचे मत होते.

स्त्री-पुरुष स्वातंत्र्याच्या प्रश्नाला आगरकरांच्या लेखनात विशेष प्राधान्य मिळावे, हे साहजिकच होते. किंबहुना त्या काळातील नवशिक्षितांच्या सुधारणेची चळवळ प्रामुख्याने स्त्रियांच्याच प्रश्नाभोवती घोटाळत होती, यात शंका नाही. कुटुंबसंस्थेत स्त्रीचे स्थान गौण होते. बालविवाह, विषमविवाह, स्त्रीशिक्षण-बंदी, विधवाविवाह-बंदी, घटस्फोट-बंदी, बहुपत्नीकत्व, केशवपन हुंड्यांचे प्रस्थ इत्यादी गोष्टींचा स्त्रीलाच जाच सोसावा लागत होता. तत्कालीन आचारविचारांच्या निर्बंधांमुळे स्त्री ही पुरुषाची गुलामच बनली होती. मध्यमवर्गीय विधवांचे जिणे तर रांधा, वाढा, उष्टी काढा, दुसऱ्यांची मुले बाळे खेळवा, अशा स्वरूपाचे होते. आगरकरांनी स्त्रियांच्या पोषाखापासून तो स्त्रीच्या मूलभूत हक्कापर्यंत विविध प्रकारे कळकळीने लिहिले. स्त्रीशिक्षणाचा प्रसार व्हावा, स्त्रियांना आणि पुरुषांना एकाच प्रकारचे आणि एकत्रच शिक्षण मिळावे, चरितार्थ संपादनाचे शिक्षण मिळून त्या आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी व्हाव्यात याबद्दल त्यांनी विस्ताराने लिहिले आहे. स्त्री मुक्तीच्या सर्वांगीण चळवळीचे एकमेव भाष्यकार, असे त्यांचे वर्णन केल्यास ते खचितच चुकीचे ठरणार नाही.

स्त्री-जीवनाशी साक्षात निगडित असे जे जे प्रश्न त्या काळी उद्भवले त्यामध्ये स्त्रियांच्या बाजूने आगरकरांनी अतिशय हिरीरीने लिहिले. उदाहरणार्थ, विधवाविवाहाच्या सशास्त्रतेचा वाद आणि दादाजी-रखमाबाई खटल्यातून उद्भवलेला संमतिवयाचा प्रश्न. यातूनच सामाजिक सुधारणा परकी सरकारच्या कायद्याने घडून याव्यात का, ही समस्या उभी राहिली. 'म्हातारी मेल्याचे दुःख नाही. पण परक्या सरकारचा काळ सोकावेल' असा युक्तिवाद सनातनी विरोधकांचा असे. परंतु तो खोडून काढून आगरकरांनी उलट भूमिकेचं जोरदार समर्थन केलं. रूढीचे गुलाम झालेल्या लोकांमध्ये सुधारणा सहजासहजी घडून येणे कठीण असते आणि म्हणून जबाबदार लोकांनी त्यासाठी परकीय सरकारकडे कायद्याची मागणी करण्यात काहीही गैर नाही, असे त्यांचे मत होते.

स्त्रियांच्या प्रश्नाप्रमाणे अस्पृश्यतेचा प्रश्नही महत्त्वाचा होता. हिंदू समाजात त्याच्याही बाबतीत उपेक्षा-बुद्धीच बाळगली जात होती. पण ही उपेक्षाबुद्धी समाजाला कशी आत्मघातक ठरत होती, त्याचेही स्पष्ट दिग्दर्शन आगरकरांनी केले आहे. ते म्हणतात: 'महारांची सावली पडली असताही विटाळ मानणारे लोक कितीही लांब जिभा करून 'आमचा रंग काळा असला व तुमचा रंग गोरा असला म्हणून काय झालं, रंगावर काही मनुष्याची पात्रापात्रता ठरत नाही' वगैरे गोष्टी प्रतिपादू लागले, तथापि त्यांच्या शब्दात जोर येण्याचा संभव नाही व त्याचा परिणामही होणे नाही. त्याबद्दल जोर येऊन इतरांनी ते ऐकलेच पाहिजेत अशी खरोखर इच्छा असल्यास 'ब्राह्मणोस्य मुखमासीत' हे पक्षपाती शास्त्र झुगारून देऊन आपल्या मांडीला मांडी भिडवून शाळांतून बसण्यास महारास मोकळीक दिली पाहिजे. आमच्या अतिशूद्र लोकांस आम्ही अगदी दूर टाकल्यामुळे त्याची एकसारखी ख्रिस्ती धर्माकडे धाव चालू आहे, ही गोष्ट आम्हाला अत्यंत उद्वेगजनक आहे. या लोकांस आम्ही जवळ घेऊ लागून त्यांचा तिकडील ओघ परत फिरेल तो सुदिन असे आम्हांस वाटत आहे." (नि. संग्रह, भा. २ रा, पृ. १७७). यावर भाष्य करण्याचे कारण नाही.

समाजक्रान्तीसाठी विचार जागृती हे आगरकरांनी आपले ध्येय मानले होते. हा ध्येयवाद म्हणजे त्या काळी सुळावरची पोळी होती. बालविवाह, विषमविवाह, केशवपन, विधवाविवाह, संमतिवय यासारखे प्रश्न आज तरी पांढरपेशा सुशिक्षित वर्गापुरते गतार्थ झालेले असले आणि तेवढ्यापुरती आगरकरांच्या कार्याला कृतार्थता लाभली असली तरी त्याकाळी, अशा समस्यांचे समर्थन करणे म्हणजे लोकक्षोभाला आवाहन करणेच होते. पण आगरकरांचे चारित्र्य आणि त्यांची कळकळ सच्ची होती, म्हणून त्यांचे कठोर आणि परखड बोलही लोकांनी सहन केले. त्यांच्या अग्रलेखांची आव्हानात्मक बोलकी शीर्षके पाहिली तरी याची पुरेपूर खात्री पटावी. 'होऊन जाऊ द्या तर दोन हात', 'अजून तरी सावध व्हा', 'आमचे दोष आम्हाला कधी दिसू लागतील ?', 'शहाण्याचा मूर्खपणा अथवा आमचे प्रेतसंस्कार', 'धर्माचा सुकाळ, बकऱ्यांचा काळ', 'महाराष्ट्रीयास अनावृत पत्र', 'तरुण सुशिक्षितास विज्ञापना' 'इष्ट असेल ते बोलणार, शक्य असेल ते करणार' इत्यादी. आगरकर हे अज्ञेयवादी होते. देव न मानणारे होते पण या 'देव न मानणाऱ्या देवमाणसाच्या शब्दाशब्दांतून जाणवणारी सत्याविषयीची आस्था, अन्यायाविषयीची चीड आणि समाजसुधारणेविषयीची तळमळ खरोखरच बावनकशी होती. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही आगरकरांची प्राणप्रिय तत्त्वत्रयी होती. आज स्वातंत्र्य मिळालेले आहे. पण समता आणि बंधुता या तत्त्वांवर समाजाची पुनर्रचना करण्याचे आगरकरांचे ध्येय अधुरेच राहिलेले आहे. ते कार्यवाहीत आणण्यासाठी तनमनधनाने झटणे हे तरुण पिढीचे कर्तव्यच ठरेल. ■

३, मनाली कॉलेजस्ट्रीज
आगरबाजार, मुंबई २८

जुन्या मराठी शब्दांचे पुनरुज्जीवन

वा. के. लेले

(१) अलिकडचे मराठी साहित्य वाचत असताना एक विचार मनात पुनःपुन्हा उद्भवतो आणि रुखरुख उत्पन्न करतो. तो विचार असा की, आजची मराठी भाषा गुळगुळीत, निस्तेज व चैतन्यहीन तर होत चालली नाही ना! आजचे साहित्य विविध व विपुल विषयांनी संपन्न आहे; पन्नास वर्षांपूर्वीच्या साहित्यिकाला जे विषय कधी सुचलेसुद्धा नसते ते विषय आज साहित्यात मोकळेपणाने मांडले जात आहेत; त्या विषयांच्या अभिव्यक्तीच्या वेगवेगळ्या तऱ्हा अस्तित्वात येत आहेत, कल्पिल्या जात आहेत; मिश्र स्वरूपाच्या साहित्य–प्रकारांचे प्रयोग केले जात आहेत; तसेच इतर भारतीय भाषांतील साहित्यिक प्रवृत्तींनी मराठी साहित्य, अल्प प्रमाणात का होईना, प्रभावित होत आहे. जरी अशा प्रकारे मराठी साहित्याचा विस्तार व विकास होत असला तरी त्या साहित्याची अभिव्यक्ती करणाऱ्या भाषेची सद्यःस्थिती कशी आहे, असा प्रश्न मनात उद्भवतो. आजच्या साहित्याच्या भाषेत तोचतोचपणा, निर्जीवपणा किंवा ठोकळेबाजपणा तर अवतरलेला नाही ना, अशी एक शंका येते, शब्द चपटे किंवा गुळगुळीत झाले आहेत; ते आपला ताजेपणा, टवटवीतपणा किंवा तजेलदारपणा हरवून बसले आहेत; परिणामी अशा शब्दांच्या संघटना सपाट वाटतात; त्यायोगे लिखाणात एक प्रकारचा भरडपणा येत चालला आहे. आजच्या मराठी भाषेबद्दलची ही रुखरुख प्रसिद्ध कथाकार पं. महादेवशास्त्री जोशी ह्यांनी १९८१ साली भरलेल्या सोळाव्या गोमंतक मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात पुढील समर्पक शब्दांत व्यक्त केली होती. ते म्हणाले होते :

"सांप्रत मराठीचं अभिव्यक्तीचं कसब वाढलेलं दिसतं. पण शब्दसंपदा त्या मानाने कमी झाली आहे. आपणापाशी जे थोडेबहुत चालचलाऊ शब्द आहेत त्यांच्या मदतीनेच आपण 'कोंड्याचा मांडा' करतो. आपलं काहीतरी हरवलं आहे, हे जेव्हा कळतं, तेव्हाच माणूस त्याच्या शोधाला सरसावतो. पण खेदाची गोष्ट ही, की आपलं काही हरवलं आहे, हेच आपण विसरलो आहो. जिथे आपल्याला नेमका मराठी शब्द सापडत नाही, तिथे आपण अवतरणात इंग्रजी शब्द ठेवून मोकळे होतो. मराठीतलं नेटकं, चांगलं, सुंदर, अर्थवाहक, असं बरंचसं काही हरवलं आहे. दहा वाक्यांचा अर्थ दोन वाक्यांत टाशीवपणे सांगणारा वाक्प्रचार आता आपल्या लेखनात दिसत नाही...पूर्वसूरींचा अभ्यास तुटला आहे. आपलं मराठी साहित्यच आपल्या महनीय भाषिक आणि सांस्कृतिक परंपरेपासून तुटलं आहे. ही स्थिती स्पृहणीय खास नाही. म्हणून नव्याने उदयाला येणाऱ्या गोमंतकीय आणि महाराष्ट्रीय साहित्यिकांनी हा आपला वारसा शोधावा आणि खऱ्या अर्थाने शब्दसृष्टीचे ईश्वर व्हावं,

अशी माझी त्यांना कळकळीची सूचना आहे.' [आमचा वानप्रस्थ, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८३, पृ. ११६] पंडित महादेवशास्त्री जोशींसारख्या एका सिद्धहस्त व नामांकित साहित्यिकांना मराठी भाषेच्या सद्य:स्वरूपाविषयी चिंता वाटते आणि ती त्यांना स्पष्टपणे बोलून दाखवावीशी वाटते ही बाब हेच सुचवते की, मराठी भाषेचे स्वास्थ्य बिघडले असून त्यावर यथायोग्य उपाययोजना विनाविलंब करणे अत्यावश्यक आहे. ह्या दिशेने विचार करू लागता जो एक विचार सुचतो तोच प्रस्तुत लेखात मांडण्याचे ठरविले आहे.

(२) कोणत्याही भाषेत नवीन शब्दांची भर विविध कारणांनी पडत असते. त्यायोगे विविध अर्थ, कल्पना, विचार इत्यादींची यथावत अभिव्यक्ती करण्याचे त्या भाषेचे सामर्थ्य वाढत असते. विदेशी संस्कृतीशी व तिच्या भाषेशी होणारा परिचय, स्वदेशातल्याच इतर भाषाभगिनींकडून होणारी उसनवारी, प्रतिभाशाली साहित्यिकांकडून होणारे अभिनव शब्दप्रयोग, शास्त्रीय व तांत्रिक संकल्पना व्यक्त करण्यासाठी साधले जाणारे नवे शब्द इत्यादी अनेक मार्गांनी भाषेच्या शब्दभांडाराची अभिवृद्धी होत असते, ही गोष्ट सर्वपरिचित आहे. अभिवृद्धीची ही प्रक्रिया एकीकडे चालू असताना दुसरीकडे जुन्या शब्दांच्या गळतीची प्रक्रियाही चालू असते. एक काळी प्रचारात असलेले, अभिप्रेत अर्थ व्यक्त करू शकणारे व लोकांच्या तोंडी रुळलेले शब्द कालांतराने विसरले जातात व प्रचारातून नाहीसे होतात. क्वचित त्यांची जागा त्यांच्याच इतके अचूक शब्द घेतात, पण अनेकदा त्यांचा अर्थ व्यक्त करण्यासाठी पसरट, अघळपघळ, पाल्हाळिक व श्रवणदुर्भग शब्दावलीचा आश्रय घ्यावा लागतो. अशा पुनरुज्जीवनाची आवश्यकता उत्कटतेने भासू लागते. अशा पुनरुज्जीवित शब्दांच्या वापरामुळे भाषा अर्थगुरू, सुटसुटीत, टवटवीत, आनंददायक व स्मरणीय बनते. वस्तुत: असे शब्द नवीन नसतातच, ते जुने व एके काळी रूढ असलेले असेच असतात, पण त्यांच्यावरील धुरळा झटकून व त्यांच्यावर साचलेली काजळी निपटून टाकून त्यांना पुन्हा एकदा ' चलनी नाण्यां 'चे स्वरूप दिले की ते भाषेला जिवंत व रसरशीत बनवतात. जुन्या मराठीतील असे कित्येक शब्द सध्या जणू अडगळीत पडल्यासारखे असून ते पुन:प्रचलनाची आतुरतेने वाट बघत आहेत. असे शब्द पुन्हा रूढ केल्याने मराठी भाषेला कसा तजेलदारपणा प्राप्त होण्यासारखा आहे ते, निवडक शब्दांच्या उदाहरणांनी, स्पष्ट करू. शब्दांची निवड कै. विद्याधर वामन भिडे यांनी रचिलेल्या **सरस्वती शब्दकोश भाग पहिला** [चित्रशाळा प्रेस, पुणे, दुसरी आवृत्ती, १९६९] आणि **सरस्वती शब्दकोश भाग दुसरा** (चित्रशाळा प्रेस, पुणे, दुसरी आवृत्ती, १९७०) ह्या कोशग्रंथांतून केली असून खालील नोंदीत लाघवार्थ त्यांचा निर्देश क्रमश: १ व २ ह्या आकड्यांनी केला आहे. शब्दांचा विचार व्याकरणातील प्रातिपदिकांच्या जातींस अनुसरून केला आहे. प्रातिपदिकाच्या समोर त्याचा अर्थ नमूद केला आहे.

(३) नामे

आडखर्च (१–२४) : किरकोळ खर्च आनुषंगिक खर्च.

आडवेळ (१–१४३) : अनुचित, भलतीच वेळ, कामाची नव्हे अशी वेळ, फुरसतीची वेळ.

आलापाला (१–१५८) : जाडेभरडे गरीबाऊ जेवण, गरिबाची मीठभाकरी.

काळवे (१–३८०) : संध्याकाळच्या प्रारंभी पसरणारा अर्धवट अंधार.

ताकतई (१–८६०) : ताकाला फोडणी देऊन केलेले कालवण.

ताडवाजी (१–८६३) : भरमसाट तर्क.

तांडव (१–८६३) : एखाद्या क्षुल्लक गोष्टीचा बोभाटा किंवा गरगशा.

तांबडसांज (१–८६८) : सूर्यास्तानंतरची पण रात्रीच्या पूर्वीची वेळ.

तारोळा (२–८७२) : चालू कामात अडथळा, घोटाळा, गोंधळ, दुर्दशा.

तितुर (१–८७९) : भांडे, वस्त्र इत्यादींना पडलेले बारीक छिद्र किंवा भोक.

तिरगी(घी)मिरगी(घी) (१-८८१) : अरेतुरे करून केलेले भांडण.
तीड (१-८८५) : मित्रामित्रांच्या मनात एकमेकाविषयी उत्पन्न होणारा वेवनाव.
तीर्थकाक (९-८८६) : अत्यंत लोभी माणूस.
त्रेसष्टी (१-९१०) पती व पत्नी, मित्रमित्र, सेव्य व सेवक यांचा पूर्ण सलोखा.
थाकी (१-९१४) : एखाद्या माणसाची बोलण्याची, चालण्यांची किंवा हसण्याची पद्धत.
थेट खरेदी (१-९१८) : पदार्थ बनविला जातो त्याच ठिकाणी केलेली खरेदी.
थोप (१-९२०) : मुक्काम किंवा मुक्कामाची जागा (इंग्रजी stopt किंवा half)
दगडघाशी (१-९२२) : कोणतेही कष्टाचे किंवा जिकिरीचे काम.
ददाची विद्या / बाराखडी (१-९२७) : देण्याची प्रवृत्ती, दानत, औदार्य.
घघाची विद्या / बाराखडी (१-५९४) : घेण्याची प्रवृत्ती; दुसऱ्याची वस्तू लाटण्याची कुशलता.
दरठरोती (१-९३१) : दर, भाव ठरविणे, भावाचा ठराव करणे.
दंश (१-९३७) : ग्रंथातील कठिण किंवा दुर्बोध भाग; भाषणातील गूढ अभिप्राय.
दाखवणूक (१-९४१) : प्रदर्शन, मंदिर, खेळ इत्यादी दाखवणाऱ्यास द्यावयाची मजुरी किंवा बक्षिशी.
दातकस(सा)ई(१-९४७) : नेहमी अशुभ भाकिते करणारा मनुष्य.
दावण (१-९४९) : पदार्थ चेपण्यासाठी त्याच्यावर ठेवलेला जड पदार्थ (उदाहरणार्थ, पेपरवेट्).
दिलदप्त(फ्त)र(१-९५७) : अंतःकरणाची चोपडी; जीत घडलेली गोष्ट नोंदलेली असते अशी स्मृती.
धरमेळ (२-१००९) : बोलण्याच्या व वागण्याच्या सरणीतील एकरूपता.
धर्मपुरी (२-१००९) : ज्या घरात आल्यागेल्याचा चांगला आदरसत्कार होतो ते घर.
धारकशी (२-१०१६) : सक्ती, तगादा; कडकपणाची वागणूक.
धुनक / धुनूक (२-१०२१) : लोकांत अर्धवट किंवा ओझरती पसरलेली बातमी.
नजर पाहणी (२-१०३५) : एखाद्या वस्तूचा अदमास करण्यासाठी तिच्यावर टाकलेली दृष्टी.
नपड (२-१०३७) : दोन माणसांचे एकमेकांशी न पटणे.
नक्षत्रमाळ /नक्षत्रमाळा (२-१०४६) : दोरीवर, दांडीवर अस्तांव्यस्त पसरलेले व लोंबत असलेले कपडे.
नाजूक काम (२-१०५२) : लाच घेणे किंवा देणे.
नादवाद (२-१०५५) : शुष्क वादविवाद, निरर्थक काथ्याकूट.
नापूस (२-१०५६) : कोणी विचारीत नाही अशी स्थिती; कोपऱ्यात पडून राहण्याची स्थिती; उपेक्षा.
नारावारा (२-१०५९) : कामाचा निष्काळजीपणाने बोजवारा उडवणे; उडवाउडवीची उत्तरे देणे.
निरानिपटा/निरानिपटारा /निरानिस्तरा (२-१०७९) : समाप्त केलेल्या कामावर शेवटचा सफाईचा हात फिरवणे; कामासाठी आणलेली साधनसामग्री जागच्या जागी ठेवणे; संपवलेले काम पुन्हा काळजीपूर्वक तपासून त्यात चुका असल्यास त्या दुरुस्त करणे.

असे आणखी शेकडो 'अर्थगुरू' शब्द उद्धृत करता येतील. काही विशेषणांचा विचार करू,

(४) विशेषणे

अखोड (१-७) : अव्यंग, निर्दोष, ज्यात दोष काढावयास जागा नाही असे.
तातडसार (१-८६५) : जो नेहमी घाईत असतो तो, लगबग्या.
तिपिकी /तिफसली (१-८८०) एका वर्षात तीन पिके देणारी जमीन किंवा शेत.

त्रेपन्नी (१–९१०) : अत्यंत वात्रट किंवा लफंगा माणूस.
थर (१–९१३) : अमुक ठिकाणचा, प्रकारचा, जातीचा, वर्गाचा किंवा तऱ्हेचा (उदा. पुणेथर, मुंबईथर, नागपूरथर इत्यादी)
दर्यागर्क (१–९३४) : समुद्रात बुडून मेलेला मनुष्य वा प्राणी; समुद्राच्या पाण्याने वाहून गेलेले शेत किंवा गाव.
दाळपिठिया (१–९५५) : गरीब; अतिशय सौम्य स्वभावाचा मनुष्य.
दिक्कतखोर (१–९५५) : जे बाजारात चालेल किंवा नाही अशी शंका ज्याच्या संबंधाने येते असे नाणे.
देखदुखी/देखदुख्या (१–९८२) : दुसऱ्याचे चांगले पाहून ज्याला दु:ख होते. असा मनुष्य, मत्सरी माणूस.
देखणाऊ (१–९८३) : केवळ दिसण्यात सुंदर पण वस्तुत: भिकार किंवा नादान.
देठसुटा (१–९८४) : गळून किंवा तुटून पडण्याच्या स्थितीतील फूल किंवा फळ.
धडकफडक (२–१००१) : साधा; मनात येईल ते कोणाची भीडभाड न ठेवता बोलणारा माणूस
धालाधाकटा (२–१०१८) : लहान–आटोपशीर; गोंडस–सुंदर; ठेंगणाठुसका.
धोरणशुद्ध (२–१०२९) : नीट विचार करून केलेले; समजसपणाचे भाषण / लेखन.
नकळा (२–१०३२) : मूर्ख, अडाणी; अज्ञात, ठाऊक नसलेला; ज्याला एखादी गोष्ट कळलेली नाही असा.
नजरबाज (२–१०३५) : सूक्ष्म नजरेने वस्तूचे निरीक्षण करण्यात कुशल.
नवघड (२–१०४१) : नवीन बनविलेला किंवा घडविलेला.
नादखोर (२–१०५५) : नादाला लागलेला; पिच्छा पुरवून सतावणारा; आपल्या तंत्राने चालावयास लावणारा.
निघोर/निघोरी (२–१०६७) : निश्चिन्त, विवंचनारहित, काळजी नसलेला.
पद्महस्त / पद्महस्ती (२–११२६) : ज्याला सर्व कामात यश मिळते असा, ज्याचा हातगुण चांगला आहे असा.

(५) **क्रियापदे**

आचंवणे (अकर्मक १ / १३९) : अचंबा पावणे आश्चर्यचकित होणे.
तातडणे (अ. १–८६५) : घाई लागलेल्या स्थितीत असणे; पैसा इत्यादी पदार्थासाठी नडलेले किंवा खोळंबलेले असणे.
तुरवुरणे (अ. १–८९२) : झाडे टवटवीत दिसणे; नव्या पालवीमुळे सतेज दिसणे; धुमारे फुटणे.
तोलणे (अ. १–९०६) : कलणे किंवा झुकणे (उदा. खांब तोलला आहे); विशिष्ट पदार्थाकडे मन आकृष्ट होणे; झेपणे (मला ते काम तोलणार नाही).
थिजवणे (स. १–९१८) : एखाद्याचा उत्साहभंग करणे; एखाद्याला मनाने खचवणे.
थोडकावणे (अ. १–९१९) : कमी होणे, आटणे (विहिरीचे पाणी थोडकावले); उणा होणे (व्यापारधंदा थोडकावला).
दगदगणे (अ. १–९२२) : काही जिकिरीच्या कामामुळे बेजार होऊन जाणे.
दांडारणे (अ. १–९४३) अतिश्रमामुळे किंवा थंडीमुळे गात्रे ताठ होणे.
दुकाळणे (अ. १–९६५) : एखादी वस्तू दुर्मिळ किंवा महाग होणे.
दुपरतणे (अ. १–९७०) : शमलेले दुखणे पुन्हा उद्भवणे (to relapse)
दुवाळणे (स. १–३७७) : एकदा सांगितलेली हकीकत दुसऱ्या खेपेस सांगताना थोडी बदलून सांगणे.

घरधरणे / घरघरावणे (अ. २–१००८) : आजारातून उठून पूर्वस्थितीवर येणे.
घिरणे (अ. २–१०२०) : धीर धरणे, घाई न करणे.
नवतरणे/नवतारणे (स. २–१०४१) : जुन्या वस्तूची डागडुजी करून तिला नवे रूप देणे.
नितांतणे (अ. २–१०६९) : एखाद्या वस्तूसाठी अतिशय उत्कंठित होणे.
निसळणे (स. २–१०९२) : लिहिण्यात, बोलण्यात, गाण्यात, कसरतीत प्रसिद्धी पावणे.
नेटणे (अ. २–१०९६) झटणे, खटपटणे, सर्व शक्ती खर्च करणे.
पखरणे/पखळणे (स. २–११०४) : सामानसुमान अव्यवस्थितपणे इतस्ततः टाकणे.
पणपणे (अ. २–११२१) : उत्पन्न होणे; रुजणे; जोराने वाढणे; वैभवास चढणे (हिंदीतील 'पनपना')

(६) क्रियाविशेषणे

उगामुका (१–१८२) : अगदी स्तब्ध; न बोलता; चळवळ न करता,
तारोतार (१–८७२) : खंड न पडता, न थांबता (हिंदी 'लगातार' सदृश)
तिसाला (१–८८५) : एकापुढे एक तीन वर्षे.
तिळातिळाने (१–८८७) : अगदी थोडचा प्रमाणात, लक्षात येणार. नाही अशा वेगाने वाढणे, रोड होणे किंवा अशक्त होणे.
तुरुंब (१–८९३) : काठोकाठ (उदा. भांडचात पाणी तुरुंब भरले).
त्रिकाळी (१–९०९) : दुपारची वेळ फार टळून गेल्यावर; उशीरा.
दाढभर (१–९४४) : तृप्ती होईल इतक्या विपुल प्रमाणात.
दुपारीतिपारी (१–९७१) : मध्यान्हाच्या सुमारास; भलत्याच वेळी.
दोरीसूत (१–९९२) : अगदी सरळ रेषेत; मध्ये वळणे न घेता.
धवधवीत (२–१०११) : गडद (उदा. पिवळा, पांढरा, गोरा इ.)
धशाफशा / धशीफशी (२१०११) : निष्काळजीपणाने; अव्यवस्थित रीतीने.
धारबोळ (२–१०१७) : काठोकाठ (उदा. भाण्डे दुधाने धारबोळ भरले)
धुमा(वा)धार(२–१०२३, १०२४) : जोराने, मोठचा धारांनी, संतत (तुळा : हिंदी धुआँधार)
निक्षाडून (२–१०६८) : स्पष्ट शब्दांनी उत्तर देणे; भीडभाड न धरता स्पष्ट शब्दांनी नकारात्मक उत्तर देणे.
निपट (२–१०७२) : अगदी, सर्वथैव, पूर्णपणे (उदा. निपट वेंधळा, इ.).
निस्तूक (२–१०९२–९३) : पूर्णपणे (उदा. पाऊस निस्तूक थांबला); (फक्त, केवळ (निस्तूक वैदिक); अट्टल, पक्का (निस्तूक भामटा)
नीटवीट (२–१०९४) : उघड उघड; तक्रारीला जागा न राहता (मी तुमचे नीटवीट पाचशे रुपये देणे लागतो)
पत्रदर्शनो (२–११२२) : पत्र पाहताच; पत्र हातात पडताच.

प्रातिपदिकांप्रमाणेच काही वाक्प्रचारांचा व म्हणींचाही पुनरुद्धार करण्यासारखा आहे. परंतु लेखाचा विस्तार होऊ नये यासाठी त्यांचा विचार करीत नाही.

(७) वरील शब्दांचे विश्लेषण केले असता असे ध्यानात येते की, ह्या शब्दांत ते-ते अर्थ व्यक्त करण्याची तर क्षमता आहेच पण त्याशिवाय त्यांत आणखीही काही वैशिष्टचे आहेत. उदाहरणार्थ, आडवेळ, आलापाला, काळवे, तांबडसांज, दाखवणूक, नजरपाहणी, नापूस, दर्यागर्क, देखणाऊ, नजरवाज, तातडणे, उगामुका, धारबोळ इत्यादी शब्द स्वेतर अर्थाची व्यावृत्ती करून फक्त स्वार्थ व स्वार्थच व्यक्त करणारे आहेत. ते जणू mot juste ह्या प्रकारात मोडतात. आलापाला, तिरगीमिरगी,

ददाची किंवा घघाची बाराखडी, नादवाद, नारावारा, देखदुखी, तुरबुरणे, दुपारीतिपारी इत्यादी शब्दांतील अनुप्रासामुळे त्यांच्यात श्रुतिसुभगता जाणवते. ताकतई, तीड, धर्मपुरी, नपड, तातडसार; घोरणशुद्ध, दुवाळणे, धिरणे, नितांतणे, दोरीसूत, पत्रदर्शनी इत्यादी शब्द सुटसुटीत असून विस्तार टाळण्यास उपयुक्त आहेत. तांडव, तांबडसांज, तीर्थकाक, दगडघाशी, नक्षत्रमाळा, देठसुटा, दांडारणे इत्यादी शब्द समर्पक अर्थ व्यक्त करणारे असून शिवाय चित्रमय आहेत. तारोळा, त्रेसष्टी, थाकी, दाखवणूक, निरानिपटा, थर, नादखोर, तोलणे, थोडकावणे, निसळणे, तिसाला, तिळातिळाने इत्यादी शब्द बहुकार्यक्षम आहेत, कारण त्यांत अर्थाच्या विविध बारीकबारीक छटा व्यक्त करण्याचे सामर्थ्य आहे. थोप, दावण, दुपरतणे धरधरणे /धरधरावणे, नवतरणे हे शब्द इंग्रजीतील अनुक्रमे stop, paper weight, relapse, to convalesce, renovate इत्यादी शब्दांचे अर्थ तितक्याच प्रभावीपणे व्यक्त करणारे आहेत. अर्थात मराठी भाषेतील भाषण–लेखनातील ह्या इंग्रजी शब्दांची जागा वरील मराठी शब्द तोलामोलाने भरून काढू शकतात. हाच न्याय, पणपणे, तारोतार, धुमाधार ह्या शब्दांनाही लागू पडतो. 'नाजूक काम'–सारखी शब्दजोडी अनिष्टपरिहार सहजतया करणारी आहे तर 'दिलदप्तरा'त मनमोहक रूपकगर्भता आहे. दंश, धुनक, नादवाद, त्रेपन्नी, दाळपिठिया, नवघड, पद्महस्त, तुरबुरणे, दाढभर, धारबोळ इत्यादी शब्द अंगभूत नावीन्यामुळे कोणत्याही वक्त्याला वा लेखकाला लीलया आकृष्ट करणारे आहेत. मराठी भाषा बोलणारांनी व लिहिणारांनी, विशेषत: ललित साहित्यिकांनी, शब्दकोशाचा साक्षेपाने अभ्यास करून वरीलसारखे शेकडो शब्द शोधून काढले व त्यांचा वापर पुन्हा आपल्या बोलण्या–लिहिण्यात सुरू केला तर लेखारंभी वर्णिलेली मराठी भाषेची मरगळ झांझडली जाऊन शिवाय, मराठी भाषेत टवटवी उत्पन्न होईल. ह्या प्रक्रियेच्या दरम्यान काही भाषक किंवा लेखक वरीलसारख्या शब्दांत पदरच्या काही छटा मिसळतील, त्यांयोगे त्या शब्दांना अधिकचे पैलू पडतील. ही घटना भाषेच्या नैसर्गिक प्रवृत्तीचा विचार करता स्वागतार्हच म्हणावी लागेल. भावी शब्दकोशकाराला अशा शब्दांच्या नोंदी, त्यांना चिकटलेल्या नव्या अर्थच्छटांसह, कराव्या लागतील.

आज मराठी भाषेवर हिंदी व इंग्रजी भाषांचा खूप 'असर' (!) पडत आहे. मुंबई–पुण्यासारख्या औद्योगिक महानगरांतील मराठी भाषकाची भाषा हिंगाडी बनत चालली आहे. त्या भाषकाला मराठीच्या सौष्ठवाकडे व रसरशीतपणाकडे लक्ष द्यावयास फुरसत नाही अशी वस्तुस्थिती आहे. इंग्रजी माध्यमाच्या व त्यातल्या त्यात कॉन्व्हेण्टच्या शाळांमधून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याला इंग्रजी हीच जणू स्वभाषा वाटत आहे. तो मराठी भाषेच्या संस्कारापासून व वापरापासून दूर–दूर सरकत आहे. विद्यापीठ स्तरावरील संशोधनात्मक लेखनामध्येही भाषांगाची प्राय: उपेक्षाच होत आहे. एकंदरीने मराठी भाषेला 'आतले' व 'बाहेरचे' असे बरेच शत्रू सध्या आहेत. हे सगळे ठाऊक असूनही मराठी भाषेच्या प्रेमापोटी आणि मराठी भाषा आणखी शेकडो वर्षे जिवंत राहील ह्या दुर्दम्य विश्वासापोटी जुन्या मराठी शब्दांचे पुनरुज्जीवन करून मराठी भाषेला 'नव्हाळी' प्राप्त करून द्यावी, अशी भूमिका प्रस्तुत लेखात मांडली आहे. तिची योग्यायोग्यता तज्ज्ञांनी परीक्षापूर्वक ठरवावी.

■

मराठी विभाग
बनारस हिंदू विद्यापीठ
वाराणसी

'श्रीऋद्धिपूर माहात्म्या'चे निमित्ताने

वि. बा. प्रभुदेसाई

श्री. ज. शा. देशपांडे यांच्या मराठीच्या संशोधन-संपादन क्षेत्रातील आतापर्यंतच्या स्पृहणीय कामगिरीचा नव्याने परिचय करून देण्याची आवश्यकता आहे असे नाही. श्री. देशपांडे यांनी साक्षेपाने संपादिलेल्या 'प्राचीन मराठी कविता' या मालेतील पहिला खंड-'विठ्ठल कळपूरकरकृत रासक्रीडा, चोंभाचे उषाहरण' इ. १९६२ साली प्रसिद्ध झाला, त्यानंतर, दुसरा खंड 'नामा पाठकांची स्फुट कविता' १९६४ साली; तिसरा खंड 'कृष्णदासांची बाळक्रीडा व विष्णुदासनाम्याची चक्रव्यूह कथा' चौथा खंड हयग्रीवाचार्यांचा गद्यराज' पाचवा खंड 'नामदेवाची स्फुट आख्याने' हे तीन्ही खंड १९६६ साली; खंड सहावा 'नृसिंहकृत रुक्मिणी स्वयंवर' १९६८ साली खंड सातवा 'नामा पाठकांचा अश्वमेध' १९७३ साली आणि खंड आठवा 'कृष्णदास दामाचे आदिपर्व' हा १९७९ साली मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाने प्रकाशित केले. श्री. देशपांडे यांनी संपादित केलेल्या 'नवे नवनीत' अद्ययावत् काव्यवेच्यांची दुसरी आवृत्ती १९७३ साली तर त्यांनीच संपादित केलेला स्वातंत्र्य शाहीर कुंजविहारी यांच्या निवडक कवितेचा 'आहुती' हा काव्यसंग्रह १९७२ साली प्रकाशित झाला आहे. प्राचीन व अर्वाचीन मराठी काव्यक्षेत्रातील संशोधन संपादनाचा श्री. देशपांडे यांचा अधिकार सिद्ध करायला एवढा तपशील पुरेसा आहे.

श्री. ए. व्ही सुब्रम्हण्यम् यांच्या तामीळ वाङ्मयविषयक 'Sips from the Sangam Cup' या इंग्रजी पुस्तकाचा श्री. वि. वा. जोग यांच्या सहकार्याने श्री. ज. शा. देशपांडे यांनी केलेला 'तामिळनाडचे संगमकालीन सुवर्णयुग' हा १९७५ साली प्रकाशित झालेला ग्रंथही अत्यंत वैशिष्टयपूर्ण असाच आहे. 'संगम्' हा तामिळ शब्द संस्कृतातील 'संघ' शब्दावरून तयार झाला. हे संगम वाङ्मय ख्रिस्तपूर्व पाचव्या सहाव्या शतकापासून निर्माण झालेले असून कविमंडळाने मान्य केलेले काव्य म्हणून 'संगम्' हे नाव पडले. कला व जीवन यांचा उत्कृष्ट मेळ साधणाऱ्या संगम् काव्यात जीवनानुभवाचे सारच अशी सुभाषिते कशी आढळतात ते पाहा.

१. "एका दृष्टीने सुख हे भूतकालाच्या चिंतनावर आधारलेले असते." २. "अत्यंत तीव्र बुद्धीची माणसे साधारणत: धनार्जनाच्या मागे नसतात. ३. "इतिहासाच्या तेजस्वी कालखंडात उच्च कलाकृतींचा जन्म होतो." ४. "संकटकालीच तो वीरवृत्तीने वागतो असे नसून सदासर्वकाळ त्याची वागणूक धीरोदात्त असते." ५. "जे राजे विचारवंत नसतात ते भरमसाट कर लादून देशाला पिळून काढून क्षयरोग्यासारखी त्याची अवस्था करतात. करांनी ठराविक मर्यादा ओलांडल्यानंतर सोन्याची अंडी घालणाऱ्या कोंबडीप्रमाणे प्रजेची अवस्था होऊन राजा व प्रजा दोन्ही विनाशाच्या दिशेने वाटचाल करतात." अशा प्रकारे श्री. ज. शा. देशपांडे यांच्या चोखंदळ उद्योगामुळेच तामिळनाडच्या सुरस अशा संगमसाहित्याचा आस्वाद मराठी वाचकांना घेता आला. संपादनाचा असा अत्यंत समृद्ध अनुभव गाठीशी असलेल्या ज्ञानवृद्ध अशा श्री. ज. शा. देशपांडे यांनी श्री.

कृष्णदास महानुभाव यांच्या सहकार्याने संपादित केलेले 'महेश्वर पंडितांचे श्रीऋद्धिपूरमाहात्म्य' हे काव्य १९८५ साली प्रकाशित झाले आहे. महेश्वर पंडित हा महानुभाव पंथातील आद्य आचार्य नागदेवाचार्य यांचा ज्येष्ठ पुत्र असून वडील नागदेवाचार्य हेच त्याचे दीक्षागुरूही होते.

महेश्वर पंडिताच्या ग्रंथरचनेविषयीचा तपशील असा आहे :-

"(१) ऋद्धिपूर माहात्म्य. इ. स. १३०२ मध्ये रचलेला ८२५ ओव्यांचा ग्रंथ. (२) निर्वेदस्तोत्र. (३) संकटस्तोत्र." [मराठी वाङ्मयकोश : प्राचीन खंड, नागपूर विद्यापीठ प्रकाशन, नागपूर १९७४, पृ. ११७] श्री. गं. दे. खानोलकर-संपादित, मराठी वाङ्मयकोश; खंड पहिला, (मराठी ग्रंथकार इ. स. १०५०-१८५७) मुंबई, १९७७ या ग्रंथात (पृ. २४३) महेश्वर पंडिताच्या या काव्यरचनांविषयी आणखी माहिती दिली आहे ती पुढीलप्रमाणे :-

"त्यांनी रचलेली निर्वेदस्तोत्र व संकटस्तोत्र ही स्तोत्रे महानुभावांच्या नित्य पठणात आहेत. त्यांनी ऋद्धिपूरमाहात्म्य हा काव्यग्रंथ लिहिला आहे. ऋद्धिपूर हे महानुभावांचे महाक्षेत्र असल्यामुळे अनेक महानुभाव कवींनी त्याचे स्थलमाहात्म्य आपल्या रचनांतून वर्णिले आहे. कृष्णमुनि ऊर्फ कवि डिंभ, नारायणव्यास बहाळिये ह्या कवींची ह्याच विषयावरील रचना उपलब्ध आहे. महेश्वर पंडितांच्या प्रस्तुत रचनेतही विशिष्ट धार्मिक भावनेचा आढळ होतो. ग्रंथात सुरुवातीला चक्रधरांना व नागदेवाचार्यांना वंदन केलेले आहे. ज्ञानदेवांच्या शैलीचे वेधक वळण पंडितांनी गिरविले आहे. पहा : 'जी उमलेनि पसायदाने । ऋद्धिपूर माहात्म्य अनुसंधाने । वोवुनि पुराण प्रवंधरत्ने । पदी प्रमेयाचा ।। परि हे देवाचे स्तवन । सलगी केले अनुवादन । ते उपसाहावे तुम्ही संतजन । म्हणे महेश्वरू ।।" इत्यादी काव्यरचना प्रौढ स्वरूपाची आहे."

महेश्वर पंडिताच्या अशा या ऐतिहासिक दृष्टीने महत्त्वाच्या काव्याची अनेक हस्तलिखिते प्रयत्नपूर्वक मिळवून ज. शा. देशपांडे यांनी त्याचे साक्षेपपूर्वक संपादन केले आहे. 'ऋद्धिपूर-माहात्म्या'च्या ऋद्धिपूर प्रतीत ८२७ ओव्या व दहा 'प्रसंग' असले तरी त्यातील सहाव्या ओवी-पासूनच सुरू होणारा दुसरा प्रसंग संपादकांनी कमी केल्यामुळे आता अन्य काही प्रतींप्रमाणेच या प्रकाशित काव्यातील एकूण 'प्रसंग' नऊ आहेत. या काव्याचा लेखनकाल शके १२२४ असून महेश्वर पंडित हे साधारणतः त्यावेळी तीस एक वयाचे असावेत असे दिसते. काव्यारंभी पहिल्या 'प्रसंगा'त श्रीचक्रधर स्वामींना नागदेवाचार्यांना संतमहंताना आणि श्रोत्यांना वंदन आहे. दुसऱ्या 'प्रसंगा'त ऋद्धिपूरमहिमा व श्रीगोविंदप्रभुलीला; तिसऱ्या 'प्रसंगा'त श्रीकृष्णकथा; चौथ्या 'प्रसंगा'त ऋचीक व परशुराम यांच्या कथा; पाचव्या 'प्रसंगा'त श्रीगोविंदप्रभुचरित्र; सहाव्या व सातव्या 'प्रसंगां'मधे ज्ञाननिरूपण; व आठव्या 'प्रसंगा'त श्रीकृष्णदर्शन आणि शेवटी नवव्या 'प्रसंगा'त श्रीकृष्णमूर्तिवर्णन व गुरुप्रशस्ती आहे. या काव्याच्या एका प्रतीत ज्ञानेश्वरांचा स्पष्ट निर्देश असून महेश्वर पंडितासमोर ज्ञानेश्वरी होती हे निर्विवाद सिद्ध होते. आठव्या 'प्रसंगा'तील पुढील ओवीकडे यादृष्टीने लक्ष वेधायला हवे:-

"धरुनी ज्ञानदेव कृताचा संगु : टाकिला ईश्वरकृत मार्गु : मग बहुत मांडिला उपसर्गु : जयाचेनि-बळें ।।६७७।। ओवी क्रमांक ९२ मधील 'मुंगील पासोनि वोळखत मनोगताते' हा भाग ज्ञानेश्वरीमधील 'मनोगत वोळख । मुंगियेचे (अ. ६-६२९) याचे रूपांतर वाटते. तसेच 'वर्णितां वोलीं नागरीं : जे मुक्तिदायक सुंदरी-६३२ आणि "सदैवा आणी पायाळासी : जरी अंजन मिळे नेत्रांसी: तरी निधी दिसतीं तयासी: दृष्टीपुढें ।।८०६।। या ओव्यांचे साम्य ज्ञानेश्वरीतील पुढील ओवीशी कसे आहे पाहा:- जैसे डोळेया अंजन भेटे । तेव्हेळी दृष्टीसी पाटा फुटे । मग वास पाहिजे तेथ प्रगटे । महानिधी "-अ. १-२३. व्युत्पन्न अशा महेश्वरपंडिताचे हे भक्तिरसाचा परिपोष करणारे काव्य रसिकांना अभ्यसनीय वाटेल.

संपादकांनी संपादित संहितेच्या शेवटी अत्यंत परिश्रमपूर्वक जोडलेल्या विविध 'परिशिष्टां'मध्ये स्पष्टीकरणात्मक टीपा, शब्दकोष, व्यक्तिसूची, स्थलसूची, काही पाठांची माहिती, संदर्भ आणि संक्षेप दिल्यामुळे ग्रंथाची उपयुक्तता वाढली आहे. श्री. ज. शा. देशपांडे यांनी 'प्राचीन मराठी कविता' खंड आठवा या कृष्णदासदामाच्या आदिपर्वाला १९७८ साली लिहिलेल्या 'प्रस्तावने'त (पृ. १२) महेश्वर पंडिताचे ऋद्धिपूर माहात्म्य लवकरच प्रकाशित करण्याची जी आशा व्यक्त केली होती, ती आता १९८७ साली 'अभिनव प्रकाशना'चे श्री. वा. वि. भट यांच्या सहकार्यामुळेच फलद्रूप झाली याबद्दल त्यांनाही धन्यवाद द्यायला हवेत. ■

साभार पोच

दिवा कुणाचा तेवत राही / संध्या कर्णिक / श्रीविद्याप्रकाशन, पुणे / पृ. ११० / रु. ४०

मनमातीचे / मनिषा पिंपळापुरे / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / पृ. ५६ / रु. २७–५०

स्वस्ति / वा. ज्यो. देशपांडे / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / पृ. ६७ / रु. २७–५०

आमचा महाराष्ट्र / संपा. पन्नालाल खुराणा व किशोर वेडकी / श्री विद्या प्रकाशन, पुणे / पृ. ३६६ रु. १००/–

क्रान्तिप्रेरणा / डॉ. बाबासाहेब आंबेडकर / डॉ. योगेंद्र मेश्राम / पारमिता साहित्य चळवळ प्रकाशन, नागपूर / पृ. ७२ / रु. १८ /–

पूर्वेची प्रभा / राम शेवाळकर / प्रतिमा प्रकाशन, पुणे / पृ. ९१ / रु. ३०

वाग्विलास / कवि मोरया / संपा. डॉ. वा. के. लेले / पृ. १२१ / रु. २५

धवावा लोटल्या धारा / शं. श्री. वाशीकर / वाग्विलास प्रकाशन अमरावती / पृ. २२ / रु.

अबला होई प्रबला / चंपा लिमये / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / पृ. १४३ / रु. ४० /–

हिमगंध / दि. वि. चित्रे / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / पृ. ८४ / रु. ५० /–

ओंजळ / वि. य. चव्हाण / शोभा विष्णू चव्हाण, माझगांव; मुंबई / पृ. ४१ / रु. १० /–

इये संताचिये नगरी / सौ. सुहास वाळ देव / वसुधा प्रकाशन, नागपूर / पृ. १२० / रु. ३० /–

काळागुलाब / विश्वास वसेकर / नवल पब्लिकेशन, सेलू / पृ. ७१ / रु. २०/–

' वऱ्हाड समाचार : एक दृष्टिक्षेप

पुष्पा लिमये

'महाराज आपण आपल्या पत्राद्वारे गरिबांची दाद लावण्याविषयी व त्यास ज्या गोष्टीने सुख होईल ती करण्याविषयी मनापासून झटता अशी आपली कीर्ती ऐकून पुढील चार ओळी आपलेकडे पाठविल्या आहेत, तर त्यास कृपा करून जागा द्यावी.

—आम्हा जळचरांस जीवन काय ते पाणी हे आपणास माहीत आहे. सांप्रत मोरणा नदीत पाणी पाहिले असता गुडघ्याला देखील लागणार नाही. बरे आता पाणी आहे, त्याची तरी व्यवस्था चांगली चांगली राहिली आहे काय ?' जनावरे धुणे, म्हशी डुंबणे, कपडे धुणे, केरकचरा टाकणे यांनी पाणी खराब झाल्याचे सांगून पुढे म्हटले आहे 'टाऊन हॉल बांधणे. सडका करणे, शहरात स्वच्छता राखणे धर्मशाळा उभारणे वगैरे जी लोकोपयोगी कामे म्हणता त्यात नदीला धरण बांधून पाणी स्वच्छ राखणे हे कलम नाही काय ?"

नद्यांच्या पाणी-प्रदूषणाचा प्रश्न आजच्या काळातही भेडसावणारा—आजची त्याची कारणे निराळी असली तरी—मोरणा नदीच्या परिसरात राहणाऱ्या कोणा एकाला तो शंभर वर्षांपेक्षाही अधिक पूर्वी जाणवला होता. वरील नाट्यपूर्ण पत्र जलचरांच्या कोणा कैवाऱ्याने 'एक नदीतील मासा, दहीहंडा वेस' या नावाने लिहिलेले आहे. (११ ऑगस्ट १८७४)

असेच एक रूपकात्मक पत्र २६ जुलै १८७४ च्या अंकात पाहावयास मिळते. 'मनुष्यमात्रास आवश्यक दोन बंधु' या शीर्षकाचे हे पत्र आहे. 'परमात्म्याने आम्हा दोघा बंधूस उत्पन्न करून प्रत्येक प्राण्याच्या तसेच जीवजंतु श्वापदे यांच्या हरवखत उपयोगी पडावे म्हणून आज्ञा केली... आम्ही उभयता बंधु अगदी शेजारी असताही आम्हा परस्परांची भेट होत नाही. आम्हा उभयतामध्ये एक लहानशी भिंत आडवी आल्याने परस्पर भेटीचा योग घडणे महादुर्घट गोष्ट आहे...भिंत पाडावी तर तशी भिंत पुन्हा न बनून घर विद्रूप दिसणार; त्यामुळे आमच्या मनात आलेली भेटीची इच्छा निर्फल होते.' हे आपले दुःख सांगून हा 'देशहितेच्छू' पत्रलेखक पुढे म्हणतो. 'तथापि जनहिताविषयी उचललेला विडा ग्रहण करून असलेले दुःख एकीकडे ठेवून बंधुवर्गास विनंतीने सुचवितो की, कितीही संकट आले तरी पत्करून एकमेकांनी एकमेकांशी साह्य करावे यात देशाचे हित लौकिक का होणार नाही ? होईलच होईल. मग मागे का सरता ?'

देशहितेच्छूप्रमाणेच वाशिमच्या कोणा 'लोकहितेच्छू'च्या ४ ऑगस्ट १८७३ च्या पत्रात तेथील पाऊस पाण्याची खबर देऊन म्युनसिपल कमिटीच्या सेक्रेटरीच्या निवडीबद्दल गावकरी नाराज असून 'कित्येक कमिटीतून आपली नावे काढून घेण्याविषयी अर्ज करणार असे ऐकतो. असे जर खरेच असेल तर फारच आश्चर्याची गोष्ट !! या पंचास आम्ही असे सुचवितो की त्यांनी आपली नावे न काढता उलट सेक्रेटरी यांजला नेहमी मदत देऊन कोणत्या तरी रीतीने मुख्य कमिटीचा उद्देश

जो शहर सुधारणेचा व लोकांस सुख देण्याचा तो सिद्धीला न्यावा, ते असे न करतील तर आपल्याच पायावर धोंडा पाडून घेतील ' असा हितकर व सबुरीचा सल्लाही दिलेला दिसतो, एकुणच हा 'लोकहितेच्छू' पत्रलेखक लोकहिताबद्दल जागरूक दिसतो, आणि सहृदय स्पष्टवक्ताही ! आपल्या पत्रात तो पुढील स्थानिक वृत्तही कळवितो 'येथे एक कथेकरी आले आहेत. कथा बरीच चांगली करत असून संस्कृतचा अभ्यास त्यांनी बराच केला आहे... ' आणि यावर तो जे भाष्य करतो ते अधिक महत्त्वाचे ! तो पुढे म्हणतो, 'हे कथेकरी बुवा आपले अति वृद्ध तीर्थरूपास कथेचे वेळी आपले मागे उभे करतात हे फार गैर दिसते. कारण त्या वृद्ध माणसाला सर्व कथा होईपावेतो उभे राहून टाळ वाजविण्याचे व म्हणण्याचे फारच श्रम पडतात. यांजकरिता बुवांनी आपले तीर्थरूपास मागे उभे न करिता त्यास श्रेष्ठ मंडळीत पुढे बसवीत जावे, यात त्यांनी आपला पुत्रधर्म पाळल्यासारखे होईल."

एका अकोलेवासी 'ग्रामस्था 'ने अकोले शहरातील खंडेराव माधव देशपांडे यांचे येथे एक देवी आहे. तिची थोडी हकीकत आपणास कळवितो त्यावरून देवाचा पैशाचा खातेपिते लोकही कसा अभिलाष करतात ते तुमच्या वाचकास समजेल ' असे म्हणून भाऊबंदांच्या हक्कातून देवीचे नवरात्र, उत्सव, पूजा, नंदादीप इत्यादीसाठी तीनशे रुपये काढूनही या खर्चाची वहिवाट असणारे 'रामराव देवीचा सर्व पैसा देवीच्या कामाकडे लावत नाहीत हे फार गैर आहे. रामराव यास दुसरे उत्पन्न कमी आहे. असे नाही. शिवाय ते प्रतिष्ठित देशपांडे, ब्राह्मण व श्रीजगदंबा त्यांचे कुलदैवत असून आणि सर्व भाऊबंदांचा समाईक पैसा असून तो देवीच्या कामी न लावता त्यात प्रतारणा करावी हे त्यास परम निंद्य होय असे मला वाटते.' (१४ सप्टें. १८७३) काहीसे व्यक्तिगत स्वरूपाचे हे पत्र, पण त्यालाही सार्वजनिक प्रसिद्धी लाभली आहे.

आणखी एक असेच पत्र, पत्रकर्त्याने 'प्रथमपुरुषी पत्र लिहिले आहे. तरी मूलतः ते तसेच असेल असे नाही. लेखन अधिक चटकदार उतरण्यासाठी घेतलेले ते अवगुंठन असावे असेच एकूण पत्रलेखनाच्या स्वरूपावरून वाटत राहते. 'आपण सर्वांच्या शंका निवारणकर्ते आहात व अज्ञान दूर करून खरा मार्ग दाखविणारे आहात ' असे गौरवात्मक प्रास्ताविक करून पत्रलेखक म्हणतो, 'आमचे गावात एक महातपस्वी वृद्ध तुळशीमाळा व पावशेर गोपीचंदन याणी सुशोभित झालेले असे प्रसिद्ध साधु आले आहेत. त्यांनी आपले नादास बरेच लोकांस लाविले आहे. त्यात स्त्रिया तर अतिशय नादी लागून बोवांच्या शिष्यिणी बनल्या आहेत आणि रात्रंदिवस सेवेस तत्पर असतात' ही माहिती देऊन 'आपली स्त्री परम भाविक व मुमुक्षु असल्याने व आपण काही अंशी तिच्या अधीन' असल्यामुळे तिला उपदेश घेण्यास मान्यता दिली. तिचा व तिच्या गुरूंचा आग्रह मीही उपदेश घ्यावा. पण त्यामुळे बहीणभावाचे नाते होईल. तेव्हा याबाबत मार्गदर्शन. खुलासा करावा अशी 'एका-शंकिता 'ने १२ जुलै १८७४ च्या अंकात विनंती केली आहे.

'अहो एडिटरराव जागे व्हा. निजलात काय ? चांगले स्वच्छ पौर्णिमेचे चांदणे पडले आहे. ते अवलोकन करा. मी आपला वटवाघूळ स्वप्न सांगण्यास आलो आहे. इकडे अवधान ठेवून माझे स्वप्नाचा उलगडा करा.' असे म्हणून पुढे एक अफलातून सुरस चमत्कारिक स्वप्न सांगितले आहे. 'एलिचपूरच्या नबाबाच्या वाड्याच्या पडक्या भिंतीतील वटवाघूळ' या टोपणनावाने लिहिलेले हे १४ जून १८७४ चे पत्र आहे. पडक्या मोठ्या वाड्याच्या भिंतीत एक पारव्याचा जोडा. त्यातील पारवी दुसऱ्याच एका पारव्यावर फिदा अशा प्रकारचे हे पत्र आहे. वटवाघुळाच्या या स्वप्नाचे इंगित त्या काळातील कोणा थोरामोठ्याच्या खाजगी भानगडी हे असणे शक्य. त्या काळातील वाचकांना त्याचा संदर्भ माहीत असणेही स्वाभाविक. एक तर गावाचा विस्तार—लोकसंख्या लहान, मर्यादित आणि असल्या भानगडीत लोकांनाही अधिक रस.

पुढील हे पत्रही अशाच वळणाचे, पण स्वप्नाचा आडवळणाचा मार्ग न पत्करता ते सरळ सरळ लिहिले आहे. मात्र त्याच्या एकंदर शैलीवरून सुधारणेचा खुल्या मनाने पुरस्कार करण्याऐवजी तिचा उपहास करणे तर पत्रलेखकाला अभिप्रेत नाही ना, असे पत्र वाचल्यावर वाटत राहते. पत्रलेखक आहे. 'वेताळ', प्रसिद्धी काळ आहे १६ नोव्हेंबर, १८७३, हरिभक्तपरायण यास. वि. वि. रामराम, नमस्कार, सलाम, गुडबाय वगैरेंनी तोषविले नाही म्हणून रागवू नका . . खाली लिहिलेल्या चार ओळी छापण्यास जागा द्या. देशसुधारणेच्या कामास हे एक मोठे उदाहरण प्रत्यक्ष पाहिलेले सर्वांपुढे ठेवितो हे मात्र दुसरीकडे तुम्ही फेकू नका म्हणजे झाले...

जळगाव तालुक्यातील सोनाळे गावी सालमजकुरी मी– एक नवीन सुधारणा पाहिली. ती कोणाची म्हणाल तर स्त्रियांनी पुढे हरदासासारखे उभे राहून भजन व अभंग म्हणावे व मागील वाजविणारांनी सूर द्यावा. हे पाहून फारच आनंद झाला. ही बाई कुणबी असून वय २०–२५ चे आत आहे.

'हिंदुस्थान हितेच्छुहो, सुधारणा ही विशेष समजली पाहिजे, कळावे.'

'फजितीबाईचा मृत्यु' हे आणखी एक वेगळ्या वळणाचे पत्र. 'आपला गोरेखा' या नावाने पत्रलेखकाने 'बंधूने सांगितलेली चमत्कारिक गोष्ट' कळविली आहे. एका दांपत्याची मुले जगत नसत म्हणून आपल्या मुलीचे नाव त्याने ती दीर्घायु व्हावी म्हणून 'फजिती' ठेवले. पुढे ती मुलगीही लहानपणीच मरण पावली. तिचे आईवडील शोक करू लागले. तेव्हा पत्रलेखक लिहितो. 'त्यांचे समाधानार्थ माझा बंधु म्हणाला की अहो तुम्ही इतके व्याकुळ व निराशी कशास होता तुम्हा उभयतास ईश्वराने पुष्कळ आयुष्य द्यावे. म्हणजे अशा अनेक फजित्या होतील. (१ फेब्रुवारी १८७५) मित्राचे सांत्वनपर बोलणे काहीसे विनोदी वाटावे असे असले, तरी त्याचा आधार कारुण्य आहे. 'फजिती' या श्लेषात्मक शब्दयोजनेतून लेखकाला आणखीही काही सुचवावयाचे असावे का, असाही एक प्रश्न !-

वरील सारी पत्रे दर्पण, प्रभाकर, ज्ञानप्रकाश, इंदुप्रकाश, नेटिव्ह ओपिनियन यांसारख्या पुण्या-मुंबईत गाजलेल्या कोणत्या वृत्तपत्रातील नसून 'वृत्तपत्रांचा इतिहास' वा 'मराठी नियतकालिकांचा इतिहास' यात नामोल्लेखही न आलेल्या वा नाममात्रच उल्लेख आलेल्या 'वऱ्हाड समाचार'[१] या वृत्तपत्रातील आहेत.

'वऱ्हाड समाचार हे पत्र अकोला येथे खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाड समाचार या छापखान्यात छापून प्रसिद्ध होत असे. जानेवारी १८६७ हे त्याचे आरंभ वर्ष. ते साप्ताहिक असून सुरवातीला काही वर्षे दर रविवारी व नंतर दर सोमवारी ते प्रसिद्ध होई. आरंभी त्याची वार्षिक वर्गणी 'अगाऊ' पाच रुपये, साल अखेर सात रुपये, फुटकळ अंकास चार आणे, डाक हशील वर्षाचे अगाऊ एक रुपया आठ आणे आणि साल अखेर दोन रुपये चार आणे होते. क्वचित, अधूनमधून वर्गणीदारांना वर्गणी पाठविण्याबद्दल आवाहन आढळते. एखाद्या वेळी, 'थकबाकीवर व्याज आकारले जाईल.' असेही खडसावलेले दिसते. आरंभी पृष्ठसंख्या चार असून त्यात जाहिराती आणि नोटिसा यांची गर्दी असे. प्रसंगी दीड दोन पृष्ठेही त्यासाठी खर्ची पडत. कधी त्यासाठी पुरवणी पृष्ठेही जोडली जात. या जाहिराती वऱ्हाडातील असत त्याप्रमाणेच वऱ्हाड बाहेरील मुंबई, दापोली, मुर्डी अशा लांबलांबच्याही असत. तेथपर्यंत हे वृत्तपत्र पोहोचत असले

१. 'वऱ्हाड समाचार'चे दोन अंक पाहण्यात आल्यामुळे त्याआधारे लिहिलेला शं. ना. बर्वे यांचा 'विदर्भातील पहिले वृत्तपत्र' हा लेख १३ ऑगस्ट १९७२ च्या 'केसरी'त रविवार, पुरवणी–प्रसिद्ध झालेला आहे. त्यानंतर रा. के. लेले यांच्या 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास' आ. १, १९८४ यातही 'वऱ्हाड समाचार'चा उल्लेख आलेला दिसतो.

पाहिजे याच्याच या जाहिराती म्हणजे खुणा म्हणता येतील.' वऱ्हाड समाचार ' कर्ते खंडेराव फडके वऱ्हाड समाचार सुरू करण्यापूर्वी सातारा, रत्नागिरी येथे काही काळ वृत्तपत्र चालवीत होते. त्याचेही हे फळ असू शकेल.

खंडेराव बाळाजी यांच्या निधनानंतर त्यांचा मुलगा नारायण खंडेराव फडके यांनीही वडिलां-इतक्याच तडफेने हे पत्र पुढे चालविले. अखंडितपणे एक्कावन्न वर्षे चालत आलेले हे पत्र नारायण खंडेराव फडके यांना ११ मार्च १९१८ (वर्ष ५२, अंक ११) रोजी सरकारी अवकृपेमुळे बंद करावे लागले. वाचकांचा निरोप घेताना ते म्हणतात, 'इंडियन प्रेस अॅक्टचे कलम ८-(२) अन्वये स्थानिक सरकारची तारीख पाच मार्चची नोटीस आम्हाला गेल्या शुक्रवारी पोचली. 'स्थानिक' सरकारला असे वाटते की 'वऱ्हाड समाचार' पत्रातील लेखांचा कल स्थानिक सरकारसंबंधाने आणि प्रजाजनांपैकी काही वर्गासंबंधाने द्वेषभाव व तिरस्कार वृद्धि ही उत्पन्न करण्यासारखा आहे. तेव्हा या पत्राच्या संपादकांनी १५०० रुपये सरकारात चौदा दिवसात येथील जिल्हा मॅजिस्ट्रेट कोर्टात अनामत ठेवावेत. हा हुकूम अवस्त्वारोपी आहे. 'क्षमस्व' असेही आम्ही म्हटले असते पण या नोटिशीतले राजद्रोहाचे विष असह्य आहे. आमची सहकारित्वाची जुनी पेढी आहे. विचाररत्नांची व माणकांची आम्ही देवघेव करीत असतो. आमच्या पेढीच्या प्रामाणिकपणाविषयी जर सरकारास शंका येते तर लोककल्याणाच्या दृष्टीने काढलेल्या या हुकुमाचे आम्ही स्वागत करितो. काल निरवधि आहे. आमचे सुविचार, सदिच्छा व सत्क्रिया ही अबाधितपणे चालू आहे. त्यामुळे आम्ही सरकारच्या कसोटीला उतरेपर्यंत वऱ्हाड समाचार बंद करण्याचा संकल्प केलेला आहे. ईश्वरकृपेने तो पुनः चालू करण्याचाही दिवस उगवेल. भावी स्थिती परमेश्वराधीन आहे." असे म्हणून त्यांनी या निवेदनाचा समारोप केला आहे. या निवेदनाला 'मृत्युंजय' असे ठळक शीर्षक दिलेले आहे. वऱ्हाड समाचार पुन्हा सुरू होण्याचा सुदिन नंतर उगवला नाही. सरकारी वक्रदृष्टीला तो बळी पडला तो कायमचाच !

'वऱ्हाड समाचार' बाल्यावस्थेत असतानाही असाच एक खडतर प्रसंग त्याच्यावर ओढवला होता. उमरावती हायस्कूलचे युरोपियन हेडमास्तर मि. म्याकिंटाश यांच्यावर अमीरण फकीरणीची मुलगी चंदा, उमर दहा अकरा इजला दोन रात्री कोंडून ठेवून जबरी संभोग केल्याचे वृत्त देऊन 'विद्याखात्यात अशी रत्ने निपजणे ही मोठी लज्जास्पद गोष्ट होय– या साहेबांचे मूर्खपणावरून यांस हायस्कूलवरून काढून टाकावे असे किती दिवस निदर्शनास आले आहे तरी सरकार त्यास थोपून धरिते. तेव्हा पुनः पुनः ते नवे थेर नाचू लागतात. या साहेबावर पिनल कोड कलम ३७६ प्रमाणे . . . मुकदमा चालू आहे. निकाल काय होईल समजत नाही, पण बहुधा गौरवर्णाचा इन्साफ ज्या प्रमाणे होत असतो त्याप्रमाणेच हाही होईल असे सर्वसाधारण सर्व लोक समजत आहेत' असे त्यावर निर्भीड प्रतिपादनही केले आहे. (१८ फेब्रु. १८७७). पुढच्याच, २५ फेब्रु. १८७७ च्या अंकात 'मि. म्याकिंटाश साहेब जबरीच्या संभोगाच्या खटल्यात आरोपी होते. परंतु त्यावर शाबिदी न झाल्यामुळे ते दोषमुक्त होऊन सुटले गेले' हा खटल्याचा निकाल देऊन पुढे 'बिच्यारे दैववान !' असे खोचक उद्गारवाची वाक्य टाकले आहे. पुराव्याअभावी निर्दोष सुटल्यावर म्याकिंटाश साहेबांनी 'वऱ्हाड समाचार' कर्त्यांवर अब्रुनुकसानीची फिर्याद लाविली. अखेर रोख पंधराशे रुपये देऊन 'वऱ्हाड समाचार' कर्त्यांनी हे प्रकरण तडजोडीने मिटविले. तसे हे प्रकरण त्यांना फार महागात पडले, पण तरीही सच्च्या पत्रकाराच्या बाण्याला जागून त्यांनी बातमी देणाराचे नाव कळू दिले नाही. ही हकीगत त्यांनी २९ एप्रिल १८७७ च्या अंकात दिली आहे. येथे 'केसरी'च्या आरंभकाळातील कोल्हापूर प्रकरणाची आठवण मनात येते. ही हकीगत त्याही पूर्वीची आहे.

त्या काळात वृत्तपत्रांचे खास बातमीदार नेमलेले असतील अशी फारशी शक्यता नाही. पत्रलेखक हेच अनेकदा बातमीदाराचे काम करीत असत. कारण 'पत्रव्यवहार' या सदरात गावातील

आरोग्य, स्वच्छता, सभासमारंभ, हवापाणी, नवीन नेमणुका, त्याबद्दलच्या प्रतिक्रिया इत्यादींचा उल्लेख अनेक पत्रातून आलेला आढळतो. पत्रविस्तारही कधी कधी नऊशे ते हजार शब्दांपर्यंत असे. अशी पत्रे म्हणजे स्वतंत्र छोटे लेखच ! 'इंग्रजी कायद्याच्या चार शाखा', 'निजामाच्या राज्यात चालू असणारी नाणी', व्याकरणविषयक प्रश्न, नाट्यप्रयोगविषयक अभिप्राय या सान्यांचा समावेश या पत्रव्यवहारात होत असे. काही पत्रे 'इंदुप्रकाश', 'नेटिव ओपिनियन', 'ज्ञानप्रकाश' यांच्या कर्त्यांना उद्देशूनही लिहिलेली दिसतात.

राजकीय परिस्थिती, पत्रकर्त्यांचे धोरण यानुसार 'पत्रांचे आरंभीचे स्वरूपही पुढे बदलत गेले. उदा. १ डिसें १९०२ च्या अंकात 'वऱ्हाड सामाजिक सभेबद्दल 'सभेला मुद्दाम गेलेला श्रोता 'याचे पत्र आले आहे. तो म्हणतो, 'वऱ्हाड सामाजिक सभा' हे नाव फार मोठे आहे. या नावाखाली काल चाळीस पन्नास गृहस्थ जमले होते. . . . वऱ्हाडचा सामाजिक इतिहास म्हणजे या सभेचा वार्षिक ग्रंथ होय. तो पाच मिनिटातच वाचून झाला. औषधांच्या जाहिरातींप्रमाणे सामाजिक सभा ही एक जाहिरात आहे. वुलियम पिंकच्या गोळ्या सर्व रोगांवरच चालतात असे नाही तर त्यांचा उपयोग वाटेल त्या गोष्टीकडे सुखाने करावा हाच प्रकार आमच्या सार्वजनिक सभेचा आहे . . . . काही दिवसांनी या सभेचे वक्ते तेवढेच श्रोते असा प्रकार होण्याची आम्हास भीती वाटते या सामाजिक परिषदेत सहृदयता नाही लोकांच्या हृदयात सभेची उक्ती शिरत नाही आणि कृतीही भरत नाही. या सभेने मौन धरले तर पुष्कळ सुधारणा आपोआप होईल. लोकांच्या दारिद्र्याचा फाडा दूर होत चालला व त्यास संपत्तीची सुखे आश्रय देऊ लागली म्हणजे आपोआप सर्व खऱ्या सुधारणा घरोघर नांदू लागतील. सामाजिक सुधारणा हे निराळे अंग समजून ही सभा ते चेपीत नसते ही चूक आहे... प्रस्तुतची सुधारणा म्हणजे क्षयी माणसाच्या तोंडाला कृत्रिम तकतकी आणण्यासारखे आहे. अशा तकतकीने समाजाचा देह नष्ट व्हावयाचा तो नष्ट झाल्याशिवाय राहणार नाही." त्या काळात सामाजिक सुधारणा मागे पडून राजकीय सुधारणांना प्राधान्य मिळत गेले, त्याचेच हे पत्र निदर्शक म्हणता येईल.

आरंभी आढळणारे पत्रव्यवहाराचे प्रमाणही पुढे कमी होत गेले आणि ती जागा वऱ्हाड आणि त्याप्रमाणेच वऱ्हाडबाहेरच्या घटना घडामोडी यांबद्दलच्या बातम्या, लेख यांनी घेतलेली दिसते. त्या काळातील इतर वृत्तपत्राप्रमाणेच 'वऱ्हाड समाचार'चाही पुष्कळसा भाग मराठीत व काही इंग्रजीमध्ये येऊ लागला. आरंभापासूनच 'वऱ्हाड' या शीर्षकाखाली वऱ्हाडमधील अधिकाऱ्यांच्या बदल्या-नेमणुका, परीक्षांचे निकाल, हवापाणी, व्याख्यानमालांसारखे स्थानिक कार्यक्रम वगैरे छोट्या बातम्यांसारखा मजकूर येत असे. 'वर्तमानसार' या शिरोनामाखाली निरनिराळ्या इंग्रजी मराठी वृत्तपत्रातील वेचक बातम्या; घडामोडी यांचा समावेश होई आणि वाचकवर्गाला बहुश्रुत केले जाई.

इ. स. १८६५ च्या सुमारास वऱ्हाडमध्ये शिक्षणखात्याची स्थापना झाली आणि वऱ्हाडच्या सर्वांगीण विकासाचा पाया घातला गेला. वऱ्हाडमधील सामाजिक जागृतीला चालना मिळाली. 'वऱ्हाड समाचार'चा काळ या काळाशी समकक्ष आहे. त्यामुळे वऱ्हाडच्या अनेकांगी प्रगतीच्या पाऊलखुणा 'वऱ्हाड–समाचारा'मध्ये पानोपानी उमटल्या आहेत. वऱ्हाडच्या प्रगतीचा इतिहास त्यात ग्रंथित झाला आहे. वऱ्हाडची ही प्रगती पुण्याचा आदर्श डोळ्यांपुढे ठेवून होत असलेली दिसते. पुण्याच्याच वळणावर वऱ्हाडमध्येही 'सार्वजनिक सभे'ची स्थापना झाली. पुण्याप्रमाणेच उमरावती, अकोला, वाशिम इत्यादी ठिकाणी ग्रंथालयांची स्थापना झाली. पुण्याच्या वसंत व्याख्यान माले' प्रमाणेच अकोल्यालाही 'वर्षोत्सव व्याख्यानमाले'ला आरंभ झाला. उमरावतीला वक्तृत्वोत्तेजक सभेची स्थापना झाली. पुण्यातील डेक्कन कॉलेजच्या विद्यार्थ्यांच्या मेळाव्याप्रमाणे वऱ्हाड हायस्कूलच्या विद्यार्थ्यांच्या 'विद्यार्थि–समाजा'ची स्थापना झाली. शैक्षणिकप्रगतीच्या बाबतीत मागासलेल्या वऱ्हाडचो वेगाने प्रगती साधण्यासाठी शैक्षणिक परिषदा, 'शिक्षक–समाज' यांचाही उपयोग झाला. या सान्यांबद्दलचे विस्तृत माहितीपर लेख–अभिप्राय 'वऱ्हाड-समाचार' मधून

प्रसिद्ध झालेले दिसतात. वऱ्हाडच्या प्रगतीला दिशा देणे, त्यासाठी लोकमत अनुकूल करणे या कामी 'वऱ्हाड समाचार'ने बजावलेली कामगिरी मोलाची आहे.

१४ सप्टेंबर १८७३ च्या 'वऱ्हाड–समाचार'च्या अंकात 'पुणे सार्वजनिक सभे'ची माहिती देऊन 'आम्ही आपले वऱ्हाडातील विद्वान प्रतिष्ठित व पुढारी लोकास विच्यारितो की तुम्हाला अशा सभेची आवश्यकता नाही काय ? तुम्हाला तर या बेकायदी मुलखात इतरांपेक्षा गाऱ्हाण्यांचे फार अधिक प्रसंग आहेत, असे असता तुम्ही स्वस्थ का ? . . . सातारा, नगर, नाशिक, धुळे, ठाणे या जिल्ह्याच्या गावी सभा झाल्या आहेत एवढेच नव्हे, कऱ्हाड, वाई, उमरगाव अशा तालुक्यांच्या गावी सुद्धा सार्वजनिक सभा झाल्या आहेत. आणि आमचे हे सहा जिल्ह्यांचे राष्ट्र वऱ्हाड यात काहीच नाही ? . . . अकोल्यास लिहिण्या बोलण्याच्या अभ्यासाकरिता एक ल्हानशी सभा भरत असे. तिला देखील गाढ निद्रा लागली आहे. नशीब वऱ्हाडचे !' असे म्हटले असले तरी हा उद्वेग खरा नाही. तो पोटतिडिकीतून उमटलेला. कारण पुढे शाळा व रेव्हेन्यू खात्यातील तरुण विद्वानांनी एकत्र येऊन अशी सुधारणेची कामे करावीत असे सुचविलेले दिसते.

राष्ट्रीय कार्यात वऱ्हाडवासीयांनीही आपला हातभार लावावयाला हवा ही 'वऱ्हाड समाचार'-कर्त्यांची आकांक्षा आहे. उदा. १५ जुलै १८९५ च्या अंकात सुमारे तीनशे शब्दांचे टिपण प्रसिद्ध झालेले आढळते. त्यातील काही अंश असा– 'श्री छत्रपति शिवाजी महाराजांची समाधी रायगडवर आहे. तिच्या जीर्णोद्धारार्थ सर्व देशभर प्रयत्न चालू असून वर्गण्या गोळा होत आहेत. देशाभिमानी लोकांच्या गावोगाव सभा झाल्या, आणि फंड उभारण्यात आले. पण आमच्या प्रांती श्री शिवाजी महाराजांचे जणू काय नावच ठाऊक नाही अशातला प्रकार दृष्टीस पडतो हे कळविण्यास देखील लाज वाटते. राष्ट्राला पूज्य व वंद्य अशा वस्तू थोड्या असतात. श्री शिवाजी महाराजांची समाधी अशा विरळ वस्तूंपैकी प्रमुख आहे. किंबहुना समाधीच्या तोडीची दुसरी वस्तू नाही. या समाधीचा जीर्णोद्धार करण्यात आला आणि श्रीशिवरायाच्या पुण्यतिथीचा महोत्सव आम्ही करू लागलो म्हणजे आमच्या इतिहासातील निराळ्या अध्यायास आरंभ झाला असे आम्ही समजतो.' ओजस्वी शब्दात असे प्रेरक स्फूर्तिदायक विषयप्रतिपादन करून अखेरीला 'लोकांच्या मनात देशाभिमानाची प्रेरणा लौकर होऊन आमच्या प्रांताची अल्पस्वल्प तरी वर्गणी समाधीफंडाला मिळावी अशी उत्कट इच्छा आहे. अलिकडे आमच्या प्रांतस्थ लोकांमध्ये सार्वजनिक गोष्टींविषयी बहुत अनास्था व औदास्य दिसून येते ते ठीक नाही' असे म्हणून 'खरोखर लोकांच्या मनोवृत्तीला लवकर पालट पडो असे आम्ही इच्छितो' अशी आवाहनपर अपेक्षा व्यक्त केलेली दिसते.

'वऱ्हाड–समाचार'कर्ते जनहिताबद्दल जागरूक आहेत. 'पुणे म्युनसिपालिटीत गावकऱ्यांनी एकंदर वीस मेंबर निवडून दिले. पुण्यातील लोकांनी या कामी जी अभिरुची दाखविली ती उदाहरण घेण्यासारखी आहे असे सांगून 'लोकल बोर्डाचे रुल वऱ्हाडात लागू होणार असल्याचे समजते. ते ग्याझीटात छापून प्रसिद्ध झाले आहेत. तर खेडेगावातील लोकांस हा अधिकार काय आहे, याची योग्यता किती याचे स्वरूप कसे आहे हे समजून देणे हे अकोले उमरावती येथील लोकांचे कर्तव्यकर्म आहे. बाबासाहेब (खापर्डे ?) यांनी या वेळेस कंबर बांधून या कामात येस घेतलेच पाहिजे. त्यास दत्तोपंत भागवत, रावसाहेब जठार, अण्णासाहेब महाजनी यांचे पाठबळ मिळेल यात बिलकूल संशय नाही. येथे एक जाहीर सभा भरवून त्यात येक सबकमिटी नेमावी व त्या कमिटीचे तर्फे खेडे-गावातील लोकांस स्थानिक स्वराज्याची थोडीबहुत माहिती करून द्यावी' (७ डिसेंबर १८८५) मिळालेल्या अधिकाराचा लाभ उठविण्यासाठीही त्या अधिकाराची पुरी माहीती हवी. हे जाणूनच वऱ्हाड समाचारकर्त्यांनी त्या काळात लोकजीवनात अग्रणी असणाऱ्यांना वरील विनंतीवजा सूचना केली आहे.

वऱ्हाडमध्ये शिक्षणसंचालकपदी सिंक्लेअर साहेबांचे नंतर नारायणभाई दांडेकर यांची नेमणूक झाली. त्याबद्दल 'नेटिवास मोठा मान दिला व नेटिवांचे कल्याणाविषयी खरोखर कळकळ यांचे (राज्यकर्त्यांच्या) मनात आहे असे पूर्णपणे दिसून आले. तेव्हा या संबंधाने पाहिले असता ही मोठी आनंदाची गोष्ट आहे' असे समाधान व्यक्त करून 'परंतु आमचे मत असे आहे की आणखी काही वर्षपर्यंत वऱ्हाडात शाळाखात्यांवर युरोपियन अधिकारी असावे हे बरे आहे. व यापासून नेटिवांचे कल्याण अधिक आहे. (३ ऑक्टो. १८७५) असे स्वमतही नोंदविले आहे. त्यावर ठाणे येथील 'अरुणोदय'कर्त्यांनी टीका केली. तेव्हा 'ठाणे मुंबई इकडील स्थिती कशी असेल ती असो, पण वऱ्हाडात असे आहे की नुसता युरोपियन पाहिला की लोकांचे मनात भीती उत्पन्न होते. खेडेगावात गोरे कातडे दृष्टीस पडले की सगळे गावातील लोक कोणी राजा आला आहे असे समजतात व त्याप्रमाणे त्यास मान देतात अशी लोकांची स्थिती आहे याकरिता जी गोष्ट अंमलाचे जोराने व्हावयाची आहे ती करून घेण्यास नुसता युरोपियनाचा शब्द पुरे म्हणून शाळा खात्यावरील मुख्य अधिकारी युरोपियन असावा असे आमचे म्हणणे आहे' अशी आपल्या मताची कारणमीमांसाही विस्तारपूर्वक विवेचली आहे (१७ ऑक्टो. १८७५) 'युरोपियन असावा' असे 'वऱ्हाड समाचार'कर्त्यांना वाटते ते तत्कालीन परिस्थितीची गरज म्हणून, युरोपियनांबद्दलच्या गौरवबुद्धीने नव्हे. पुढच्याच महिन्यात १४ नोव्हे. १८७५ च्या अंकात पुढील वृत्त आलेले आढळते. 'येथील हायस्कूलचे हेडमास्तर मि. एटकीन साहेब यांनी मुलांस . सोमवारी दोन प्रहरी मुंबईस प्रिन्स येणार तर त्या संध्याकाळी त्यास अकोल्याहून सोडले व पाच सहा दिवसांनी त्या मुलांची मुंबईस परीक्षा आहे तरी तिजकरिता न थांबता मागे परत यावे व पुन्हा या आठवड्यात आणखी जावे असा हुकूम केला ! काय समंजसपणाची तऱ्हा ही ! मुलांचे मास्तर म्हणून त्यांनीही केवळ मुलांहून मूल झाल्यासारखा पोरपणा करावा हे चांगले नव्हे" अशी युरोपियन हेडमास्तरांना कानपिचकी द्यायलाही कमी केलेले नाही.

राज्यकर्त्यांवर, त्यांच्या धोरणांवर 'वऱ्हाड–समाचार'कर्त्यांचा राग असला तरी व्यक्तिशः कोणा युरोपियनावर तो केवळ युरोपियन म्हणून त्यांचा राग नाही. न्याय्य असेल तर इंग्रज अधिकाऱ्याचीही ते बाजू घेतात. मि. एटकीन यांनी रा. ब. जठार यांच्या अनुपस्थितीत शिक्षणखात्याचे डायरेक्टर म्हणून काम पाहिले. त्या पदावर त्यांचा हक्क असता जठार सेवानिवृत्त झाल्यावर त्यांची नेमणूक न होता त्या जागी मुंबईचे पटवर्धन यांची नेमणूक झाली. त्यामुळे मि. एटकीन स्वाभाविकच नाराज झाले. आणि रा. ब. जठार यांच्या सन्मानार्थ अकोल्यास टौन हॉलमध्ये भरलेल्या सभेला ते अनुपस्थित राहिले. त्यावर 'वैदर्भ'मध्ये टीका आली. तेव्हा वऱ्हाड समाचारकर्ते लिहितात, 'सभा भरण्याचे आदले दिवशी मि. एटकीन साहेब रावबहादुरास स्वतः भेटले. व त्यांनी त्यांजपाशी प्रांजळपणे सांगितले की, 'आपले सन्मानार्थ टौनहालात उद्या जो समारंभ होणार आहे, त्यावेळी माझे न येण्याने कदाचित आपणास बरे वाटणार नाही. परंतु मी आपल्यास उघडपणे सांगतो की माझ्या निराशेमुळे उद्याचा समारंभ मला फार दुस्सह होईल. तथापि मी यावेच अशी जर आपली इच्छा असेल तर माझ्याच्याने आपले मन मोडवणार नाही,' यावर रा. ब. यांनी 'आपण येण्याचे कारण नाही' असे सांगितले. 'वैदर्भकार यांनी साहेबमजकुरावर लादलेला कृतघ्नतेचा दोष मिथ्या आहे हे वाचकांच्या ध्यानी येईल. (२ जुलै १८९४).

केवळ वऱ्हाडचीच नव्हे तर एकूण हिंदुस्थानचीच स्थिती सुधारण्यावर 'वऱ्हाड समाचार'-कर्त्यांचा भर आहे. 'हिंदुस्थानची खरी स्थिती इंग्रज लोकांस समजण्याची आवश्यकता' या लेखाचा समारोप करताना लेखक 'आमचे एवढेच म्हणणे आहे की विद्वान लोकांनी केवळ पोटाला मिळविण्यात व आळसात आपला वेळ न घालविता नेहमी विद्याभ्यासंगात देशाचे हित–अनहित पाहण्यात धर्मसंबंधी, जातिसंबंधी व सामाजिक सुधारणेसंबंधी गोष्टींचे मनन करण्यात आपला वेळ

घालवावा. नुसते नाव मोठे असण्यात पाचचार अक्षरे नावापुढे झळकण्यात, मोठाल्या गप्पा मारण्यात अगर बयाची प्रार्थना करण्यात अगर अस्ताव्यस्त तऱ्हेनें पडण्यात बिलकूल हशील नाही' असा सुशिक्षित वर्गाला खडसावताना दिसतो. (२ फेब्रु. १८८५).

त्याप्रमाणे, 'मद्रास इलाख्यातील एका शाळा मास्तरास त्याचे जागेवरून काढून दुसऱ्या ठिकाणी त्याची बदली केली याचे कारण त्या मास्तराने, तेथील एका सभेसंबंधी काम केले, व सभेस मदत केली. ही सभा जंगलखात्यासंबंधी रयतेस जे दुःख आहे त्याची सरकारपाशी दाद मागण्याकरिता झालेली होती व त्या सभेसंबंधाने वर्गणी गोळा करणे, व इतर तऱ्हेने सभेच्या कामास मदत करणे याबद्दल तेथील मास्तरास प्रायश्चित्त भोगावे लागले. इंग्रज राज्याचा रंग कसा बदलत चालला आहे व आपले कर्तव्य काय आहे याविषयी विचार करणे फारच जरुरीचे आहे. अशी सावधगिरीची सूचनाही 'वऱ्हाडसमाचार'कर्ते वाचकांना देताना आढळतात. (२८ जून १८८६).

१३ जुलै १८९५ च्या अंकात मराठी भाषेची सेवा करण्याकरिता स्थापन झालेल्या 'डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटीची माहिती देऊन उत्तम पुस्तकांना बक्षिसे देण्याची तिची योजना चांगली असली तरी पुस्तक परीक्षणार्थ नेमलेले सारे परीक्षक पुण्या मुंबईकडचे याबद्दल 'वऱ्हाड समाचार'कर्त्यांनी नापसंती व्यक्त करून पुढील महत्त्वाची सूचना केली आहे. 'आमच्या मते बाह्य प्रांतीय विद्वान गृहस्थांची भरती या परीक्षक मंडळीत केली तर हल्लीच्या पेक्षा पुस्तक परीक्षणाचे काम चांगले झपाट्याने चालेल. इतकेच नाही तर बाह्य प्रांतातील गृहस्थांचा जो इतका नकळत अनादर होत आहे, तो दूर होईल. उदाहरणार्थ आमच्या वऱ्हाड प्रांतातील विद्वन्मणि रा. रा. वि. मो. महाजनी एम्. ए. हे या मंडळीमध्ये अवश्य असलेच पाहिजेत. निरनिराळ्या प्रांतांचे लक्ष्य या संस्थेच्या कार्याकडे लागण्यास हा एक सोपा उपाय आहे असे आम्हांस वाटते. नागपूरकडील काही निवडक गृहस्थ पुस्तक परीक्षण कमिटीमध्ये समाविष्ट नाहीत ही आम्ही कमिटीच्या रचनेत मोठी उणीव समजतो. ही गोष्ट इतर मराठी भाषा बोलणाऱ्या प्रांतासही सारखीच लागू आहे.'

'इंग्रजी कवींची विचारसरणी, कल्पनातरंग, सृष्टिसौंदर्यपर निरीक्षण या गोष्टींची ओळख महाराष्ट्र भाषाभिज्ञास करून द्यावी या स्तुत्य हेतूने आमच्या एका सन्मान्य मित्राने इंग्रजी कवित्व मराठी भाषेच्या मुशीत ओतण्याचा प्रयत्न चालविला आहे. (५ एप्रिल १८९७) असे प्रास्ताविक देऊन 'विजया दशमीचे सोने' या सदरात या भाषांतरित कविता दिलेल्या दिसतात. या उपक्रमास इ. स. १८९३ च्या विजया दशमीच्या मुहूर्तावर आरंभ झाला. मध्ये काही काळ तो बंद पडला. इ. स. १८९७ मध्ये त्याला परत एकदा चालना मिळाली.

नंतरच्या काळात 'विविधज्ञानविस्तार', 'नवयुग' वगैरे मासिकातील लेखांबद्दल मतप्रदर्शन, पुस्तक-परीक्षणे यांनाही 'वऱ्हाड-समाचार'मध्ये स्थान मिळू लागलेले दिसते.

आरंभी, शैक्षणिक सामाजिक विषयांना मिळणारे स्थान कमी होत जाऊन पुढे राजकीय विषयांना प्राधान्य मिळत गेले. काँग्रेसची अधिवेशने, त्या संदर्भातील घडामोडी यांचे अहवाल विस्तारपूर्वक येऊ लागले. जोडीला साहित्य चर्चेलाही स्थान मिळू लागले, तरी एकूण सर्वसाधारण धोरण कायम राहिले. उदा. वि. मो. महाजनी आणि देवराव विनायक यांच्या पुढाकाराने महार लोकांस सर्वसाधारण लिहिणे वाचणे यावे म्हणून एक रात्र शाळा सुरू झाली. त्याबद्दलची बातमी देताना 'या विद्यालयानिमित्त काही महार लोक वर्गणीची यादी घेऊन घरोघर फिरताना दृष्टीस पडतात तेव्हा खरोखर आनंद वाटतो' असे सांगून 'आम्ही तर असे सुचवितो की या महार लोकांच्या तसेच इतर प्राथमिक शाळांसाठी गावकऱ्यांच्या वर्गण्या नकोत आणि या कामासाठी सरकारी पैसाच विपुलतेने आला पाहिजे. गावकऱ्यांच्या वर्गण्यांसाठी दुसरी प्रयोजने पुष्कळ आहेत.' असा रोखठोक अभिप्राय दिला आहे. (५ ऑक्टो. १९०८) या आधी चौदा वर्षापूर्वीही 'शिक्षण ही

सरकारची जबाबदारी हे यापेक्षाही वरच्या पट्टीत 'वऱ्हाड समाचार' कर्त्यांनी सरकारला सुनावलेले दिसते. खानेसुमारीच्या अहवालासंबंधीच्या या लेखात वऱ्हाड समाचार कर्ते म्हणतात, 'एकंदरीने सारा देश अक्षरशत्रू लोकांचाच होय. सरकारजवळ पैसा नाही म्हणून सरकार प्रजेला शिक्षण देऊ शकत नाही ही ओरड नित्याची असून सरकारी उधळपट्टीच्या राज्यकारभारात सरकारच्या तिजोरीत विद्यादानासाठी शिल्लक कधी राहील असा भरवसा नाही. विद्यादान हेच सर्व सुधारणांचे मूळ आहे आणि ते तर इंडियन लोकांस मिळत नाही. त्याहून अत्यंत खेदास्पद गोष्ट दुसरी कोणती असणार ! विद्येची थोरवी नव्याने कळविणे नको. निदान प्राथमिक शिक्षण लोकांस अत्यंत आवश्यक आहे. रावबहादूर महादेव गोविंद रानडे यांनी असे म्हटले आहे की हवापाणी जसे शरीराला आवश्यक आहे. तशी मनाला विद्या ही आवश्यक आहे हवापाण्याची मनुष्यास ईश्वरीय देणगी आहे. तशी विद्या ही नाही. मनुष्यमात्राने ती उणीव भरून काढली पाहिजे. शाळा ठिकठिकाणी पाहिजेत. शिक्षण होईल तितके फुकट व सरसकट मिळाले पाहिजे. प्रजेच्या शिक्षणासंबंधाने सरकार आपले कर्तव्य स्मरत नाही. याला उपाय काय करावा. (१९ फेब्रु. १८९४).

जानेवारी १८६७ ते मार्च १९१८ हा 'वऱ्हाड समाचार'चा अर्धशतकापेक्षाही थोडा अधिकच जीवितकाल. या काळात 'नागपूर समाचार', 'वैदर्भ', 'प्रमोदसिंधू' हीही वृत्तपत्रे वऱ्हाडमध्ये सुरू झालेली दिसतात. पण कालानुक्रमे त्यात आद्यत्वाचा मान 'वऱ्हाड समाचार'चा आहे. 'वऱ्हाड समाचार'ने वऱ्हाडच्या सामाजिक जीवनात–' त्यात शैक्षणिक, धार्मिक, राजकीय, औद्योगिक, सांस्कृतिक इत्यादी सारीच अंगोपांगे समाविष्ट–महत्त्वाची कामगिरी बजावलेली दिसते. मराठी भाषेच्या विकासालाही त्याने हातभार लावलेला आहे. महाराष्ट्रात 'केसरी'ने जी मोलाची कामगिरी केली तशाच स्वरूपाची, केवळ राजकीय नव्हे, तर सर्वांगीण जनजागृतीची कामगिरी वऱ्हाडमध्ये 'वऱ्हाड–समाचाराने बजावलेली असावी. पण, 'वऱ्हाड–समाचार'च्या कार्याचा यथायोग्य सविस्तर परामर्ष अद्याप कोठे घेतला गेलेला आढळत नाही.

'वऱ्हाड–समाचार'च्या आरंभकाळी वऱ्हाड प्रांत निजामाच्या अखत्यारीत असून कर्जापोटी तो इंग्रजांकडे सोपविलेला होता. त्यामुळे पुण्या मुंबईपासून तो काहीसा अलग पडला होता. इ. स. १९०४ च्या सुमारास तो मध्यप्रदेशाला जोडला गेला. त्यामुळे 'वऱ्हाड समाचार' आणि त्याचे कर्ते दुर्लक्षित राहिले असण्याची शक्यता आहे.

येथे हेही नमूद करणे आवश्यक आहे की 'वऱ्हाड समाचार'चा सर्वांगीण, परिपूर्ण परिचय करून देणे हे या लेखाचे उद्दिष्ट नाही, तर त्याची अंशतः ओळख व्हावी, एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील वऱ्हाडच्या सांस्कृतिक जडणघडणीचा साक्षीदार आणि काही अंशी शिल्पकार असणाऱ्या 'वऱ्हाड समाचार' यासारख्या उपेक्षित पण महत्त्वाच्या विषयाकडे अभ्यासकांचे लक्ष वळावे, एवढ्याच माफक हेतूने हा लेख–प्रपंच केलेला आहे. ■

५६३ / ग २, बुधवार पेठ
पुणे ४११००२

प्रतिष्ठानचे एक संवत्सर

राम देशमुख

साहित्याच्या एखाद्या कालखंडाचे मूल्यमापन त्या कालखंडातील केवल साहित्यदर्शनाने पूर्ण होत नसते साहित्याच्या निर्मेळ, मूलगामी विचाराविष्कारावरोबरच, ते साहित्य ज्या सामाजिक घडामोडींचा, व्यवस्थेचा परिणाम म्हणून आले आहे, त्याचाही विचार व्हावा लागतो. त्यामुळे विशिष्ट कालखंडातील साहित्याच्या मूल्यांकनात अंतर्गत विश्लेषणाबरोबरच वाह्य स्वरूप किंवा तांत्रिक बाजूही निरीक्षिणे अपेक्षित असते.

'प्रतिष्ठान' या औरंगाबादहून प्रकाशित होणाऱ्या द्वैमासिकाच्या (आता त्रैमासिक) १९७४-७५ या चैतन्यशील संवत्सरात आजघडीस लौकिकाचे परमोच्च शिखर गाठलेल्या साहित्यिकांचा अंतर्भाव आहे. या काळातील साहित्यिकांचा बालार्क प्रतिभेचे किरण या कालखंडात शोधता येतात. किंबहुना असे शोधन एक उच्च प्रकारचा आत्मानंद (Universal Delight) मिळवून देते. या कालखंडाच्या बाह्य अवलोकनात प्रतिष्ठानचे तत्कालीन संपादक मंडळ, त्या काळातील प्रकाशित झालेली पुस्तके, परिष्करणे इ. चा विचार येतो. परंतु लेखनमर्यादेमुळे बाह्य अवलोकनाचे हे अंग लक्षात घेणे अशक्य आहे. केवळ लेखकांच्या साहित्यविषयक प्रयत्नातील सातत्य आणि लिखाणाची प्रत तौलनिक दृष्टीने पाहणे आणि साभिप्राय मांडणे तेवढे शक्य आहे. आमच्या मते प्रतिष्ठानच्या जीवनेतिहासातील हा कालखंड मराठी साहित्याच्या इतिहासातही आपली लहानशी नोंद करून जाणारा कालखंड आहे.

या संवत्सराच्या आरंभालाच प्रा. म. सु. पाटील यांचा एक वैचारिक निबंध दिसू लागतो आहे. नारायण सुर्वे यांचा 'माझे विद्यापीठ' या सुविख्यात कवीतासंग्रहावरील हा निबंध श्री. म. सु. पाटील यांनी मराठी प्राध्यापकांच्या नासिककर अभ्यासमंडळापुढे वाचून दाखविण्यात आल्याची नोंद आहे (प्रतिष्ठान जाने. ७४) अर्थात् प्रा. म. सु. पाटील यांना 'माझे विद्यापीठ' या काव्यसंग्रहाची समीक्षा अभिप्रेत नसावी. त्यामुळेच कदाचित असेल की नामवंत आणि लोकप्रिय होऊ लागलेल्या अक्षरयात्रिकांवर लिहिताना समूहाचे मानसशास्त्र लक्षात घेऊनच काळजीपूर्वक टाकांच्या फेकी कराव्या लागतात, हे व्यावहारिक शहाणपण या निबंधातून जाणवल्याशिवाय राहत नाही.

'माझे विद्यापीठ' या काव्यसंग्रहाचा विचार समकालीन कवींच्या तुलनेतून झालेला नाही. तो स्वतंत्रपणे करण्यात आला आहे असा विचार मांडताना सुर्व्यांच्या कवितेसाठी श्री. पाटील स्वत: आपल्या मनासारखी तयार करून घेतलेली एक चौकट – जिला ते काव्यात्म जाणिवेची चौकट म्हणतात – वापरताना दिसतात. या चौकटीचे वर्ण्य-विशेष सांगतांना श्री. पाटील म्हणतात– "काव्यात्म जाणिवेची किमान दोन टोके असतात. कधी ही टोके बहुपर्यायी असतात–ज्यामुळे काव्यात ताणतणाव निर्माण होतात. हे ताण निर्माण झाल्याशिवाय साहित्यनिर्मिती होत नाही; किंबहुना उत्कृष्ट साहित्यनिर्मितीची ती खूण असते, कसोटी असते."

नारायण सुर्वे यांच्या कवितेचे मार्क्सच्या 'विरोध–विकास'वादावर संघर्षाच्या अनुरोधाने केलेले श्री. म. सु. पाटील यांचे हे अवलोकन वाटते. यावर अस्तित्ववादी विचारसरणीतून निराळे भाष्य प्रकट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. कुठलेही ताणतणाव मुद्दाम निर्माण केल्याशिवाय निर्माण झालेल्या श्रेष्ठ कलाकृती जागतिक वाङ्मयात नाहीत काय? उदाहरणच द्यावयाचे तर नोबल पारितोषिक विजेता जॉर्ज ऑरवेल याची 'Animal–farm' ही कादंबरी किंवा सॉल वेलो या अमेरिकन लेखकाची डॉ. हरझोग हो कादंबरी कुठल्याही ताणतणावाशिवाय उत्कृष्ट का ठरू शकते, असे प्रश्न सहजच मनात डोकावून जातात.

समाजातील दोन विषम टोकांचे अभाव आणि समृद्धीचे– 'आहे रे' आणि 'नाही रे' हे वर्णन अप्रस्तुत वाटते. अशा अघळपघळ जागा या निबंधात बऱ्याच असल्यामुळे त्याचे अपेक्षित समीक्षामूल्यही घसरले असावे. प्रा. म. सु. पाटील यांनाही ही जाणीव आधीपासूनच असावी. त्यामुळेच समीक्षेप्रत न पोहोचू शकलेला हा लेख निबंधरूपात अवतरला.

या पार्श्वभूमीवर नारायण सुर्वे यांच्या कवितेची श्री. वि. स. जोग यांनी 'मार्क्सवाद आणि मराठी कविता' या मथळ्याखाली घेतलेली दखल अधिक सयुक्तिक वाटते. 'माझे विद्यापीठ' (१९६६) या कवितेत साम्यवाद सौंदर्यपूर्णतेने आविष्कृत झाला आहे. मॅक्झीम गोर्कीच्या 'माय युनिव्हर्सीटीज' या आत्मवृत्तात्मक ग्रंथाच्या मथळ्याचा अनुवाद असलेल्या या कवितेत अनाथ नारायण सुर्व्यांचे आयुष्य थोडेबहुत कळते. स्वतः नारायण सुर्वे यांनी आपली काव्यविषयक भूमिका अशी मांडली आहे.–

"त्या काळात मर्ढेकर, कुसुमाग्रज, मुक्तिबोध, विंदा करंदीकर हे कवी मला जवळचे वाटावयाचे. तरीही हे कवी मला समाधान देत नसत. ते जे लिहायचे अर्थात् वर्णन करायचे तेवढेच सत्य नव्हते. त्यांचे जग वेगळे असे. त्या जगातील माणसांच्या भावना वेगळ्या असत. ह्याही पलीकडे एक अफाट जग उभे होते, ज्या जगात मी उभा होतो. त्या जगाविषयी ते बोलत, पण ते अंतःकरणाला भिडत नव्हते." (युगांतर किस्ता–पृष्ठ ६३).

सुर्वे नावाच्या मार्क्सवादी कवीचे हे अनुभव आणि प्रतीत होणाऱ्या जाणिवा हेच त्यांच्या कवितेवरील भाष्य नाही कां?

यापुढील म्हणजे फेब्रु. ७४ च्या 'प्रतिष्ठान'मधून काही नावे आपापल्या जागा 'रिझर्व' करताना दिसतात. इथे एक गोष्ट प्रामुख्याने ध्यानात येते ती अशी की या नियतकालिकातून केवळ मराठवाड्यापुरतेच (क्वचित अपवाद) कवींना प्रतिनिधित्व लाभले आहे. प्रादेशिकतेच्या या 'झोनल' मर्यादेत फ. मु. शिंदे, लक्ष्मीकांत प्रामाणिक, विलास गिते, नमिता चंद्रपुरे ही नावे चतुर्थीच्या चंद्रकोरीसारखी वर्धिष्णु होतील असे तर्कविधान कवींच्या काव्यप्राक्तनावरून करण्याचे हे दिवस. काळाच्या प्रवाहात पुढे काही आडाखे चुकतातही! फ. मु. शिंद्यांच्या काही कवितांचा त्यांनी स्वतः इंग्रजीतून अनुवाद केलेला असतो. आपल्या कवितेला 'हायकू'च्या शैलीत न बसविता, मात्रांची तमा न बाळगता ते एक प्रकारे 'मुक्त हायकू'चाच स्वीकार करताना दिसतात. खरं तर याला कोणी वदतोव्याघात म्हणेल. कांटच्या भाषेत या 'हायकू'ची स्थिती 'हेतुशून्य हेतुपूर्णता' जाणवून देणारी आहे, किंवा ती The bare form of formality आहे.

विलास गिते मराठी कवितेतील त्याच त्या प्रतिक–प्रतिमांना वैतागलेले दिसतात. लक्ष्मीकांत प्रामाणिकांच्या कवितेला इथे 'भरतीची लाट' आलेली दिसते.

कथाक्षेत्रातूनही भास्कर चंदनशिव, महावीर जोंधळे यासारखी नावे मराठवाड्याचे नुकतेच प्रतिनिधीत्व करू लागलेली असतात. याच अंकाच्या 'परीक्षण' विभागातील 'संगीताचे सौंदर्यशास्त्र' या प्रा. अशोक रानडे यांच्या ग्रंथावरील सुरेश गजेंद्रगडकर यांचे सखोल परीक्षण आलेले आहे. हे

परीक्षण नावावरून संगीत क्षेत्रातील एखाद्या अधिकारी व्यक्तीचे असेल असे वाटत नाही. परीक्षण-लेख वाचल्यावर गजेंद्रगडकरांच्या संगीतावरील सखोल चिंतनाचे नवनवे प्रदेश दृष्टीच्या टप्प्यात येऊ लागतात. एका अधिकारी व्यक्तीच्या निर्मितीवर तितक्याच अधिकारी व्यक्तीने लिहिल्यावर वैचारिक संघर्षाच्या ज्या ठिणग्या उत्पन्न होतात, त्यामुळे सर्वसामान्य वाचक दिपून जातो. अशा विषयसंबद्ध असलेल्या प्रतिलिखाणातून काही वैचारिक स्फोटके निर्माण होतात. लेखक, समीक्षक आणि वाचक यांच्या मानसविश्वात काही काळापुरता एक थरार निर्माण होतो–ज्याला मोनॅडिक अनुभूती म्हणता येईल. सुरेश गजेंद्रगडकरांनी संगीतातील काही मूलभूत संकल्पनांची छाननी केल्यामुळे सांगितिक धारणांना कधी नवी गती मिळते तर काही धारणा घासून–पुसून लख्ख करून घेण्याची गरज प्रकर्षाने जाणवू लागते. 'स्वर', 'लय' आणि 'बंदिशी'च्या रूढ संकल्पनांचा तर्कशुद्ध, शंभर टक्के नवा नसला तरी नवी वाट चोखाळणारा विचार या परीक्षण–लेखात येऊन जातो. चमकदार विधाने अनेकदा फसवी ठरतात. अशोक रानडचांचे 'नादबिंदू व कालबिंदू ह्या दोन्हींचा मिळून स्वर होतो' हे असेच एक फसवे विधान. त्याचे खंडन गजेंद्रगडकरांनी असे केले आहे– "नाद हा स्वराचा गुणधर्म. स्वरसंहती एकाहून अधिक स्वर आला की आपोआप दोन स्वरातील कालाच्या अंतराची एक मिती निर्माण होते. परंतु त्याचा अर्थ 'स्वर हा नादबिंदू व कालबिंदू यांचा बनतो असा होत नाही."

सुरेश गजेंद्रगडकरांचे हे परीक्षण संगीतशास्त्राच्या प्रस्थापित नियमांची अस्पर्श राहिलेली बाजू उलगडणारे आहे हे खरे; परंतु गजेंद्रगडकरांचे हे परीक्षणही 'समग्र स्वयंपूर्ण' असे मानता येईल का हा प्रश्नच आहे. मूळात 'सौंदर्य–शास्त्र' या शब्दापासूनच वाद होऊ शकेल. सौंदर्य हे शास्त्र नसून ती शास्त्राची मीमांसा आहे. त्यातून 'संगीताचे सौंदर्यशास्त्र' जर आपण अलग काढू गेलो तर प्रत्येक ललित–कलेचे स्वतंत्र शास्त्र मानावे लागेल. शास्त्र हे ज्ञान सुसंगत तर्कशुद्ध रीतीने मांडणारी एक लिखित व्यवस्था आहे; आणि सौंदर्यमनास प्रमुदित करणारी एक अमूर्त अवस्था आहे. ती एकाच वेळी ज्ञातृगत व वस्तुगत दोन्ही असू शकते. कांटच्या मते सौंदर्यानंद निश्चित कल्पनेवर आधारलेला नसतो. परंतु तो नुसत्या संवेदनेच्या अनुभवातील आनंदही नव्हे. सौंदर्य जसे ऐंद्रिय सुखकारक गोष्टीपेक्षा वेगळे आहे, तसे ते चांगलेपणाहूनही वेगळे आहे.

ज्यायोगे मानवी इच्छा, वासना यांची तृप्ती होते (What gratifies) त्याला रोचक म्हणतात; ज्यायोगे नुसता आनंद होतो (What simply pleases) त्याला सुंदर म्हणतात."

अर्थात् संगीतातील 'केवलानंदाची'च इथे अपेक्षा होती; ती गजेंद्रगडकराकडूनही पूर्ण होऊ शकली नाही.

संगीतातील घराणे म्हणजे संगीत घराण्याची शिस्त. हा आणि एवढाच घराण्याचा वारसा असतो. अमुक एक गायक विशिष्ट घराण्याचा म्हणून त्याने त्या घराण्याविषयी अदब राखणे गैर नाही. पण हा अदब अभिनिवेशात बदलू नये. घराण्या–घराण्यात समन्वयवादी भूमिका असावी म्हणजे छान जुगलबंदी जमेल; असे स्पष्टपणे गजेंद्रगडकरांनी या लेखात कुठेही नमूद केले नसले तरी त्यांचे 'मंतव्य' त्याच रोखाने आहे. 'भीमसेन जोशी केवळ किराणा घराण्याचेच गातात काय ?' किंवा 'जितेंद्र अभिषेकी आग्रा घराण्याचेच गातात काय ?' अशी ते पृच्छा करतात. गजेंद्रगडकरांच्या या 'घराणेशाही'ला विरोध करणाऱ्या व समन्वयवादी दृष्टिकोनाचा सकौतुक स्वीकार करूनही काही प्रश्न शेष राहतातच–

उदाहरणार्थ कुमार गंधर्वांनी बांधलेल्या सर्वस्वी 'नव्या चिजा' कुठल्या घराण्याचा वारसा सांगत आहेत ? की कुमारांचेच एक स्वतंत्र घराणे मानावे ? याचा उहापोह श्री. गजेंद्रगडकरांनी करावयास हवा होता.

जाता जाता या अंकातील गिरीष चिंधडे यांच्या 'स्वराच्या लोचनांनी सारे विश्व पाहणारा कवी' या शीर्षकाच्या मंगेश पाडगावकरांवरील लेखावर एक ओझरता दृष्टिक्षेप. पाडगावकरांच्या भावकवितेवरील हा एक कोरीव लेख. श्री. चिंधडे यांनी पाडगावकरांना (इतर भावकवींच्या तुलनेत) अधिक झुकते माप देतो आहे, हे स्वतःच कबूल केले आहे; ह्यात पाडगावकरांवरील चिंधडयांची भक्ती मात्र दिसून येते.

एखाद्या आस्वाद्यविषय झालेल्या भावकवितेला आस्वादकाच्या भूमिकेवरून न्याय द्यायचा झाला, तरी त्या कवी आणि कवितेच्या प्रभावात समीक्षकाने वाहून जाता कामा नये. कारण भावनात्मकता आणि हृद्यता (Charm) हे सर्वांच्या दृष्टीने गुण किंवा वैशिष्ट्ये ठरत असतात असे मानता येत नाही. " जी अभिरुची भावना (Emotion) आणि हृद्यता (Charm) यांची अपेक्षा बाळगते, किंवा आनंदासाठी पूर्णपणे याच घटकावर अवलंबून असते ती रानटी म्हटली पाहिजे " असे सौंदर्यशास्त्राचा (?) जनक कांट म्हणतो. कांटचे हे विधान सर्वांनाच मान्य होईल असे नाही. प्रस्तुत लेखकालाही ते मान्य नाही.) परंतु निखळ सौंदर्यानंद कलाकृतीकडे अलिप्त दृष्टीने पाहता यावे, भावनेच्या पुरात वाहून जाऊ नये ही कांटची सूचकता सर्वमान्य व्हायला प्रत्यय नाही. पाडगावकरांवरील या आस्वादलेखाच्या आरंभीच श्री. चिंधडे आपली भूमिका स्पष्ट करतात ती अशी :– " स्व–शरण आस्वादकतेला विंधण्याचं सामर्थ्य पाडगावकरांच्या विलक्षण सौंदर्यशाली भावगीतांमध्ये कशा तऱ्हेने अवतरले आहे, याचा हा मागोवा घेण्याचा एक प्रांजळ प्रयत्न."

पुढे कुसुमाग्रज, बा. भ. बोरकर, ना. घ. देशपांडे आणि पु. शि. रेगे हे कवी पाडगावकरांच्या कवितेच्या तुलनेसाठी श्री. चिंधडयांनी घेतले आहेत. एका पारडयात ही भारदस्त नावे ठेवून दुसऱ्या पारडयात पाडगावकरांना बसवून देण्यात आले आहे. पाडगावकर हे या प्रथितयश कवींहून अगदी वेगळे, निराळे ! श्री. चिंधडे यांच्याच शब्दात बोलायचे तर " अन्य कवींच्या भावगीतात जर आस्वादकाच्या ऐंद्रिय स्वागतशीलतेला विघटित केले जाते, तर पाडगावकरांच्या भावगीतात तिला संघटित केले जाते आणि ते फक्त स्वरसंवेदनेच्या स्वरूपात."

अर्थात् स्वरसंवेदन हेच पाडगावकरांचे वैशिष्ट्य किंवा बलस्थान. म्हणूनच त्यांच्या कवितेत 'श्रवणप्रतिभेची अतिवृद्धी (Hypertrophy of the auditory) झाल्यामुळे अन्य संवेदनांची (atrophy) होणे हा एकच परिणाम स्पष्टपणे संभवतो; व तो येथेही गोचर होतो.'

श्री. गिरीष चिंधडयांनी केलेल्या या व यत्सदृश विधानातून त्यांना पाडगावकरांच्या कवीतेविषयी नक्की काय म्हणावयाचे आहे याचा अर्थबोध होण्यापेक्षा चिंधडयांच्या इंग्रजी समीक्षेच्या व्यासंगाचा मात्र प्रत्यय येतो. वर्डस्वर्थ आणि कीट्सच्या टीकाकारांचे बोट धरून तर चिंधडयांनी 'स्वरांच्या लोचनांनी सारे विश्व पाहणारा कवी' पाहिला नसेल ना ! अशी शंका वेगाने येते. शिवाय 'ब्रॅकेट'मधून सोप्या मराठी शब्दांचे इंग्रजी पर्याय मिळतात हाही एक लभ्यांशच !

असे असले तरी पाडगावकरी कवितेचे मार्मिक रसग्रहण करणाऱ्या काही जागा या लेखात निःसंशय आहेत. पाडगावकरांच्या कवितेवरील नेमकी वैशिष्टचे श्री. चिंधडे हेरतात. " केवळ कल्पना-तरल संवेदनाचित्रे, अस्पर्श जाणिवांचे आलेखन अशा स्वरूपात त्यांच्या कवितेत अनेक वेळा, अनेक ओळी प्रकटतात."

श्री. चिंधडे यांनी एक कवी म्हणून दुसऱ्या एका कवीला दिलेला हा मुजरा मात्र चिंधडयांच्या लेखाचा गौरव वाढविणारा आहे–

"पाडगावकरांच्या शब्दांच्या पालखीत विराजमान झालेले असतात स्वरगुच्छ. पण ही स्वरफुले या मेण्यात एकटी नसनात. त्यांचा 'राणा' संगतीला असतो – तो म्हणजे 'अर्थ.' फूल आणि फळ यासारखं नातं आहे ते. एकानं दुसऱ्याला वाहून न्यायचं असतं. एकानं दुसऱ्यात विलीन व्हायचं असतं. द्वैत नसतंच."

चौऱ्याहत्तरच्या या संवत्सरातील प्रतिष्ठानच्या अंकात दोन कथा लक्ष वेधून घेतील. एक उत्तम शिरवळकरांची 'डिस्गस्ट १९७३' आणि दुसरी प्रतिष्ठान त्रैमासिकाचे सध्याचे संपादक, आजचे प्रथितयश कथाकार व कवी श्री. नागनाथ कोत्तापले यांची 'दसरा उजाडला' ही !

शिरवळकरांच्या 'डिस्गस्ट – १९७३' या कथेवर भाष्य करायला भरपूर वाव आहे. प्रस्तुत लेखात तिच्या विशिष्ट अंगाने चर्चा करणे तेवढे शक्य आहे. कारण 'डिस्गस्ट – ७३' सारख्या वादग्रस्त कथांना आशयाचे कित्येक कंगोरे असतात. या कथेचे आकलन आणि आस्वादन वर्णनात्मक (Descriptive) बाजूने करता येण्यासारखे नसून त्याला मूल्यात्मक (Evaluative) दृष्टीकोनातून आस्वादिण्याची गरज आहे, असे वाटते. या आकाराने छोटया असलेल्या ललीतकृतीत 'का ? कोठे ? व कसे ?' या प्रश्नांना मूळातच स्थान नाही. काल आणि अवकाशाची बंधनं इथे अस्तित्वात नाहीत. कारण आपल्या असंज्ञ मनात वा नेणिवेत फक्त जीवन–तृष्णेने डागाळलेल्या इच्छा आकांक्षाच जाऊन बसतात असे समजण्याचे कारण नाही. इतरही अनुभव तेथे जमा होतात. त्यांच्याशी आपली मुक्त प्रतिमा रमते, खेळते, विहरते, त्यातील काही निवडते, त्यांचे रूपबंध बांधते आणि स्वप्नांच्या रूपाने सादर करते, असे प्रा. प्रभाकर पाध्ये आपल्या 'सौंदर्य–मीमांसे'त म्हणतात; ते ग्राह्य वाटते. विशेषत: 'डिस्गस्ट १९७३' सारख्या कथांची मीमांसा करताना प्रा. प्रभाकर पाध्यांचा हा निकष (Criteria) मला स्वागतार्ह वाटतो. त्यादृष्टीने 'डिस्गस्ट १९७३' ही कथा 'अनुभवक्षमतेचा विशुद्ध प्रयोग' ठरेल. कै. आचार्य अत्रे यांना स्वप्नातून स्फुरलेले–माझ्या आठवणीप्रमाणे 'घराबाहेर' हे नाटक कवी वसंत बापट आणि पु. शि. रेगे यांच्या काही प्रकाशित कविता या 'अनुभवक्षमतेच्या विशुद्ध स्वरुपात' मोडतात.

'सौंदर्यानुभव' या आपल्या बहुचर्चित ग्रंथात प्रा. प्रभाकर पाध्ये यांचे अनुभवविषयक विश्लेषण मुलभूत स्वरूपाचे मानायला हवे. चेतकांचा ज्ञानेंद्रियांशी संयोग झाल्यावर संवेदना निर्माण होते. एखाद्या प्रसंगविशेष व्यक्तिसमष्टिसंदर्भात निर्माण होणाऱ्या अनुकूल–प्रतिकूल प्रतिक्रिया (Pro-or Contra feelings) ही जीवनमूलक गरज आहे, असा श्री. पाध्ये यांनी निष्कर्ष काढलेला आहे. प्रभाकर पाध्यांचे हे निष्कर्ष म्हणजे नुसते 'सायको–अनॅलिसीस' किंवा मानसपृथक्करण नसून ते 'फिजोसायको अनॅलिसीस' आहे, हे उघड आहे. नुसत्या मानसशास्त्रीय पृथक्करणापेक्षा शरीरशास्त्राशी त्याची सांगड घालून केलेले अनुभवांचे आकलन आणि पृथक्करण अधिक भक्कम आणि निर्दोष व्हावे, असा विसाव्या शतकाच्या आरंभी एक सूर होता. परंतु नंतरच्या काळात अस्तित्ववाद नित्शे आणि किर्केगार्ड यांच्या कितीतरी पुढे निघून कामू आणि सार्त्रपर्यंत येऊन थडकला. काही विद्वान चिकित्सकांना मानसशास्त्राची विज्ञानाशी सांगड ही आवळयामोपळयाची मोट बांधणे आहे, असेही वाटले. या विद्वानांच्या मते सौंदर्याचा विचार फक्त मानसशास्त्रीय भूमिकेवरून व्हावयास पाहिजे, त्याला इतर शास्त्रे चिकटविण्याची गरज नाही. दुसऱ्या शब्दात सौंदर्यविचार विज्ञानाच्या चौकटीत बसवून विचार करण्यासारखी प्रयोगशील वस्तू नाही. तो नुसता वस्तुगत भाव आहे. हवेला अस्तित्व आहे, ही गोष्ट जशी प्रयोगाने सिद्ध करता येते, तशी 'मन' नावाची संकल्पना प्रयोगाच्या मुशीत पकडता येण्यासारखी नाही. तेव्हा सौंदर्यविचार हा विज्ञानाच्या दृष्टिकोनातून व्हावा; ही धारणाच मुळी चूक आहे. अतः प्रा. प्रभाकर पाध्ये यांचे सौंदर्यविषयक विचार अस्तित्ववाद्यांच्या मते कालबाह्यच नव्हे, तर 'अप्रयोजक' आहेत.

'कालबाह्य' या शब्दाचा गुळमुळीतार्थ तेवढा इथे प्रतीत होतो. कारण एखादा विचार 'कालबाह्य' आहे असे ठरवितांना तो पूर्वी कधीतरी काळाच्या परिघात शिरावयास हवा. कालाच्या परिघात पूर्वी कधीही न शिरलेला विचार आज जर नोंदल्या जात असेल, तर प्रा. पाध्यांचा हा विचार कालबाह्य कसा ?

शिरवळकरांच्या कथेच्या अनुषंगाने हे थोडे विषयांतर झाले, याची कल्पना आहे. परंतु 'डिस्गस्ट १९७३' या कथेची पार्श्वभूमी शोधताना या परस्परविरोधी मतांचा परामर्श घेणे आवश्यक वाटले. हे म्हटले तर विषयांतर आहे, आणि मानले तर विषयानुसंधानही! शिरवळकरांची कथा अबोध संवेदनांचा नुसता परिचय आहे. क्रियांचाही नुसता अ-भावात्मक परिचय आहे. हा अनुभव शुद्ध स्वरूपात प्रतीत होणारा आहे. त्याचा निखळ प्रतिभेशी तेवढा संबंध आहे. कलेचे जाणिवेतील रूप ते हे नव्हे.

थोडक्यात शिरवळकरांच्या कथेचे सार म्हणजे कल्पना, स्वप्न आणि मित प्रतिभेचा संमिश्र आविष्कार होते.

'दसरा उजाडला' या नागनाथ कोत्तापले यांच्या कथेचा 'एक उपहासगर्भ कथा' म्हणून उल्लेख करता येईल.

प्रतिष्ठान मार्च ७४ (पृष्ठ २८) या अंकातूनच 'तांबे आणि त्यांचे काव्य' या परीक्षणलेखात उषा मा. देशमुख यांनी गूढ ललितकृतीवर विचार व्यक्त करीत तांब्यांचे विचार त्यांच्याच शब्दात कसे व्यक्त होतात याचे एक उदाहरणच दिले आहे.

कविवर्य तांबे म्हणतात, "मनुष्याच्या अंतरंगाशी वास्तवाचा गूढ व्यवहार चालू असतो, तो संवाद विश्वाच्या अजस्र दडपणामुळे सामान्य जनांना ऐकू येत नाही. अशा या गूढ व्यवहारातच ललित कलेचे बीज आहे. निसर्गातील वस्तू त्या वस्तूची प्रतिकृती आणि ललित कलाकाराची व्यक्ती ही तीन अंगे परस्परात मिसळून ललितकृती सिद्ध होते. ललित कलाकार हा आपल्या हृदयाच्या साह्याने भावांच्या पंखावर आरूढ होऊन वास्तवावर भरारी मारतो आणि स्वर्ग-पाताळातील रहस्ये उलगडतो."

अद्‌भुतरम्य किंवा गूढसदृश भासणाऱ्या कथेवरील या भाष्यानंतर शिरवळकरांच्या कथेवर आणखी काही लिहायचे प्रयोजन राहत नाही.

एप्रिल १९७४ च्या कवितातून त्यावेळी नवी असलेली काही नावे पहाटेच्या काळोखातून बाहेर डोकावताना दिसतात. नमिता चंद्रपुरेसारखी काही नावे पुनरावृत्त होताना दिसली, तरी शशिकांत लोखंडे, नारायण कुळकर्णी अशी आजची प्रस्थापित नामावली प्रतिष्ठानमध्ये प्रथमच येताना दिसते. नमिता चंद्रपुरे यांचा चौकार इथे पंचेन्द्रियांच्या प्रतिकांभोवती घुटमळून हुकलेला आहे, तर कवठेकरांनी 'हायकू'चे वेड घेतल्यासारखे दिसते. शशिकांत लोखंडे यांचा गूढ आणि भावसमृद्धतेचा 'षट्कार' मात्र संपादकांनीही सीमापार होत असलेला पाहिला आहे :

"तू कोर : कमंडलूवर तहानी हरणं उरात बाण घेऊन सैरावैरा होणारी." (प्रतिष्ठान एप्रिल ७४).

■

३०, 'विजय' जि. प. क. कॉलनी
बिदर्भ महाविद्यालय अमरावती, ४४४६०४.

तीन केशवसुत

मधु जामकर

कविवर्य कृष्णाजी केशव दामले, बाळ सीताराम मर्ढेकर आणि नारायण गंगाराम सुर्वे यांच्या कवितेचा, आधुनिक मराठी कवितेच्या संदर्भात विकासाचा क्रम पाहिला म्हणजे एक प्रश्न समोर सहज उभा राहतो. अलिकडे आपण मराठी कवितेत संप्रदाय मानू लागलो आहोत. विशेषतः मराठी सामाजिक कवितेत केशवसुतांचा संप्रदाय, मर्ढेकरांचा संप्रदाय किंवा सुर्वे यांचा संप्रदाय अशी भाषा आपण सरळ वापरतो. हे कितपत योग्य आहे याचा विचार आपण केला पाहिजे. संप्रदाय कल्पनेत एक महत्त्वाची गोष्ट अशी असते की आपण ज्या गोष्टीचा स्वीकार करतो तिचे प्रतिपादन करताना इतर गोष्टी नाहीत असे सांगावे लागते; पण वरील तिन्ही कवीत विशेषतः त्यांच्या सामाजिक कवितेत एकमेकांना जे अभिप्रेत आहे ते सारे काही आहे. या तिन्ही कवींच्या कवितेची पार्श्वभूमी एकच आहे. यांच्या कालखंडात काही संकेत रूढ झालेले होते. साहित्याचे विषय अमके असावेत. त्या विषयाची एक प्रकारची संगती असावी, कवितेची रचना, त्यातील प्रतिमा व त्याची भाषा अमुक प्रकारची असावी असा दंडक घातलेला होता. त्यामुळे कवितेची एक बंदिस्त चौकट तयार झालेली होती. केशवसुत, मर्ढेकर आणि सुर्वे यांनी ही सगळी चौकटच मुळी मोडून तोडून टाकली. या तिघांनी प्रतिभावंताना रूढ संकेतांच्या बंधनांतून मुक्त केले आणि मराठी कवितेच्या क्षेत्रात स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले. यामुळे मराठी कविता अधिक संपन्न झाली. या तिघांच्या कवितांमुळे नव्या प्रकारच्या संगती जुळवणे शक्य आहे हे प्रतिभावंतांना कळून आले, अशा तऱ्हेने मराठी कविता संपन्न झाली. परंतु या तिघांच्या कवितेत मराठी कवितेचा विकास उत्तरोत्तर सूक्ष्म होत गेलेला दिसून येत असला तरी प्रत्येकात एक समानधर्म अढळ असलेला दिसतो. यात स्थूळाकडून सूक्ष्माकडे जाण्याचा एक अखंड प्रयत्न झालेला दिसून येतो. म्हणून कवितेच्या विकासात या तिघांचे वेगळे संप्रदाय नीटपणे बसूच शकत नाही. म्हणून हे संप्रदाय नसून विकासाचे वेगळे टप्पे वाटतात.

या तिन्ही कवींनी मराठी कवितेच्या स्वरूपात असा मूलभूत बदल केला. काव्याचे विषय; काव्याची रचना, काव्यातील प्रतिमा व काव्याची भाषा यांच्या विषयींचे अनेक रूढ संकेत त्यांनी मोडून टाकले. म्हणून यांना आपण पहिले, दुसरे आणि तिसरे केशवसुत म्हणू या. मराठी कवितेच्या मोडणीत, परंपरेत या कवींनी मराठी मनाची एक घडण आणून सोडली व एक नवनिर्मिती केली. यामुळेच की काय या तिन्ही कवींची कविता कुठल्याही जातीच्या मोहात न अडकता, कुठल्याही अभिरुचीचे मर्यादित बंधन न स्वीकारता ती स्वतःवर स्थिर आहे. कारण जातीपेक्षा कलावंताच्या मोहात अडकणारे मन या कवींजवळ आहे. हे कवी जन्मभर कवितेच्या संदर्भात समतेची भूमिका घेत राहिले. यामुळे यांचे मन आग्रही होते पण आक्रस्ताळी नव्हते. त्याचबरोबर ते संयमी व समंजस राहिले. समाजाच्या संदर्भात जातीपलिकडे व कवितेच्या संदर्भात विशिष्ठ अभिरुचीपलिकडे यांची कविता जाते व मानवी मनाच्या मूलभूत कक्षा विस्तारीत जाते; किंबहुना माणूस या केंद्राभोवतीच तिला आपला परिघ ठेवावासा वाटतो. केशवसुत काय, मर्ढेकर काय किंवा सुर्वे काय यांच्या काल-

खंडाचेच पडसाद या कवितेत दिसत असले तरी ही कविता परिस्थितीशरण राहत नाही. प्रासंगिक होत आहे. वर्ग किंवा पक्ष यांच्या विचार प्रचारातून पुढे येत नाही. ती सरळ माणसाकडून माणसाकडे जाते आणि येते. तिची क्रांतीची भाषा, बदललेल्या आशयाची रचना किंवा अभिव्यक्तीची कल्पना वेगवेगळी असली तरी ही क्रांती मानवसन्मुख व कलावंतसन्मुख आहे.

केशवसुतांचा भर 'जुने जाऊ द्या मरणालागुनि 'पेक्षा 'प्राप्तकाल हा विशाल भूधर ! सुंदर लेणी तयात खोदा' यावरच अधिक आहे. मर्ढेकरांना 'जेथे निघे धूर । तेथे आहे अग्नी । आम्ही जमदग्नी । प्रेतरूपी' या रूपात माणसाचे माणूसपणच या यांत्रिक वास्तवपणात हरवलेले दिसते. त्यांची कटु व विदारक जाणीव सभोवतालच्या वास्तव मूल्यात अर्थपूर्ण दिसते. पण माणसाच्या दैनिक जीवनामुळे या मूल्यात्मक आकांक्षा पूर्ण होत नाहीत. 'प्रेतरूप जमदग्नी' या केंद्रीय प्रतिमेत मर्ढेकर तपशिलाचा भाग दाखवीत नसून अनुभवाचा भाग दाखवितात. केशवसुतांच्या 'निजनामे त्या वरती नोंदा' यातील माणूसपण आणि मर्ढेकरांचे यांत्रिक जीवनावरील अर्थशून्यतेचे माणूसपण एकच आहे. सुर्वे यांना देखील 'रोजीचा रोटीचा सवाल रोजचाच आहे.' या पार्श्वभूमीवर जी क्रांती करावी वाटते तिचे स्वरूप 'सारस्वतांनो ! थोडासा गुन्हा करणार आहे.' असे असले तरी ते कवितेच्या संदर्भात 'जसा जगत आहे. मी तसाच शब्दात आहे.' या भूमिकेनेच येतात. याचा अर्थ हे तिन्ही कवी प्रथम माणूस आणि नंतर कलावंत होऊन आपली कविता अद्वैत करतात. केशवसुत, मर्ढेकर आणि सुर्वे यांच्या काळाची पार्श्वभूमी लक्षात घेता हे तीन विकासाचे महत्त्वपूर्ण टप्पे वाटतात.

याचा परिणाम असा झाला की या कवींना आपल्या कवितेत माणूस महत्त्वाचा वाटला. पुढील उदाहरणे या दृष्टीने बोलकी वाटतात.

'देव दानवा नरे निर्मिले हे मत लोका कवळू द्या'–केशवसुत
'ह्या नच मुंग्या : हीच माणसे
असेच होते गांधीजीही
येशु क्रिस्त अन् कृष्ण कदाचित्
कालिदास अन् टैकोव्राही '–मर्ढेकर

'तरी का कोण जाणे । माणसा इतका समर्थ सृजनात्मा मला भेटलाच नाही.'–सुर्वे
या माणूस माहात्म्यामुळे ही कविता आपल्या अवतीभवती असलेली परिस्थिती विसरून माणुसकीवर आपले लक्ष केंद्रित करते. शिवाय या तिन्ही कवींच्या वाटचाला आलेले जीवन तसे अर्थशून्य असले तरी त्यामागे आपल्या वास्तवाची कडवट जाणीव आहे. भलेही जाणीव मध्यमवर्गीय स्वरूपाची किंवा त्याहून भिन्न अशा दलित वर्गाची असली तरी तिचा तपशील वेगळा असला तरी अंतर्यामी तिचे तत्त्व मात्र एकच आहे. हे देखील या तीन कवींच्या पुढील उदाहरणावरून स्पष्ट दिसून येईल.

'भिकार या जगी । इच्छित न मिळे काही
म्हणुनी तुझे पायी । भिक्षां देहि" –केशवसुत

केशवसुतांच्या या ओळीत जीवनविषयक जो त्रागा आहे तो त्यांच्या मानवी वृत्तीशी सुसंगत आहे. 'चिंता भय दुःखे । अवघी दूर झाली.' या भूमिकेतून ते स्थिरावतात ते 'भिक्षा देहि' या पदावर. यामुळेच की काय त्यांच्यापुढील ओळी अधिक आशयघन होताना आपण पाहतो. कवी आणि कविता एकच पाहतो.

'अमुचा पेला दुःखाचा
डोळे मिटुनी प्यायाचा
पिता बुडाशी गाळ दिसे
त्या अनुभव हे नाव असे

फंकुनी द्या तो जगावरी
अमृत होउ तो कुणावरी '–केशवसुत

येथे कडवट भूमिकेतून आपल्या जगण्याचे स्वरूप दाखवितो. त्यात अर्थशून्यतेबरोबर जगण्याची दुर्दम्य मनीषा दिसून येते. मर्ढेकरांना देखील आपली जीवनानुभूती अशीच वाटते.

'अशा येथल्या संसारात
जगण्याचाही चुकला पाढा
आणि शेवटी परिस्थितीचा
गळचा खालती उतरे काढा '–मर्ढेकर

येथे कवी उपरोध, अगतिक सूराने आपले लक्ष वेधत असला तरी त्याचे मुख्य लक्ष मानवी जीवनावरच आहे.

' सर्वे जन्तु रुटिनाः । सर्वे जन्तु निराशयाः
सर्वे छिद्राणि पंचन्तु । मा कश्चित् दु:ख लॉग् भरेत ''–मर्ढेकर

नारायण सुर्वे देखील अगदी याच भूमिकेतून मानवी जीवनसन्मुख आपली कविता वाचकांपुढे ठेवतात. जीवनाचे, जगण्याचे स्वरूप दाखवीत या कवीने शेवटी प्रत्यक्ष जीवनच आपल्यापुढे साकार केले जसे :

' झोत भट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले
दोन दिवस वाट पाहाण्यात गेले, दोन दिवस दु:खात गेले '–सुर्वे

इथे देखील कडवट सूर स्थिर होतो तो पुढील भूमिकेवरच :

' आता आलोच आहे जगात वावरतो आहे या उघडचा नागडचा वास्तवात
जगायलाच हवे, आपलेसे करायलाच हवे कधी दोन घेत कधी दोन देत '–सुर्वे

इथे कडवट, अगतिक तडजोडवादी भूमिकेने मानवी जीवनाचा पुन्हा नवा, वेगळा पदर कवी आपणास दाखवून देतो. यावरून हे तिन्ही कवी अर्थशून्य, परिस्थितीजन्य भूमिका आपल्या कवितेतून मांडत असले तरी त्यांना शेवटी मानवी जीवनाचा शाश्वत स्तर आपल्या कवितेतून दाखववायाचा आहे. आपआपल्या काळानुसार, परिस्थितीप्रमाणे या कवींची कविता वेगळे वळण घेत असली तरी प्रत्येकात एक समान सूत्र दिसून येते. यातून विफलता हे वैचारिक मूल्य या कवींच्या कवितेतून दिसून येते. यामुळे या कवींच्या काव्याला अंतर्गत व्यापकता आणि खोली प्राप्त झालेली आहे. आपली समाजरचना जी मानवजातीवर लादली गेली आहे तिचा अपरिहार्य परिणाम या कवींच्या व्यक्तित्व–शून्यतेवर झालेला दिसतो.

या विफलतेचे दुसरे टोक या कवींची अदम्य अशी आशावादी वृत्ती होय. किंबहुना जे विफलवादी असतात तेच खरे क्रांतिवादी कविता लिहू शकतात. केशवसुतांना कविता हे एक साधन वाटत असले तरी तिच्या द्वारे होणारी क्रांती ही मानवी जीवनसाध्य वाटते. माणसावर, माणुसकीवर लक्ष केंद्रित करणारे केशवसुत जेव्हा लिहितात :

' पद्यपंक्तिची तरफ आमुच्या करी विधीने दिली असे
टेकुनी ती जनता शीर्षावरी जग उलथुनिया देउ कसे '

तेव्हा त्यांना देव दानवांना निर्माण केलेल्या माणसांचीच पार्श्वभूमी लक्षात घ्यावी लागते. आणि ही मोडतोड सुद्धा कशासाठी तर :

' मूर्ती फोडूनीया । देऊ जोडोनीया
परी विकूनीया । टाकू न त्या '

केशवसुतांना आपल्या परिस्थितीवर मात करायची असली तरी शेवटी तिला जे जोडायचे आहे ते माणुसकीनेच.

मर्ढेकरांना अभिप्रेत असलेला वैफल्यवाद हा देखील जीवनमूल्यांचा संदर्भात उफाळून येणारा आशावाद दाखवितो.

'घडल्या गोष्टी विसरुनि जा अन्
नडल्या आशा चुलीत फेका
जिवंतता जर असेल रोमी
मरण तिच्यातिल थोडे हुडका'

या कवितेत जुनी मूल्ये मानवाला खेळवितात. त्याला नव्याचा स्वीकार करता येत नाही. चाकोरीबद्ध जीवनात मर्ढेकरांना पलायनवाद अमान्य आहे. तो क्षुद्र भीतीचे अपत्य वाटतो. या पलायनवादा-विरुद्ध ते शरसंधान करतात. मर्ढेकरांच्या कवितेत जे नैराश्य येते ते तत्त्वज्ञानाचे नैराश्य आहे. उलट त्यांचा आशावाद मात्र माणुसकीने ओथंबलेला आहे. या कवितेत माणसाची इच्छाशक्ती, सभोवतालचे वास्तव, नियती आणि अंतिम शक्ती यांचे एकाच वेळी कलात्मक दर्शन घडते. यातून जीवनानुभवाचा आलेख स्पष्ट दिसतो. जेव्हा त्याचे वैफल्य विश्व, मन, पृथ्वी, जन्म, मरण या विषयीचे अनेक प्रश्न निर्माण करते तेव्हा ते मानवी बुद्धीतून उत्तरे देऊ शकत नाही. या प्रश्नाचे उत्तर देण्यास मानव असमर्थ आहे. हे त्याने ओळखून अधिक जीवनवादी व्हावे असे त्यांना वाटते :

'नळीतले जग नळीत जगते
उगाच रुसवा रसायनाचा
उगाच दावा मानवतेचा
आणि डंका सामर्थ्याचा'

या ओळीत मर्ढेकरांनी मानवी सामर्थ्य आणि मर्यादा अधिक स्पष्ट करून सांगितल्या आहेत. त्यांचा आशावाद वास्तवसन्मुख असल्याने तो अधिक जीवनवादी वाटतो. इथे त्यांना तत्त्वज्ञानापेक्षा आपला माणूस अधिक जवळचा वाटतो. म्हणून ही कविता माणसाचा आशावाद प्रकट करते.

सुर्वे यांना अभिप्रेत असलेली क्रांती परिस्थितीपुढे शरणागती पत्करणारी असली तरी तिच्यात उफाळून येणारा संघर्ष कमालीचा आशावादी. तो सूर्यपुत्र, सूर्यफूल या प्रतिमेतून स्पष्ट होतो. 'जाहीरनामा' सुर्वे याच भूमिकेतून दाखवितात. त्यांचा आफ्रिकीचाचा जो क्रांतीची भाषा बोलतो तिचे स्वरूप :

'हमारा खून झिंदावाद। वाटले चाचाने उलथलाच पृथ्वीगोल
खळाळल्या नसानसात लाटा, कानांनी झेलले उत्थानाचे बोल
अडकवून साखळदंडात सिंह सोजिरांनी बोटीवर चढवला
बेटा, गदगदला कंठ एक अश्रु खमीसावर तुटून पडला'

या शब्दातून येत असले तरी, त्यात आपल्या वास्तवतातून येणाऱ्या मानवी जीवनाचे अधिक महत्त्व आहे. हे जीवन माणुसकीतून येते. त्यांचा आशावाद पोकळ, अवास्तव किंवा आक्रस्ताळी प्रचारकी थाटाचा नाही. तो हाडामासाच्या माणसाशी निगडीत आहे. त्याचे स्वरूप सुर्वे पुढील ओळीत अधिक स्पष्ट करून देतात :

'प्रत्येक रात्र आत्म्याशी चर्चा करण्यात घालविली
एक आम्हीच असे निघालो, बेइमान झालो नाही'

यावरून केशवसुत, मर्ढेकर आणि सुर्वे यांना आपल्या जीवनात कविता ही जीवनसाथी वाटते. ती विरंगुळा देते. साधनातून साध्याकडे नेते. प्रसंगी ती जीवनविषयक जी अर्थशून्यता देते तिचाच एक

अपरिहार्य भाग आशावाद म्हणून येतो व तो शेवटी माणुसकीत विसर्जित होतो. हे तिन्ही कवी सामाजिक विचार, सामाजिक जाणिवा कवितेतून असे काही दाखवितात की ती शेवटी माणसाळलेल्या जीवनाचीच बांधिलकी होऊन येते.

या बांधिलकीमुळेच या कवींची भाषा देखील अधिक जीवनस्पर्शी झाली आहे. केशवसुतांना 'आम्ही कोण' या कवितेत समस्त प्रतिभावंतांना आपल्या दर्पोक्तीतून मानवी मनाचा अगम्य असा खेळ दाखवावयाचा आहे. तर मर्ढेकरांच्या कवितेत चटकदार जिवंतपणा व अंतःकरणपूर्वकता आहे. तीत सौंदर्यशोधक डोळसपणा आहे. भावनेची संस्कारक्षमता व मधुर गेयता आहे. ही कविता पोकळ अतिशयोक्तीपासून, गर्जनाऱ्या आवेशापासून दूर राहिलेली आहे. सुर्वे देखील आपल्या कवितेत परंपरेचा आढावा घेत आशय अभिव्यक्तीच्या अद्वैतातून जीवनसन्मुख भावानुभव अधिक बोलका करून देतात. किंबहुना ही कविता सुर्वे यांच्या जगण्याचा हुबेहूब आलेख आपणापुढे ठेवते. हे तिन्ही कवी ज्या काळात जगले. ज्या परिस्थितीतून आपल्या कवितेला साकार करू लागले तो काळ इतिहासजमा होणारा असला तरी त्याच्याशी निगडीत असलेली कविता मात्र काळापलिकडे जाणारी आहे. ती कुठल्याही वर्गाशी निगडीत राहो, कुठल्याही अभिरुचीशी संबंधित राहो किंवा कुठल्याही तत्त्वज्ञानाशी बांधली जावो, तिचे शाश्वत स्वरूप मात्र मानवी प्रेरणेशी जोडल्याने ते मराठी वाङ्मयात अक्षय झाले आहे. आशय-अभिव्यक्तीच्या संदर्भात या तिन्ही कवींची पुढील उदाहरणे याची साक्ष देतील.

'क्लृप्तीची मग करूनी नौका व्योम सागरावरि जाऊ,
उडुरत्ने या गरिब धरेला तेथुनि फेकुनिया देऊ' -केशवसुत.

'पिपात मेले ओल्या उंदिर
माना पडल्या, मुरगळल्याविण
ओठावरती ओठ मिळाले
माना पडल्या आसक्तीविण' -मर्ढेकर

'कधी विचार असे येतात
जसे थकून यावेत तिसऱ्या पाळीचे कामगार घरात
कुदळ घालून रस्ता खोदणारे शब्द
चिंब भिजून निथळत सावलीत दमून बसतात' -सुर्वे

मराठी कवितेला या तिन्ही कवींनी ज्या विकासाच्या टप्प्यातून पुढे नेले त्याचा आलेख तपशिलाने वेगळा असला तरी त्याचे सूत्र शेवटी मानवी जीवनसन्मुख असलेले दिसते. या तीन कवींची, पर्यायाने त्यांच्या कवितेची अंतर्यामी प्रकृती एकच आहे.

या तीन कवीत समानधर्मा दिसण्याचे कारण या कवींचे कवितेविषयी असलेले आत्यंतिक प्रेम. केशवसुतांना कविता विजेप्रमाणे जाज्वल्य वाटत असली तरी ते तिच्याशिवाय जिवंत राहू शकत नाहीत. 'भृंग' या कवितेत त्यांनी कलात्मक दुःख व्यक्त केले आहे. 'आम्ही कोण' या कवितेत त्यांनी व्यक्त केलेला दुर्दम्य आशावाद त्यांचा काव्यविषयक दृष्टिकोन स्पष्ट करतो. कविता त्यांना मनोहारिणी वाटते, तुतारी वाटते. तिचे स्वरूप क्षणात नाहीसे होणारे दिव्य भास वाटते. ते कवितेवर फिर्याद करतात. हिचेच दर्शन त्यांना 'वातचक्र', 'म्हातारी'तून घडते. 'शब्दांनो! मागुते या' या कवितेचा शेवट केशवसुतांच्या शब्दातच पाहण्यासारखा आहे.

'वाग्देवी शारदे गे! फिरवुनि अपुले शब्द पाचार येथे
साहाय्यावीण त्यांच्या भजन तव कसे सांग साधेल माते?
आशा मेघालि चितानल अजि विझवू जाहलीसे तयार
शब्दांनो, मागुते या, बहर मम मनी नूतन येईल फार.'

मर्ढेकरांना आपल्या कवितेविषयी अशीच ओढ आहे. ते या कवितेतून एकीकडे सभोवतालच्या वास्तवाचे चित्रण करतात तर दुसरीकडे वास्तवाची मूल्यात्मक जाणीव दाखवितात.

> 'अहो शब्दराजे, ऐका। लाज सेवकाची राखा
> नाही तरी वरती काखा। आहेत ह्या'

वास्तव आणि निरर्थक बनलेले मूल्य एकरूप करून मर्ढेकर फटकळ वृत्तीतून दाखवितात. अशी कविता त्यांची पापणी नेहमी जागी ठेवते. तिला द्रौपदीचे सत्व मिळालेले असते. तिला साधकाचे पसायदान प्राप्त झालेले असते. तिचा आकार भरलेल्या हृदयातून गच्च लगाम दाखविणारा असतो. आपले प्रवाही पण दिशाहीन, सूरहीन, जीवन याच कवितेमुळे आपलेसे वाटते. मर्ढेकरांसह या कवितेला काळ्यावर पांढरे आणि पांढऱ्यावर काळे एकाच वेळी करायचे असल्यामुळे ही कविता मर्ढेकरांना सोडू शकत नाही किंवा ते तिला सोडू शकत नाही. तिच्या बाबतीत रसिक एवढेच म्हणेल :

> 'किती पायी लागू तुझ्या
> किती आठवूं गा तूंते
> किती शब्द बनवू गा
> अब्द अब्द मनी येते.'

सुर्वे यांची कवितेविषयक भूमिका अशीच जीवनवादी आहे. ते कवितेवरचा विश्वास पुढीलप्रमाणे व्यक्त करतात :

> 'थांबु तर शकत नाही आणि तुमचे हे असे औदासीन्य
> एका नव्या संघर्षासाठी घुमाळीत घुसू नये तर काय करावे ?'

या कवितेचा प्रवास सूर्यकुळातील लोकांचा असल्याने तिला थांबणे माहित नाही. ती प्रखर वास्तववादी आहे. संघर्षवादी आहे. विद्रोहवादी आहे. पण या सर्वात तिचा अंगभूत संयम अधिक कलावादी झालेला आहे. तिने मराठी कवितेचा मागोवा घेत, मराठी अभिरुचीचे अंदाज घेत आपल्या प्रकृतीचे वेगळे न्याय अधिक सुसंगत केले आहेत. दुधात साखर विरघळून जावी तशी ही कविता जगण्यात मिसळून जाते. यामुळेच तिचा अभिप्राय 'माझ्या देशाच्या नोंदबुकात' अढळ होऊन राहतो. त्यांच्या कवितेचा प्रारंभ :

> 'एकटाच आलो नाही युगाचीही साथ आहे
> सावध असा तुफानाची हीच सुरुवात आहे
> कामगार आहे मी तळपती तलवार आहे
> सारस्वतांनो ! थोडासा गुन्हा घडणार आहे'

या ओळीतून होते. आणि शेवट ;

> 'आणि दोस्त हो !
> मी पांहतो आहे
> एक क्षुब्ध नवागत गतीचे टोक धरून लिहतो आहे :
> हे शब्द हटवा...हे पुतळे...स्थितिस्थापक
> हवा आहे मनासारखा नवा जाहीरनामा म्हणून.
> नवा जाहीरनामा म्हणून.'

या अर्थपूर्ण, कलापूर्ण, भाववेड्या जीवनवादी दृष्टीतून होतो. असे या तीन कवींचे कवितावेड घातक ओलांडले तरी आपल्या मूळ प्रकृतीपासून दुरावले नाही.

या कवितेचे आणखी एक वैशिष्ट्य हे आहे की ती व्यक्ती आणि समष्टी यांना एकाच पातळीवर सदैव ठेवते. या तिन्ही कवींच्या कवितेतून येणारा 'आम्ही' हा समष्टीतून व्यक्तीकडे व

व्यक्तीकडून समष्टीकडे आपले व्यक्तिमत्व अधिक स्पष्ट करून देतो. केशवसुतांना आपला व्यक्तिवाद संघशक्ती म्हणून दाखवावा वाटतो.

'संघशक्तिच्या भुईत खंदक
रुंद पडुनि शे तुकडे झाले
स्वार्थनिपेक्ष जीवी अपुले
पाहिजेत ते सत्वर भरले
घ्या त्यात उडचा तर वेलाशक'

या ओळीतून आपल्यातील संघशक्ती पार नाहीशी झाली आहे. तीत पडलेले खोल खंदक भरण्याला आपले जीव दिले पाहिजेत, त्यात उडचा घ्या असे केशवसुत सांगतात. या व्यक्तिवादाचे स्वरूप 'नवा शिपाई' आणि 'आम्ही कोण'मध्ये अधिक व्यापक होते.

'पूजितसे मी कवणाला ? तर पूजितसे अपणाला
अपुल्यामध्ये विश्व पाहुनी, पूजी मी विश्वाला'

या विशाल दृष्टीचा आत्मविश्वास देखील तितकाच जोरकस आहे. तो पुढील ओळीत स्पष्ट होतो.

'आम्हाला वगळा-गतप्रभ झणी होतील तारांगणे
आम्हाला वगळा-विकेल कवडीमोलावरी हे जिणे'

अशी ही केशवसुतांची क्रांतीसन्मुख कविता व्यक्तिवादातून समष्टीकडे जाते. मर्ढेकरांना देखील आपल्या काळात आपल्या 'आम्ही'चे स्वरूप गहिऱ्या व्यक्तिवादाने भरलेले दिसते. यातून त्यांची उपहासगर्भता, शोकगर्भता मिस्किलपणे आलेली दिसते. त्यांचा उपहास, त्यांची मूल्यावरची श्रद्धा व त्या मूल्याची मानवी जीवनातील अपरिहार्यता एकवटते. उदाहरणार्थ,

'मोले घाडी जो मराया । नाही आसू आणि माया
त्यासी नेता बनवावे । आम्हा मेंढरांस ठावे.'

'आम्ही जमदग्नी' या प्रतिमेतदेखील मूल्यात्मक आकांक्षा पूर्ण होत नसल्याचा उपहास आहे.

'आम्ही ज्ञानवंत भोगलो । ना पश्चातापे पोळलो
नाही कधी हळहळलो । तुझ्या मला'

यात विज्ञान व बुद्धिवाद मानवसन्मुख ठेवण्याची तळमळ आहे. ज्ञानवंत व परमेश्वर यांचा काहीच उपयोग नाही असा हा 'वांझ पोटीस इनाम' आहे. मर्ढेकरांच्या समग्र कवितेत 'आम्ही' हा असा कडवट व्यक्तिवादाचे गहिरे रंग घेऊन येतो. त्याला काव्यात्म शोकगर्भतेचा पदर मिळतो.

सुर्वे यांच्या कवितेत 'आम्ही'ला कवितेत खराब व्हायचे होते. याही उपरोधात व्यक्तिवादाचा कलात्मक सूर आहे. या कवितेत 'आम्ही'शी साधलेला संवाद कवीच्या जीवनवादी व्यक्तित्वाचे स्वरूप दाखवून देतो. आमचे आणि तुमचे या कवितेने दोन भिन्न पदर समष्टीतून दाखविले आहेत.

ज्यांना जन्मभर दुःख दैन्य, दारिद्र्यच मिळाले असेल
त्यांनी तपशीलासह सर्वच नाकारू नये, तर काय करावे ?

असा ते समष्टीवादी सवाल करतात. 'पोष्टर' आणि 'पोर्टरची स्वगते' या कवितात हाच 'आम्ही' एका नव्या जीवनाचा भावपूर्ण प्रत्यय देतो. सुर्व्यांची 'मर्ढेकरांशी एक बातचीत' ही कविता तर या दृष्टीने अधिक बोलकी आहे. उपरोध, उपहास, शोकगर्भता, वैचारिकता आणि व्यक्तिवाद या साऱ्यांचे तीत स्वच्छ प्रतिबिंब पडले आहे. या तिन्ही कवींची कविता एकाच वेळी व्यक्ती व समूहाची होते.

केशवसुतांनी मराठी कवितेत आमूलाग्र परिवर्तन केले. आशय, अभिव्यक्ती व अभिरुची सर्वस्वी बदलून दिली. या कवितेने कवी, कविता, तिचे आकलन, मूल्यमापन यांना देखील आपल्या संदर्भात

नवी दिशा दिली. ती ज्या ऐतिहासिक, सामाजिक परिस्थितीतून आली तिचा अटळ परिपाक ह्या कविता आहे. तिचा सामाजिक दृष्टिकोण वैचारिक असला तरी त्याला मानवी मनाचा भक्कम आधार आहे, कविता आणि कवी, कवी आणि समाज ही द्वंद्वे ती सांभाळून पुढे आली. मर्ढेकरांना केशवसुतांच्या वळणानेच आपली कविता पुढे न्यावी लागली. तिने जुन्या संकेताना छेद दिला. नवी भाषा, प्रतिमा परिस्थितीसापेक्ष केली. परंतु यातूनच तिला विश्वात्मक स्पर्श झाला. हे दोन्ही कवी मध्यमवर्गीय, पांढरपेशी असले तरी यांची कविता या कक्षा ओलांडून पुढे आली. पुढे सुर्वे यांची कविता या दोघांपेक्षा भिन्न होऊन जो प्रदेश, भाषा आशय मराठी कवितेस माहित नव्हता, त्याची दखल घेऊ लागली. मराठी कवितेत, सामाजिक कवितेत या तीन कवींचा वाटा स्वतंत्र असून तो परस्परांच्या व्यक्तिमत्वाशी निगडीत आहे. म्हणून या तिघांचे कार्य एकाच स्वरूपाचे, परिस्थितीनुसार बदलत गेलेले आहे. मराठी कवितेच्या संदर्भात पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या केशवसुतास जी आव्हाने आपल्यापुढे दिसली ती एकाच आत्म्याने बांधलेली आहेत. या कवितेचे शरीर बदलत गेले, आत्मा तोच राहिला. एखाद्या झाडावर फुलाचे फळात रूपांतर व्हावे तसे ह्या तीन कवींचे विकासाचे टप्पे, मराठी सामाजिक कवितेच्या संदर्भात लक्षात घ्यावे लागतील. ■

'दिलासा' स्नेहनगर
परळी वैजनाथ ४३१५१५

'युगवाणी' संबंधी माहिती

प्रकाशनस्थळ : विदर्भ साहित्य संघ, राणी झाशी चौक, सीताबर्डी नागपूर ४४० ०१२; प्रसिद्धीचा नियतकाल : त्रैमासिक. मुद्रकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता : मधुसूदन पांडुरंग बनहट्टी, भारतीय, नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर ४४० ०१२. प्रकाशकाचे नाव, मनोहर म्हैसाळकर, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, सीताबर्डी, नागपूर-४४० ०१२. संपादकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता : सौ. आशा सावदेकर, भारतीय, सी/२, हेमराज अपार्टमेंट्स, १२२, शिवाजीनगर, नागपूर-४४० ०१०. वृत्तपत्राची मालकी : विदर्भ साहित्य संघ, नागपूर.

मी, मनोहर म्हैसाळकर जाहीर करतो की, वर दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे संपूर्णतः खरी आहे.

नागपूर दि. ३० मार्च ८९ मनोहर म्हैसाळकर, प्रकाशक

चांगदेव पाटील : एक आकलन

किशोर सानप

चांगदेव पाटील हा भालचंद्र नेमाडेंच्या 'बिढार', 'जरीला' व 'झूल' या कादंबरींचा प्रमुख नायक. 'कोसला'तील 'पांडुरंग सांगवीकर' कॉलेजचे शिक्षण अपूर्ण सोडून आपल्या गावी परततो. आयुष्यात काहीही करण्याची इच्छा त्याच्या अंगी शिल्लक राहिलेली नसते. फक्त पंचवीस वर्षाच्या आयुष्यातच तो एवढा एककल्ली आणि निराश होऊन जातो की भोवतालच्या जगात त्याला अजिबात 'रस' नसतो. ही त्याची स्थिती त्याच्या स्वत्वाचे 'परात्मतेत' विसर्जन करण्यास उपकारक ठरते. पांडुरंग संपूर्णत्वाने 'बापा'च्या आधीन होऊन जगू लागतो. "मग मी आईवडिलांना, गावातल्या प्रतिष्ठितांना म्हणायला लागलो, तुम्ही जे जे म्हणता ते सगळं मला कबूल आहे. आपण सगळं करू. हे म्हणतात वगैरे ते सगळं. थेट इतकी वर्षे अशी उदाहरणार्थ काढलीच की नाही?" (कोसला पृ. ३२६-३२७) आत्महत्या करणे जमले नाही म्हणून जगण्यासाठीच फक्त जगावे; ही पराकोटीची स्थितिबद्ध परात्मता निमूटपणे स्वीकारून जगणारा पांडुरंग सांगवीकर समाजापासून पूर्णपणे तुटला आहे. अस्तित्ववादाची परमोच्च परात्मता गाठून पांडुरंग सांगवीकर 'भूतकाळ' होऊन जातो आणि 'वर्तमान' आणि 'भविष्य' त्याच्या लेखी कुठेच शिल्लक राहत नाही. पांडुरंग सांगवीकरच्या विलक्षण स्वभावाचा व वेगळयाच नावीन्यपूर्ण शैलीचा धागा पकडूनच पांडुरंग सांगवीकरचा आत्मा गीतेच्या सिद्धांताप्रमाणे आपले जुने वस्त्र आणि नाव मागे टाकून, नवे वस्त्र, नवे शरीर आणि नवे नाव धारण करतो. हे नवेपण आहे चांगदेव पाटलाच्या अस्तित्वाचे आणि व्यक्तिमत्त्वाचे. सांगवीकर 'कोसला'त पंचवीस वर्षाचा असतो. पदवीपर्यन्तचे जेमतेम शिक्षण झालेले. शेवटी परात्म झालेले हे व्यक्तित्व. परंतु 'कोसला'तील परात्मता संपूर्णपणे नाकारून खऱ्या अर्थाने 'स्वयंभू' आणि 'आत्मपर' होण्याचा कसोशीने प्रयत्न चांगदेव पाटील करीत असतो. पांडुरंग सांगवीकरच्या पुढचे म्हणजेच पदवीनंतरच्या शिक्षणाचे, नोकरीचे, स्थिरत्वाची धडपड करण्याचे आयुष्य चांगदेव पाटील जगत असतो. सांगवीकरप्रमाणेच चांगदेवला आई-वडिलांच्या कुटुंबाशी सख्यत्वाचे संबंध ठेवण्याची कधीच गरज वाटत नाही. नात्यागोत्यांचे धागेदोरे सबंध आयुष्यभर गुंफत राहण्याचा सामाजिक विलक्षणपणा चांगदेवला मुळातच आवडत नाही. 'बिढार' 'जरीला' मध्ये काही प्रमाणात आई-वडील-काका यांनी त्याची काळजी घेतलेली असते. चांगदेवकडून या सर्व कौटुंबिक काळजीबाबत काहीही प्रतिसाद मिळत नाही. चांगदेव फुफ्फुसाच्या आजाराने काळवंडलेला, दुर्मुखलेला असतो. आपल्या एकूणच व्यक्तिमत्त्वाबद्दल त्याला फारशी लौकिक आस्था नसते. स्वतःतील मूलद्रव्याचे 'भान' सतत तेवत ठेवून त्याच्या जगण्याचा क्रमिक कार्यक्रम सातत्याने चालू असतो. फुफ्फुसाच्या आजारामुळे 'बिढार'च्या पहिल्या भागात तो खूपच खचून जातो. जगण्याचा अर्थ शोधताना त्याला श्राफ, भैय्या गोखले, नारायण, सारंग, शंकर सारखी कारी मित्रमंडळी भेटलेली असते. भंकस सामाजिक वातावरणात जगताना चार चांगले मित्र मिळाले की चांगदेव आपले अंतर्विरोधी लयीचे

विश्व क्षणभर विसरून भौतिक जगात रमू लागतो. साहित्यिक गप्पागोष्टी, लघुअनियतकालिकांच्या चळवळीत, साहित्य जगातील भ्रष्टाचारावर आगपाखड करून, जीव ओतून धडपडू लागतो. आणि अशाच धडपडीतून एकदा मरतामरता वाचतो. एम. ए. इंग्रजी झाल्यावर मुंबई आवडत असूनही तो सोडून एका आडगावात नोकरीसाठी जातो. मुद्दामहून मुंबई सोडून तो स्वतःला एका नव्या वातावरणात रमवू पाहतो. मागचे सर्व वर्ष विसरून नव्याने जगण्याची एक अफाट जिद्द 'बिढार'च्या दुसऱ्या भागात त्याच्या अंगी संचारते, तो ख्रिस्तबंधू माणिकराव कॉलेजमध्ये जॉईन होतो. या गावात पाणी, खोली, हॉटेलं अशा अनेक गोष्टींची मारामार. तरी बरेच दिवस तो 'मेवाड लॉज' वर दिवस काढतो. इथेही त्याला गायकवाड–पवार–शबीर–सारखे जगण्यासाठी आवश्यक असलेले सच्चे मित्र भेटतात. तरी याही वातावरणात आणि एकूणच गावाचा त्याला उबग येतो. पुन्हा तो गाव बदलण्याचा निर्णय घेतो. जेमतेम एक वर्ष नोकरी करून तो पुन्हा नव्या गावाच्या शोधात मुलाखती देत हिंडू लागतो. या गावात त्याला अनेक वर्ष जगणे भयप्रद आणि विलक्षण वाटू लागते. इंग्रजीचा हा प्राध्यापक शेवटी पुन्हा एक नवे गाव स्वीकारतो आणि 'बिढार'मधील चांगदेव पाटलाच्या आयुष्याचा पाच–सात वर्षांचा आलेख पूर्ण होतो. नोकरीच्या पहिल्याच वर्षात एक अफलातून परिवर्तन त्याच्या आयुष्याला व्यापून टाकण्याचा प्रयत्न करीत असते. 'पारू सावनूर' ही वादग्रस्त ख्रिस्त तरुणी, चांगदेव तिच्या प्रेमात पडतो. परंतु तिच्या प्रेमातील 'सुरक्षिततेची भावना' आणि व्यावहारिक संदर्भ लक्षात येताच तो चक्रावून जातो. संपूर्ण हादरतो आणि गाव बदलून पुन्हा स्वतःला नव्या वातावरणात रमविण्याचा प्रयत्न करतो.

'जरीला'त तो मराठा शिक्षण संस्थेच्या पी. झेड. पाटील कॉलेजात रुजू होतो. सुरुवातीला तो अत्यंत अस्थिर असतो 'पारू सावनूर'चे स्मरण होताच तो दिवास्वप्नातही बरेचदा रममाण होतो. एकटेपणाला टाळण्यासाठी नेहमीच बाहेर बाहेर जगू पाहतो. कॉलेजचे जास्तीचे तास, लायब्ररी, चौधरी, शेख, नखवी, पी. टी., वाणी, भौडस, नामजोशी, माळी अशा काऱ्यावृत्तीच्या मित्रात तो रमून जातो. परंतु अचानक गावातील ट्रान्सफॉर्मरची मोडतोड होऊन गाव अंधारात अनेक महिने बुडून जाते. शेवटी खोलीतील एकटेपण आणि बोचणारे रखरखते नाकर्तेपण त्याला पुन्हा अस्वस्थ करते. 'लग्न' करण्याची इच्छा उत्पन्न होऊन तो आत्याच्या आग्रहाखातर यावलला बुटके मास्तरांची पुतणी 'इंदिरा'ला पाहण्याचा सोपस्कार पूर्ण करतो. पहायला जाताना ढगळ मनिला घालणे, डोळ्यात झोपेची खूण, विक्षिप्त बोलण्याची तऱ्हा अशा अनेक बाबींनी 'नकार' मिळतो आणि तो स्वतःचे एकाकी स्वतंत्र निरस जीवन जगण्यास मोकळा होतो. भोवतालचे संसार पाहून तो आधीच वैतागलेला असतो. तरी एक लहर त्याच्या मनावर कब्जा करून घेते व तोही औपचारिकतेला बळी पडतो. गावी परत आल्यावर पुन्हा त्याचे आंतरिक युद्ध प्रारंभ होते. जगण्याचा न जगण्याशी झगडा सुरू होतो. अंधार सोबतीला असतोच. अशात डॉ. मिस. पिंगळेशी ओळख करून घेऊन स्वतःच तिच्याशी काहीही विक्षिप्त बोलून चांगदेव मिस. पिंगळेलाही स्वतःपासून अलग करतो. सौ. गुप्तेच्या वासनात्मक प्रेमाचीही तो नैतिक पातळीवर विल्हेवाट लावतो. शेवटी पुन्हा सर्व वातावरण त्याच्या जगण्याला आणि स्थिरत्वाला पोषक असूनही तो पुनश्च या अनुकूल वातावरणाला स्वतःपासून विलग करून पुन्हा नवे गाव शोधण्याची धडपड करू लागतो. 'जरीला'तील एक वर्षाचा प्रवास अशा प्रकारे संपतो. हुबेहूब परिचित परिस्थितीशी फारकत घेऊन जगण्याचा नवा अर्थ शोधण्याची धडपड चांगदेव पाटलाची सातत्याने सुरू असते. एव्हाना चांगदेव वयाने अठ्ठावीस–एकोणतीसपर्यंत पोचतो.

मराठा शिक्षण संस्थेचे कॉलेज सोडून चांगदेव पाटील एका ऐतिहासिक शहरातील पुराणिक कॉलेजवर जॉईन होतो. पुन्हा 'झूल'मध्ये त्याला नवे वातावरण – नवे मित्र आणि सहज ओळख होऊन मैत्रीत रूपांतरित झालेली पर्यटन खात्यात नोकरी करणारी राजेश्वरी ही प्रौढ तरुणी भेटते.

'झूल 'मध्ये पुन्हा चांगदेवला 'बिढार 'प्रमाणेच फुफ्फुसाच्या आजाराचे हादरे बसतात आणि चांगदेव पुन्हा एकदा जबरदस्त हादरतो. एवढेच नव्हे तर जगण्याचे दिवस आता ओसरू लागल्याची चाहूलही त्याला लागलेली असते. जीवनाचा बुडबुडा आता फारसा तग धरणारा नाही याची जाणीव चांगदेवला झालेली असते. भोळे, शेंडे, चिपळूणकर, चांगला देशपांडे, देसाई, गंगातीरकर, ही त्याची जिव्हाळ्याची मित्रमंडळीही त्याच्या आजाराने हादरून जाते. पण कुणाजवळच त्याचा इलाज नसतो. चांगदेवला या नव्याने निर्माण झालेल्या स्थितीची जाणीव फार पूर्वीपासून असते. म्हणूनच तो प्रत्येकवेळी प्रत्येक गाव–मित्र–स्त्रिया–नातेमंडळी–कॉलेजं–माणसं–घरं सर्वकाही मागेमागे टाकत फक्त स्वत:च्या मूलतत्त्वाची आणि मूलद्रव्याची जाणीव सदाकाळ उराशी तेवत ठेवून शुद्ध जीवसत्त्वाचा शोध घेत फक्त जगत राहतो. अंतर्बाह्य.

चांगदेवच्या आयुष्यातील आठ–दहा वर्षांचा आलेख नेमाडेंनी 'बिढार ' (१९७५) 'जरीला ' (१९७७), 'झूल ' (१९७९) या तीन कादंबऱ्यातून (३५५+२५३+१९८ =) एकूण ८०६ पृष्ठांच्या आधारे मांडला आहे. चांगदेव पाटलाच्या आयुष्यातील दहा वर्षांची ही प्रदीर्घ अनुभवसृष्टी, अनेक महत्त्वाचे अंतर्बाह्य प्रश्न निर्माण करते. चांगदेव पाटील आपल्या दुर्धर फुफ्फुसाच्या आजाराने अत्यंत व्यथित झालेला असतो. आपले निरुपयोगी जीवन कुणालाही सुख देऊच शकत नाही, उलट जगणाऱ्यांचा आनंद हिरावून घेण्याचेच आपण भागीदार होणार ही चांगदेवची स्वत विषयीची समज अत्यंत प्रगल्भ झालेली असते. परिणामत: आप्त–स्वकीयांपासून तो स्वत:ला जाणीवपूर्वक बाजूला काढतो. निरुपयोगी व्यक्तीचे कुटुंबातील स्थान ओळखण्यात तो मुळीच चुकलेला नाही. जगण्याचे दिवस पूर्ण होईपर्यंत जगत राहण्यासाठी कुणावरही 'ओझं 'न टाकता जगता आलं पाहिजे म्हणून तो एम. ए. (इंग्रजी) होऊन नोकरी करतो. मुंबईचे परिचित आणि विमनस्क जग नाकारून तो नव्या गावाच्या द्रव्यात स्वत:ला ओतून जगू पाहतो. पण प्रत्येक गावात एक जिव्हाळ्याचे विश्व निर्माण होऊ पाहते. नेमकं त्याला हे जिव्हाळ्याचं जग टाळायचं असतं पण त्यात त्याला यश लाभत नाही. प्रत्येक गावात तो पक्के नखं रोवून जगण्यासाठी येतो. शिल्लक आयुष्य पूर्ण एकाच गावात जगता यावं, अशी समाधानाची स्थिती त्याच्या आयुष्यात कधीच येऊ पाहत नाही. कोणत्याही एखाद्या नकळत घडलेल्या घटनेनं त्याच्या अंत:करणात वादळ उठतं आणि चांगदेव प्रत्येक वेळी एकाच गावात–एकाच परिस्थितीत भोगलेल्या सर्व क्षणांना आपल्या व्यक्तित्वापासून अलग करण्यासाठी जीवाच्या आकांताने धडपडत राहतो. त्याचे धडपडणे त्याच्या अस्तित्वाचा एक अनिवार्य भाग होऊन बसते.

चांगदेव पाटलाच्या आयुष्यात ऐन उमेदीत कु. देसले, सौ. गुप्ते, ह्या स्वत:हून चांगदेवकडे आकर्षित होणाऱ्या पोरी आहेत. परंतु चांगदेव या पोरकट व्यभिचाराचा तिरस्कार करतो. पारू सावनूर ह्या अफवाग्रस्त तरुणीवर तो मनापासून प्रेम करतो. तिच्या सोबत संसार करण्याची गुलाबी स्वप्न तो रंगवतो (बिढार) पण तिच्या हिशोबी प्रेमाचा तिटकारा येऊन चांगदेव तिलाही स्वत:पासून अलग करतो. तरी तिला तो विसरू शकत नाही (जरीला) डॉ. मिस. पिंगळेशी त्याचा परिचय होतो. तिच्याकडे वेळ काढायला म्हणून तो जातो. तीही त्याला आवडू लागते. परंतु जेफरसनचा स्त्रीविषयक विचार "जरी वीस वर्षांच्या मुलीपेक्षा तीस वर्षांची बाई चेहऱ्यानं थोडी निस्तेज वाटली तरी खाली सगळं तसंच असतं." (जरीला पृ. १६२) असे फारच मोकळं बोलून टाकल्यामुळे डॉ. पिंगळे त्याला नेहमीसाठी हाकलून लावते. (जरीला) शेवटी त्याला एक प्रौढ तरुणी राजेश्वरीही अशीच आवडू लागते व तिलाही तो आवडतो. परंतु राजेश्वरी अमेरिका–मुंबईच्या वातावरणात आणि संस्कृतीत वाढलेली असल्यामुळे तिला चांगदेव फक्त 'वेळ पास करण्यापुरताच मित्र ' वाटतो. ती जाताना त्याचं चुंबनही घेते पण तेही सहज भावनेतूनच. नेमका चांगदेव इथे चुकतो. स्त्री–पुरुष साहचर्याच्या मताचा तो असूनही राजेश्वरीला तो भारतीय मनाने पाहू

लागतो. ती त्याला नेहमीसाठी सोबत रहावी असे विनाकारणच वाटू लागते आणि पारूप्रमाणेच इथेही तो निराश होतो. पारूला तो बाजूला टाकतो तर इथे राजेश्वरी चांगदेवला स्वत:पासून बाजूला काढून मुंबईला निघून जाते (झूल) एकूण चांगदेव पाटलाच्या आयुष्यात येणाऱ्या स्त्रिया ह्या स्वाभाविक जीवनात सहज भेटणाऱ्या; येऊ शकणाऱ्या वास्तव स्त्रियाच आहेत. त्यामुळे चांगदेव भावजीवनात रमणारा दुबळा जीव नाही एवढे निश्चित म्हणता येईल.

चांगदेव दहा वर्ष ज्या समाजात जगतो तो समाज अनंत विसंगतींनी परिपूर्ण आहे. चांगदेव हा संवेदनाक्षम बुद्धिवंत, वास्तववादी, माणुसकीने तुडुंब असलेला जाणीवसंपन्न तरुण असल्यामुळे आणि आपल्या जीवनाचे 'अंतिमचरण' जाणणारा असल्यामुळे तो अधिकच अंतर्मुख होऊन योजनापूर्वक आपल्या जीवनाबाबत ठरवीत असतो. त्याचे नवेनवे निर्णय जरी सर्वांना आश्चर्यकारक वाटत असले तरी ते निर्णयच त्याच्या जीवनाला पोषक आणि गती देणारे असतात. चांगदेवच्या जीवनाचे एक अत्यंत मोलाचे सूत्र नेमाडेंनी 'झूल'च्या शेवटी उद्‌धृत केले आहे. ते असे- "ह्या संकुचित खंडित समाजजीवनामध्ये मला संपूर्ण अस्तित्व ओतता येत नाही. मी कुणालाही बांधलेला नाही. मला घरदार नाही. जातिधर्म नाही, खुंटदावे नाही, आईबापांचा, स्वग्रामाचा, स्वसंबंधियांचा मी त्याग केला आहे. हे घनघोर उग्र सृष्टितत्वा, मला शुद्ध जीव कर की जेणेकरून मी निखळ जीवसत्व होईल." चांगदेवच्या एकूणच व्यक्तिमत्त्वाचे आकलन या 'सूतोवाच'वरून होऊ शकते. किंबहुना "चांगदेव पाटील" या नायकास समजून घ्यायला मदत खचितच होऊ शकते. ■

श्रीनिवास कॉलनी रोड, रामनगर, वर्धा

प्रवासवर्णन : एक वाङ्मयप्रकार

शीला कोलटकर

ग्रां थि की

साहित्यात एखादा वाङ्मयप्रकार रुजला की त्याचे स्वरूप शोधण्याचा प्रयत्न समीक्षकाकडून केला जातो. एका अभ्यासकाच्या भूमिकेतून डॉ. वसंत सावंत यांनी मराठी साहित्यात आता स्थिरावलेल्या 'प्रवासवर्णन' या वाङ्मय-प्रकाराच्या रूपाचा शोध घेण्याचा प्रयत्न 'प्रवास-वर्णन : एक वाङ्मयप्रकार' या आपल्या ग्रंथात केलेला आहे. प्रास्ताविकात डॉ. सावंत यांनी म्हटल्याप्रमाणे 'एक ललित वाङ्मयप्रकार' या दृष्टीने त्यांनी मराठीतील प्रवासवर्णनांचा अभ्यास केला आहे.

हा ग्रंथ दोन भागात विभागलेला आहे. पहिल्या भागात 'प्रवासवर्णना'विषयीची तात्त्विक चर्चा आली आहे. त्यात भारतीय संस्कृतीतील व साहित्यातील प्रवासविषयक भूमिकेपासून लेखकाने शोध घेतला आहे, या विभागात प्रवासवर्णन हा वेगळा वाङ्मयप्रकार कसा व स्वतंत्र वाङ्मय-प्रकार म्हणून त्याला का मान्यता द्यावी लागते याची विस्तृत चर्चा लेखकाने केली आहे. हा विषय हाताळताना लेखकाने विविध दृष्टिकोणांचा व विविध बाबींचा अतिशय सूक्ष्मतेने विचार केला आहे. त्यातूनच लेखकाच्या अभ्यासू वृत्तीचा प्रत्यय पदोपदी येतो.

दुसऱ्या विभागात मराठीतील प्रवासवर्णनांचा सांगोपांग आढावा घेतलेला आहे. इ. स. १८८२ ते १९८० या कालखंडातील प्रवासवर्णनांचा अभ्यास लेखकाने केलेला असून त्यातील महत्त्वाच्या प्रवासवर्णनांचा विचार प्रामुख्याने केलेला आहे. परिशिष्टात प्राचीन मराठीतील प्रवासवर्णनां-विषयीही अभ्यास केलेला आहे. या कलाकृतींचे विहंगमावलोकन करण्यामागील उद्देश स्पष्ट करताना डॉ. सावंत म्हणतात, "प्रवाससूत्राच्या अनुरोधाने ज्या ग्रंथामध्ये लेखकाच्या व्यक्तित्त्वाचा व प्रदेशाच्या व्यक्तिमत्त्वाचा समतोल साधून कलात्मक चित्रण झालेले असेल आणि ते प्रतिभाशाली लेखकाने केलेले असेल, त्याच ग्रंथाचा विचार करणे इष्ट आहे.' (पृ. क्र. १६५) ह्या दृष्टीने पाहता हे विहंगमावलोकन सर्वसमावेशक झालेले आहे. ज्या कलाकृतींमुळे, ह्या वाङ्मय-प्रकारात काही महत्त्वाचे टप्पे निर्माण झाले आहेत, अशा कलाकृतींचा लेखकाने विस्तृत परिचय करून दिला आहे. त्या कलाकृतील सौंदर्य लेखकाने विविध मुद्यांच्या आधारे उलगडून दाखविले आहे. या दृष्टीने 'धुक्यातून लाल ताऱ्याकडे' ते 'तोकोनोमा' हे प्रकरण वाचनीय ठरते. प्रत्येक कलाकृतीचे वैशिष्ट्य, त्यातील सौंदर्यतत्त्व उलगडून सांगताना, कलाकृतीतून व्यक्त होणारे त्या त्या लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलूही डॉ. सावंत यांनी दाखविले आहेत. त्या लेखकाच्या लेखनामागील प्रवृत्तींचाही शोध घेतलेला आहे. शिवाय लेखकाने त्या कलाकृतींचा विचार कालखंडाच्या संदर्भातही केलेला असल्याने त्या कलाकृतीचे ऐतिहासिक महत्त्वही लक्षात येते.

डॉ. सावंत यांचा हा ग्रंथ त्यांच्याच प्रबंधावर आधारित आहे. पण प्रबंधात जाणवणारी क्लिष्टता ह्या ग्रंथात नाही. अतिशय सुबोध, सोप्या विवेचनातून हे विहंगमावलोकन केलेले आहे. इतकेच नव्हे तर समर्पक उदाहरणांमधून डॉ. सावंत यांच्या सौंदर्यदृष्टीचा प्रत्ययही जागोजागी येतो. या उदाहरणांमुळेही हा ग्रंथ रोचक झाला आहे.

मात्र पुनरुक्तीने कित्येकदा रसभंग झाला आहे असे म्हणावे लागेल. उदा. 'प्रवासवर्णन आत्म-चरित्राला जवळ' हा विषय पृ. ८० तसे पृ. १२८ वरही येतो. पहिल्या विभागातील तात्त्विक चर्चेत असे पुष्कळदा वाचताना जाणवते. अर्थात या विषयीची जाणीव लेखकाला आहे. कारण 'प्रवासवर्णन : एक वेगळा वाङ्मयप्रकार कसा' या संबंधी विवेचन करताना लेखकाने म्हटले आहे

'यावेळी मागील विचारांची पुनरुक्ती होणे सहज शक्य आहे.' (पृ. क्र. ७९)

प्रवासवर्णन या वाङ्मयप्रकाराच्या रूपाचा शोध घेण्याच्या प्रयत्नात डॉ. सावंत यशस्वी झाले आहेत. हा समीक्षापर ग्रंथ असला तरी कित्येकदा स्वतंत्र कलाकृतीचे गुणविशेष ह्या ग्रंथात आढळतात. अभ्यासकांना उपयुक्त ठरेल तसेच वाचकांनाही 'प्रवासवर्णना' विषयीचे संपूर्ण स्वरूप कळेल असाच हा ग्रंथ आहे. ■

प्रवासवर्णन : वाङ्मयप्रकार
ले. वसंत सावंत
महा. राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
मंत्रालय, मुंबई
पृ. ४४९ कि. रु. ५०

संयुक्त महाराष्ट्र : काल आणि आज

ना. ल. वैद्य

संयुक्त महाराष्ट्राचे स्वतंत्र राज्य बनून २८ वर्षांहून अधिक काळ लोटला–"संयुक्त" म्हणण्याचे कारण असे की त्यात महाविदर्भ आणि मराठवाडा हे मराठी भाषिक प्रांत पण सामील आहेत. दुर्दैवाने गोवा महाराष्ट्रात येऊ शकला नाही. येऊ शकला असता, पण मराठी भाषिक गाफील राहिले आणि ख्रिश्चन मिशनऱ्यांनी बाजी मारली. गोवा महाराष्ट्रात येऊ नये ही काँग्रेस श्रेष्ठींची इच्छा होतीच. संयुक्त महाराष्ट्र बनू नये अशी सुद्धा इच्छा होतीच, व त्यात नेहरू मोरारजीपासून यशवंतराव चव्हाणापर्यंत लोक होते–जे यशवंतराव पुढे याच संयुक्त महाराष्ट्राचे मुख्यप्रधान झाले. त्यांनी "महाराष्ट्रापेक्षा नेहरू मोठे आहेत." असे गुलामाला शोभणारे उद्गार काढले होते; आणि एसेम जोशी यांनी ज्या मोरारजींना भारताचा पंतप्रधान बनविण्यात पुढाकार घेतला होता, त्याच मोरारजींनी १०४ मराठी भाषिकांचे रक्त मुंबईला सांडले होते ! (याच मोरारजींनी ते महाराष्ट्राचे मुख्यप्रधान असता १९४६ साली अंमळनेरला गिरणी कामगारांवर गोळ्या झाडून आठ कामगारांचे मुडदे पाडले होते !) हा सगळा रोमांचकारी इतिहास विसरला जाऊ नये यासाठी संयुक्त महाराष्ट्र निर्माण कसा झाला याचे सिंहावलोकन करणे व येणाऱ्या पिढीला जागृत करणे हे महत्त्वाचे कार्य प्रा. भगवान काळे यांनी "संयुक्त महाराष्ट्र : काल आणि आज" हा ग्रंथ संपादन करून केले आहे. महाराष्ट्राचे स्वतंत्र राज्य कसे झाले याविषयी कै. काका गाडगीळ, कै. चिंतामणराव देशमुख, ज. श्री. टिळक इत्यादींचे लेख वाचण्यासारखे आहेत. चिंतामणरावांनी नेहरूंच्या मनात महाराष्ट्राविषयी द्वेष कसा ओतप्रोत भरला होता याचे सडेतोड वर्णन केले आहे ! आणि अशा या महाराष्ट्रद्वेष्ट्या नेहरूंना महाराष्ट्रापेक्षा श्रेष्ठ म्हणणाऱ्या यशवंतराव चव्हाणांची गुलामी वृत्ती आणि मामा देवगिरीकर आदि महाराष्ट्रीय काँग्रेसवाल्यांची भेकड वृत्ती दिसून येते. या संदर्भात काका लिहितात, "राजकारण म्हणजे स्वार्थांचा बाजार, चोर बाजार, तेथे कृतज्ञता नाही, मान नाही, सत्य नाही !" (पृ. २६) काकांचे दुर्दैव असे की त्यांचा मुलगा विठ्ठल मात्र यात लोळत आहे !

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीने खालील गोष्टी स्पष्ट होतात–

१. दिल्लीच्या मनात महाराष्ट्राबद्दल आकस आहे. केंद्रात मराठी पुढाऱ्यास प्रतिष्ठा नाही.

२. महाराष्ट्रीय काँग्रेस पुढारी महाराष्ट्राच्या पाठीत खंजीर खुपसणारे आहेत, व स्वतःच्या स्वार्थासाठी लाचारी पत्करणारे आहेत मराठ्यात स्वाभिमान नाही.

३. पुढाऱ्यात एकी नाही.

४. संयुक्त महाराष्ट्र हा जनतेने लढा देऊन मिळविला.

संयुक्त महाराष्ट्र प्राप्त झाल्यानंतर, 'स्वप्न' आणि वास्तव' यातली दरी खूपच स्पष्ट झाली. गेल्या २८ वर्षात संयुक्त महाराष्ट्राचे रूप कसे आहे ?

१. सर्व बुद्धिमत्ता विरोधी पक्षात.

२. महाराष्ट्रातील काँग्रेस पुढारी दिल्लीचे गुलाम.

३. ज्यांनी लढ्यात भाग घेतला होता त्यांच्या हाती सत्ता न जाता अत्यंत सामान्य वकूबाच्या स्वार्थांध माणसाच्या हातात सत्ता गेली. महाराष्ट्रात नेतृत्व नाही.

४. जातीयवाद वाढला.

५. नवीन झुंडशाही निर्माण झाली.

६. शेती हा न परवडणारा धंदा झाला.

७. विदर्भ, मराठवाडा यांच्या विकासात पक्षपात.

८. गरीब, गरीब होत गेले. सहकार तत्वाने नवे सरदार निर्माण झाले.

९. खेडी ओस पडू लागली; शहरे फुगत चालली.

१०. मराठी भाषेला दुय्यम स्थान या दृष्टीने श्री. मधुकर भावे यांच्या, "महाराष्ट्र होता कुठे? चालला कुठे?" या लेखातील काही महत्त्वाची वाक्ये उद्धृत करतो–"महाराष्ट्राचे नेतृत्व विकलांग झाले आहे. व्यक्ती, गट, गटबाजी, पक्षांतर्गत भांडणे, यातच कार्यकर्त्यांची शक्ती खर्च होत आहे...चिंतनाची सगळी प्रक्रियाच थांबली आहे. ...सार्वजनिक जीवनातील मूल्यांचा झपाट्याने महाराष्ट्रात ऱ्हास होत आहे. राजकीय नेत्यांबद्दल आदर संपत चालला आहे. सरकारचा धाक लोकांना राहिलेला नाही. प्रशासनाचे मोठ्या-प्रमाणात अवमूल्यन होत आहे. कायदे–मंडळावरचा लोकांचा विश्वास उडत चालला आहे. गुंड आणि पोलीस यांच्यात मोठ्या प्रमाणात युती झाली आहे. पुढाऱ्यांचे चारित्र्यही संपुष्टात आले आहे. महाराष्ट्राचे सामाजिक व राजकीय जीवन झपाट्याने उध्वस्त होत चालले आहे." (पृ. १४९–१५०) याला सावरणारी शक्ती दृष्टिपथात दिसत नाही अशी भीती वाटत आहे. तरुण पिढीपुढे आदर्श तर नाहीच, पण ती बिघडविण्याची क्रिया मात्र झपाट्याने सुरू आहे–हे भेसूर चित्र पाहून कोणाही विचारी माणसाला चिंता वाटेल.

या ग्रंथात महाराष्ट्रातील गतेतिहासातील लोकसंगीत, कीर्तने, कलावैभव, नाटके, महानुभावकालीन महाराष्ट्र, पैठण, इत्यादी लेख दिले आहेत; ते वाचून महाराष्ट्राच्या भवितव्याबद्दल आशा निर्माण होते. मुंबईला ज्या १०४ मराठी-भाषिकांचा खून मोरारजींच्या पोलिसांनी केला त्या सर्वांची नावे दिलेली आहेत. तसेच, महानुभाव पंथाच्या श्रुतिपाठ ग्रंथातून महाराष्ट्र म्हणजे काय ते दिले आहे, ते वाचण्यासारखे आहे.

या पुस्तकात काही उणीवा राहिल्या आहेत, त्यांचे निराकरण पुढील आवृत्तीत करावे. प्रत्येक लेख केव्हा लिहिला गेला याचा निर्देश पाहिजे. लेखकांची माहिती थोडक्यात द्यायला पाहिजे. शुद्धलेखनाच्या व मुद्रणाच्या चुका भरपूर आहेत. अनुक्रमणिकेत पृष्ठांक नाहीत. पानावर लेखाचे नाव नाही. काही लेख उगाच घेतले गेले आहेत. उदा. यू. म. पठाण, कस्तुरे शास्त्री, मोरवंचीकर, इ. च्या लेखांचे प्रयोजन प्रत्यक्ष नाही.

पं. लक्ष्मणशास्त्री जोशी यांची प्रस्तावना फार चांगली आहे. "महाराष्ट्राच्या जीवनातील झोपडपट्टी मानवतेच्या अवनतीचे भेसूर चित्र आहे." प्रबोधन करणाऱ्या समाज सेवकांची जरूरी आहे असे शास्त्रीबुवा लिहितात.

एकंदरीत एक उत्कृष्ट संदर्भ ग्रंथ संपादित केल्याबद्दल प्रा. काळे यांचे आभारच मानले पाहिजेत. ■

"संयुक्त महाराष्ट्र : काल आणि आज."
संपादक–प्रा. भगवान काळे, संकेत प्रकाशन
आनंदी स्वामी मार्ग, जालना, ४३१२०३
प्रथमावृत्ती २३ जानेवारी १९८८
मूल्य रु. १००

'ऋतु'

सामाजिक व राजकीय जाणिवेचा उपहासगर्भ आविष्कार

राजेंद्र दुर्योधन मुन्ढे

अलिकडे मोठ्या प्रमाणावर कविता लिहिल्या जात आहेत. यात संख्यात्मकतेच्या तुलनेत गुणात्मकता किती? हा प्रश्न शंकेचाच आहे. वाढलेली प्रसार, प्रचार, प्रसिद्धी माध्यमे यामुळे उदंड कविता प्रसवली जात आहे व झटपट प्रसिद्धी म्हणून उमेदवारीच्या काळातच अशा कवींचे

कवितासंग्रह सुद्धा प्रसिद्धीस येत आहेत. अशा गर्दीच्या कवितेत चांगली खरी कविता हाती पडणे मोठी दुर्लक्षित बाब आहे. असे असले तरी काही कवी जाणीवपूर्वक कविता लेखन आजही करीत आहेत. याचे उदाहरण म्हणजे प्रा. किशोर सानप यांच्या 'ऋतू' ह्या कविता संग्रहातील कविता· त्यांचा हा पहिला कवितासंग्रह आपल्या वैशिष्टय· पूर्ण काव्यगुणांनी व वास्तव काव्यानुभूतीने परिपूर्ण अशा कवितांनी वेगळा ठरला आहे. एका अविचल काव्यनिष्ठेने आणि सखोल सामाजिक व राजकीय जाणिवेने त्यांच्या कवितेत त्यांचे परिपक्व आणि समृद्ध मनाचे दर्शन घडते.

'ऋतू'तील बहुतांशी कविता सामाजिक वास्तवाच्या चिंतनातून स्फुरलेल्या आहेत. त्यातून डोकावणारा विद्रोहभाव विचारप्रवृत्त करणारा आहे. या कवितेतून आजच्या एकूण शोषण प्रक्रियेच्या सामाजिक बदलांची एक कोवळी; हिरवीकंच आणि मनाला होरपळून टाकणारी उपहासात्मक भावना अभिव्यक्त होताना दिसते ती अशी–

'असा हा काळ नकळत बदललेल्या बदलांचा
तुम्ही आम्ही प्रयत्नांची शिकस्त केलेली
असते मुलखावेगळी
तरी असमर्थतेची चिवचिव संपलेली नसतेच
बुरसटलेल्या पक्षांची' (ऋतू)

एकीकडे विकासाच्या भाकडकथा सांगणारी जमात दुसरीकडे समाजाला अज्ञानाच्या खाईत खोल ढकलीत आहे व आपला स्वार्थ साधत आहे. या जमातीचे कनवाळू कृपाळू मन हे ऋतुबद्ध कसे आहे? या कनवाळू कृपाळू जमातीचा उपहास 'ऋतू'त निषेधाच्या आणि बंडखोरीच्या स्वरूपात उमटतो. तो तसा उमटणेही अपरिहार्यच आहे, कारण तो या कवितेचा प्रकृतिधर्मच आहे. मला त्यांच्या उपहासशक्तीचे महत्त्व वाटते ते यामुळे की आपले जीवनच विसंगतीने खच्चून भरलेले आहे व प्रा. सानपांना संगतीची चांगली जाणीव आहे. म्हणूनच त्यांच्या कवितेत विसंगतीचा उपहास प्रखरतेने परंतु सहज भाषेत प्रगट होतो–

'तू आलास–
ये, आम्ही तुझे स्वागत करतो.
पण आमच्या घरातला दिवा मात्र विझवू
नकोस'
आणि पुढे–
तरी तू 'आलास आम्हाला आनंद आहे.'
घरात साखर असती तर
तुझं तोंड गोड केलं असतं
पण घरात पाण्याचा माठ भरलेला आहे.'
(स्वागत)

असे पुढारीपणाच्या गळचात माळा घालून सर्वांना लुबाडीत राहणारे नेते कवीच्या उपहासाचा विषय बनतात तसेच त्यांची एकूणच प्रवृत्ती ढोंगीपणाचा छेद घेणारी आहे. नेता दंगलग्रस्त भागाची पाहणी एक गरज म्हणून, एक कर्तव्य म्हणून नव्हे तर केवळ औपचारिकता म्हणून करण्यासाठी जातो तेव्हा त्याच्या मनात कशा प्रतिक्रिया उमटत असतील तर त्या अशा–

'एक पोर जवळ येऊन बंगालीशी खेळू लागलं
खूप राग आला मनातून–
पण फिरवावा लागला त्याच्या डोक्यावरून
हात.
एक बाई तरुण कपाळावर हात मारून
ओरडू लागली गावभर
दिसायला गोरी गोमटी होती फर्स्टक्लास–
पण डोळचात अश्रू दाटले म्हणून दिसत
होती धूसर'

तर पुढे म्हणतो–

पदयात्राही झाली पूर्ण–
अन् डोळचासमोर तरळू लागलं एक सुंदर
चित्र
ती बाई कोण असावी बरं?' (पदयात्रा)

असले लबाड नेते जागोजागी आहेत याचे कवीला अतीव दुःख आहे. असे हे दुःखावलेले कविमन केवळ सामाजिक वा राजकीय जीवनातील विसंगतीवर केवळ काल्पनिक भाष्य करीत नाही तर या कविमनाला सामाजिक वास्तवाचे परिपक्व भान आहे म्हणूनच ते असे विधान करू शकतात–

'आता अनेक गतिमान पावलांना
प्रस्थापित उंबरठचांनी जाहीरपणे नाकारले
आहे.
व्यासपीठावर शपथा घेण्याचे युग आता

संपले आहे
पायात सूर्य गाठून
आभाळयोद्धयांचा पराभव करण्याचीच आता
गरज आहे.' (पराभव)

असा आशावाद सुद्धा आपल्या कवितेतून दर्शवितात म्हणजे हा कवी आजची एकंदरीत सामाजिक परिस्थिती पाहता उदासीन न होता आशावादी आहे. तो यामुळे की त्याच्याजवळ एक हत्यार आहे कविता. ते तो उपहासाच्या माध्यमाने अपप्रवृत्तीच्या, 'दुबळ्या जीवांनाही लुटण्याची स्वप्ने पाहणाऱ्या पशूंच्या' मानेवर ठेवतो. कारण त्याला 'खणून काढावयाची आहेत अंधाराची हृदये आणि शुद्ध करावयाची आहेत सडकी मने' यातून एखादी निळी पहाट उगवण्याची त्यांना आशा वाटत असली" तरी ती पहाट शांतपणे उगवणार नाही याची जाणीव सुद्धा त्यांना आहेच-

'लॉनवर जमलेल्या समुदायाच्या
विचारांचे दगड
खूप सोसले असतील तळागाळातून आजपर्यंत
आताही या दगडांचा मारा थांबलेला
नाही पूर्णपणे
आणि थांबणारही नाही तो
जोपर्यंत लॉनच्या प्रदेशात भूकंप होत नाही.'
(लॉन)

प्रा. किशोर सानप यांची कविता केवळ एक कविता किंवा बौद्धिक हिकमत नाही तर प्रथम व अंततः व्यापक जीवन आणि संघर्षाचा साक्षात्कार आहे. हा साक्षात्कार कधी भूत तर कधी वर्तमान संघर्षाच्या पातळीवर घडतो.

'पुरातन वृक्षांची खोकी
ही शापग्रस्त गिळायला
आ वासून उभी–
असे हे ऋतू बदलणारे आणि फितूर होणारे.'
(ऋतू)

अशा या फितूर माणसांच्या युगात माणसेच माणसांचे शोषण करण्याच्या समूळ प्रक्रियेत व्यस्त झाली आहेत. अशा या युगात कवी विव्हळणार नाही तर काय ?

'छातीठोकपणे गीतेवर हात
ठेवून कसे सांगावे ?
आज गीताच जिथे पुस्तकी झाली
तिथे शपथांच्या शब्दांनाही पूज्यतेचं प्रतीक
चढवावं असं यात काय आहे ?'
(तेव्हा सर्व शांत होते.)

अशी बदलेलली नीतिमुल्ये उंडारलेली असामाजिक मने जिकडे तिकडे विषविजांचे नांगरण करीत आहेत. ही उंडारलेली मनं उंडारलेल्या सांडांचे प्रतीक घेऊन कवितेत व्यक्त होतात–

'डोळयात धूळ फेकून उंडारतो आहे तो–
आज तुडविलेत त्याने महात्म्याचे पुतळे
अन् उद्या भूक वाढली म्हणजे–
करील रवंथ तो हळूवार
राज्यघटनांची पुस्तके' (बैल)

अशा अस्थिरतेच्या काळात काही 'झाडे' कशी-बशी तग धरून आहेत. 'ह्या देही ह्या खांद्यावर मरण पालखी उचलून जगत आहेत धीटपणे ? अशी ही दुःखाचे उसासे साहणारी कविता आहे.

केशवसुतांनी मराठी कवितेच्या क्षेत्रात निसर्ग हा अनुभव म्हणून रुजविला तर बालकवींनी निसर्गाचे खरे चैतन्य आपल्या कवितेत उतरविले यानंतर ना. धों. महानोर यांनी रानाची हिरवी बोलीच रुजविली. "मी त्या हिरव्या बोलीचा शब्द झालो.' असे ते म्हणतात.

तर प्रा. किशोर सानपांनी निसर्गातील झाडांनाच देहरूप प्रदान केले आहे. 'झाड' त्यांच्या काव्यप्रतिभेचा अनिवार्य होऊन बसलेला आविष्कार आहे. वैश्विक समस्यांच्या संदर्भात वेगवेगळया अर्थच्छटा झाडांच्या प्रतिकातून त्यांच्या कवितेत प्रकट होतात. 'झाड' हे नुसतेच झाड न राहता ते झाड बोलकेरूप धारण करून प्रवृत्ती-अपप्रवृत्तीच्या उच्चाटनासाठी तिरस्काराची भाषा बोलू लागते तर कुठे हीच 'झाडे' 'हुंदक्यांची पोटं फाडतात' तर कुठे 'रूदनांचे निषाद निमूटपणे गिळतात.' असे हे झाडांचे प्रतीक जवळजवळ सर्वच कवितेतून डोकावत राहते. तरी ते प्रत्येक वेळेला आपले नवीन शरीर कायम करते हे या कवितेचे खरे वैशिष्टच आहे.

प्रा. किशोर सानपांची 'ऋतू'तील कविता सामाजिक, राजकीय उपहासाची भाषा बोलते ती सहज भाषेत. कुठे कुठे क्लिष्टता येते ती एक

अनिवार्यता म्हणून, फॅशन म्हणून नव्हे. त्यांच्या कवितेतील वक्तृत्वामुळे सुद्धा कवितेतील प्रभाव गतिमान होऊन निश्चित ठिकाणापर्यंत पोहचविण्यास मदत होते. त्यांचे पृथगात्म व्यक्तिमत्व, प्रत्यक्ष अनुभव, अनुभूती व सहज अभिव्यक्ती यामुळे त्यांची कविता फक्त एक 'विधान' न ठरता ती एक 'सच्ची' कविता ठरते. नाही तर अलिकडे आपल्या कवितेतून विधाने करणे एक फॅशन बनली आहे. "विधाने भोगलेल्या अनुभवातून फुललेली असली पाहिजेत. केवळ विधानरूपी कविता फार काळ जगत नाही. कारण विधानालाही काव्यरूप प्राप्त व्हायला हवे. ही प्रक्रिया अतिशय कठीण आहे. त्यासाठी अनुभवाला चिंतनाची आवश्यकता आहे.' असे प्रा. डॉ. भालचंद्र फडके म्हणतात याचा प्रत्यय प्रा. किशोर सानप यांच्या 'ऋतू'मधून निश्चितच येतोय. ■

'ऋतू'
कवी प्रा. किशोर सानप
प्रकाशक सौ. नलिनी जोशी
अभिजित प्रकाशन, आर८, प्रभानिवास,
लक्ष्मीनगर नागपूर-४४००२२
किमत रु. २०

'तारतम्या'तील मौलिक संशोधनाचे आणि समीक्षेचे स्वरूप

वि. बा. प्रभुदेसाई

प्रा. डॉ. स. गं. मालशे यांनी आपल्या साक्षेपी संशोधनकार्याने आणि समीक्षालेखनाने मराठी साहित्यक्षेत्रात खास स्वतःचे असे एक स्थान निर्माण केले आहे. सत्यासत्याचा योग्य तो निवाडा करण्याचे कष्ट न घेताच 'ठोकून देतो ऐसाजे' प्रकाराचे लिखाण करणाऱ्यांमध्ये प्रतिष्ठित म्हणवणारे देखील कसे सामील असतात, याबाबतीत आपली विधाने शास्त्रकाट्याच्या किंवा अस्सल पुराव्यांच्या कसोटचांवर पारखून पाहण्याचे साधेसुधे तारतम्यसुद्धा भल्याभल्यांमध्ये कसे आढळत नाही हे कुणाचाही मुलाहिजा न बाळगता साधार सांगण्याचे कार्य डॉ. मालशे हे आतापर्यंत करीत आले आहेत. 'तारतम्य' या त्यांच्या १९८७ साली प्रसिद्ध झालेल्या लेखसंग्रहामध्ये एकूण १५ लेख असून त्यांचा मुख्य भर एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या जडणघडणीला हातभार लावणाऱ्या मानकऱ्यांवरच आहे. प्रारंभीचे सहा लेख हे महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्यासंबंधीच्या विविध लेखकांच्या बेजबाबदार लिखाणाचा खरपूस समाचार घेणारे आहेत.

पं. सि. पाटील यांचे 'म. जोतिराव फुले यांचे चरित्र' १९२७ साली प्रसिद्ध झालेले असून ते धनंजय कीर यांच्या पूर्वीचे महात्मा फुले यांच्याविषयीचे माहितगार असे अधिकृत चरित्रकार मानले जातात. 'शेतकऱ्याचा असूड' हे म. फुले यांचे तत्कालीन शेतकऱ्यांच्या दयनीय परिस्थितीचे विदारक विश्लेषण करणारे महत्त्वाचे पुस्तक आहे. या पुस्तकाच्या बाबतीत पं. सि. पाटील यांच्यापासून प्रा. गं. बा. सरदार, प्रा. मा. प. मंगुडकर यांच्यापर्यंत अनेकजण कशी दिशाभूल करणारी माहिती देतात, पु. बा. कुळकर्णी यांच्या 'मामा परमानंद आणि त्यांचा कालखंड' या ग्रंथातील एका परिच्छेदाचे बारकाईने वाचन केले असता त्या सुगाव्याच्या आधारे कलकत्त्याच्या राष्ट्रीय ग्रंथालयात 'शेतकऱ्याच्या असूड'च्या हस्तलिखिताची प्रत कशी उपलब्ध झाली, या सर्व घटना "म. फुलेकृत 'शेतकऱ्याचा असूडा'चा शोध" या मूळ लेखातून वाचायला हव्यात.

सामाजिक सुधारणेत आघाडीवर असलेल्या महाराष्ट्रात आज स्त्री-शूद्रांच्या दारात जी ज्ञानाची गंगा येऊन ठेपलेली आहे त्याचे मुख्य श्रेय म. फुल्यांसारख्या तळमळीच्या कार्यकर्त्यांना कसे द्यायला हवे यासंबंधीचे मुद्देसूद प्रतिपादन 'महात्मा फुले यांचे शैक्षणिक विचार आणि कार्य' या लेखात आढळते. म. फुले हे इंग्रजी राज्याचे पुरस्कर्ते असून त्यांचा ख्रिस्ती धर्माकडे विलक्षण ओढा होता इत्यादी आरोपांचा सविस्तर परामर्श घेऊन 'म. फुले आणि ख्रिस्ती धर्म' या लेखात डॉ. मालशे यांनी काढलेला पुढील

साधार निष्कर्ष न्याय्य वाटतो :– "सारांश, ख्रिस्ती धर्मप्रसारकांची मूर्तिपूजेवरील आणि पुरोहितवर्गाच्या वर्चस्वावरील टीका आणि म. फुल्यांनी केलेली टीका यांत सहीसही साम्य आहे; स्त्रिया आणि शूद्रातिशूद्र यांच्याविषयीचा ख्रिस्ती धर्माचा उदार दृष्टिकोन आणि दुष्काळादी आपत्तीच्या प्रसंगी 'ज्यांसी आपंगिता नाही। त्यासि धरी जो हृदयी' या पद्धतीची भूतदया-वादी वृत्ती या गोष्टींचा खोल ठसा म. फुल्यांच्या मनावर उमटला असला पाहिजे, यात शंका नाही. तरीसुद्धा 'गुलामगिरी'तील अनावृत पत्र, जुन्नरच्या व्याख्यानातील विधान, अय्यादारूंच्या पुस्तिकेवरील प्रतिक्रिया, आणि बाबा पदमनजींची अखेरची आठवण या चारही पुराव्यांचा एकत्रित विचार केल्यास असे दिसते की, विद्यमान धर्मांपैकी ख्रिस्ती धर्म आणि त्याचा संस्थापक येशू ख्रिस्त यांच्याविषयी त्यांच्या मनात परमादराची भावना असली, तरी ख्रिस्तांगीकार केल्याखेरीज आत्म्याचे तारण होत नाही. तशा तऱ्हेच्या भावडचा कल्पना म. फुल्यांनी बाळगलेल्या नव्हत्या."

'म. फुल्यांची भाषाशैली' या लेखात विद्यार्थ्यांचा संपूर्ण विश्वास संपादन करून त्यांना फुल्यांच्या लेखनाचे, पद्यरचनेवरील संस्कार, संतप्त व्यक्तिमत्त्व, बोलभाषेशी नाते, प्रदीर्घ रचनेचा जोरकसपणा, औपरोधिक शब्दचित्रे, उपहासाची खास तऱ्हा, अस्सल कळवळा, बोलके नाट्य, विशेषणांचा समर्पक उपयोग, प्रतिमा-सृष्टीची विशिष्ट कक्षा, शब्दकळेची अर्थघनता, श्लीलाश्लीलविवेक, वाक्यरचनेतील दोष इत्यादी वैशिष्ट्ये आस्थापूर्वक समजावून सांगणाऱ्या 'प्राध्यापक' मालशांचे विलोभनीय दर्शन घडते. विष्णुशास्त्री चिपळुणकरांसारख्या मराठी भाषेच्या शिवाजीने फुल्यांवर आपल्या 'निबंधमाले'तून केलेल्या एकांगी टीकेच्या पार्श्वभूमीवर प्रा. मालशे यांचे हे विवेचन वास्तविक वाटते :– "महात्मा फुल्यांचे व्यक्तिमत्त्व जसे परखड आणि संतप्त तसेच त्यांचे गद्यलेखन परखड आणि संतप्त आहे. त्यांचा स्वभाव जसा मनस्वी तशीच त्यांची आविष्कारपद्धतीही मनस्वी आहे.

फुल्यांच्या गद्याची जडणघडण झाली तो काळ, सार्वत्रिक शिक्षण सुरू होऊन भाषाशिक्षणाला प्रमाणबद्ध स्वरूप प्राप्त होण्यापूर्वीचा होता. त्या काळी व्यावहारिक स्वरूपाचे गद्यलेखन प्राय: मोडीतच होत असे. परिणामी त्या काळच्या लेखनात एकविधतेपेक्षा अराजक अधिक दिसून येत असे. शिवाय फुल्यांच्या गद्यभाषेवर बोलीचा परिणाम अधिक दिसतो. अशा स्थितीत व्याकरण शुद्धतेचे नियम त्यांच्या लेखनात पाळले गेले नसले, तर आश्चर्य नाही. बोलीभाषेशी नाते सांगणारे एकोणिसाव्या शतकातले एक समर्थ गद्यशैलीकार म्हणून महात्मा फुल्यांचे स्थान मराठीत वैशिष्ट्यपूर्ण ठरते" धनंजय कीर यांच्या सहकार्याने 'महात्मा फुले : समग्र वाङ्मय' या ग्रंथाचे साक्षेपाने संपादन करणाऱ्या प्रा. डॉ. मालशे यांचे हे प्रतिपादन विशेष लक्षणीय वाटते. विद्यापीठाच्या स्नातकोत्तर अभ्यासक्रमात महात्मा फुल्यांच्या वाङ्मयाचे अध्ययन करणाऱ्या अभ्यासकांना त्यामुळे विचारांची नवी दिशा लाभेल यात काही शंका नाही.

"मराठी भाषेवरील पोवाडा म. फुल्यांचा नव्हे" या लेखात तो पोवाडा म. फुल्यांच्या लेखणीतून उतरल्याचे वारंवार प्रतिपादन करणारे प्रा. भ. श्री. पंडित यांची कशी गफलत झाली आहे ते डॉ. मालशे यांनी साधार सिद्ध केले आहे.

डॉ. मा. गो. माळी यांनी लिहिलेल्या 'क्रांतिज्योती सावित्रीबाई जोतीराव फुले' या जनमानसामध्ये चांगलीच मान्यता प्राप्त झालेला शंभर पानांच्या पुस्तकाचा संपूर्ण इमलाच कसा अत्यंत बनावट साधनांवर आधारलेला आहे आणि त्यामुळे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, ना. ग. गोरे, प्रा. गं. बा. सरदार, डॉ. रा. चिं. ढेरे, डॉ. भा. दि. फडके यांच्यासारख्या दिग्गजांचीही कशी दिशाभूल झाली, हे अत्यंत परखड शब्दांत प्रतिपादन करणारा डॉ. मालशे यांचा 'साहित्यातील तोतयेगिरी अर्थात डॉ. माळीकृत सावित्रीबाई फुले यांचे चरित्र' हा लेख सत्याची चाड असलेल्या प्रत्येक व्यक्तीने मुळातूनच वाचायला हवा.

अनुक्रमणिका

भल्याभल्यांचा दंभस्फोट करताना प्रा. मालशे यांच्या भाषाशैलीतील, उपरोध, उपहास, नर्म विनोद इत्यादी खास वैशिष्ट्यांचे दर्शन कसे घडते त्याचा एक नमूना पाहा :– "डॉ. माळी हे सावित्रीबाईंची जी प्रतिमा उभी करीत आहेत, तीच मुळात बनावट आहे.

सावित्रीबाई इंग्रजी शिकल्याचाही माळी यांचा शोध आहे...महात्मा फुल्यांच्या महत्त्वाच्या भाषणांची स्वत: सावित्रीबाईही टिपणे घेत, त्यांपैकी काही भाषणे त्यांनी संपादित केलेली होती, असेही कालविसंगत मासलेवाईक विधान त्यांनी नोंदवून ठेवले आहे. सारांश, सावित्रीबाई म्हणजे आजकालच्या स्त्रीमुक्तीच्या आंदोलनात शबनम खाकोटीस लावून सभासंमेलनांतून धीटपणे हिंडणाऱ्या मृणालताई किंवा प्रमिलाताई यांच्यासारखी प्रतिमा डॉ. माळी यांना उभी करायची आहे ! आता तत्कालीन अधिकृत लेखनात मात्र नेमकी उलट प्रतिमा आढळून येते. . . सावित्रीबाईंच्या चरित्रात नव्याने उजेडात आणलेल्या म्हणून ज्या पुस्तिका म्हटल्या आहेत, त्या एकजात बनावट आहेत. ... एकूणच या पुस्तिका आणि त्यांतून निर्माण झालेली पिलावळ म्हणजे मराठी साहित्यातील तोतयेगिरी आणि बनावटगिरी (फ्रॉड आणि फोर्जरी) यांचे इरसाल नमुनेच आहेत." 'नामूलं लिख्यते किंचित' हे सच्च्या संशोधकाचे ब्रीदच असायला हवे, त्याचे येथे उत्कटतेने स्मरण होते.

स्त्रीजातीचे पहिले कृतिशील कैवारी म. फुले यांनी ज्यांच्या 'स्त्रीपुरुष–तुलना' या पुस्तिकेची पाठराखण केली आहे. ताराबाई शिंद्यांच्या कार्याचा सविस्तर परिचय आणखी एका लेखात आढळतो. नंतरच्या काळात महर्षी कर्वे, पं. रमाबाई इत्यादींनी स्त्रीमुक्तीची आंदोलने पुण्यात व्यापक प्रमाणावर यशस्वी केली असली तरी त्यापूर्वी स्त्रीजातीच्या सनातन दु:खाला एका स्वकीय स्त्रीकडून वाचा फोडली गेली ती बुलढाण्यासारख्या एका आडबाजूच्या गावी राहाणाऱ्या ताराबाई शिंदे यांच्या १९८२ साली पुण्याहून प्रसिद्ध झालेल्या 'स्त्री–पुरुष–तुलना' या पुस्तिकेच्या रूपानेच होय, अशीच इतिहासाची साक्ष आहे.

महाराष्ट्रीय समाजप्रबोधनाचे अग्रदूत म्हणून विख्यात असलेल्या लोकहितवादींविषयीच्या डॉ. अरुण रा. जोशी, डॉ. य. दि. फडके, डॉ. मंगुडकर, डॉ. सरोजिनी वैद्य यांच्या दिशाभूल करणाऱ्या व विपर्यस्त लिखाणाचा परखड परामर्ष घेणारे पुढील चार लेखही या संग्रहात समाविष्ट झाले आहेत :–

"बुद्धिप्रकाश 'मधील लोकहितवादींचे गुजराती लेखन", "जातिभेद आणि लोकहितवादींचे पुरोगामित्व", "'गोपाळराव हरी' : विपर्यस्त चित्रण"; आणि "एक 'स्वदेशहितेच्छु' वर प्रकाश."

प्रा. अ. का. प्रियोळकरांसारख्या विद्वानांचीही कशी गफलत होऊ शकते हे दाखवून 'एक स्वदेशहितेच्छू' हे प्रियोळकर म्हणतात त्याप्रमाणे लोकहितवादींचे टोपणनाव नसून विष्णुशास्त्री पंडितांनीच हे टोपणनाव धारण करुन 'ब्राह्मणकन्याविवाहविचार' 'वेदांविषयी' व 'ब्राह्मणवर्णाचे मूळ आणि वेदांवरील द्वितीय व्याख्यान' ही पुस्तके लिहिली असल्याचे डॉ. मालशे यांनी साधार सिद्ध केले आहे.

'गोपाळराव हरी' या ग्रंथातील विपर्यस्त चित्रणावर प्रकाश टाकताना डॉ. मालशे लिहितात. "लोकहितवादींचे पणतू भाऊसाहेब देशमुख यांनी केलेले आठवणींचे निवेदन, त्याचे लेखिकेने ठायी ठायी केलेले मंडन, लोकहितवादींच्या आक्षेपकांचे अधूनमधून केलेले खंडण आणि अस्सल साधनांची शेवटी जोडलेली ६१ पृष्ठांची थोडीफार अप्रस्तुत चार परिशिष्टे यांच्या जोडकामातून हे पुस्तक तयार झालेले आहे. या साऱ्या प्रपंचातून लेखिकेच्या दाव्याप्रमाणे लोकहितवादींचे 'माणूस' म्हणून यथातथ्य दर्शन घडले असते, तर मराठी भाषेत एका मौलिक ग्रंथाची भर पडली असती. पण तसे फारसे घडून आलेले नाही, हे प्रारंभीच मोठ्या खेदाने नमूद करावेसे वाटते."

देवदत्त ना. टिळक यांनी लिहिलेल्या 'महाराष्ट्राची तेजस्विनी पंडिता रमाबाई' या ग्रंथाचे परीक्षण करताना स्वत:ला 'उपेक्षितांच्या देवडीवरचा भालदार' असे म्हणवणाऱ्या प्रबोधनकार के. सी. ठाकरे लिखित पंडिताबाईंच्या चरित्रांशी

त्याची तुलना करून जो पुढील निष्कर्ष काढला आहे तो असा :– "देवदत्त टिळकांच्या या ग्रंथ-राजातून 'महाराष्ट्राच्या तेजस्विनी'चे दर्शन होण्याऐवजी 'ख्रिस्ती धर्म प्रचारिणी'चेच दर्शन अधिक होते. ही मोठी खेदाची गोष्ट होय!"

बेळगावचे एक संशोधक कृ. बा. मराठे यांनी 'मराठी रंगभूमीचा पूर्वरंग' या आपल्या ग्रंथात व अन्यत्रही 'संगीत रंगभूमीच्या जन्माची मतलबी मीमांसा' कशी केली आहे पण वस्तुस्थिती कशी अगदीच निराळी आहे याचे साधार प्रतिपादन डॉ. मालशे यांच्यावरील शीर्षकातच एका स्वतंत्र लेखात आढळते. त्यामुळे, श्री. मराठे यांनी प्रस्तुत संदर्भात केलेला, मराठी संगीत रंगभूमीवर क्रांती घडवून आणणारे 'संगीत शाकुंतल' हे नाटक अण्णासाहेबांनी स्थापन केलेल्या भरत-शास्त्रोत्तेजक बेळगावकर नाटक मंडळीने स. १८७७ सालीच रंगभूमीवर आणले होते, हा दावा चुकीचा असून या नाटकाच्या चार अंकांचा पहिला प्रयोग पुणे येथे दि. ३१ ऑक्टोबर १८८० रोजी होऊन मराठी संगीत रंगभूमीची मुहूर्तमेढ रोवली गेल्याचे जनमानसात स्थिरपद पावलेले आधीचे मतच कसे वस्तुस्थितीला धरून आहे, याची खात्री पटते.

केशवकुमारांचे 'झेंडूची फुले' हे विडंबन-काव्य आणि त्याचे डॉ. मालशे यांनी केलेले नंतरचे साक्षेपी संपादन ही दोन्ही मराठी साहित्य-विश्वात चांगलीच गाजली आहेत. त्याच संदर्भात मराठीतील पहिला विडंबनकार कोण याची सर्वांगीण चर्चा होणे अपरिहार्यच ठरते. मंगेश रा. तेलंग हेच मराठीतील पहिले विडंबनकार असून त्यांच्या १८८९ साली प्रसिद्ध झालेल्या 'संगीत हजामत' या विडंबन काव्यात अण्णासाहेब किर्लोस्करांच्या संगीत 'शाकुंतला'-तील अकरा आणि 'सौभद्रा'तील चौदा पदांचे कसे उत्कृष्ट विडंबन केले आहे त्याचे सोदाहरण विवरण "संगीत हजामत' : कर्ता आणि कर्म!!' या अत्यंत मार्मिक शीर्षकाच्या लेखात आढळते.

डॉ. मालशे यांनी आपला हा लेखसंग्रह गुरुवर्य कै. प्रा. अ. का. प्रियोळकर आणि ज्येष्ठ स्नेही कै. धनंजय कीर यांना आदरपूर्वक" अर्पण केला आहे. ही घटनाही अत्यंत अर्थपूर्ण वाटते. प्रा. प्रियोळकरांच्या संशोधनाचा वारसा पुढे चालवणारे डॉ. मालशे हे एक अत्यंत समर्थ असे त्यांचे शिष्य आहेत. 'शेक्सपिअरच्या रूपांतरांच्या परीक्षणांचे पर्यालोचन' या अभ्यासपूर्ण लेखात हरी नारायण आपटे यांच्या परीक्षण लेखांच्या संदर्भात व्यक्त झालेली डॉ. मालशे यांची पुढील भूमिका ही त्यांच्या बहुतेक सर्वच लेखांच्या संदर्भात प्रातिनिधिक स्वरूपाची म्हणता येईल :–

"समीक्षा आणि संशोधन ही क्षेत्रे परस्परपूरक आहेत. परंतु मराठी समीक्षक संशोधनाचे क्षेत्र किचकट म्हणून त्यापासून प्रायः दूर राहतात. त्यामुळे मराठी उपयोजित समीक्षेतच नव्हे, तर सैद्धान्तिक समीक्षेतही ऐतिहासिक दृष्टिकोनाचा अनेकदा अभाव असल्याचे जाणवते व ती अर्धांग झाल्यागत दुबळी वाटते."

मराठीच्या मानकऱ्यांविषयीचे मूळ ग्रंथ सर्व सामान्य वाचकांना सहजासहजी उपलब्ध होऊ शकत असल्याने त्यांचाच फार गाजावाजा होतो. त्या मानाने वेगवेगळ्या नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेली त्या ग्रंथांचा परखड परामर्श घेणारी परीक्षणे प्रायः दुर्लक्षितच राहातात असा अनुभव आहे.

मुंबईच्या परचुरे–प्रकाशन–मंदिराने ग्रंथ-रूपाने प्रकाशित केलेल्या या डॉ. मालशे यांच्या समीक्षा आणि संशोधन यांच्या मेळाचे आदर्श वस्तुपाठच ठरणाऱ्या लेखांचे महत्त्व म्हणूनच अनन्यसाधारण वाटते. ■

तारतम्य
ले. स. गं. मालशे
परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई

मेड इन इंडिया

मराठी कादंबरीचा वेधक टप्पा

वसंत वाहोकार

"पुढे बसलो त घुरजळ. मांगे बसलो त उलाय अन् मंधात बसलो तं बैलबुजाळ असा हा माहोल. अख्खी जिंदगी अथूनतथून मीजमाशी पळल्यावानी माही अन् या गावाचीही."

'मेड इन इंडिया' या इंग्रजी नावाच्या मराठी, नव्हे जातीवंत वऱ्हाडी कादंबरीची ही आहे सुरुवात. आणि या सूत्राभोवतीच ही अख्खी कादंबरी आपली गुंफण करीत गेलेली. वरपांगी हसत खेळत रिझवत जाते, असं वाटत असतानाच, अंतर्वेदना-संवेदनांना थेट हात घालून उस्कटून टाकणारी ही अफलातून लेखनयात्रा !

'भंडारवाडी' ही साधारणतः पंधरा वीस वर्षांपूर्वी अस्सल वऱ्हाडीतून बाजीराव पाटलांनी जन्मास घातलेली खेडे आणि तेथील जनजीवन यावरची नोंद घेणारी कादंबरी. उद्धव ज. शेळके यांनी 'धग' लिहून वऱ्हाडी वैभवात मोठीच भर घातली. मग वऱ्हाडी कादंबरीविषयी मराठी भाषिकांच्या-वाचक अभ्यासक, रसिक-जिज्ञासूंच्या अपेक्षा वाढल्या खऱ्या पण पाहिजे ते माप त्यांच्या पदरी पडू शकले नाही. याच परिस्थितीत अवचित्पणे धक्का देत बाहेर पडली ती ! मेड इन् इंडिया !

इथे एक गोष्ट प्रामुख्याने स्पष्ट व्हायला हवी ती म्हणजे, कुठेही कोणाची व्यक्तिगत तुलना-मोजमाप अपेक्षित नाही. शिवाय मराठी कादंबरी, तिचा विकास आव्हानात्मक टप्पे व त्यात वऱ्हाडी बोलीभाषेतील कादंबऱ्यांचे स्थान यांचाही विचार करावयाचा नाही. स्थूलमानाने वऱ्हाडी लेखन व 'मेड इन'ची जातकूळी या निमित्त जेवढे सांगता येईल तेवढेच.

कादंबरी व तिचा जन्म तपासण्याआधी लेखकासंबंधीही चार दोन गोष्टी माहित असाव्यात म्हणून...पुरुषोत्तम बोरकर हे कादंबरी प्रांतात एकदम नवे नवखे वाटावे असे नाव. त्यांची ही ग्रंथरूपात प्रसिद्ध पहिलीच कादंबरी. पण मराठी रसिकांना हे नाव अजून वेगळ्याही संदर्भात आठवायला हवे. बोरकरांच्या कविता, गझला त्यांनी वाचल्या आहेत. तुरळक ललित-कथालेखन त्यांच्या नावे आहेच. शिवाय 'थंडर-वंडर' अशा स्वरूपाच्या रहस्यकथांचे लेखनही त्यांनी केल्याचे आढळेल. असा हा हरहुन्नरी लेखक पहिल्यांदा आपली प्रतिमा यथोचितपणे सादर करताना दिसतो, तो 'मेड इन इंडिया'मध्येच. या सर्व वृत्तिप्रवृत्तींचा परिपाक म्हणजे 'मेड इन इंडियाचे' या स्वरूपातले लेखन. पहिल्यांदाच, प्रकाशित होतानाच एखादे पारितोषिक प्राप्त होण्याचे भाग्य लाभलेली ही कादंबरी स्वभावतःच स्वतःविषयी आणि लेखकाविषयीही अपेक्षा उंचावते व मराठी वाचकांचे लक्ष वेधून घेते. (अलिकडे व आधीही तिची थोडी चुकीची जाहिरात होत जात्री हा जरासा विसंवाद नजरेआड व्हायला हवा.)

श्री. पंजाबराव साहेबरात्र गरसोळीकर पाटील
बी. ए.
सरपंच ग्रामपंचायत-गरसोळी खुर्द'

तर असा हा पंज्याव, पंजाबराव हा या लेखनातला नायक. म्हणजे प्रथमपुरुषी निवेदनातून उलगडत जाणारी ही कादंबरी. भोवतालच्या बेहिशेबी बकालपणावर रट्टे हाणणारी. नाही म्हटलं तरी भालचंद्र नेमाडेंचा प्राध्यापक नायक पांडुरंग सांगवीकर नजरेसमोर येतोच व त्याचे सभोवतालचे सूक्ष्म आकलनही आठवत जाते. पंजाबचे, त्याच्या विश्वाचे आकलन व त्यावरच्या प्रतिक्रिया ह्या त्या वळणावरून जाणाऱ्या म्हणून अधिक सोईच्या-लेखक व वाचक दोघांनाही.

'भाऊ पंजाब' म्हणून पंजाबराव पाटलाचा स्वतःशीच संवाद हा खूप गमतीचा . . . बिलंदर आणि तरीही सुजाण असा.

"आपनही त पाह्यतो भाऊ पंज्याब, आपल्या आजूबाजूले ह्या शिनॅरिटीच्या मानापानाच्या, प्रमोशनच्या-इन्क्रीमेंटच्या भानगळी. पटवाऱ्यापासून त थेट कलेक्टर लोग. त हेही सायाचं अखरीनच आपल्याले. त आपन अथीच बेस्ट आहो. त मंग दोस्ताना कराले काय हर्कत आहे या मातीशी ?"

म्हणजे परिस्थिती चालून आली आहेच. ती विदारक आहे. म्हणून स्वभावाशी सुसंगत नाही. मग तिच्याशी धडका न घेता स्वतःपुरता शहाणपणाचा विचार स्वीकारणारा पंज्याब सहज सांगून जातो की, 'हेही सायाचं अखरीनच आपल्याले त आपन अथीच बेस्ट आहो' आणि एकदा मनाशी हे गणित जमल्यानंतर पंज्याबचे उत्तर असते त मंग दोस्ताना कराले हर्कत आहे या

मार्तीशी ? म्हणजेच विद्यमान परिस्थिती ही पंज्याबने स्वतःहून स्वीकारलेली जीवनपद्धती.

या जीवनपद्धतीत विसंगतो आहे. भेसूरता आहे. नको एवढी भयानकता आहे. पण पुरुषोत्तम बोरकर हा कवीमाणूस तिथंही आपल्या स्वप्नाचे रंगीत राजवाडे उभे करतोच. त्याला माहीत आहे की या गावात या मान्साईत राहूनच पुरी उमर कटवाची आहे. जिंदगीशी भानामती खेयाची आहे. आपल्या शरीराचा डमरू अथी याच गावात वाजवाचा आहे आपल्याले. नाहीतं भाऊ पंज्याब ! आपल्याले कोन वयखते सैबेरियात अन कॅनडात.' आणि त्याची स्वप्नं सुरू होतात ती अशी "... तो सवतरफ दिखना पुरा हराहीहरा. पुरा डीपग्रीन फॉरेस्ट. घने बियाबाफे माफिक लगनेकू होना ये पुरा येरिया. और गावमे ज्यो यस्टीका रोड आता है उसके दोनो ओर होना वरगदके उचेउचे पेड. और वरगदक्या दाढचा ऐशा होना की अलग दुनियाके वंदरोमे ये चर्चा हो की भाई सबसे सुपरसुप्रीम झुला कहा झूलना तो, तो गरसोईके रोडपे. और छाव तो ऐशी घनी ऐशी घनी की जैशी माँ की गोद. और हरेभरे खेतोमे हर यक्करमे होंगे कमसेकम चार आमके इयाळ, नारियल गुलमोहर निलगिरी, नीम, चंपा, ज्यामुन, पिपल, मो, गोंदन, बकाल, शिसम, साग, हिवर, वेर, औदुंबर, चंदन, केले, पपिते, आस्ट्रेलियन बब्बूल और आवला हो सब तरफ, ये सब हो अल्लाताला. मगर कांग्रेसीघास और बेशरमके पेड न हो कही भी ! और ये सब हो मगर झील के उसपार न हो गुलशन नंदा. नही तो उसकी सिरीज यहाके कच्चोको बेववत पकायेगी और वेकार बनायेगी..."

अशी स्वप्नं पाहाणारं कलंदर पंज्याव पाटलाचं व्यक्तिमत्व घडत गेलं कसं ? तेही त्याच्याच शब्दात व्यक्त होत जातं ते असं, 'ह्या गावासाठी फुल ना फुलाची पाकई व्हाचा ईचार माझ्या मनी कसा आला, त्याचं आनखी येक कारण म्हन्जे माझ्या शैक्षणिक अर्हतेचा साईडइफेक्ट ! आता प्री बीकॉम, बीयस्सी पार्ट वन अन यमे पार्ट वन इन मराठी लिट्रेच्यर असं कसच्या कसं शिक्षन होयेल आहे माह्य' शिवाय या शिक्षणासोबत शायरी, जाफ्रानीची पानं, व्रिस्टॉलची पाकिटं, अत्तराचे फाये आणि कोणत्याही गोष्टीले इर्शाद है, ती लकब ! लोकल मराठी हिंदी शायरांचा सहवास. अशा सगळ्या संमिश्र रसायनातून हे व्यक्तिमत्व घडत गेलेलं . . . त्याचे पडसाद मग लेखनभर !

अशातच पंज्यावचे आत्मपरीक्षणही सुरूच. त्याला प्रश्न पडतच असतात. रात्री एकाच ताटात जेवून दुसऱ्यादिवशी अजनवी होणारा हा माहोल त्याला चांगला माहीत आहे. हे जगणं भारतीय समाचार चित्रासारखं आहे. ते आपणास जमणार नाही ही त्याची जाणीव ठाम आहे. त्याची ओढ क्षितिजापल्याडची व झेप अस्मानाची आहे आणि स्वतःच्या सामर्थ्याचे त्याचे भानही तसे सुटलेले नाही. अशातून तीव्रपणे उमटणारे त्याचे प्रश्न हे असे असतात. 'ईच्यार करो, भाऊ पंज्याब ! आपन कितलूसे ह्या अगळवंव पसाऱ्यात ? आपला पल्ला किती ? पाय कसे ? चाल कशी ? सगळं सगळं जन्मापासूनचं वळ येकवटून पऊ पऊ त कितीक पऊ आपन ? कुठलोग पऊ ? एखांद्यातरी चार्नीले शिवू की नाही आखरीलोग ?'

आकाशातल्या महावीर, गौतम, कवीर, चक्रधर, मीरा, नामदेव, तुकाराम, गाडगेवावा, तुकडोजी यांच्या चांदण्या त्याला खुणावत असतात आणि मग त्याला उन्मळून येते आपण कुठे अन् हे सारे कुठे ? यांची वरोबरी आपल्याने होईलच कशी ? यावरचे पंज्यावचे शेरे-ताशेरे अतिशय समर्पक व तीव्र असतात. आपल्यापेक्षा किडेमुंग्या सरस आहेत कारण त्यांना लाईन सापडली असते त्यांची. पण आपला तर चकवाच भानामतीच्या आडसट्टयात आलेला. एखादं महाणव्रत हरवून जावं आणि उभं आयुष्य नुसतं व्याजात चाललं जावं-असे सारे तीव्र चटके आतल्या आत पचवणे सुरू असते. आणि त्यातूनच दु:खच दवा मानण्याची वृत्ती बनत जाते ती याच आशेवर की, की कधीतरी अंगावरचे हे पलस्तर (प्लास्टर) गळून-झडझडून पडेल.

तर हे राहाते गाव गरसोई पंज्याबच्या अणू-रेणूत व्यापून राहिलेले. तियले दिवसरात्र-सारे व्यवहार. शेतीभाती-मोलमजूरी-दुधदुभतं-शोषण पीडण-मिजास अनावश्यक अहंकार-उधळपट्टी-

काय न् काय राजकारण–समाजकारण, पाटीलकी या सगळ्यांचे तंतू न् तंतू उपसून अगदी सुटे सुटे करुन दाखवण्याची सगळी अफलातून किमया पंज्याबला इतकी अचूक साधली, की ती साधली म्हटल्यापेक्षा तीच त्याची जीवनप्रणाली झाली याचा संभ्रम पडावा असा एकूण प्रकार पंज्याबराव गरसोईकरचा. लग्न सराई असो की मरणतोरण... त्यातले व्यवहार–डावपेच–डावे उजवे–चतराई चतुराई–या सगळ्यांचे रोखठोक हिशेब पंज्याबला जमून येतात. त्यामुळे त्यातली कोणतीही 'मध्यस्त' वृत्ती तो खपवून घेत नाही. सरळसरळ प्रहार ही त्याची पक्की भूमिका असते. त्याला समजत असते की–' हे असंच शिकोलं सायाचं आतालोग निरा येलशेल फोका. पिवर पिढयामागून पिढया च्युतिया बनोनं. अन भय्या दूध देतोवाल्या संस्कृतीले त हे खरंच वाटनार, ज्याईनं वावराचं तास पाह्यलं नाही त्याईले हे सुज्यलाम सुफलामच वाटनार. दुबादह्याच्याही म्हटल्या खिनभर त नद्या काय इतल्या भरभरून वाह्यतात ? अफूच्याही तऱ्हा टेक्नीकलर अन् चकवेही सायाचे सिनेमास्कोप !'

एकूणच जिनगानीचं बजेट लंबं करणाऱ्या गोष्टी...दरवर्षीच अधिक उणे प्रकार. कधी रोहिनी खताचे भाव वाढवूनच येते त कधी मिरुग कीटकनाशकांचे रेट वाढोते. कईया एन्ड्रीनचा डब्बा उघडला की त्यात राकेल मिक्चर निगते. कीटकनाशके तीही गरसोईत इतकी की गरसोईत आहोत की अमेरिकेतल्या सान फ्रान्सिस्कोत आहो असा पेच पळते. आणि मग यातून उद्‌भवतात ते फार वेगवेगळे प्रकार–हातचलाख्या. ग्रेडरशी आटं साटं–इकळचा कळसळा तिकडे भरून काळण्याची वाटेल तसी धळपळ. या सगळ्या धडपडींचा एक बेमालूम घटक 'पंज्याब' असतो हे तोही नजरेआड करू शकत नाही.

'धुमीत खोटी नोट चालते, तसे हे चालून राह्यले सायाचे. जिंदगीत खाल्ली नाही याईनं कण्हा अंब्राळीची भाकर. तरी चोट्टीचे निवळून येतातच येतात याच भाकरीच्या भरोशावर...'

ही वस्तुस्थिती, कठोर वास्तव पंज्याब'चे हृदय पिळवटून काढते आणि त्यांच्या मनात 'आपण आता (सरपंचपकीचा) राजीनामाच देल्ला पाह्यजे, हे असं उंबराचं फुल धुंडनं काही खरं नाही. आता इतके दिवस सरपंच्य होऊन राह्यल्यावर ध्यानात आलं की ह्या याईच्या लायनीत काही आपल्याले गती नाही' अशासारख्या. पळवाटा फुटू लागतात. कोणत्याही संवेदनशील अंतःकरणात अशा उलाघाली व्हाव्या तशाच त्या 'पंज्याब'च्याही होतात. अंतःकरण, स्वच्छ, निरोगी असताना बकाल वास्तवाचे चटके त्याला असे भाजून काढतात व त्यात 'पंज्याब'लाही ते प्राक्तन चुकवता येत नाही, प्राक्तन हे असे व ते चुकवता येऊ नये ही विदीर्ण जाणीव मग कधी अशा उदास हताश क्षणी हुंकारते–' भाऊ पंज्याब! नाकातोंडात तं रेती जाऊनच राह्यली आपल्या अन् हा मुलूख त ना ऐलतीर ना पैलतीर. इतकं शिकूनही घळ ना सूर्योदय अन घळ सूर्यास्तही !' तीव्र होत जाणारं हे वाटणं त्याला अंधारासारखं–वीज निघून गेल्यासारखं–डसत असते आणि त्यातच तो म्हणून जातो की ' मी तुमाले जसं पाह्यजे तसं जगू शकत नाही.'

नवे संकट दारात उभे अन घरात जुनाट गर्दी
काय करू मीही दर्दी, घर दर्दी, दार दर्दी

'सायाचं आपन येखांद्याले जिगरज्यान समजून ताटात घेऊन बसावं जेवाले अन हात धुता धुता त्यानं आपल्याले म्हनावं, काल अळीच रुपयात असंच जेवलो होतो मी हाटेलीत आकोल्याच्या...' अशा नोंदीही त्याला कराव्या लागतात, घ्याव्या लागतात व त्याच नंतर खड़े फेकून चकवतात....हे पदराशी तहहयात ... कसे दूर करायचे ? एकूणच हा लखलख वहर आहे. टवटवीत तजेला असलेला. अस्सल गिन्नीबंद असं बावनकशी सोनं. त्याला कुठे खोट नाही. वट्टा नाही. कारण ते धुमीत मारून नेण्यासाठी चकवण्या फसवण्यासाठी नाही. जे आहे ते खणखण. जसं आहे तसं बेबंद: नाटकं नाहीत, फसवेगिरी नाही की नुसतीच चवन्नी अठन्नी तमाशागर्दी नाही. सगळा थाट अस्सल वऱ्हाडी म्हणजे वऱ्हाडी–धेडगुजरी नाही. सगळा बाज तुर्रेबाज दिमाखदार–हातचलाखी नाही. नव्या कोऱ्या आयुष्याच्या मुशीत अनुभवांचं–रोजच्या कलंदर कलदार जगण्याचं रसायन असं तप्त निखळ होऊन चकाकणारं. खरं तर ही एक

आत्मलक्षी अशी दीर्घ भावकविता आहे. काव्य-गर्भ कथा म्हणावे की कथागर्भ काव्य अशा सलील संभ्रमात रसिकतेला आव्हान देत, खुलवत-रिझवत-गाणी गात-धुंदावत-वेडावत झपकन् आरशासमोर उभे करणारे हे लेखन सच्चे लेखन.

भुलभुलैये . . . चकवे भानामती ह्या लेखनालाही खुणावतील. कधी वेडावतील. बाजार-पेठांचीही यादी ऐकवली जाईल. पण 'पंज्यात' आणि 'पंज्यावराव' या हाकांमधील अंतर जाणून घेण्याइतके हे तरल-पारदर्शी ... तरीही जहांबाज लेखन, चकणार नाही-फसणार नाही-आपली वाट आडवाट होऊ देणार नाही, इतके ठाम नक्कीच आहे. त्या खुणा पुनःपुनः शोधण्याची गरजही नाही.

ग्रामीण जीवनाची क्रूर थट्टा, गावांची विटंबना करून-बाजारपेठा गजबजत असतील - पैसा-प्रतिष्ठा उफणता येत असेल. पण आत्मतेजानं लखलखता येईल असं शाश्वत-तडाखेबाज लेखन कधीतरी मधूनच असं धुक्यातून सूर्यासारखं उगवतं, तो सूर्य नाकारता येत नाही. ती किरणं थोपवता येत नाहीत, आणि हे प्रारब्धही नाकारता येत नाही. म्हटलंच तर बाजारपेठांच्या अशा दुर्दैवाशी दोन हातही करता येत नाहीत.

शेवटी 'मेड इन इंडिया' नुसती एखादे गाव-खेडे किंवा वऱ्हाडी बोली भाषा एवढीच नाही तर मराठी कादंबरीत तिचा पसारा खूपसा निराळा, महत्त्वाचा आणि एका वेगळ्या टप्प्यावर घेऊन जाणारा असा आहे-ते माप तिच्या पदरी पडेल, ही खात्री. ■

'मेड इन इंडिया'
पुरुषोत्तम बोरकर
कादंबरी : श्री विद्या प्रकाशन, पुणे
मूल्य ४५ रुपये

गोंडवन पेटले आहे

सुनील बावने

"गोंडवन पेटले आहे" हा कवी प्रा. विनायक तुमराम यांचा पहिलाच काव्यसंग्रह असला तरी त्यांचे 'गोंडवनातील क्रांतिवीर नारायणसिंह उईके' हे चरित्रात्मक पुस्तक महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाच्या नवलेखक सहाय्य योजनेच्या अंतर्गत यापूर्वीच प्रकाशित झाले आहे. प्रा. विनायक तुमराम यांनी आदिमांच्या, आदि-वासींच्या प्रबोधनासाठी सभा, संमेलने चर्चासत्रे, वाचनालये, मेळावे आदीद्वारा कार्य करून आदि-वासींमधील आत्मभान जागविण्याचा यापूर्वीही प्रयत्न केला आहे. 'मराठीतील प्रकाशित आदिवासी साहित्याचा वाङ्मयीन आणि सांस्कृतिक अभ्यास' या विषयावर त्यांचे डॉ. द. भि. कुळकर्णी यांचे मार्गदर्शनाखाली संशोधन चालू आहे. ते मूलच्या नवभारत कनिष्ठ विज्ञान महा-विद्यालयात प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

प्रा. विनायक तुमराम यांची कविता मनस्वी विद्रोहाची भाषा बोलणारी कविता आहे. नागर संस्कृतीपासून अलिप्त असलेल्या, जगण्याचा गंध नसलेल्या, आजही पशुपक्ष्यांची शिकार करून व कंदमुळे भक्षण करून जगणाऱ्या चेतनाहीन, निद्रिस्त आदिवासी समाजाचे प्रतिनिधित्व कर-णारी त्यांची कविता आहे. "गोंडवन पेटले आहे" या प्रस्तुत काव्यसंग्रहात कवीने दुर्गम, पहाडी, रानावनातल्या क्षेत्रात शतकानुशतके खितपत पडून असलेल्या आदिमांचे, त्यांच्या व्यथांचे, शोषणाचे, लाचारीचे, वर्णभेदाने भोगत असलेल्या दाहक अनुभवांचे हृदयस्पर्शी, मर्मभेदक चित्र रेखाटले आहे.

पहाडांच्या पायथ्याशी
सूर्योदयाची वाट पाहत
वैतागलेले माझे रानटी अस्तित्व
समतेच्या साम्राज्यापुढेही
एक प्रश्न म्हणूनच उभे राहील

किंवा

पेटत्या अंतराळाच्या कुशांशी
माझ्या वेदनांचे रक्तनाते आहे
मुक्तीच्या उध्वस्त वाटांना
त्या पावलांचा स्पर्श ठाऊक आहे.

आदिवासींचे आक्रोश घेऊनच कवीची कविता जन्माला आली आहे. कवी सूर्योदयाची वाट पाहत पहाडांच्या पायथ्याशी सडतो आहे. कुजतो आहे. त्याच्या रानटी अस्तित्वाला तो वैतागतो आहे.

पण आदिमांच्या वस्तीत अद्यापही सूर्य उगवलाच नाही याची कवीला खंत आहे. आपल्या दुर्गम अस्तित्वापर्यंत प्रस्थापित लोकांनी लक्ष घालायला पाहिजे असे कवीला वाटते. म्हणून तो यापुढेही जाऊन आदिवासींच्या जीवनाचे, संस्कृतीचे दर्शन देताना म्हणतो,

किर्रर्र रानात
मी रोज मरण पेरतो
गर्द झुडुपांच्या पसाऱ्यात
वनवासाचा आशय शोधतो
माझ्या वेदनेला युगांचा संदर्भ आहे
माझ्या विद्रोहाला निळ्या पहाडांची साक्ष
आहे.

किंवा

आसवांच्या पाण्याने
आम्ही जाळत आहोत
'स्वप्नांचे' दिवे—

किंवा

दारिद्र्याचे कित्येक पावसाळे अंगावर
रिचवले
तेव्हा कुणीच मित्र झाला नाही
रखरखत्या उन्हात माझी विवस्त्र काया
जळत राहिली
अन् निरपराध पाठीवर अन्यायांचे वळ
उठत राहिले.

कवी दु:ख, दैन्य, दारिद्र्य यांचे तडाखे अंगावर सोसतो आहे. तो निरपराध पाठीवर अन्यायाचे वळ निमूटपणे भोगतो आहे. प्रस्थापित समाजाचे अन्याय, अत्याचार पहाडांच्या रानकुसात तो अनुभवतो आहे. तो स्वत:साठी अस्तित्वाच्या पायवाटा शोधतो आहे. म्हणून तो 'मुक्तीच्या नव्या संदर्भ-वाटा' निर्माण करून आदिपुत्रांच्या घायाळ जगण्याला टाहो फोडतो आहे.

मी वनवासी आहे
आणि शोधतो आहे आजही
माझ्या मरणांचा संदर्भ मिळणारा अंधार
नि:शब्द पहाडांच्या गर्भात
माझ्या जखमांना शब्द देणाऱ्या
रानकुसात—
मला अजूनही गवसल्या नाहीत
त्या अस्तित्वांच्या पायवाटा

प्रा. तुमरामांची कविता अशाप्रकारे आक्रोशाची, वेदनेची, विद्रोहाची आरोळी ठोकून प्रचलित समाजव्यवस्थेविरुद्ध लढा देण्यास उद्युक्त होते. कारण प्रचलित समाजव्यवस्थेमुळे, चातुर्वर्ण्यामुळे, वर्णभेदामुळेच आदिम, आदिवासी जीवनाच्या संस्कृतीची हानी झाली आहे, असे कवीला अभिप्रेत आहे. प्रस्थापितांनी आदिमांकडे, आदिवासींकडे दुर्लक्षिलेल्या दृष्टिकोनातूनच पाहिले. त्यांनी कधी या आदिम समाजाच्या व्यथा, वेदना जाणण्याचा प्रयत्न केलाच नाही, याचे उदाहरण देताना कवी म्हणतो,

गावकुसांच्या आतील निष्ठूर सावल्यांनी...
विझवित गेलो आपला आक्रोश
आपणच आपल्या शब्दांनी
तेव्हा पावसाळी वाऱ्यांना
ठाऊकच नव्हता आमचा दुर्गम मुलुख—

किंवा

मरणाला अस्तित्वाची
चाहूल लागली नाही
म्हणून आयुष्याशी काळांच्या
बेरजा करीत जगतो आहे
वनवासाची रात्र अजून
ढगाळलेली आहे तरी . . .

पण या सर्व भोगाच्या मुळाशी मनुधिष्ठित समाजव्यवस्था, वर्णव्यवस्थाच कारणीभूत आहे याची कवीला पुरेपूर जाण आहे. स्वातंत्र्य मिळून अनेक वर्षे झाली तरी पण आदिम जीवन उपेक्षित राहिले याचीही कवीला खंत आहे. आजपर्यंत कवीच्या वाट्याला, जगण्याला उपेक्षाच आली आहे. कवी जन्माला येताना 'माणूस' म्हणून अवतरला पण तो जगताना 'गुलाम' म्हणून जगत आहे. पण आता त्याला प्रस्थापितांची जुलमी चौकट उध्वस्त करायची आहे. इथल्या वर्णवादी समाजव्यवस्थेने एकलव्यापासून तर आजतागायत आदिवासींवर अन्यायच चालविला आहे. म्हणून तो आता विषमतेच्या मुळाशी घाव घालण्यासाठी सज्ज झाला आहे. तो प्रश्न विचारण्यास उद्युक्त झाला आहे.

हा वनवास माझ्या गतजन्मीचे भोग म्हणून
मी कां मानावे

विषमतेच्या चक्रव्युही तुम्हीच मला गोवले
हे कसे विसरावे

किंवा

आठवणींचे निष्प्राण सांगाडे कोणत्या
भुईत पुरावे
प्रतिक्षेत आटलेले आसू कोणकोणत्या
रात्रींना मागावे.

असा कवी खडसावून जाब विचारतो.

जन्मासोबत वादळे घेऊन येणारा कवी आजही पहाडांच्या अंधारगुहात आदिम जीवनाचे अस्तित्व शोधतो आहे. वर्णभेदाच्या चकव्या नीतीला, वेगडी कारस्थानाला बळी पडून तो विषमतेच्या चक्रव्यूहात सापडला आहे. म्हणून तो सारे चक्रव्यूह भेदू पाहणारा अभिमन्यू होऊ इच्छितो आहे. तो आपल्या शब्दांनी वनवासमुक्तीच्या शपथा घेण्यास सजग झाला आहे. आपल्या मुक्तीसाठी तो जिवावर उदार होऊन नव्या युगाच्या मैत्रीसाठी पुढे पाऊल टाकतो आहे. म्हणून मनुवंशत्वाच्या तत्वावर, विषमतेवर घाव घालतांना कवी म्हणतो,

वनपुत्रांच्या मनामनात
दिसावते आहे स्वप्न वनमुक्तीचे
दास्यत्वाचा अंधार पुसण्याची
ही जिद्द पेटली आहे
विषमतेशी लढायची
ही क्रांती जागली आहे

कवी कधीचाच दूर डोंगरदऱ्यात आदिमांच्या मुक्तीची वाट पाहतो आहे. विषमतेच्या चक्रव्यूहात सापडलेल्या अगतिक असहाय्य आदिमांना, आदिवासींना त्यांच्या दास्यत्वाचा, गुलामीचा, अज्ञानाचा अंधार दूर सारण्यासाठी वनवासी बांधवांच्या मनात क्रांतीची जिद्द पेटविण्याची 'जागल' करण्याचा प्रयत्न करीत आहे. कवीला विषमतेविरुद्ध क्रांती करायची आहे. त्यासाठीच कवी आपल्या वेदनांचे नाते मुक्तीच्या उद्ध्वस्त दाटांशी जोडत आहे. एकलव्य ते बिहारचा क्रांतिसूर्य–बिरसा राणी दुर्गावती, बाबूराव शेडमाके, क्रांतिवीर नारायणसिह उईके ह्या आदिम क्रांतिकारकांचे आदर्श डोळयांसमोर ठेवून तो आपली कविता आदिवासींच्या व्यथांना वाचा फोडण्यासाठी खर्ची घालत आहे. एकलव्य जसा इथल्या प्रस्थापितांचा वर्णबळी ठरला तसाच आदिवासी समाज वर्णभेदाच्या वणव्यानेच गावकुसाबाहेरच्या रानात तडफडत आपले प्राण जगतो आहे. पण कवींना या बंधनातून आदिमांना आदिवासींना बंधमुक्त करायचे आहे. म्हणून त्यांची कविता एकलव्याच्या विद्रोहाच्या दिशेने प्रहार करते–

मित्रवर ! तुझ्या भात्यातील तळपणाऱ्या
तीक्ष्ण तीरांना
करणार आहे मी
क्रांतीच्या मशाली अन्
तुझ्या आंगठ्यातून सांडलेल्या रक्ताने
लिहिणार आहे मी इथल्या
सुवर्णशाहीचा मृत्युलेख
कारण वेदनांनी भरलेले
तुझे वनवासी जीवन
मीही वर्णबळी म्हणून जगतो आहे.

कवी एकलव्याच्या आंगठ्यातून सांडलेल्या रक्ताने विद्रोहाचा कुळारंभ करतो आहे. कारण एकलव्याचे जीवन जसे वेदनांनी भरलेले होते तसेच कवीचे जीवन वेदनांनी, वनवासांनी भरले आहे.तो अद्यापही वर्णबळीच म्हणून जगतो आहे. कवी एकलव्याचा आदर्श घेऊन क्रांतीच्या मैदानातील प्रदेशात उतरला असला तरीपण कवीला एकलव्यासारखे वर्णबळी म्हणून जगायचे नाही. तो आता प्रस्थापितांच्या बंधनात गुरफटलेल्या शृंखलातून स्वतंत्र होऊ इच्छितो. विषमतेच्या चक्रव्यूहात तो आता राहू इच्छित नाही. म्हणूनच कवी वर्णवादी तत्वज्ञान जाळायचा प्रयत्न करतो आहे. जाळतो आहे.

मी जाळून टाकतो
ती सर्व निर्लज्ज तत्वज्ञाने
जी माझ्या आयुष्याची जात विचारतात

इथल्या प्रस्थापितांनी आदिवासींचा आक्रोश ऐकून घेतलाच नाही. विज्ञानयुगातही, २० व्या शतकातही त्यांच्या दारिद्र्याकडे, परिस्थितीकडे, त्यांच्या रानटी अस्तित्वाकडे कोणीच लक्ष दिले नाही. तो अद्यापही वनवासाची रात्र भोगून वेदनांच्या व्यथांच्या बेरजा करून आयुष्य कंठतो आहे. तो नुसता वनवासच भोगत आला आहे. 'सुखाचे

स्वप्न आशेने पाहतो पण त्यांच्या स्वप्नांच्याही शेकोटया झाल्या आहेत. सुखाच्या भविष्याच्या आशेने तो अंधारात स्वप्नांचे दिवे जाळतच आहे. उपेक्षेच्या, वर्णजातीच्या भयाण अंधारात तो तडफडतो आहे. पण कवी अद्यापही निराश झालेला नाही. कवीला विषमतेविरुद्ध बंड करायचे आहे. पण जोपर्यंत मनुवादी वर्णव्यवस्था, समाजव्यवस्था नष्ट होत नाही तोपर्यंत आपण स्वतंत्र होऊच शकत नाहीं ही कवीची ठाम धारणा आहे म्हणून तो आदिमांना प्रस्थापित समाज-व्यवस्थेविरुद्ध लढा देण्यास प्रवृत्त करतो आहे.

मरे इथे उगवावे लागते स्वतःच सूर्य होऊन
ग्रासावा लागतो चंद्र होऊन उन्मत्त काळोख
झुंजावे लागते इथल्या विषप्रथांशी
क्रूर वादळ होऊन
ज्वालामुखी व्हावा लागतो कधी
माणुसकीच्या शत्रुसाठी

गुलाम म्हणून जगताना कवीला अत्यंत वेदना झाल्या आहेत. म्हणूनच त्याने आता क्रांतीचा मार्ग जवळ केला आहे. कवी आता स्वतःच सूर्य होऊन इथल्या प्रस्थापितांना हादरवून सोडणार आहे. इथले दारिद्रय, अज्ञान, अंधार, व्यथा, वेदना तो चंद्र जसा अमावस्येचा काळोख पितो तसा तो ग्रासणार आहे. तो इथल्या अमानुष, अमानवी प्रथांशी वादळ होऊन झुंजणार आहे. प्रसंगी तो ज्वाला-मुखीसारखे उग्र रूप सुद्धा धारण करणार आहे. कारण त्याला इथे 'माणूस' म्हणून जगावयाचे आहे. म्हणूनच तो साऱ्या वेदना पायातळी तुडवून आदिमांना, आदिवासींना लढा देण्याचे आत्मभान देऊन प्रकाशाच्या दिशेने क्रांतीशी सोबत करायला निघाला आहे. कारण त्याला आत्मविश्वास आहे की, उद्याचा सूर्य क्रांतिवाद्यांचा आहे. उद्याचा सूर्य कवीचा आहे.

प्रा. तुमरामांची कविता अशाप्रकारे आक्रोशपूर्ण, आवेशपूर्ण स्वरूपाची आहे. त्यात दलित कवितेइतका आक्रस्ताळेपणा विशेष प्रमाणात आढळत नसला तरी दलित कवितेसारखा नकार तीत ठासून भरला आहे. इतकेच नव्हे तर संपूर्ण कविता वाचताना आपण दलित कविताच वाचत आहोत असा भास होतो. आदिवासींच्या व्यथा, वेदना, विद्रोह ही या काव्यसंग्रहाची जमेची बाजू असली तरी आदिवासींमधील अंध-श्रद्धा बुवाबाजी अंतर्गत कलह, आदिवासी समाजातील शिक्षित पांढरपेशा वर्गांचे समाजाकडे होणारे दुर्लक्ष इत्यादी बाबींचे विवेचन कवीने या काव्य-संग्रहात केलेले नाही ही या काव्यसंग्रहाच्या उणीवेची बाजू आहे. एकलव्या! 'विषमतेच्या चक्रव्यूही', 'रक्तपात', 'मुक्तीचे स्वप्न', 'वेदनांचे रक्तनाते', 'स्वप्नाचे अवशेष' इत्यादी अनेक कवितांतून कवीचे सामर्थ्य प्रत्ययाला येते.

प्रस्तुत काव्यसंग्रहाचे प्रकाशन एकलव्य प्रकाशन चंद्रपूर यांच्या तर्फे प्रकाशिका सौ. विभा तुमराम यांचे द्वारा श्री. पी. एस. पालांदूरकर यांनी केले आहे. ह्या काव्यसंग्रहाच्या प्रकाशनासाठी मा. गोसावी साहेब, प्रकल्प अधिकारी (ट्रॉयबल सेल) देवला (गोंडवन विभाग) जि. चंद्रपूर तसेच मा. नैताम साहेब, प्रादेशिक व्यवस्थापक, आदि-वासी विकास महामंडळ चंद्रपूर ह्यांनी अर्थसहाय्य दिले आहे. काव्यसंग्रहाची उत्कृष्ठ व सुबक छपाई नागपूरच्या नारायण मुद्रणालयाचे श्री. मधुसूदन बनहट्टी यांनी केली असून वेधक व उत्कृष्ट मुखपृष्ठ मांडणी चंद्रपूरचे श्री. चंदू पाठक यांनी केली आहे. कवी प्रा. विनायक तुमराम यांनी आदिमांच्या वेदना व्यथा, अन्याय, अत्याचार यांचे दाहक अनुभव पाठीशी बांधून आदिमांच्या अंगातील चेतनाहीन-तेला, त्यांच्यातील विद्रोहाला, प्रगल्भतेला उठाव देण्याचा पुरेपूर प्रयत्न कसोशीने केला आहे. "गोंडवन पेटले आहे." हा त्यांचा उत्कृष्ठ काव्य-संग्रह आदिवासी साहित्य क्षेत्रातील नव्या युगातील विद्रोहाचे, क्रांतीचे पाऊल आहे यात तिळमात्र शंका नाही. या काव्यसंग्रहाला सुप्रसिद्ध साहि-त्यिक प्राचार्य राम शेवाळकर यांचा पुरस्कार तर सुप्रसिद्ध साहित्यिक व समीक्षक प्रा. डॉ. अक्षय-कुमार काळे यांची प्रस्तावना लाभली आहे. ■

"गोंडवन पेटले आहे"
प्रा. विनायक तुमराम
प्रकाशिका सौ. विभा तुमराम
एकलव्य प्रकाशन, चंद्रपूर
मूल्य : वीस रुपये

अस्वस्थ करणारे आत्ममंथन : झोंबी

गणेश देशमुख

"विद्येविना मति गेली; मतीविना नीती गेली; नीतीविना गती गेली! गतीविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले!"

अशा अविद्येविरुद्ध विद्येची बीजे रुजू घातलेल्या ग्रामीण महाराष्ट्रातील एका कोवळ्या मनाने तुडविलेल्या वाटेची एक संघर्षकहाणी 'झोंबी'द्वारे मराठी सारस्वतात आपले नाव नोंदवत आहे.

मराठीत दादोबा पांडुरंगापासून मान्यताप्राप्त झालेला 'आत्मचरित्र' हा साहित्यप्रकार; १९६० नंतरच्या मराठी साहित्यात एक युग-प्रवर्तक घटना म्हणून सिद्ध होतो आहे. त्यात सर्वाधिक नव-अनुभवविश्वाची भर. 'दलित आत्मकथनां'ची असली तरी इतर अनेकांगांनी तो प्रकार आपले नाव मराठी साहित्याच्या इतिहासात सोनेरी अक्षरांनी गोंदतो आहे.

'डॉ. आनंद यादव' हे मराठी साहित्यात 'वादळी' ठरलेलं व्यक्तिमत्व! ते एका साहित्य चळवळीचे प्रवक्ते; नेते आहेत, तसेच अनुभवनिष्ठ सर्जनशील कलावंत, समीक्षक व संशोधक आहेत. त्यांच्या व्यक्तित्वाच्या ह्या बहुविध पैलूंच्या विकासाचे काही टप्पे म्हणजे त्यांचे अलिकडील 'झोंबी' हे अभिनव आत्मचरित्र होय. डॉ. यादवांनी त्याला 'आत्मचरित्रात्मक कादंबरी' असे म्हटले असले तरी प्रखर वास्तवाच्या आधारावरची ३७३ पृष्ठांची ही 'आत्मकहाणी' अनेक दृष्टींनी लक्षवेधक ठरली आहे. पु. ल. आपल्या रसोद्ग्राही प्रस्तावनेत त्याबद्दल म्हणतात; "तो आपले बालपण आठवत गेला आणि एखाद्या गवयाने राग आळवावा तसा तो आळवीतही गेला आहे . . . त्यामुळे 'झोंबी' ही एक सुंदर ललित कलाकृती झाली आहे."

पु. लं. ची मर्मग्राही, विवेचक प्रस्तावना; आत्मचरित्रात्मक कादंबरी : एक टिपण; आणि आई-वडिलांच्या विवाहापासूनची हकिकत; अशा तिहेरी जमेच्या बाजूमह यातनाचक्राची ही ललितकहाणी आपल्यापुढे सुरुवातीलाच वेगळा ठसा घेऊन सामोरी येते.

'आत्मचरित्र' म्हटल्यानंतर सर्वसाधारणत: आत्मचरित्रकाराने 'हातचे काही राखून न ठेवता' आपल्या व्यक्तिमत्वविकासाचा आलेख त्यात मांडावा असे गृहीत असते. परंतु बहुधा कोणत्याही आत्मचरित्रामधून असे संपूर्ण सत्यदर्शन घडणे अशक्य असते, कारण जीवनातील सूक्ष्मादी 'नगण्य' स्वरूपाच्या घटना मांडणे अनेक कारणांनी अशक्य असते आणि तशा प्रकारची अपेक्षाही केल्या जाऊ नये; कारण आत्मचरित्रात महत्त्व असते ते आत्मचिंतन, आत्मचिकित्सा व आत्मशोधाला. 'झोंबी'च्या लेखनात डॉ. यादवांनी ह्या सर्व मर्यादा सांभाळून वास्तव अनुभवांनाच रूप देणारी 'आत्मचरित्रात्मक कादंबरी' ही संकल्पना स्वीकारून आपल्या जीवनातील एका टप्प्यापर्यंतचा आत्मशोध घेतला आहे. त्यामुळे रूढ आत्मचरित्रांच्या लेखनातील सांकेतिकता जाऊन 'झोंबी'स अभिनवता प्राप्त झाली आहे. आणखी उल्लेखनीय बाब म्हणजे त्यांनी आत्मचरित्राच्या प्रांजळतेला कुठेही धक्का पोहचू दिला नाही. ह्या अनुभवनिष्ठेसंबंधी ते म्हणतात, "या 'जगण्यातून' अनुभवाला 'अनुभवपण' देण्याची धडपड आहे; ते देण्यातून अनुभवांच्या अंगोपांगांना चैतन्यपूर्ण करण्याचा प्रयत्न झाला आहे. या प्रयत्नातून जे (मर्यादित अर्थाने) सर्जन झाले तेवढेच इथे अभिप्रेत आहे."

'झोंबी'द्वारे मराठी साहित्यास अपरिचित असलेल्या; फाळयाने शेती करणाऱ्या एका सामान्य शेतकरी कुटुंबातील दैनंदिन जीवन-संघर्षाचा परिचय होतो आहे. 'मी'च्या आई-वडिलांच्या विवाहाच्या हकिकतीपासून नायकाच्या एस. एस. सी. होईपर्यंतच्याच जीवनाचा कालपट त्यात आला आहे; परंतु कादंबरीत जो व्यामिश्र, प्रदीर्घ कालपटावर पसरलेला, व्यापक जीवन-पटावरील ताणतणावांचा 'कलानुभव' अभिप्रेत असतो; त्या दृष्टीने संपूर्ण जीवनाचे आत्मचरित्र म्हणून ते अपुरे असले तरी 'झोंबी'स एक कादंबरी म्हणून परिपूर्णता लाभली आहे. ग्रामीण जीवनशैली, कौटुंबिक नातेसंबंधातील ताणतणाव

परिस्थिती व परंपरा, ह्या सर्वातून उद्‌भवलेल्या भेदक वास्तवाच्या वेदना–कळांचा हा आलेख 'कादंबरी' म्हणून परिपूर्ण आहे.

'आत्मचरित्र' हे केवळ 'स्व'शी निगडीत 'कथन' नसते, तर त्या 'स्व'शी संबधित समाज, कुटुंब, संस्कृती, परिस्थिती, इ. विषयांचे प्रसंगोपात्त रेखाटनही त्यात अभिप्रेत असते. 'झोंबी'त हे भान अधिक ठेवल्याचे जाणवते. या जीवनाच्या क्षेत्रात 'स्व' हा केन्द्रबिंदू असला तरी केवळ त्याचे समर्थनपर एकपदरी चित्रण त्यात नाही; तर 'स्व' बरोबर 'स्व'च्या भोवतालच्या शेतीनिष्ठ समाज, शेतीनिष्ठ कुटुंबजीवन, ते गाव, जातिजीवन, ह्या सर्वांशी निगडित असलेल्या 'मी'चे ते सामूहिक चित्रण आहे. ज्या समाजातून, कुटुंबातून 'झोंबी'चा नायक वरती आलेला आहे त्याचे वास्तवदर्शन त्यातून पुरेशा संयमशीलतेने तर व्यक्त झालेच आहे, त्याचबरोबर महाराष्ट्र–कर्नाटकाच्या सीमेवरील एका गावाच्या सामाजिक, आर्थिक व्यवस्था, त्यांचा तेथील कुटुंबांच्या दैनदिनीवरील परिणाम, त्यातील ताणतणाव आणि, संघर्ष व त्यातून उद्‌भवणाऱ्या अस्वस्थतेचे विचारगर्भ चित्रणही त्यात आले आहे. आजच्या 'दलित आत्मचरित्रां'तील 'स्व' भोवती रमणाऱ्या अनुभवांच्या पार्श्वभूमीवर हे वेगळ्या पातळीवरील अनुभवाचे रेखाटन जेवढे मनाला मोहिनी घालते तेवढे अस्वस्थही करीत जाते.

'झोंबी'तील जीवनपर्वाला सुरुवात होते ती नायकाच्या आई–वडिलांच्या विवाहाच्या हकिकतीने. "ताराचं लग्न झालेलं ताराला माहीत नाही" ही कादंबरीचो पहिला ओळच, पुढे थैमान घालणाऱ्या परंपरेविषयी व कादंबरीविषयी बरेच काही सांगून जाते. त्यानंतर जकाते कुटुंबामधील भाऊबंदकीतून, सवतेपणातून उद्‌भवणाऱ्या वैराचे ताणतणाव उभे राहतात व नायकाच्या वडिलांच्या बालपणातील शाहू–महाराजांच्या औरस-गावातील ऊरूस, शर्यतीमधून कायमचा शाहू महाराजांचा वारा प्यालेलं गाव उभं राहतं. अशा गावात 'रतनू'चा जन्म झालेला; त्यामुळे साहजिकच तांबड्या मातीत पोसलेल्या पिळदार देहात रग निर्माण होते आणि त्यातूनच पुढे 'मार देणं ही दाल्लेपणाची खूण' मानणारा नवरा, ताराच्या नशिबी येतो. हे कुटुंब वैरभाव, चालीरीती, परंपरा पत्करलेले; दारिद्रय व अज्ञानात ढोरमेहनत करून इतरांच्या शेती फाळचाने (खंडाने) करणारे आहे. ह्या सर्वांत दारिद्रयाचा विळखा जबरदस्त आहे, "झोपडीभोवतालची झुडपं आपसुक उगवावी, आपसूक वाढावी तशीच सुकावी–एखादं दुसरं मरून जावं अशीच जिथे कुटुंबात जन्मलेल्या पोराची अवस्था " अशा कुटुंबात 'झोंबी'च्या नायकाचा म्हणजे "आन्दू"चा जन्म होतो.

"घरदार नि घरचा कुणबावा. घरातलो माससं नि रीतीभाती. माणसांचं बोलणं चालणं नि वागणं–वागवणं–यातच जगत, भोगत गेलेला तो. त्याच आठवणींच्या नाबाटचांना वळलेली ही कहाणी. माणसं माणसाला सांगतात तशी सांगितलेली." अशा वेदनागर्भ यातनांची गाणी म्हणजे 'झोंबी' होय. त्या इवल्याश्या रावणाऱ्या कुटुंबात जन्मलेला नायक 'आन्दू' असा आपल्यापुढे येतो. ह्या यातनाचक्राच्या कोशात आपलं मन जाऊ पाहते . त्याच्यापर्यंत पोहचू पाहते.

'आन्दू'च्या बालजिज्ञासेबरोबर शेतकरी कुटुंबाच्या सस्कारात त्याचे संवेदनशील मन वाढू लागते. साहजिकच 'बैल मरणार' असे वाटू लागताच आसव सांडते. वर्षातून एकदाही नवी कापडं न मिळणाऱ्या घराला शिक्षणाचा गंध असणंही अशक्यच ! या अज्ञानाच्या परंपरेत 'शिक्षण' दाराशी येताच रतनूसारखे व्यवहारी पुरुप मुलगा 'दिवानजी' होऊ पाहण्याच्या स्वप्नाने मुलाला शाळेत पाठवतात. गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर 'आन्दा' शाळेत जाऊ लागतो. खेड्यातील शाळा मनासमोर येते.

दोस्त–मित्रांच्या सोबतीने नव्या नादात अन् खेळात मन रमू लागते, पण हौसेखातर रतनूने बांधलेल्या घरामुळे साऱ्या घराला राबण्याची वेळ येते. त्यामुळे "आन्दा, आता मळ्यातलो काम करण्याजोगा झाल्याचं" लक्षात येताच बारा आण्यासाठी शाळा सुटते व जन्मभराचं 'मातरं'

झालं म्हणून मळयावर राबण्याची वेळ येते. हळू हळू तिथेही मन रमू लागते पण मुळात असलेली गुदमरणारी शाळेची आवड; मळा व चिखल यात फसलेलं त्याचं 'कमळा'सारखं मन "काय बी करून आपूण शिकलं पाहिजे" या जाणिवेनं उसळी मारू लागते. रतनूच्या विरोधाने संतापही वाढतो पण "मी शाळेत जाणारच्" असं मनाचं धाडस करून सांगणं होत नाही.

एकदाची पुन्हा 'दत्ताजीरावां'च्या मध्यस्थीने कामाची 'कबुली' देऊन शाळा सुरू होते. शाळेत होणाऱ्या चेष्टेमुळे 'माणसानं शिवलेल्या कावळयाच्या पिलासारखी' अवस्था होते, तरीही खोल रूजलेल्या आत्मविश्वासाने दिवस गजवजू लागतात. मनाला 'कविता'नकलांच्या ओळखीने नवं पान फुटतं पण तेवढयात बहिणीच्या (चंदराच्या) मृत्यूने आगीचा डोंगर कोसळताच हळवं झालेलं मन उन्मळून पडते. गांधीवधात सापडलेले अर्धवट जळालेले पुस्तक तरीही "ऐवज" वाटू लागतो; ही वाचनाची हौस टिळक-आगरकरांना मनात रुतवत जाते. त्यांच्यासारखे व्हावेसे वाटू लागते; पण परिस्थितीच्या तडाख्यामुळे पराभव पत्करावा लागतो. आन्दाचं खरं दुःखही ह्या परिस्थितीविषयीच आहे; आनसाच्या राजबिंडया रूपाकडे पाहून ते अधिक वाढते; अन् त्या सुखासाठी झटण्याची तयारी होते. जीव धोक्यात घालून सातवीच्या पुस्तकासाठी तो कपाटातले 'पैसे' घेतो. रतनूपुढे महत्त्वाचा प्रश्न 'खायचा' असल्याने तो मारणारच; तो शाळेसाठी खायचा. त्याला वाटते की-"काय वसलं त्यो मार खायचा...आपला जीव जाणार नाही. मारलं-मारलं नि चार दिसानं आपणच गप्प वसलं. जरा जास्त काम करायची मग त्येला मारावंसं वाटणार न्हाई" ही त्याच्या समजूतीची तगमग व अगतिकता मन भरडून काढते.

हळू हळू परिस्थिती बिघडते. मळयाचा 'फाळा' डोईजड झाल्याने साऱ्या घराचे हाल होऊ लागतात. ह्या सगळयामुळे आपली 'शाळा बोंबलणार' ह्या दुःखाने तो धास्तावतो; मळयाच्या मालकावर चिडतो. मनात जुळलेली अभ्यासाची जुळणी 'कामामुळे' विस्कटत जाते; आणि हे सगळं रतनूला सांगून उपयोग नाही ही खंतही काळीज चेंगरत जाते; सहामाहीनंतरच्या सुटीचा आनंदही आता तेवढया दिवस तरी शाळा बुडणार नाही. असा जगावेगळा आहे. तो पाहून 'झोंबी' हे बाल्य हरवलेलं बालकांड आहे. ह्याची ओळख पटते.

ह्या तगमगीतही तो अर्धपोटी 'काम' करून शाळेसाठी धावपळ करू लागतो पण कधीकधी दोन्हीकडूनही हाती काहीच येत नाही; त्यामुळे शेवटी चिऱ्याला पाणी देताना डोळे पुस्तकाकडे वळवावे लागतात पण हातास असणारा चिखल आडवा येतो. ही त्याची मानसिक उलाघाल अस्वस्थ करणारी आहे. ह्या संघर्षात साथ आहे ती एकटया 'दुबळया' आईची, पण तिचेच हाल पाहवत नाही. रतनू सोडला तर सारं घर 'हातघाईत' डुंबलेलं. त्यात आन्दा-रतनूचा उभा-आडवा संघर्ष, हे दोन पिढयातील अंतर काळजात रुतत जाते. तसा ह्यात रतनूचाही दोष नाही. ह्या ओढाताणीचा खलनायक आहे ती परंपरा व परिस्थिती. म्हणूनच परंपरेत गाडलेल्या रतनूपुढे आन्दाला शाळेत पाठवायचे म्हटले की सुकून जाणारे पिक उभे होते. आन्दाला हे कळत असूनही तो जिवाच्या आकांताने शाळेला पळू लागतो. अशावेळी कोणी सहानुभूती दाखवताच मनाला बळ येतं. या साऱ्या धावपळीतून सातवीत तालुक्यातून 'पहिला' म्हणून 'पुढारी'त नाव येताच आनंदाने 'आन्दा' बेभान होतो.

नोकरी लागंल म्हणून बरं वाटणाऱ्या रतनूच्या स्वभावामुळे त्यासाठी वय आडवे आल्याचे कळताच 'आन्दा'भोवती भविष्याची नागवी नृत्ये घेराव घालू लागतात. मनातला चिखल "भावंडाना वर्सातनं एकदा तरी धडसं धडूतं घेता येणं नशिबात नाही" हे पाहून वाढत जातो. ह्या अगतिकतेतून सुख देणारी वस्तू म्हणून मन साहजिकच 'सिनेमा'कडे वळते. त्यातून उद्भवलेल्या 'एकटे'पणाला मुकी जनावरं जीवाभावाची वाटू लागतात. भाऊबीजेला ओवाळणी म्हणून बहिणीला एक आणाही देता येत नाही; ह्या परिस्थितीने हळवं मन होरपळत

परिस्थिती व परंपरा, ह्या सर्वातून उद्भवलेल्या भेदक वास्तवाच्या वेदना-कळांचा हा आलेख 'कादंबरी' म्हणून परिपूर्ण आहे.

'आत्मचरित्र' हे केवळ 'स्व'शी निगडीत 'कथन' नसते, तर त्या 'स्व'शी संबधित समाज, कुटुंब, संस्कृती, परिस्थिती, इ. विषयाचे प्रसंगोपात्त रेखाटनही त्यात अभिप्रेत असते. 'झोंबी'त हे भान अधिक ठेवल्याचे जाणवते. या जीवनाच्या क्षेत्रात 'स्व' हा केन्द्रबिंदू असला तरी केवळ त्याचे समर्थनपर एकपदरी चित्रण त्यात नाही; तर 'स्व' बरोबर 'स्व'च्या भोवतालच्या शेतीनिष्ठ समाज, शेतीनिष्ठ कुटुंबजीवन, ते गाव, जातिजीवन, ह्या सर्वांशी निगडित असलेल्या 'मी'चे ते सामूहिक चित्रण आहे. ज्या समाजातून, कुटुंबातून 'झोंबी'चा नायक वरती आलेला आहे त्याचे वास्तवदर्शन त्यातून पुरेशा संयमशीलतेने तर व्यक्त झालेच आहे, त्याचबरोबर महाराष्ट्र-कर्नाटकाच्या सीमेवरील एका गावाच्या सामाजिक, आर्थिक व्यवस्था, त्यांचा तेथील कुटुंबांच्या दैनदिनीवरील परिणाम, त्यातील ताणतणाव आणि, संघर्ष व त्यातून उद्भवणाऱ्या अस्वस्थतेचे विचारगर्भ चित्रणही त्यात आले आहे. आजच्या 'दलित आत्मचरित्रा'तील 'स्व' भोवती रमणाऱ्या अनुभवांच्या पार्श्वभूमीवर हे वेगळ्या पातळीवरील अनुभवाचे रेखाटन जेवढे मनाला मोहिनी घालते तेवढे अस्वस्थही करीत जाते.

'झोंबी'तील जीवनपर्वाला सुरुवात होते ती नायकाच्या आई-वडिलाच्या विवाहाच्या हकिकतीने. "ताराचं लग्न झालेलं ताराला माहीत नाही" ही कादंबरीची पहिला ओळच, पुढे थैमान घालणाऱ्या परंपरेविषयी व कादंबरीविषयी बरेच काही सांगून जाते. त्यानंतर जकाते कुटुंबामधील भाऊबंदकीतून, सवतेपणातून उद्भवणाऱ्या वैराचे ताणतणाव उभे राहतात व नायकाच्या वडिलांच्या बालपणातील शाहू-महाराजांच्या औरस-गावातील ऊरूस, शर्यतीमधून कायमचा शाहू महाराजांचा वारा प्यालेलं गाव उभं राहतं. अशा गावात 'रतनू'चा जन्म झालेला; त्यामुळे साहजिकच तांबड्या मातीत पोसलेल्या पिळदार देहात रग निर्माण होते आणि त्यातूनच पुढे 'मार देणं ही दाल्लेपणाची खूण' मानणारा नवरा, ताराच्या नशिबी येतो. हे कुटुंब वैरभाव, चालीरीती, परंपरा पत्करलेले; दारिद्र्य व अज्ञानात ढोरमेहनत करून इतरांच्या शेती फाळचाने (खंडाने) करणारे आहे. ह्या सर्वात दारिद्र्याचा विळखा जबरदस्त आहे, "झोपडीभोवतालची झुडपं आपसुक उगवावी, आपसूक वाढावी तशीच सुकावी-एखादं दुसरं मरून जावं अशीच जिये कुटुंबात जन्मलेल्या पोराची अवस्था " अशा कुटुंबात 'झोंबी'च्या नायकाचा म्हणजे "आन्दू"चा जन्म होतो.

"घरदार नि घरचा कुणबावा. घरातली मासस नि रीतीभाती. माणसांचं बोलणं चालणं नि वागणं-बागवणं-त्यातच जगत, भोगत गेलेला तो. त्याच आठवणींच्या नावाटचांना वळलेली ही कहाणी. माणसं माणसाला सांगतात तशी सांगितलेली." अशा वेदनागर्भ यातनांची गाणी म्हणजे 'झोंबी' होय. त्या इवल्याश्या रावणाऱ्या कुटुंबात जन्मलेला नायक 'आन्दू' असा आपल्यापुढे येतो. ह्या यातनाचक्राच्या कोशात आपलं मन जाऊ पाहते . त्याच्यापर्यंत पोहचू पाहते.

'आन्दू'च्या बालजिज्ञासेबरोबर शेतकरी कुटुंबाच्या सस्कारात त्याचे संवेदनशील मन वाढू लागते. साहजिकच 'बैल मरणार' असे वाटू लागताच आसवं सांडते. वर्षातून एकदाही नवी कापडं न मिळणाऱ्या घराला शिक्षणाचा गंध असणंही अशक्यच ! या अज्ञानाच्या परंपरेत 'शिक्षण' दाराशी येताच रतनूसारखे व्यवहारी पुरुष मुलगा 'दिवानजी' होऊ पाहण्याच्या स्वप्नाने मुलाला शाळेत पाठवतात. गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर 'आन्दा' शाळेत जाऊ लागतो. खेड्यातील शाळा मनासमोर येते.

दोस्त-मित्रांच्या सोबतीने नव्या नादात अन् खेळात मन रमू लागते, पण हौसेखातर रतनूने बांधलेल्या घरामुळे साऱ्या घराला राबण्याची वेळ येते. त्यामुळे "आन्दा, आता मळ्यातली काम करण्याजोगा झाल्याचं" लक्षात येताच बारा आण्यासाठी शाळा सुटते व जन्मभराचं 'मातरं'

झालं म्हणून मळयावर राबण्याची वेळ येते. हळू हळू तिथेही मन रमू लागते पण मुळात असलेली गुदमरणारी शाळेची आवड; मळा व चिखल यात फसलेलं त्याचं 'कमळा'सारखं मन "काय बी करून आपुण शिकलं पाहिजे" या जाणिवेनं उसळी मारू लागते. रतनूच्या विरोधाने संतापही वाढतो पण "मी शाळेत जाणारच्" असं मनाचं धाडस करून सांगणं होत नाही.

एकदाची पुन्हा 'दत्ताजीरावां'च्या मध्यस्थीने कामाची 'कबुली' देऊन शाळा सुरू होते. शाळेत होणाऱ्या चेष्टेमुळे 'माणसानं शिवलेल्या कावळयाच्या पिलासारखी' अवस्था होते, तरीही खोल रूजलेल्या आत्मविश्वासाने दिवस गजबजू लागतात. मनाला 'कविता'नकलांच्या ओळखीने नवं पान फुटतं पण तेवढयात बहिणीच्या (चंदराच्या) मृत्यूने आगीचा डोंगर कोसळताच हळवं झालेलं मन उन्मळून पडते. गांधीवधात सापडलेले अर्धवट जळालेले पुस्तक तरीही "ऐवज" वाटू लागतो; ही वाचनाची हौस टिळक-आगरकरांना मनात रुतवत जाते. त्यांच्या-सारखे व्हावेसे वाटू लागते; पण परिस्थितीच्या तडाख्यामुळे पराभव पत्करावा लागतो. आन्दाचं खरं दुःखही ह्या परिस्थितीविषयीच आहे; आनसाच्या राजबिंडया रूपाकडे पाहून ते अधिक वाढते; अन् त्या सुखासाठी झटण्याची तयारी होते. जीव धोक्यात घालून सातवीच्या पुस्तका-साठी तो कपाटातले 'पैसे' घेतो. रतनूपुढे महत्त्वाचा प्रश्न 'खायचा' असल्याने तो मारणारच; तो शाळेसाठी खायचा. त्याला वाटते की–"काय वसलं त्यो मार खायचा...आपला जीव जाणार नाही. मारलं-मारलं नि चार दिसानं आपणच गप्प वसलं. जरा जास्त काम करायची मग त्येला मारावंसं वाटणार न्हाई" ही त्याच्या समजूतीची तगमग व अगतिकता मन भरडून काढते.

हळू हळू परिस्थिती बिघडते. मळयाचा 'फाळा' डोईजड झाल्याने साऱ्या घराचे हाल होऊ लागतात. ह्या सगळयामुळे आपली 'शाळा बोंबलणार' ह्या दुःखाने तो धास्तावतो; मळयाच्या मालकावर चिडतो. मनात जुळलेली अभ्यासाची जुळणी 'कामामुळे' विस्कटत जाते; आणि हे सगळं रतनूला सांगून उपयोग नाही ही खंतही काळीज चेंगरत जाते; सहामाहीनंतरच्या सुटीचा आनंदही आता तेवढया दिवस तरी शाळा बुडणार नाही. असा जगावेगळा आहे. तो पाहून 'झोंबी' हे बाल्य हरवलेलं बालकांड आहे. ह्याची ओळख पटते.

ह्या तगमगीतही तो अर्धपोटी 'काम' करून शाळेसाठी धावपळ करू लागतो पण कधीकधी दोन्हीकडूनही हाती काहीच येत नाही; त्यामुळे शेवटी चिऱ्याला पाणी देताना डोळे पुस्तकाकडे वळवावे लागतात पण हातास असणारा चिखल आडवा येतो. ही त्याची मानसिक उलाघाल अस्वस्थ करणारी आहे. ह्या संघर्षात साथ आहे ती एकटया 'दुबळया' आईची, पण तिचेच हाल पाहवत नाही. रतनू सोडला तर सारं घर 'हातघाईत' डुंबलेलं. त्यात आन्दा–रतनूचा उभा–आडवा संघर्ष, हे दोन पिढयातील अंतर काळजात रुतत जाते. तसा ह्यात रतनूचाही दोष नाही. ह्या ओढाताणीचा खलनायक आहे ती परंपरा व परिस्थिती. म्हणूनच परंपरेत गाडलेल्या रतनूपुढे आन्दाला शाळेत पाठवायचे म्हटले की सुकून जाणारे पिक उभे होते. आन्दाला हे कळत असूनही तो जिवाच्या आकांताने शाळेला पळू लागतो. अशावेळी कोणी सहानुभूती दाखवताच मनाला बळ येतं. या साऱ्या धावपळीतून सातवीत तालुक्यातून 'पहिला' म्हणून 'पुढारी'त नाव येताच आनंदाने 'आन्दा' बेभान होतो.

नोकरी लागंल म्हणून बरं वाटणाऱ्या रतनूच्या स्वभावामुळे त्यासाठी वय आडवे आल्याचे कळताच 'आन्दा'भोवती भविष्याची नागवी नृत्ये घेराव घालू लागतात. मनातला चिखल "भावंडाना वर्सातनं एकदा तरी धडसं धडूतं घेता येणं नशिबात नाही" हे पाहून वाढत जातो. ह्या अगतिकतेतून सुख देणारी वस्तू म्हणून मन साहजिकच 'सिनेमा'कडे वळते. त्यातुन उद्भवलेल्या 'एकटे'पणाला मुकी जनावरं जीवाभावाची वाटू लागतात. भाऊबीजेला ओवाळणी म्हणून बहिणीला एक आणाही देता येत नाही; ह्या परिस्थितीने हळवं मन होरपळत

जातं. ह्या सगळ्यात ठेचत जाणाऱ्या मनाला 'कवितांची' संगत भावू लागते. हातातून निसटून गेलेलं जग कथा–कादंबऱ्यात जवळ येतं. अन् लग्नाचा 'सापळा' रचल्या जाताच त्याचं धुसमसणारं मन अशा निकराच्या वेळी जीवावर उदार होऊन बंड करू लागते. भोगलेल्या अन्याया-विरुद्ध मन नाठाळपणा करू लागते.

शेतातही मनासारखं काही करता येत नाही. जागोजागी परिस्थिती अडवणूक करते. सालभर राबूनही, हातात कोळसं आलेलं पाहून रुजू घातलेलं मन मळघातनं उखडू लागते व पुन्हा पुस्तकाभोवती फिरू लागते; चित्रकलेच्या ऐन परीक्षेच्या वेळी 'आनसा'चा मृत्यू होतो. परिस्थितीच्या महापुरातील घट्ट आधार निघून जातो; मळघात 'जगताना' पुन्हा–" शाळंशिवाय काय खरं न्हवं" ही जाणीव "पोटाचा प्रश्न सुटला असता तर शाळा शिकता आली असती" या 'जल्मा'च्या प्रश्नामुळे तीव्र होत जाते; व पुन्हा उदासणारं मन, नव्या उभारीने आठवीची परीक्षा देते. तर नववीत दडपल्यासारखं होणाऱ्या मनाभोवती, फीचा साप मेंदूला वेटाळून बसतो. फ्रीशिपसाठी जात आडवी आल्याने जाऊ घातलेलं बळ 'कविता'कडे वळते. सुटीत ढोरमेहनत व प्रसंगी 'चोऱ्या' करून 'फी'ची कशीबशी तोंड-मिळवणी करीत नववीचं गुदमरणारं वर्ष पार पडतं, चोरीचा आळ आल्याने तो नाद कायमचा सुटतो.

कुटुंबाच्या सुखासाठी शिकण्याशिवाय काहीच गत्यंतर नसल्याचे लक्षात येते पण रखडणाऱ्या संसारात 'तेवढा' पैसा घालविणं जमत नाही, शेवटी 'आन्दा' अंगच्या अभिनयाच्या बळावर 'फी'साठी नकला करीत गावची–गावं तुडवतो; पण कोल्हापूरसारख्या शहरात नवती फुटलेल्या मनाच्या झोळीत वास्तवाचे निखारे पडताच स्वप्नांच्या कल्पनांचा स्फोट होऊन त्या उध्वस्त होतात. तरीही फीचे ओझे व कामाच्या रणघाईत तो 'शिकू' पाहतो. ही सगळी 'महादिव्ये' करून तो प्रसंगी 'एकलव्या'सारखं शिकण्याचीही तयारी ठेवतो. या धावपळीत मात्र मन समजून घेणारा आधार कोणाचाच नसल्याने या धडपडातून उद्‌भवलला तडफड' मनात काळोख पेरीत जाते.

जात, परिस्थिती, कधी स्वत:शीच भांडत तो उंचच उंच जाऊ पाहतो. ह्या धकाधकीत एस. एस. सी. पूर्वपरीक्षा पार पडताच मनाला मोकळं–मोकळं वाटतं. आणि शेवटी आता "रक्तबंबाळ झालो तरी चालेल" या निश्चयाने नव्या जोमाने शेवटची 'लढाई' लढावी म्हणून एस. एस. सी त दाखल होतो. जाणत्या झालेल्या मनाला 'चंद्र-शेखरादी' कवींच्या कवितेतील वर 'वर'पणा जाणवू लागतो. व त्यातून वास्तवाने सजलेले; काम करता करता पोटातले ओठात येणारे शब्द 'हिरवं जग' साकारत जातात; दुसरीकडून विनोबा, ना. ग. गोरे 'वगैरेंची वैचारिक ओळख 'त्यांच्या एवढे' होण्यासाठी शिक्षणाची 'जिद्द' आभाळाएवढी करतात.

अशा जिकरीच्या वेळी, कोर्टामुळे घराची फळी अधिक विस्कटत जाते. रतनू काकुळतीला येऊन "आवंदाचं वरीस तुझी शाळा ऱ्हाऊ दे" म्हणतो पण तोंडाशी आलेला घास सोडावा वाटत नाही. अशा परिस्थितीच्या फासात अडकलेलं मन, सततच्या विरोधाने बंडाचे निशाण उभारू पाहते. शाळेची जिद्द आभाळाएवढी वाढत जाते! ठार मारलं तरी पत्करलं पण शाळा सोडायची नाही या जिद्दीने तो रतनूला उलटून बोलू लागतो; व मरणप्राय वेदनांनी वैतागून शेवटी घर सोडतो व डोक्यातले 'वादळ' आपोआप गाव सोडण्यास भाग पाडते; पाय गावापासून कोल्हा-पूरला आणून सोडतात पण तिथे उलट पोट असल्याची जाणीव तीव्र होत जाते. आग लागलेल्या पोटाला केळाच्या साली थंड वाटतात; अशा उदासल्या वेळी गोपाताल्या भेटतो. शिक-विण्याचं वचन देतो. पाय गावाकडे वळतात. घरात पाय ठेवताच या छळकथेचा नायक असलेल्या रतनूच्या डोळ्यातून पश्चात्तापाच्या टोचणाऱ्या सुया 'पाणी' होऊन पाझरू लागतात. ह्या संघर्षातून एकदाची 'सुखाची'शाळा सुरू होते. पण रतनू 'शरण आल्याने गदगदल्यासारखं होतं. हा 'बा' आवडत नाही, हा मानवी स्वभावाचा विरोधाभास लक्षणीय आहे.

शेवटी ह्या संघर्षाच्या अखेरच्या दिवसात 'आन्दा'नं घासलेल्या डोक्याच्या श्रमाला फळ येतं. हायस्कूलात तिसरा नंबराने तो 'पास' होतो. तीन वर्ष दडपल्या गेलेल्या अन्यायाला न्याय मिळतो; तीन विषयात डिस्टिंक्शन मिळतं.

प्रचंड घडपडीतून, कष्टांचं फळ हाताशी येतं, एस. एस. सी. ची गुणपत्रिका हातात पडताच, फुलासारख्या निष्पाप बालपणाचा वळी घेऊन आयुष्यभर यातनांची गाणी सोबत देणाऱ्या हायस्कूलकडे पाहावसं वाटत नाही. बघितलेल्या स्वप्नातील एक शिखर हाताशी आल्यागत होते. त्यातील अनेक स्पंदने बेडूक होऊन मनावाहेर पडू लागतात–

समाज, परिस्थिती, परंपरा, कौटुंबिक मर्यादा, कष्ट, उपासमार, दारिद्र्य, अज्ञान, या सर्वांच्या फळचा पार करून; त्यांचा पराभव करून तो पुन्हा नव्या आभाळाच्या दिशेने, त्याला गवसणी घालण्यासाठी उंचच–उंच उडी मारतो. नेमके शिखर नजरेसमोर नसले तरी स्वप्नांची रूपं वास्तवात आल्यासारखी वाटतात. अशी ही आठवणींच्या नाबाटचांनी वळलेली "छळकथा" कलात्मक वास्तवदर्शनामुळे अस्वस्थ करीत जाते, भिडत जाते. खोल कुठे तरी मनात रूतून असलेल्या 'माणसाला' माणूस होण्यासाठी चेतवत जाते. आणि हेच तिच्या आशयाचे जीवनप्रेरणांच्या दृष्टिकोणातून सर्वात, लक्षणीय मोठेपण आहे. ही यातनांची गाणी समाज–संघर्षाचे वास्तव प्रगट करताना दाराशी आलेले 'फ्री' मिळणारे 'शिक्षण' हे आपल्या व्यक्तिमत्वावर आंतरिक संस्कार करण्याचे महत्त्वाचे मूल्य आहे; त्यासाठी प्रसंगी जिवाचे 'रान' करण्याइतके; जीव धोक्यात घालण्याएवढे ते महत्वाचे आहे. या हेतूने 'डोळसपणे' उभी झालेली ही साहित्यकृती दुसरीकडून संयमशील, कलात्मक रुप प्रगट करत उतरली असल्याने जुनाट परंपरा व जनसामान्यांची विकट परिस्थिती या विषयी वाचकाच्या मनात संतप्तपणाची एक खोल चीड पेटवून देते. मनातलं शब्दात न बसणारं बरंच काही सांगून जाते. अजूनही ग्रामविश्वातून प्रतिकूल परिस्थितीत शिकत असलेल्या अनेक 'आन्दां'ना ही कहाणी हत्तीचे बळ देते. स्फूर्तीचा ध्येयवादी 'झंकार' साऱ्या मनभर चेतवत जाते. हेच तिचे समर्पण आहे. दुसरी गोष्ट म्हणजे डॉ. यादवांची ग्रामीण साहित्य चळवळीनंतरची ही साहित्यकृती असल्यानेही तिला वेगळे महत्व आहे; नव्हे 'झोंबी' मागील प्रेरणाच चळवळी-मागची तगमग, त्यांची 'तडफड' ही असावी असे वाटते.

डॉ. यादवांचे व्यक्तिमत्व आज चहुबाजूंनी समृद्ध झाले असल्याने झोंबीच्या अनुभव विश्वातून प्रगटलेला 'आशय' जेवढा समर्थ आहे; तेवढेच कलात्मकतेचे भान सांभाळल्यामुळे, या आकृतीबंधाचा कलात्मक घाटही वैशिष्टयपूर्ण झाला आहे.

'प्रांजल शिक्षणनिष्ठा' हा झोंबीचा मध्यवर्ती आशयबिंदू आहे. त्यामुळे ही शिक्षणाविषयीची तडफड, उलाघाल अतिशय बोलकी झाली आहे. चौथीपासून शाळा सुटल्यानंतर हा 'जीव कंसातरी रमत असला तरी 'शाळे'ची ओढ कायमच राहते. पाचवीची परीक्षा बारा आण्यासाठी बुडताच 'जीव' तळमळतो. "जलमभर हुचेंच्यासाठी गडचागत मरावं लागणार" हे दुःख; "दुसऱ्या आईऽबा'च्या पोटाला आलो असतो तर निदान त्यांनी माझं शिक्षेण तरी पुरं केलं असतं" असे जन्माचे दुखणे होते.

शिक्षण दुरावल्याने आता पोटात जन्मभर असंच 'श्याण' जाणार हे कळतं. "रयत हो; शिका नि शाणे व्हा" ह्या शाहूंचा संदेशही बालमनाला कळतो पण परंपराप्रिय रतनूला कळत नसल्याने मन काळवंडत जातं. दिवाणांचा वाडा गांधीवधात जाळल्यानंतर 'शिक्षणनिष्ठेने' पेटलेले मन, इतर वस्तूऐवजी जळक्या पुस्तकाकडे धावतं. अशी ही जीवनभर जोपासली गेलेली 'शिक्षणनिष्ठा' हा त्या देहाचा, मूळ पिंडधर्माचाच एक भाग आहे. नव्या पुस्तकासाठी झुरणारं मन प्रसंगी मार खाण्याची तयारी ठेवून धाडसं करते. शेताचा फाळा थकतो; घर आर्थिक ओढाताणीत घुसमटत जाते; तेव्हाही काळजी वाटते ती आपली शाळा आता नक्कीच 'बोंबलणार' याची. सुटीचा आनंदही तेवढे दिवस आता मास्तर

मुलांना काही शिकविणार नाही व आपली शाळा 'बुडणार' नाही (पृ. १९०) असा जगावेगळा वाटतो तो ह्या शिक्षण निष्ठेमुळेच !

रतनूच्या विरोधामुळे; कामाचा प्रचंड भार अंगावर पडूनही शिक्षणाचे हे वेड बेभान करणारे आहे. अर्धवट कामे सोडून बेभान होऊन दीड–दोन मैलावरील शाळेसाठी जिवाचा आकांत करताना होत असलेल्या पळापळीत 'चिखलाचे पाय' ह्या वेडापायी तसेच राहतात हे लक्षात येत नाही (पृ. १९५) ह्या सगळ्या उभ्या–आडव्या संघर्षात घरचे लोक 'दावं' लावावं म्हणून लग्नाचा सापळा रचतात; तेव्हाही 'आन्दा'ला वाटतं "लगीन काय कवावी हुईल. पर शिक्षेणाचं वय गेलं की गेलंच "(पृ. २२७) अशी शिक्षणाविषयीची मनोधारणा घट्ट होत गेल्याने तो आड आलेले सगळे अडथळे पार करत जातो. नको ती धाडसं करतो, वडिलांशी नाठाळपणा करू लागतो अन प्रसंगी त्यासाठी घरही सोडतो; आणि शेवटी विजयाच्या 'दुंदुभी' कानावर आदळताच साहजिकच 'बेभान' होतो. ही 'प्रांजळ शिक्षणनिष्ठा' झोंबीला वेगळे 'परिमाण' प्राप्त करून देते.

'झोंबी' हा असा ग्रामजीवनातील शिक्षणाच्या बेभान वेडाने झपाटलेल्या बालमनाचा आत्मशोध असला तरी तो ती 'मर्यादित' जीवनरेषा ओलांडून मानवी जीवनातील हतबलता; असहाय्यता, कारूण्य, क्रौर्य व त्यामागच्या कारण-मीमांसेपर्यंत जाऊन ठेपला आहे. बारा आण्या-साठी शाळा बुडल्यानंतर, किंवा शाळेत फ्री शीप मिळत नसल्याचे कळताच (गल्लीतील मास्तराने त्यावद्दल हेडमास्तराचे 'कान' भरल्या-नंतर) अशा अनेक ठिकाणी बालमनाची असहाय्यता व हतबलता प्रत्ययकारी झाली आहे. तर ताराची मुलगी व नवरा या दोघांच्या मधोमध होणारी (स्त्री' मनाची) कुचंबणा, नेहमी उपसावे लागणारे कष्ट व तरीही वाट्यास येणारा मार, शिव्या; आणि स्त्री देहामुळे पडणाऱ्या मर्यादा ह्या असहाय्यतेत भरच घालत जातात. आन्दा, ताराला रतनूचं नेहमी मारणं, शिव्या देणं, ह्या बरोबरचं आपली मतं लादणं; त्यातून क्रूर मानवी मनाचे दर्शन घडते. एक–दोन प्रसंगी तो किंचित गलबलल्यासारखा वाटतो. एरव्ही "बसता बुक्की, उठता लाथ" असेच धोरण तो बायकापोरांच्या बाबतीत अवलंबितो.

"कारुण्या'च्या दृष्टीने तर अनेक प्रसंग दाखविता येतील. तथापि आन्दा'ला रेडीने ओढत नेणे, शिक्षणासाठी प्रसंगीं जरा जास्त कामं करायची मग त्येला मारावंसं वाटणार न्हाई'" (पृ. १८६) अशी समजूतदारीने पुस्तकासाठी मार खाण्याची तयारी. चिऱ्याला पाणी देताना पुस्तकाभोवती अडकलेल्या मनाची उलाघाल; भाऊबीजेला नसलेल्या एका 'आण्या'साठी गुदमरणारं मन. चंदराचा अंधारात; झोपीतच घडून आलेला मृत्यू. आनसाचं गिरणीत एकटं पडणं, बाळंतपणाच्या वेळी होणारा आक्रोश; तिची मुंडकं चिमटचात सापडलेल्या खारीगत होणारी तडफड; ह्या सर्व कारुण्यपूर्ण घटना हृदय पिळवटून टाकणाऱ्या, उन्मळून टाकणाऱ्या आहेत.

ह्या सर्वांच्या जोडीला संयम उदा. "तो घरात वस्तीला राहू लागला की, माझा राग आतल्याआत घुमसत राही." (पृष्ठ ७८) व काव्यात्मकतेमुळे लालित्याने नटणारी ही आत्म-कहाणी अनुभव–आशय व अभिव्यक्तीच्या नाना रंगांनी वेगळी झालेली असल्याने ही बालमनाची 'होरपळ' अस्वस्थ करीत जाते.

"झोंबी" हा वास्तवाचा आलेख असून तो "अर्थपूर्ण" आहे. ह्या 'होरपळी'च्या मुळाशी असलेल्या अज्ञानाची कारणमीमांसाही त्यात आहे. त्याचबरोबर, गावातल्या खेळात रमणारे, शाळे-तील व इतर पुस्तकात देहमान विसरण्याची वाचनाची हौस, त्यातूनच होणारा वैचारिक परिणाम, आईवडिलांना समजू घेवू पाहणारं मन, चोऱ्यातून मिळालेल्या पैशाच्या लालसेतून वाढत जाणारा चोरीचा नाद व रतनूच्या दृष्टांन्तामुळे त्यातून सुटका, भावंडे, घरादाराविषयी जाणते-पणानं विचार करू लागलेले मन; असा व्यक्तित्वविकासाचा चढता आलेखही त्यात यशस्वीपणे रेखाटल्या गेला आहे.

'प्रांजळपणाने' अनुभवांचे सत्यप्रगटन नसेल तर कलादृष्ट्या 'आत्मचरित्र' हे फारशी उंची

गाठू शकत नाही. झोंबीत हा 'प्रांजळपणा' ही आहे. ते केवळ 'स्व'च्या समर्थनपर लेखनाचेच चित्र नाही तर चोरी, सिनेमा, विडचा, पाटीचे तुकडे खाण्याचा, पैसे खेळण्याचा नाद; अशा अनेक गोष्टींबरोवर इतर व्यक्तिमने (उदा. तारा, मामा) व परिस्थितीचा ठावही त्यातून घेतला गेला असल्याने ते सर्वांगाने फुलले आहे.

अनुभवांच्या दृष्टीने 'नाविन्य'ही त्यात आहे. आजपर्यंतच्या दलित 'आत्मकथना'मधून बहुतांशी ग्रामजीवनच व्यक्त झाले असले तरी ते 'ग्रामसंस्कृती'चा पाया असलेल्या शेतीभोवती रमत नसते तर त्यांची धावपळही सामाजिक विषमतेविरुद्ध असते. मात्र झोंबीतील अभिव्यक्त झालेले ग्रामजीवन हे 'कृषिनिष्ठ' आहे. फाळचाने केलेली शेती हा या कुटुंबाच्या आर्थिक व्यवस्थेचा कणा आहे तसेच लहानापासून–मोठ्या-पर्यंत सर्व कुटुंब शेतीवरच राबते आहे. साहजिकच त्यातून हंगामानुसार शेतीतील बारीक–सारीक घटनांचे तपशिलवार वर्णन आले आहे; त्यामुळे ती शेती, (मळा), त्यावर राबणारे ते कुटुंब, आणि एकंदर या समाजातून 'कृषिजीवन' सहज-जगत्या नजरेसमोर येते. हा इतर 'दलित आत्म-कथने' व या 'ग्रामीण आत्मचरित्रातील' महत्त्वाचा फरक आहे.

एक कादंबरी म्हणूनही ती यशस्वी झाली आहे. कादंबरीत आवश्यक असलेले व्यापक, व्यामिश्र, गुंतागुंतीचे अनेक जीवनानुभव तीत आहेत. उदा. झोंबीतील बालमनाच्या 'शिक्षणजिज्ञासे'चा आत्मशोध हा जसा मर्यादित जीवन ओलांडतो, तसेच कौटुंबिक ताणतणाव नातेसंबंधातील ताण-तणाव (उदा. हिराच्या नांदवणूकीचा वा आनसाच्या राहण्याचा प्रश्न) जातीमुळे उद्भवणारे पेचप्रसंग इ. अनेक जीवनानुभव त्यात आहेतच; शिवाय समकालीन ग्रामवास्तवाचे दृक्प्रत्ययी रेखाटनही त्यात झाले आहे. समकालीन वास्तव घटनांचे उदा. गांधीवध, लढाई, वगैरेचे प्रतिबिंबही त्यात आहेतच; त्याचबरोबर एका कृषिनिष्ठ समाजातील परंपरा, श्रद्धा, त्यांची जीवनशैली, दैनंदिनी इ. चे चित्रणही एका 'कुटुंबाच्या' निमित्ताने झाले आहे. तर गावगाडयाच्या सूक्ष्म, ऋतुनिष्ठ व्यवहाराचे वर्णनही गुणवत्तेत भर घालणारे आहे.

आप्पाच्या वाडीसारखे दैवत पावल्यानंतर त्याची काढली जाणारी 'पालखी, गावाशेजारच्या विहिरीतील साती आसरा, जुना किल्ला–पांद सारख्या वस्त्याविषयी सम जगैरसमज, गैबीचा ऊरुस, रतनूचे दृष्टान्त, अशा अनेक धार्मिक श्रद्धा व रुढि–परंपरांचे दर्शन त्यातून घडतेच, त्याचबरोबर समकालीन समाजवास्तवाचे चित्रही साकारत जाते.

मृगाची पहिली सर पडताच शाळा सुरू होणं; सावकारीचे व्यवहार, त्यातून उद्भवणारी भांडणे, "शेतकऱ्याचं पोरं शेतकरी" ही वर्ण-जाति-व्यवस्थेने घालून दिलेली परंपरा पाळण्यात धन्यता मानणारा समाज. पावसाळयात गावा–काठी पडणाऱ्या गोसावी–धनगऱ्यांच्या वस्त्या. कृषि-जीवनात गावात 'गप्पा' मारीत हिंडणं एवढीच 'सुखाची' कल्पना. समकालीन लढाईचे परिणाम, त्यामुळे जीवनावश्यक वस्तूंचा काळाबाजार; दारिद्र्याने पिचलेल्या समाजाला "भटाच्या घरात लिवणं, म्हाराच्या घरातं गाणं नि शेत-कऱ्याच्या घरात दाणंच पिकलं पाहिजेत" (पृ. १४३) अशी परंपराप्रियतेची लागलेली कीड. शेतीजीवनातील 'बाळूगडी, देसायाचा मळा, भटाचा मळा, गणपा गडी, फाळचाच्या कवुलायती; व फसवेगिरी. गांधीवधाने ब्राह्मणांची जाळलेली घरे व त्याला वैरभावांचे मिळालेले रूप, खऱ्या गुन्हेगारांना मिळालेली मोकळीक, ह्या सगळ्यात निर्माण झालेली दहशत–उठणाऱ्या अफवा इ. चे सखोल चित्रण त्यात आले आहे.

स्वातंत्र्यदिनात गावाचा उत्साह; त्यापासून दूर असलेली सामान्य कुटुंबे, स्वातंत्र्यदिन साजरा करण्याची पद्धत, गावातील अल्लावा, 'गैबी'च्या ऊरुसासारखे सामूहिक उत्सव, त्यांचा गावमना-वरचा दरारा; लग्नातील चालीरीती, वराती अशा अनेक गोष्टींचे सूक्ष्म निरीक्षणशैलीमुळे एका गावाच्या संपूर्ण समाजवास्तवाचे चित्र त्यात आले आहे.

कौटुंबिक ताणतणावातून स्पष्ट होणाऱ्या

नातीसंबंधाचे चित्रणही त्यात आले आहे. रतनू–ताराचे सुरुवातीचे संबंध, सासू–सासऱ्याच्या मृत्यूनंतर 'कंबळा 'ने भरलेले रतनूचे कान; त्यामुळे 'तारा 'वर होणारा अन्याय व तिची मानसिक कुंचबणा. ताराचे धाकट्या भावाला भाकरी देणं. आनसाच्या लग्नाचा प्रसंग, व भाऊबीजेला न येणं. कंबळा व बेलवडचाचे संबंध. मामाच्या पोराचं घरात येणं व त्याचे होणारे हाल, हिराच्या नांदवणूकीचा प्रश्न या साऱ्यात ताराच्या मनाची होणारी कुतरओढ; असे कौटुंबिक ताणतणावातील भावस्पंदनाचे सूक्ष्म रेखाटनही त्यात आहेच पण ह्या कुटुंबाच्या दारिद्र्यातून निर्माण झालेल्या नातेसंबंधातील "तारा, आन्दा, आनसा, मामा," इ. व्यक्तींची मानसिक ससेहोलपट प्रत्ययकारी आहे.

जे सांगायचे आहे ते प्रथमपुरुषी, ओघवत्या, निवेदनशैलीमुळे 'नीट' सांगितले गेले आहे. त्याच बरोबर अनुभवातील अस्सल जीवनानुभूतींच्या अनेक सूक्ष्म छटाही त्यात आहेत. उदा. वाटचाला आलेल्या दोन द्राक्षांचा चवीचे वर्णन (पृ. २४३) त्याबरोबर ते कधी करुण, कधी विदारक वास्तव तर केव्हा विषम–समाज-व्यवस्थेचे दर्शन घडविणारे आहे. अनुभवाचे काव्य, नाट्य, आदी अनेक घटक इथे सगोचर झालेले आहेत.

संपूर्ण 'झोंबी' हेच एक जीवननाट्य आहे. फुलपाखरांच्या सोबतीने नाचण्या–बागडण्याच्या वयात कष्टाच्या भाराने गुदमरत जाणाऱ्या सोशिक मनाच्या मानसिक भावआंदोलनातील 'नाट्य' त्यात कलात्मकतेने रेखाटले गेले आहेच. त्याबरोबर तारा–कंबळाची धुसफुस, आंन्दूचे खिडकीत जाऊन मजा बघणे बिड्या ओढतांना उघडकीस येणं, तालमीत सोन्याची पेटी हरवून जाणं, हातोऱ्यातनं तीनवेळा विंचूचा दंश होणं, भूतांच्या वस्तीवरून जाणं, अर्धवट काम सोडून आकांताने शाळेला पळणं, संघातल्या भटमंडळीचं रतनूकडे, किंवा आन्दाचे आनसाकडे भाऊबीजेस जाणं; अशा कितीतरी नाट्यात्म–घटना प्रसंगाचा निर्देश करता येईल.

'मी 'चा पिंडच मुळी काव्यात्म असल्याने अभिव्यक्त अनुभवांच्या विविध पदरांना व अंगोपांगांना काव्यात्मतेची किनारही लाभली आहे. उदा. आनसाला मूल होतानाचे वर्णन- "–होतं–नव्हतं तेवढं रक्त जणू तिनं त्य गुप्तधनासाठी राखून ठेवलं होतं...दोन दिवसांनी तो जीवही तिच्या मागोमाग तिचं स्तन्य शोधत निघून गेला" (पृ. २५२) किंवा शिवाबद्दलचे... "माती खाऊन खाऊन तो ही मातीचा काळा पुतळा बनला होता. त्याच मातीशी त्यानं स्वतःच्या जन्माचा खेळही मांडलेला." अशा अनेक अनुभवांच्या पदरांना काव्यात्मता लाभली आहे.

व्यक्तिचित्रणाच्या बाबतीतही लेखणी 'समर्थ' दृक्प्रत्ययी वाटते. सिद्धू माळकर, लक्षू म्हातारा, बापूचा म्हातारा ही माणसं तर 'जित्ती' होऊन डोळ्यासमोर येतातच पण आनसा, चंदरा, सुंदरा, शिवा, वगैरे लहान–सहान व्यक्तिरेखाही कमालीच्या 'बोलक्या' झाल्या आहेत. या सर्वांत 'रतनू–तारा–मामा' लक्षणीय आहेत. "तारा" ही सोशिक, कनवाळू व महत्त्वाचे म्हणजे 'ढोरमेहनती' आहे. तिला 'आन्दु' व भावाविषयी कणव आहे. रात्रंदिवस 'कष्ट–कष्ट–कष्ट' करून आणि अनिच्छेने देहधर्मामुळे वाटचाला आलेल्या बाळंतपणामुळे तिच्या शरीराचे 'चिपाड' होते. त्यातच रतनूच्या मार व शिव्यांची भर पडत जाते. एकूण पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेची बळी ठरलेली ही व्यक्तिरेखा 'कारुण्य' व 'कष्टाची' मूर्ती आहे. एखाद्या निकराच्या वेळी तिचा अहंकार उफाळूनही येतो (पृ. २४८) पण एरव्ही ती कमालीची सोशिक आहे, "सासऱ्याचं राज हात्ती झुलावंत असं नि ह्या म्हेनत्यानं हातात भिकंचं बेलं आणून ठेवलं." (पृ. २१७) अशा स्थिती-तही जिवापाड कष्ट करून ती आपल्या मुलांना सावली देते. आन्दाच्या शाळेत मदत करते पण आयुष्यभर मार–जाच आणि छळवणूक या पलिकडे तिला काहीच भेटत नाही. ही "कारुण्य माता" कोणाच्याही कठोर हृदयाला पाझर फोडणारी... त्यातच तिची अनेक भावस्पंदने जिवंत झाली असल्याने; प्रत्ययकारी वाटतात.

परिस्थितीने व परंपराप्रियतेने 'खलनायक' वाटावा असा 'रतनू', रंगराज पहेलवान, वर्तनाने

पुरुषसत्ताक संस्कृतीचा पुरस्कर्ता वाटणारा आणि शेतकरी असूनही कमालीचा आळशी आहे. त्याच्या ह्या सनातनी अज्ञानी परंपरेचा वारसा जपून; जाति-वर्ण व्यवस्थेपुढे मान झुकविण्याच्या वृत्तीमुळेच या छळकथेचा जन्म होतो. तो रागीट, प्रसंगी क्रूर चाकोरी सोडून न जाणारा, एकमार्गी, मुलखाचा फाटक्या तोंडाचा, महासंशयी आहे. घरादाराला राबायला लावून गावात गप्पा मारत फिरणं म्हणजे जन्माचे 'सार्थक' झाले असे त्याला वाटते. त्यामुळे आन्दाच्या शाळेला नेहमी तो विरोध दर्शवितो. त्यामागे त्याचा वैयक्तिक सुखवाद असला तरी अनेकदा 'सुकणारं-करपणारं' पिकही त्याच्या डोळ्यासमोर येतं. परिस्थिती व परंपराप्रियता यामुळे उद्भवणारा वैताग; अन् आळशी स्वभाव यामुळे तो 'खलनायक' वाटतो. त्याशिवाय 'मामा'चे व्यक्तिरेखाटनही लक्षणीय वाटते. ह्या सर्व व्यक्तींच्या अंतर्मनातील भावस्पंदनाचे रेखाटनही वेधक दृक्प्रत्ययी आहे.

झोंबीची भाषा ग्रामीण, नागर अशी असली तरी त्यामागे असलेल्या व्यक्तिमत्त्वाच्या घडवणूकीतून ती अनुभवांशी प्रामाणिक आहे. कलात्मकतेचा साज घेऊन येणारी ओघवती लेखनशैलीही अशीच प्रत्ययकारी आहे. उदा. (पिंपळाचा वृक्ष) "वर कायम सळसळत असे. उंचच उंच त्याला भोवती भोर उंच पार (पृ. ३८). त्यांनी पहिल्या पेपरालाच माझ्या पायात साप सोडला. (पृ. ८३). आई नुसती रात्रंदिवस कष्ट-कष्ट-कष्ट करीत असे. (पृ. १२६) आईच्या मनात रानडुक्कर खोल खोल रुतलेलं (पृ. १५०). तिचा भोळा विश्वास स्वैपाकघराच्या चुलीसमोर चित्र रंगवीत बसला (पृ. १७९). अशी अनेक उदाहरणे दाखविता येतील. ह्या अल्पाक्षरी, काव्यात्म लेखनशैलीमुळे ही 'करुण' कथा अधिक 'गडद' होत जाते. कलात्मकतेचा आगळा-वेगळा साज घेऊन येते.

ह्या सगळ्यात डॉ. आनंद यादवांच्या व्यक्तिमत्वातील सर्जक कलावंतही ह्या छळकथेत वावरताना दिसतो. विड्याची थोटकं, पाटीचे तुकडे खिशात सापडल्यानंतर, दप्तर हरविल्यानंतर, मगा आणि बागीच्या अनेक प्रसंगी दिलेली उत्तरं 'कल्पनाशक्ती'चे प्रत्यंतर घडवितात. वाचनाचे वेड आगीसारखे भडकत जाते. त्यातील माणसं 'सर्जनशील' मन डोळ्यासमोर 'जित्ती' करीत जातात. पुढे पुस्तकाची जागा 'सिनेमा' घेतो. रात्र-रात्र उपाशी राहून जागणाऱ्या मनाला 'सिनेमातील' अनुभवापुढे पोटाचे हाल 'नगण्य' वाटतात. त्यांचे बालमन त्या 'कलानुभवात' रंगत जाते. पोस्टरकडे पाहून कल्पनेने संवाद घडू लागतात. गैबीच्या अड्ड्यावर 'जुगार' खेळणाऱ्या लोकांचा मनाचा हुरहुरता आनंद घ्यावासा वाटतो-(परकाया प्रवेश ?) आणि ह्या सर्वातूनच मग एकटेपणात शब्द जुळत जातात.

माळ आणि आभाळाच्या सापटीतन फिरताना माळभर अंथरलेल्या मनात खोलवर हे कल्पनाविश्व साठत जातं. 'सौंदलगेकर' मास्तरामुळे 'कविमन'जागे होते; अन् रानातलं जळतं वास्तव विश्व शब्दाच्या कोंदणात बसू लागते... सिनेमात भान हरवणारी कल्पनाशक्ती शब्दात बागडू लागते...आणि जेव्हा जेव्हा 'एकटेपणाची' उदास कोंडी वाटचाला येऊ लागते; तेव्हा तेव्हा 'हिरवं नसणारे' हे 'हिरवे जग' शब्दातून आकारत जाते.

अशी ही यातनांची गाणी असलेली कहाणी; आशयाबरोबरच, कलात्मकतेमुळे 'लालित्याचा' रंग घेऊन, लेऊन आली आहे. मराठीत 'स्मृतिचित्रे' नंतर सर्वांग परिपूर्ण-आपल्या जीवनाचे 'भांडवल' न करता, ह्या वेदना-कळांना कलात्मकतेचा साज देऊन; 'स्व'च्या आत्मशोधाबरोबर समाजभान ठेवून वास्तवाचे प्रांजळ चित्र व चरित्र रेखाटणारी एक मोलाची 'आशयवादी' साहित्यकृती दाखवायची म्हटले तर "झोंबी" कडेच निर्देश करता येईल. ■

जय-पराजय

सुलभा हेर्लेकर

'जय पराजय' ही जयश्री रुईकरांची दुसरी कादंबरी ! कथाक्षेत्रात विविध आशयाच्या व्यक्तिसंबंधाच्या कथा लिहिणाऱ्या या लेखिकेची

ही कादंबरी म्हणजेही कथेचे व्यापक रूपच होय! कथेवरूनच बेतलेली पण कथेचा कॅनव्हास पुरेसा न वाटल्याने विस्तृतपणे प्रयोगशील धारणेने लिहिलेली ही कादंबरी वाचकांना एका वेगळ्याच विज्ञानयुगात तर नेतेच, पण 'स्त्री'च्या भावविश्वाला समर्थ रूप देऊन जाते, म्हणूनच माझ्या मते ह्या कादंबरीचे स्वरूप 'प्रयोगशील' एवढेच नसून समाजात कोड असलेल्या एका कुमारिकेचे मनोविश्व, भावविश्व कसे जोपासले जाते, समाज तिला आपला मानतो कां? जवळचेच रक्ताचे संबंधही एका तिच्या कोडाने नातं विसरून कसे जातात... अशा अनेकपदरी समस्यांचे चित्रमयी शैलीत पण परखडपणे केलेले विश्लेषण हा या कादंबरीचा मूलभूत हेतू आहे. कादंबरी नायिकाप्रधान असूनही इतर डॉ. कुणाल सकट पुरुषपात्रें अधिक जिवंत वाटतात, मानवी वाटतात.

डॉ. प्रियाभोवती वावरणारा समाज तसा किडलेलाच आहे. डॉ. कुणाल रॉय हा प्रियाचा पती—ह्या दोघांची, त्यांच्यातील अबोल, अदृश्य संघर्षाचीचही कथा आहे. सुरवातीलाच प्रियाच्या पत्राने सुरुवात होते व फ्लॅश बॅक पद्धतीने तिचे लहानपण आपल्यापुढे उलगडते. कादंबरीचा पूर्वार्ध हा प्रियाचं लहानपण, तिच्या आईला आलेले अनुभव, तिची शाळा, कॉलेज या गोष्टींनी गजबजला आहे. प्रियाचे कोड, त्यावरील उपचार हे सारंच लेखिकेनी सहज घडावे या पद्धतीने लिहिले आहे. आदर्श विद्यार्थिनी असणारी प्रिया—तिच्या मैत्रिणी—तिच्या कोडावरील चर्चा हे येणं अपरिहार्य होतं. देवेंद्र जैन नावाच्या तरुणाशी तिची मैत्री होण ..आणि तिच्या व तिच्या आईच्या पिढीतल्या अंतरामुळे विचारांचे सामंजस्य नसणं हाही एक प्रश्न सूचकरूपाने पुढे आला आहे. पण आईनेच कोड असलेल्या आपल्या लाडक्या मुलीला दुसऱ्या मुलीचं लग्न तिच्यामुळे कसं मोडतं हे सांगताना आईच्या मनोवृत्तीची चीड येते. पुढे तिचे शिक्षण संपल्यावर ती दूर गेल्यावर आईची मनोवृत्ती व्यावहारिक पातळीवरून मानसिकतेकडे येते. हे सत्य लेखिकेने अगदी मानवी अनुभवातून टिपले आहे.

डॉ. प्रियाचे डॉ. कुणालशी लग्न ही घटना तशी सहज पण धक्का देणारी! डॉ. कुणालने आपल्यावर प्रेम केलेच नाही तर आपल्या कोडामुळे आपल्याला स्वतःच्या प्रयोगाचं फक्त साधन म्हणून पाहिलं हे कळतं तेव्हा प्रियाला धक्का बसतो. पण प्रिया इथेही शांतच असते. फक्त डॉ. कुणालला ती अधिकाराने मातृत्व मागते. मानवी संबंधातले हे वारकावे, ह्या स्वभावाच्या छटा लेखिकेने चारदोन फटकाऱ्यात रंगवल्यात पण वाचकाला सुन्न करून! अंतर्मुख करून! प्रिया, कुणाल ही पात्रं जिवंत वाटतात. लेखिकेने अलिप्तपणे ती रंगवल्यामुळे जीवनानुभवाचा एक तरल पदर आपल्यापुढे उलगडतो, डॉ. प्रियाला दिवस रहातात तेव्हा कुणाल किती हळुवार होतो. तिला अगदी फुलासारखं जपतो. 'आपण असं कां वागतो? जिच्याबद्दल प्रेम नव्हतं आपल्या प्रयोगाची एक साधन म्हणून आपल्या लेखी जिला महत्त्व होतं त्या प्रियाबद्दल आपल्या मनात ही एकाएकी नाजूक, हळुवार भावना कशी काय निर्माण झालीय? विचार करूनही ह्याचा उलगडा त्याला करता येत नव्हता. आपल्या अपत्याची माता म्हणूनच तर तिच्याबद्दल अशी हळवी आपुलकीची भावना मनात निर्माण झाली नसेल?" या प्रश्नाने तो अस्वस्थ होतो आणि मनाशीच आपण प्रियात गुंतलो आहोत याची कबुली देतो. आणि स्वतःचा पराभव पत्करतो. . ." कादंबरी इथे संपते पण इथूनच तिचे विचार वाचकांच्या मनात सुरू होतात हे या कादंबरीचे यश म्हणावे लागेल. कुठेही सांकेतिकता न येता, उपदेशाचे पारायण न येता एक प्रयोगशील कादंबरी निर्माण करून कादंबरीवाङ्मयात मोलाची भर टाकली आहे.

■

जयपराजय
जयश्री रुईकर
हीरक प्रकाशन, नागपूर,
पृ. ११६, रु. ३२/-

| वि | शे | ष |

अखिल भारतीय साहित्यसंमेलनाचे फलित
एक विचार

| वि | शे | ष |

६२ वे अखिल भारतीय साहित्य संमेलन अमरावती येथे दि. २१–२२–२३ जाने. १९८९ ला पार पडले. के. ज. पुरोहित उपाख्य शांताराम हे या संमेलनाचे अध्यक्ष होते. या संमेलनाचे वैशिष्टच असे की विद्याधर गोखले यांच्यासारख्या अध्यक्षीय निवडणुकींच्या रिंगणात उतरून मागे पडलेल्या उमेदवार लेखकानेही या संमेलनात खेळकर स्वभाव आणि उमदी वृत्ती यांचे दर्शन घडवून, संमेलनात सहभाग कायम ठेवला. त्यामागे संयोजकांचे योजक कर्तृत्व तर होतेच पण त्याबरोबरच गोखल्यांचे स्वच्छ मोकळे मनही प्रतिबिंबित होत होते.

दि. २१ जाने. ला सकाळी ११ वाजता अंबादेवीच्या मंदिरापासून ग्रंथदिंडीचे आयोजन केले गेले होते. दिंडी संमेलनस्थानी आल्यानंतर अध्यक्षांच्या हस्ते पुस्तक प्रदर्शनी, चित्र प्रदर्शनी यांचे उद्घाटन झाले. सायंकाळी ५ वाजता मुख्य सोहोळा सुरू झाला. डॉ. प्रभाकर माचवे यांनी समईच्या ज्योती उजळून संमेलनाचे उद्घाटन केले. आपल्या छोटयाशा उद्घाटनपर भाषणात 'क' म्हणजे आकाशतत्त्व आणि 'ल' म्हणजे पृथ्वीतत्त्व अशी कल्पना स्पष्ट करुन 'काल' आणि 'कला' मध्ये काय अंतर आहे ते प्रभाकर माचवे यांनी फार सुंदर रीतीने सांगितले. जी आभाळाशी नाते सांगते पण पृथ्वीतत्त्वावर भर देते ती 'कला.'

प्रा. के. ज. पुरोहित यांनी अभिव्यक्तिस्वातंत्र्यावर भर देत त्याच्या ऱ्हासाबद्दल चिंता व्यक्त केली. कवी, कथाकार आणि वक्ता यांनी 'प्रयोग' म्हणून सुरू केलेल्या दर्शनावर त्यांनी टीका केली. 'कवी, कथाकार म्हणजे शब्दांचे चाळ पायात घालणारा नाच्या पोर नव्हे' असे ठाम विधान त्यांनी केले आणि लोकप्रियतेच्या किमान पातळीवरील व्याख्यानांनाही त्यांनी 'अभिरुचीआड येणारे विघ्न' म्हटले. संस्कृतीच्या आविष्काराची भाषा म्हणून तिचे संवर्धन व्हावे हे स्पष्ट करून के. ज. पुरोहित म्हणाले की वाङ्मयीन संस्कृतीमुळे "माणसाच्या अनुभवाची प्रत सुधारेल. तो स्वतःकडे व इतरांकडे माणूस म्हणून बघू लागेल. तो जीवनातून जास्त रस उचलेल व जीवनाला जास्त रस देईल."

संमेलनात झालेले परिसंवाद हे जास्त गर्दी खेचू शकले नाहीत. अपवाद फक्त 'लेखिकांनी तरी स्त्रीला न्याय दिला आहे काय?' या परिसंवादाचा. 'प्राचीन वाङ्मय आज संदर्भशून्य झाले आहे' या परिसंवादाला तर आमंत्रितांच्या गैरहजेरीमुळे गालबोटच लागले. परिसंवादाच्या एकाच वेळेच्या आयोजनामुळे, त्याच वेळी सुरेश भटांची प्रकट मुलाखत एकीकडे तर दुसरीकडे नवोदितांचे कवि-संमेलन अशा कार्यक्रमांच्या भाऊगर्दीमुळे असे घडले असावे.

सुरेश भटांच्या मलाखतीचा प्रयोग हा 'एकपात्री' होता. गं. ना. जोगळेकर, लक्ष्मीकांत तांबोळी, अक्षयकुमार काळे या मुलाखतकारांना फारसे बोलू न देता भटांनी सर्व सूत्रे आपल्या हाती ठेवली. पण जिंकले ते त्यांच्या बोलण्याने नव्हे तर त्यांच्या कवितेने!

'प्राचीन वाङ्मय आज संदर्भशून्य झाले आहे' हे मत मंजूर न करता डॉ. श्रीकांत निडके, डॉ. सुशीला पाटील यांनी प्राचीन वाङ्मयाच्या कालातीततेवर भर दिला. अध्यक्ष डॉ. भाऊ मांडवकरांनी मात्र विषयाच्या बाजूने विवेचन केले. श्री. डिंगरे यांनी 'संदर्भ' पुन्हा तपासून पहावे लागतील असे विचार मांडले.

स्त्रीलेखिकांच्या परिसंवादाला गर्दी होती आणि आमंत्रित वक्तेही उपस्थित होते. विषयाच्या साहित्यिक बाजूपेक्षा सामाजिक अंगावर भर दिला प्रा. भालचंद्र फडके आणि शांताबाई किर्लोस्कर यांनी. डॉ. वीणा देव यांनी एकंदर आढावा घेऊन वातावरण निर्माण केले. प्रभा गणोरकर आणि आशा सावदेकर यांनी लेखिकांची बाजू मांडण्याचा प्रयत्न केला तर प्रा. विजया डबीर यांनी लेखिकांच्या विविध साहित्यातील त्रुटींवर बोट ठेवले.

डॉ. सरोजिनी वैद्य यांनी आपल्या नेमक्या पण सर्व मतांना कवेत घेणाऱ्या विवेचनाने परिसंवादाची सांगता केली. श्रोते, विचारयुक्त अशी भाषणे दोन अडीच तास एकाग्र होऊन ऐकू शकतात याचा आजच्या काळातील पुरावाच या परिसंवादाने दिला.

'परिवर्तनवादी साहित्य वस्तुस्थिती आणि अपेक्षा' या परिसंवादात प्रा. भा. ल. भोळे, प्रा. मधुकर वाकोडे, प्रा. अशोक राणा, प्रा. ललिता बापट यांची विषयाला न्याय देणारी भाषणे झाली.

'बृहन्महाराष्ट्राची मराठी साहित्यसेवा: वैशिष्टये व मर्यादा' या परिसंवादात द. पं. जोशी, निशिकांत मिरजकर आदी नामवंतांनी हजेरी लावली. प्रसिद्ध नाटककार आणि पत्रकार विद्याधर गोखले यांची प्रगट मुलाखत. प्रा. सुरेश द्वादशीवार, डॉ. विनय वाईकर आणि प्रा. माधवी चाफेकर यांनी घेतली. या कार्यक्रमाला रसिकांची चांगलीच दाद मिळाली. उर्दू शेरशायरी, गझला यांच्या साह्याने विद्याधर गोखल्यांनी मुलाखतीला चांगला सूर मिळवून दिला.

२३ जानेवारीला सकाळी मुंबई मराठी साहित्य संघाच्या वतीने आयोजित 'आजच्या मराठी पत्रकारितेची साहित्याशी फारकत झाली आहे' हा परिसंवाद ज्येष्ठ पत्रकार बाळासाहेब मराठे यांच्या अध्यक्षतेखाली झाला. त्यात श्री. मा. गो. वैद्य, विद्याधर गोखले, शरद कळणावत, प्रभाकर पुराणिक यांचा सहभाग होता. पत्रकाराचे अनुभवक्षेत्र जास्त व्यापक असल्यामुळे त्याला साहित्यापासून दूर करता येत नाही हाच परिसंवादाचा इत्यर्थ होता. त्याच सकाळी झालेले कथाकथन फारसे रंगले नाही. प्रतिमा इंगोले यांची कथा रसिकांनी उचलून धरली.

हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाची शिस्तबद्ध व्यवस्था चांगली होती. 'महानिर्वाण' आणि 'नटसम्राट' या नाटकांचे स्थानिक संस्थांनी सादर केलेले प्रयोग, २३ ता. ला रात्री झालेली हृदयनाथ मंगेशकरांची 'भावसरगम' ह्या संमेलनातील आणखी जमेच्या बाजू होत्या. मात्र आमंत्रितांच्या कविसंमेलनाने सर्वच बाबतीत निराशा केली. त्यामानाने नारायण कुळकर्णी कवठेकरांच्या संचलनाखालील कविसंमेलनाने चैतन्य निर्माण केले. आमंत्रितांच्या कविसंमेलनात तुळशीराम काजे, शिरीष गोपाळ देशपांडे, श्रीपाद जोशी यांच्या कविता चांगल्या होत्या.

अमरावती संमेलन हे प्रादेशिक संमेलन असे तुच्छतेचे उद्गार अनेकांनी काढले तरी हल्लीच्या अखिल भारतीय संमेलनाची जातकुळी साधारण अशीच असते हे नाहीतरी मुंबई व ठाणे या साहित्यसंमेलनांनी सिद्ध केलेच आहे. मात्र अध्यक्षीय भाषणात आत्मकेंद्रित रूपवादाविषयीची खंत व साहित्याचा रसिकांशी नतलेला संवाद याबाबतचे महत्त्व निरूपण करून श्री. पुरोहित यांनी अध्यक्षाची संयमी सजगता स्पष्ट करण्याचे महत्त्वाचे काम केले आहे. अमरावती संमेलनाने दिलेले हे देणे काय थोडे आहे ?

आशा सावदेकर

वाचकांचा पत्रव्यवहार

नेरीच्या पार्वती प्रतिमा लेखाच्या निमित्ताने

'युगवाणी'च्या जानेवारी–मार्च १९८८ च्या अंकात डॉ. प्रदीप मेश्राम यांचा 'नेरीचा पार्वती प्रतिमा लेख' नावाचा एक लेख प्रसिद्ध झालेला आहे. डॉक्टरांनी हाच लेख प्राथमिक स्वरूपात पुण्याहून प्रसिद्ध होणाऱ्या 'अपूर्व' ह्या डायजेस्ट मासिकाच्या जून १९८७ च्या अंकात प्रसिद्ध केलेला होता. तेथेही त्यांनी पार्वती प्रतिमा वर्णन व लेखाचे वाचन (?) प्रसिद्ध केलेले आहे. लेखा-बरोबर त्यांनी मूर्तीच्या पादपीठावरील लेखाचे एक छायाचित्रही प्रसिद्ध केलेले आहे. त्यामुळे शिलालेखाच्या अभ्यासकांना पुनर्वाचनाच्या दृष्टीने तो उपयुक्त करावा.

'अपूर्व'मधील त्यांचा लेख व शिलालेखाचे त्यांचे वाचन पाहून मला त्यांच्या वाचनातील दोष स्पष्टपणे दृष्टीस पडले, म्हणून त्यांनी प्रसिद्ध केलेल्या शिलालेखाच्या छायाचित्रावरून मी यथा-शक्ती त्याचे पुनःवाचन करून त्याप्रमाणे एक लेख लिहून 'अपूर्व' कडे प्रकाशनार्थ पाठविला आणि तो ऑगस्ट १९८७ च्या अंकात प्रसिद्धही झाला.

माझी अशी समजून होती. की डॉ. मेश्राम माझे पुनर्वाचनाचे अवलोकन करतील. त्यांनी तो केलेला नाही हे आताच्या त्यांच्या 'युगवाणी'तील लेखा-वरून स्पष्ट होते. कारण त्यांच्या वाचनातील मी ज्या चुका दाखविलेल्या होत्या त्यात कोणत्याही प्रकारची दुरुस्ती न करता पूर्वीच्या चुका तसेच ठेवून पुन्हा चुकीचे वाचन देऊन शिलालेखातील अनावश्यक काना, मात्रांची चर्चा केलेली आहे. ह्यावरून असे समजावे का की, 'अपूर्व'मध्ये प्रसिद्ध झालेला माझा लेख त्यांच्या वाचनात आलेला नाही ?

दुसरे असे की डॉ. मेश्रामांनी 'युगवाणी'-तील आपल्या लेखाच्या तळटीप क्रमांक १० मध्ये स्पष्ट म्हटले आहे की, ज्या अभ्यासकांना प्रतिमा लेखाची प्रत हवी असल्यास त्यांनी त्यांच्याशी संपर्क साधावा. त्या प्रमाणे मी त्यांना लेखाची (छायाचित्राची) एक प्रत अधिक अभ्यासासाठी पाठवून देण्याचे विनंतीवजा पत्र पाठविले. त्याला आता एक महिन्याचा काळ लोटला. परंतु त्यांच्या कडून कोणत्याही स्वरूपाचा प्रतिसाद नाही. माझे पत्र त्यांना मिळाले नसावे असे समजून पोस्ट खात्यास दोषी धरून गप्प बसण्याशिवाय तूर्त तरी दुसरा मार्ग नाही.

आता शिलालेखाच्या विषयाकडे वळू. लेखकांनी सदर शिलालेखावरील मजकूर हा संस्कृतमिश्रित मराठी आहे असे म्हटले आहे. परंतु सकृतदर्शनी तसे वाटत नाही. म्हणून त्यास संस्कृत मराठी सनिश्र लेख असे म्हणता येणार नाही.

डॉ. मेश्रामांनी डॉ. तुळपुळे यांचे बृहद ग्रंथ 'प्राचीन मराठी कोरीव लेख' याचा उल्लेख त्यांच्या 'युगवाणी'तील लेखात केलेला आहे. हा ग्रंथ त्यांनी जागरुकतेने वाचलेला दिसत नाही असे म्हणावेसे वाटते. कारण त्यांनी तो तसा वाचला असता तर लेख कोरण्यामध्ये अमुक चूक झाली आहे किंवा अमुक अक्षर अमक्यासारखे दिसते अथवा अमुक चिन्ह चुकीचे कोरलेले आहे असे म्हणाले नसते. ते कसे ते आता आपण पाहू.

शिलालेखाच्या पहिल्या ओळीत 'पदुंपयाचे' असा शब्द आहे. त्याचे वाचन लेखकांनी 'पदुम-पाचे' असा करून 'पा' अक्षरासमोर अनावश्यक काना दिली गेली आहे, असे म्हणतात. ते तसे नाही. प्राचीन मध्ययुगीन कोरीव देवनागरी लिपीतील लेखांमध्ये अक्षरांवर मात्रा दोन पद्धतीने देत असत. एक नेहमी प्रमाणे अक्षराच्या माथ्यावर मात्रा आणि दुसरी पद्धत म्हणजे अक्षरापूर्वी एक काऱ्याच्या दंड देणे. विशेषतः अक्षरांवर दोन मात्रे जर असतील तर त्यापैकी एक मात्रा अक्ष-राच्या सुरवातीस एक काना देत असत. त्यास पृष्टमात्रा असे म्हणतात. उपरोल्लेखित डॉ. तुळपुळेंच्या ग्रंथांत अशी बरीच उदाहरणे आहेत. मात्र याचे प्राचुर्य संस्कृत भाषेतील ताम्रपट आणि शिलालेखात आढळते. किंबहुना लेख प्राचीन आहे

हे ओळखण्याचे ते एक गमक आहे, म्हणून 'पदुमपाद्ये' असे वाचन न करता त्या ठिकाणी 'पदुमपाद्यँ' असा करावा लागेल. ह्या प्रमाणे तिसऱ्या ओळीतील शेवटची दोन अक्षरे 'गमा' असे न वाचता 'गमो' असे वाचावे लागेल. कारण त्या ठिकाणींसुद्धा पृष्टमात्रेचाच उपयोग करण्यात आलेला आहे. डॉ. मेश्राम निश्चितपणे म्हणतात त्या प्रमाणे हा लेख पादपीठावर नंतरच्या काळात कोरलेला आहे, असे म्हणवत नाही आणि तसा कोणताही आधार त्यांनी दिलेला नाही. शिवाय तसे म्हणायचे काही एक कारण नाही. मूर्तीसमवेतच लेख कोरला गेला असण्याची दाट शक्यता आहे. अशी उदाहरणे विपुल प्रमाणात देता येतील. अनेक प्राचीन जैन मूर्तींच्या पादपीठावर कालोल्लेखासहित लेख कोरण्यात आलेले आहेत. खजुराहो येथील मारुतीच्या पादपीठावर एक लेख कालोल्लेखासहित कोरलेला आहे. तथापि डॉ. मेश्राम म्हणतात त्याप्रमाणे नेरी येथील पार्वती प्रतिमा (मूर्ती) ही ९–१० व्या शतकातील निश्चितच असावी असे एकदम सांगता येणार नाही. कारण लेखातील अक्षराचे वळण ९–१० व्या शतकाकडे संकेत करीत नाहीत. तर ते त्याहूनही उत्तरकालीन आहेत. अक्षरवाटीकेवरून प्रस्तुत मूर्ती आणि त्यावरील लेख १२ व्या शतकातील असावेत. लेख काळजीपूर्वक न कोरला गेल्यामुळे काही अक्षरांबद्दल संदेह उत्पन्न होणे सहाजिकच आहे. तथापि मजकूरावरून ते अक्षर ओळखता येते. 'अपूर्व' जून १९८७ च्या अंकात प्रसिद्ध झालेले लेखाचे छायाचित्रावरून मी जे सुधारीत वाचन केले आहे ते असे.

१. सोमेस्तमा पदुमपाद्यँ

२. वाकेसरि आगुवासु

३. त्रओ गमो

उपरोक्त वाचनात जाणकार अभ्यासू व तज्ज्ञ काही बदल सहज सुचवू शकतील. पहिल्या ओळीतील "द्यँ", दुसऱ्या ओळीतील "वाकेसरि" "रि" आहे की "पि", "आगुवासु" मधील "गु" की "वा" आणि "स" की "सु" आणि शेवटच्या ओळीतील शेवटचे अक्षर "गमो" मधील "मो" "भो" सारखे दिसते. "भ" ह्या अक्षराचे प्राचीन वळण ह्या ठिकाणी दिसते.

प्रस्तुत नेरीच्या प्रतिमालेखाने इतिहास ज्ञानात काही मोलाची भर पडली असे म्हणवत नाही. तरीही अशा लेखांच्या उपलब्धीने त्याच्या वाचन प्रकाशनाने निराळ्या धाटणीच्या अक्षर पद्धतीचे, वळणांचे अभ्यासास चालना मिळते. सारांशाने असे सांगता येईल की, प्रस्तुत प्रतिमालेख शुद्ध अथवा अशुद्ध मराठी भाषेत नाही तर तो अशुद्ध अशा संस्कृत भाषेत आहे. हे त्याच्या पाठावरूनच स्पष्ट व्हावे. अक्षरवाटीकेवरून मूर्तीचा व लेखाचा काळ सुमारे इसवी सनाच्या १२ व्या शतकाच्या उत्तरार्धातील ठरावा.

आनंद कुंभार
प्लॉ. नं. ३४, न्यू पाच्छापेठ
सोलापूर ४१३ ००६

पु. भा. भावे निबंधस्पर्धा

पु. भा. भावे स्मृती समितीने 'पु भा. भावे यांचे भाषाप्रभुत्व' या विषयावर निबंधस्पर्धा आयोजिली आहे. शब्दमर्यादा दोन हजार शब्द. पाच पारितोषिके रु. पाचशे, तीनशे, दोनशे, दीडशे व शंभर. निबंध पाठविण्याचा अखेरचा दिनांक १५ जून १९८९. तपशीलासाठी लिहा :– पु. भा. भावे स्मृती समिती, १८ वेणू अपार्टमेंटस, देवरुखकर रस्ता, मुंबई १४

गो. म. किराणे
(निबंधस्पर्धा आयोजक)

केन्द्रीय कार्यवृत्त / दि. १ ऑक्टो. ८८ ते ३१ डिसेंबर ८८.

१ ऑक्टोबर ८८ रोजी कविवर्य अण्णाजी बोबडे यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालण्यात आला.

दि. २ ऑक्टोबर ८८ रोजी म. गांधी जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस हार घालण्यात आला.

दि. ३ ऑक्टोबर ८८ रोजी वि. सा. संघाच्या संगीत समितीतर्फे श्री. हिंदराज दिवेकर (पुणे) यांचे वीन व सतारवादन व किराणा घराण्याच्या सुप्रसिद्ध गायिका सौ. पद्मजा देशपांडे (पुणे) यांच्या गायनाचा कार्यक्रम टिळक सभागृहात आयोजित केला होता. रसिकांनी या कार्यक्रमास चांगला प्रतिसाद दिला.

दि. ७ – ८ ऑक्टोबर ८८ रोजी ठरलेल्या तारखांना ११ केंद्रातून परीक्षा घेण्यात आल्या. सप्टेंबर–ऑक्टोबर सत्रातील विविध परीक्षांना एकूण ७१० परीक्षार्थी साम्मिलित झाले होते. त्याचप्रमाणे शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी शासनमान्य मराठी प्रवीण / मराठी प्राज्ञ परीक्षा घेण्यात आल्या. १५ नोव्हेंबर १९८८ ला निकाल घोषित करण्यात आला.

दि. २३ ऑक्टोबर ८८ ला परीक्षा समितीची सभा घेण्यात आली. सभेत सटाणा येथे झालेल्या युवा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. वि. स. जोग यांची निवड झाल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव घेण्यात आला.

दि. २४ ऑक्टोबर ८८ ला वि. सा. संघातर्फे कै शिवदास कृष्ण बारलिंगे व्याख्यानमालेअंतर्गत सुप्रसिद्ध कथाकार प्रा. के. ज. पुरोहित (शांताराम) यांचे व्याख्यान आयोजित केले होते. व्याख्यानाचा विषय " लघुकथा–एक वाङ्मयप्रकार " असा होता.

दि. ३१ ऑक्टोबर ८८ रोजी कै. दुर्गाप्रसाद तिवारी यांच्या स्मृतिदिना–निमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालण्यात आला.

दि. २ नोव्हेंबर ८८ रोजी कै. शरच्चंद्र मुक्तिबोध यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालण्यात आला.

दि. ४ नोव्हेंबर ८८ रोजी अखिल भारतीय दलित साहित्य संसद व वि. सा. संघाच्या संयुक्त विद्यमाने नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ वोकरे यांचे "भारतीय समाजक्रांतीचे अवरोध" या विषयावर एक व्याख्यान गडकरी सभागृहात संध्याकाळी ६–३० वाजता आयोजित केले होते.

दि. ५ नोव्हेंबर ८८ रोजी वि. सा. संघ आणि श्रीवत्स प्रकाशन वणी यांचे संयुक्त विद्यमाने गडकरी सभागृहात श्री. राम शेवाळकर यांनी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकरिता संपादित केलेला कै. यशवंत खुशाल देशपांडे यांच्या संशोधनात्मक असंकलित लेखांचा एक संग्रह तसेच श्रीवत्स ह्या दिवाळी अंकाचे प्रकाशन न्यायमूर्ती बाळ गंगाधर देव यांचे हस्ते करण्यात आले. या प्रसंगी डॉ. सुरेश डोळके यांचे व आशीर्वादपर म्हणून डॉ. भाऊसाहेब कोलते यांची भाषणे झालीत.

दि. ७ नोव्हेंबर ८८ रोजी कविवर्य केशवसुत यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालण्यात आला.

दि. ११ नोव्हेंबर ८८ रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालण्यात आला.

१४ नोव्हेंबर ८८ रोजी कै. पु. भा. भावे स्मारक समितीतर्फे विदर्भ साहित्य संघाच्या श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयास पु. भा. भावे लिखित ४९ ग्रंथ पु. भा. भावे स्मारक समितीचे कार्यवाह श्री. प्रभाकर चाफेकर यांनी देणगी म्हणून दिले.

१६ नोव्हेंबर ८८ ला दरवर्षीप्रमाणे यंदाही वि. सा. संघाच्या संगीत समितीने पं. शंकरराव सप्रे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ पं. जितेंद्र अभिषेकी यांचे शिष्य मुंबईचे श्री. रघुनाथराव फडके यांचे शास्त्रीय नाट्य व भक्तिसंगीताचा अतिशय बहारदार कार्यक्रम आयोजित केला होता. यात हार्मोनियमची साथ श्री. श्रीराम सप्रे व तबल्याची संगत दीपक फडणीस यांनी केली होती.

१९ नोव्हेंबर ८८ रोजी कै. वि. रा. हंबर्डे यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालण्यात आला.

वि. सा. संघातर्फे संतवाङ्मयाच्या अभ्यासक सौ. सुहास बाळ देव यांच्या "इये संताचिये नगरी" या लेखसंग्रहाचे प्रकाशन वसुधा प्रकाशनाच्या सहकार्याने आयोजित केले होते. याप्रसंगी डॉं. आशा सावदेकर, सेवानिवृत्त न्यायाधीश बाळासाहेब जोशी व ॲड्. भा. वि. गायकवाड यांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. राम शेवाळकर होते.

दि. २७ नोव्हेंबर ८८ रोजी कै. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालण्यात आला.

दि. २८ नोव्हेंबर ८८ रोजी कै. महात्मा फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालण्यात आला.

अखिल भारतीय दलित साहित्य संसद व वि. सा. संघ यांचे संयुक्त विद्यमाने नीलकांत ढोले यांचे अध्यक्षतेखाली काव्यवाचन व काव्यास्वाद हा कार्यक्रम आयोजित केला होता. यात १२ कवी व ४ समीक्षकांनी भाग घेतला.

दि. ४ डिसेंबर ८८ रोजी कै. जोशी कुटुंबियांकडून देणगी मिळाली. विदर्भ साहित्य संघातर्फे शालेय विद्यार्थ्यांसाठी यंदापासून लेखनस्पर्धा आयोजित करण्यात आली असून ही स्पर्धा आयोजित करण्यासाठी विदर्भ साहित्य संघाचे एक आजीव सभासद श्री. रमेश जोशी यांनी जोशी कुटुंबियांतर्फे रु. १०,००० /–ची देणगी वि. सा. संघास दिली आहे. या देणगीच्या व्याजातून दरवर्षी वर्ग ९ व वर्ग १० च्या विद्यार्थ्यांसाठी लेखनस्पर्धा आयोजित करण्यात येईल. विदर्भ साहित्य संघाने या देणगीचा स्वीकार केला असून यंदा ही स्पर्धा ४ डिसेंबर १९८८ रोजी न्यू इंग्लिश हायस्कूल, कॉंग्रेसनगर येथे आयोजित केली होती.

दि. ६ डिसेंबर ८८ रोजी डॉं. बाबासाहेब आंबेडकर यांच्या निर्वाणदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालण्यात आला.

दि. ११ डिसेंबर ८८ ला सावनेर येथे राम गणेश गडकरी नाटयगृहाचे उद्घाटन मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांचे हस्ते झाले. या प्रसंगी वि. सा. संघाने या नाटयगृहाचे निर्मितीस संत कान्होपात्रा या नाटकाचा एक प्रयोग विनामूल्य दिला होता व त्याचे सर्व उत्पन्न स्मारक समितीस दिले होते. या प्रसंगी वि. सा. संघाचे सरचिटणीस श्री. मनोहर म्हैसाळकर यांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

दि. १४ डिसेंबर ८८ रोजी कै. ग. दि. माडगूळकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालण्यात आला.

दि. १७ डिसेंबर ८८ ला वि. सा. संघातर्फे गडकरी सभागृहात सुप्रसिद्ध लेखक डॉ. मधुकर वाकोडे यांनी लिहिलेल्या "झेलझपाट" ह्या देशमुख आणि कंपनी पुणे यांनी प्रकाशित केलेल्या कादंबरीचे प्रकाशन डॉ. भाऊसाहेब कोलते यांचे हस्ते करण्यात आले. याप्रसंगी कादंबरीचे समीक्षण डॉ. आशा सावदेकर व प्रा. बा. ह. कल्याणकर यांनी केले. या कार्यक्रमाचे संयोजन प्रा. विठ्ठल वाघ व श्री. योगेश बऱ्हाणपुरे यांनी मान्यवरांचे स्वागत केले.

दि. २० डिसेंबर ८८ रोजी कै. गाडगे महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालण्यात आला.

दि. २३ डिसेंबर ८८ रोजी वि. सा. संघातर्फे कै. लक्ष्मण देविदास जोशी आंतरशालेय लेखन स्पर्धेचा बक्षीस समारंभ पत्रकार श्री. शरद मोडक यांचे हस्ते करण्यात आला. या प्रसंगी साहित्य प्रसार केंद्रातर्फे बालवाङ्मयाचे प्रदर्शन आयोजित केले होते. यात खालील विद्यार्थ्यांनी पारितोषिके मिळविली.

१. कु. कलावती नरताम, श्रीकृष्ण हायस्कूल कान्होलीबारा, रु. २०० /– २. कु. सुप्रिया पारखी, भिडे कन्या शाळा, नागपूर. व कु. अनघा रावळगावकर, यांना विभागून रु. १५० /– ३. प्रवीण घरडे, धनवटेनगर विद्यालय, रु. १०० /– रुपये व ७५ /–ची दोन पारितोपिके कु. अर्चना नारनवरे, सोमलवार हायस्कूल व कु. तनुजा खोब्रागडे, गणेशनगर यांनी मिळविले. स्पर्धेचे परीक्षक म्हणून सौ. शोभाताई बुचे व डॉ. सौ. निलिमा कुळकर्णी यांनी उत्तम सहकार्य दिले या बक्षिस समारंभास कै. लक्ष्मणराव जोशी यांच्या पत्नी श्रीमती प्रभाताई जोशी, मुलगा रमेश जोशी व इतर कुटुंबीय हजर होते. संयोजन सौ. कुंदा केळापुरे यांनी केले.

याच कार्यक्रमाला जोडून पं. जवाहरलाल नेहरू जन्मशताब्दिनिमित्त बालसाहित्याचे प्रदर्शन साहित्य प्रसार केंद्र, नागपूर यांच्या सहकार्याने टिळक सभागृहात मांडण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन श्रीमती प्रभाताई जोशी यांनी दीप प्रज्वलित करून केले. सुमारे एक हजार पुस्तके या प्रदर्शनात ठेवण्यात आली होती. तरुण भारताचे छायाचित्रकार श्री. जयंत हरकरे यांनी काढलेली लहान मुलांचे मूड्स् दर्शविणारी व खेळांची छायाचित्रे हे या प्रदर्शनाचे आणखी एक आकर्षण होते.

दि. २६ डिसेंबर ८८ रोजी मुंबई दूरदर्शनवर गाजलेले महाराष्ट्राचे विख्यात चित्रकार श्री. अरुण दाभोळकर यांच्या अनेकविध चित्रमालिकातील रंगीत चित्रांचे एक प्रदर्शन कला दालनात आयोजित केले होते. याचे उद्घाटन सरचिटणीस श्री. मनोहर म्हैसाळकर यांचे हस्ते झाले.

दि. २७ डिसेंबर ८८ रोजी विख्यात जनसाहित्यिक, वयोवृद्ध हिंदी लेखक बाबा नागार्जुन यांच्या जनसत्कार समितीतर्फे आयोजित सत्कार कार्यक्रमात विदर्भ साहित्य संघाचाही प्रामुख्याने सहभाग होता. नागपुरातील सर्व साहित्य संस्था व मान्यवर लेखकांच्या वतीने हा सत्कार आयोजिण्यात आला होता. वि. सा. संघाचे वतीने सरचिटणीस मनोहर म्हैसाळकर यांनी बाबा नागार्जुन यांचे स्वागत केले तर अन्यभाषा साहित्य विभागाचे आमंत्रक श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी जनसत्कार समितीच्या वतीने आभार व्यक्त केले.

दि. ३० डिसेंबर ८८ रोजी "लोकांची वेदना लोकांच्या भाषेत व्यक्त झाल्याशिवाय जनसाहित्य जगूच शकत नाही. लोकभावना व्यक्त करताना कवीला लोकजीवन व व्यक्तिजीवन सूक्ष्मपणे अवलोकून त्याचे तरल पदर दाखवता आले पाहिजेत. दुर्दैवाने असे फारच कमी घडते." अशा आशयाचे उद्गार विख्यात ज्येष्ठ हिंदी कवी व जनसाहित्यिक बाबा नागार्जुन यांनी काढले. विदर्भ साहित्य संघाच्या अन्य भाषा साहित्य विभागातर्फे आयोजित "वार्तालाप" कार्यक्रमात ते बोलत होते. वि. सा. संघाचे अध्यक्ष प्रा. राम शेवाळकर यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम आयोजिण्यात आला होता. प्रारंभी बाबा नागार्जुन यांचा सत्कार करून प्रा. शेवाळकरांनी विदर्भ साहित्य संघाची विदर्भातील लेखकांची तसेच एकूणच मराठीतील लेखकांची मोलाची कामगिरी विशद करून अन्य भाषांमध्ये ती प्रसृत व्हावी म्हणून अशा आदान-प्रदान कार्यक्रमाचे आयोजन असल्याचे सांगितले. या निमित्ताने जनसांस्कृतिक केंद्राचे वतीने "आरती भ्रष्टाचार की" या डॉ. नामदेव लाघवे, किशोर जामदार, अनिल हजारे, रमेशकुमार बहुरूपी, तरुण सरकार व ज्ञानेश्वर बोरकर यांच्या भूमिका असलेल्या विनायक कराडे लिखित व दिग्दर्शित पथनाटयाचा प्रयोगही वि. सा. संघाचे आवारात बाबा नागार्जन यांचे उपस्थितीत सादर करण्यात आला. बाबा नागार्जून यांच्या मुक्त काव्यवाचनाचाही लाभ या प्रसंगी श्रोत्यांना मिळाला. प्रसिद्ध हिंदी लेखक व हिंदी साहित्य संमेलनाचे पदाधिकारी श्री. शैलेंद्र, श्री. शिवनारायण द्विवेदी तसेच श्री. उमेश चौबे, लोहिया अध्ययन केंद्राचे श्री. हरीष अडयाळकर यांनीही कार्यक्रमात भाग घेतला. कार्यक्रमाचे आयोजन व संचालन अन्य भाषा साहित्य विभागाचे आमंत्रक श्री. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी केले.

अमरावती जिल्हा साहित्य संमेलन अचलपूर-परतवाडा सार्वजनिक वाचनालयाचे प्रांगणात दि. ३१ डिसेंबर ८८ व १ जानेवारी ८९ रोजी झाले. संमेलनाचे उद्घाटन सुप्रसिद्ध पत्रकार व कादंबरीकार श्री. अरुण साधु यांनी केले. संमेलनाचे अध्यक्ष वयोवृद्ध कवी ज्ञानेश्वर उर्फ नानासाहेब साधु होते. संमेलनाला विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रा. राम शेवाळकर, उपाध्यक्ष वामनराव तेलंग, सरचिटणीस श्री. मनोहर म्हैसाळकर, सुप्रसिद्ध कवी बाबा मोहोड, पक्षीतज्ञ व लेखक श्री. मारुती चित्तमपल्ली, माजी आमदार भय्यासाहेब देशमुख, प्रा. वसुधा घुरडे प्रामुख्याने उपस्थित होते.

■

ऑक्टोबर ८८ ते मार्च ८९

जवाहरनगर :

शाखेतर्फे दि. १ ऑक्टोबर रोजी त्रिभाषिक कविसंमेलन आयोजित करण्यात आले. यात मराठी–हिंदी व उर्दूच्या ३५ कवींनी भाग घेतला. सांस्कृतिक संगम भंडारा आणि वि. सा. संघ शाखा लाखनी यांच्या सहकार्याने एवढ्या मोठ्या संख्येने कवी हजर राहू शकले.

सचिव हिरामण लांजे उर्फ रमानंद यांनी शाखेची माहिती देऊन उपस्थित कवींचे व रसिकांचे स्वागत केले. निरीक्षक श्री. मित्तल यांनी दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. यावेळी श्री. मित्तल आणि सा. स. भंडाराचे अध्यक्ष श्री. श्याम नांदूरकर यांची भाषणे झाली.

कविसंमेलनाचे संचालन श्री. एस. एम. वर्मा, भंडारा यांनी हिंदीत केले. यावेळी पुढील प्रमाणे कवी सहभागी झाले. भंडाऱ्याचे–श्याम नांदूरकर, मेहताब " ताब ", एस. एम. वर्मा, मेहमूद, खान मेहमूद, मोमिन शेख, विजय शर्मा, एहसान अली, निलकंठ रणदिवे, मंजर भंडारवि (बम्बई), मौलाना अंजूम (अयोध्या), असगर भोपाली, रंजनकुमार शृंगारपवार (तिरोडा), लाखनीचे–द. सा. बोरकर, प्रल्हाद सोनवाने, बुद्धिसागर भदाडे, प्रा. खुशाल मोटघरे, दिनेश पंचबुद्धे, कु. यशोदा येळणे, सौ. मंदाकिनी पोहरकर, माधव भुपारी (केसलवाडा), चंद्रकांत हटनागर (पोहरा), जवाहरनगरचे हिरामण लांजे, डॉ. चंद्रमोहन गुप्ता, देवारामजी महाजन, छगन पंचे, अशोक सोनी, पी. डी. शेंडे, त्रिवेदी, भाऊ सेवईवार, राजकरण शर्मा, श्रीमती मित्तल, श्रीमती माहूरकर, श्रीमती नंदनवार. सफल आयोजनासाठी उपाध्यक्ष माधवराव ब्राम्हणकर आणि सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

दि. ६–१–८९ रोजी शाखेची सर्वसाधारण सभा सर्वानुमते पार पडली. पुढील तीन वर्षासाठी नवीन कार्यकारी मंडळ निवडण्यात आले. प्रारंभी सचिव श्री. हिरामण लांजे उर्फ रमानंद यांनी शाखेचा अहवाल वाचला.

कार्याध्यक्ष– श्री. मधुकरजी कनेर, कार्योपाध्यक्ष– श्री. रत्नाकर सालकाडे, सचिव– श्री. हिरामणजी लांजे उर्फ रमानंद. सहसचिव– श्री. विनय जोशी, कोषाध्यक्ष– श्री. माधवराव ब्राम्हणकर. कार्यक्रम प्रमुख– श्री. वसंत चन्ने. सदस्य– सर्वश्री. चंद्रकांत बोरकर, रामचंद्र नाकाडे, वासुदेव फडके, गोविंद कापगते.

लाखनी :

दि. २६–१–८९ रोजी कै. शालिनीताई शिवनकर स्मृतिप्रित्यर्थ दिनांक २७–१–८९ ला रात्री ८–०० वाजता राष्ट्रभक्तीपर गीतगायन स्पर्धा व शालिनीताई कथाकथन स्पर्धा घेण्यात आल्या.

पहिल्या स्पर्धेचे प्रमुख अतिथी दलितमित्र श्री. सी. डी. खवसकर व दुसऱ्या स्पर्धेच्या अध्यक्षा डॉ. सौ. स्वाती मुंडले ह्या होत्या.

संचालन श्री. ता. ह. भुरे, प्रास्ताविक श्री. द. सा. बोरकर व आभारप्रदर्शन श्री. बी. डी. भदाडे यांनी केले.

" राष्ट्रभक्तीपर गीतगायन स्पर्धा "–दि. २६–१–८९

गट १ ला (वर्ग ५ ते ७) १. कु. चारु उदय राजहंस– स. वि. लाखनी, प्रथम. २. पुष्पहास मनोहरराव हडप स. वि. लाखनी, द्वितीय. ३. कु. सीमा केवलराम गिऱ्हेपुंजे– राणी ल. वि. लाखनी, तृतीय.

गट २ रा (वर्ग ८ ते १०) १. कु. नागेश्री सूर्यनारायण– राणी ल. वि. लाखनी, प्रथम. २. विनोद वासुदेव कोचे– आ. शि. वि. गराडा, द्वितीय. ३. कु. विद्या बुद्धीसागर भदाडे– जि. प. गो. वि. लाखनी, तृतीय.

गट ३ रा (वर्ग ११ ते इतर) १. अजयसिंग सावलसिंग व्यास– स. म. वि. लाखनी, प्रथम. २. राजकुमार देवराम वाहणे– स. म. वि. लाखनी, द्वितीय. ३. विकास विठ्ठल मेश्राम– जि. प. वि. पिंपळगाव, तृतीय.

" शालिनी कथाकथन स्पर्धा "– दि. २८–१–८९

गट १ ला (वर्ग ५ ते १०) १. कु. मुक्ता दवलत बोरकर– स. वि. लाखनी, प्रथम. २. कु. ज्योती प्रभुनाथ पारधी– राणी ल. बा. वि. लाखनी, द्वितीय. ३. कु. नागेश्री सूर्यनारायण– राणी, ल. वि. लाखनी, द्वितीय. ४. नाजीश सालिक कुरेशी– स. वि. लाखनी, तृतीय. ५ कु. मनिषा भास्करराव देशपांडे– स. वि. लाखनी. तृतीय.

गट २ रा (वर्ग ११ ते इतर) १. कु. यशोदा निलकंठ येळगे– मुक्ताभवन, लाखनी, प्रथम. २. दिलीप तातोबाजी गजभिये– जि. प. क. म. वि. पिंपळगांव–द्वितीय. ३. विकास विठ्ठलजी मेश्राम– जि. प. क. म. वि.– पिंपळगांव– तृतीय.

कारंजा लाड :

विदर्भ साहित्य संघ शाखा कारंजा व भारतीय स्टेट बँक स्टाफ वेलफेअर कमेटी शाखा कारंजा यांच्या संयुक्त विद्यमाने २९ आक्टोबर ८८ रोजी, प्रसिद्ध गायक श्री. सुधाकर कदम यांचा " गीत व गझलां 'चा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. स्टेट बँक कारंजा शाखेच्या सभागृहात रात्री ९ वाजता सुरू झालेल्या या रसपूर्ण कार्यक्रमाला अनेक रसिक उपस्थित होते.

शाखा कार्याध्यक्ष डॉ. शरद असोलकर व स्टेट बँक कारंजा शाखाप्रमुख निळकंठजी नागराज यांनी प्रास्तविकातून भूमिका स्पष्ट केली. कलाकारांचे हृद्य स्वागत करण्यात आले. श्री. प्रभुणे यांनी सुधाकर कदम यांचे, वासवाणी यांनी कलिमखान यांचे, पांडे यांनी माहुरे यांचे व बन्नोरे यांनी खंदारे यांचे पुष्पहाराने स्वागत केले.

श्री. सुधाकर कदम यांना तबल्यावर खंदारे, तानपुऱ्यावर माहुरे यांनी साथ केली. कलिमखान यांनी निवेदन केले.

सुधाकर कदम यांनी श्रीकृष्ण राऊत; सुरेश भट, म. बा. चव्हाण, कलिमखान, नारायण कुलकर्णी कवठेकर, उ. रा. गिरी आदींच्या १४ गझला अतिशय नजाकतीने पेश केल्या.

कार्यक्रमाचे संचालन शाखेचे सचिव प्रा. सुभाष गडीकर यांनी केले. स्टेट बँक वेलफेअर कमेटी शाखा कारंजाचे पदाधिकारी रविंद्र सोनटक्के यांनी आभार मानले.

स्टेट बँक वेलफेअर कमेटीचे सदस्य व वि. सा. संघ शाखेचे सभासद यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अतिशय परिश्रम घेतले.

दिग्रस :

१. शाखेच्या वतीने दुर्गोत्सवात देवनगर येथे परिसरातील कवींचे भव्य कविसंमेलन प्रा. गोल्हर यांचे अध्यक्षतेखाली दि. १७ ऑक्टोबर रोजी घेण्यात आले. यात प्रा. राम गायगोले, श्री. हरीभाऊ

शिंदे, सौ. शिंदे, सौ. प्रतापवार, श्रीमती चव्हाण, श्री. सोले, श्री मिश्रा. कु. उज्वला तुपसुंदरे आदी कवींनी भाग घेतला. श्री. तुपसुंदरेसाहेब, प्रा. केशरवाणी, श्री. जैस्वाल यांच्या परिश्रमामुळे हा कार्यक्रम फारच बहारदार झाला.

२. शाखेच्या वतीने प्रत्येक महिन्यात "एक कवीगोष्ठी "चे आयोजन करावयाचे ठरविण्यात आले. त्यानुसार श्रीमती कुंदाताई चव्हाण यांचे निवासस्थानी दि. २४-११-८८ ला प्रा. गोकूळप्रसाद केशरवाणी यांचे प्रमुख उपस्थितीत कवीगोष्टींचे आयोजन करण्यात आले. प्रा. राम गायगोळे व प्रा. गोल्हर यांनी या प्रयोगासंबंधी आपली मनोगते व्यक्त केली. उत्तर-रात्रीपर्यंत रंगलेल्या या कवीगोष्टीत सौ. प्रभावती शहा, श्रीमती चव्हाण, सुरेश गुप्ता, अॅड. सुधाकर जाधव, प्रा. राम गायगोळे व प्रा. गोल्हर यांनी सहभाग घेतला. प्रा. राम गायगोळे यांनी आभार मानले.

३. दूरदर्शनवरील "आव्हान" या मालिकेवरून एक चर्चा दि. १०-१२-८८ ला श्री. तुपसुंदरे यांचे उपस्तिीत आयोजित करण्यात आली. प्रा. वाघमारे, प्रा. राम गायगोळे, प्रा. केशरवाणी यांनी चर्चेत सहभाग घेतला.

रामटेक :

१. शाखेतर्फे दि. २९-९-८८ ला एकांकिका स्पर्धेत विजयी होणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता बक्षिस वितरणाचा कार्यक्रम श्रीमती गुप्ताबाई, खंड विकास अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली व रामटेकचे प्रतिष्ठित नागरिक श्री. आनंदरावजी महाजन (देशमुख) यांच्या उपस्थितीत श्रीराम शाळेच्या प्रांगणात घेण्यात आला. यात उत्कृष्ट अभिनयाकरिता श्री. संदीप, चिखखेडे, चंद्रशेखर कामळे, कु. कविता देवगीरकर व कु. प्रिया आष्टनकर यांना पारितोषिके देण्यात आली.

२. दि. ३-१२-८८ रोज शनिवारला कै. दामोधररावजी किमतकर स्मृती वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली होती. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री. मधुकरराव पोकळे प्राचार्य-समर्थ कनिष्ठ महाविद्यालय, रामटेक तसेच प्रमुख पाहुणे म्हणून श्री. तांदूळकर साहेब प्राचार्य-श्री. नरेंद्र तिडके महाविद्यालय, रामटेक हे उपस्थित होते. याशिवाय श्री. लोंढीकर, श्री. किमतकर गुरुजी, श्री. बुंदे, श्री. भारत श्री. किमतकर, श्रीमती क्षीरसागर, श्रीमती पंडीतबाई, श्रीमती महाडिक हे उपस्थित होते. या स्पर्धेत गट "अ" मधून- १. कु. अर्चना दुबे, व २. पी. एन. नागदेवते तसेच गट "ब" मधून- १. कु. पी. जे. दुबे व २. मिलिंद चोपकर हे विद्यार्थी विजयी झाले. "आजची सामाजिक परिस्थिती व युवकांचे कर्तव्य" या विषयावर विद्यार्थ्यांनी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे आयोजन शाखेचे सचिव श्री. शेषराव येडके यांनी समर्थ विद्यालयात केले होते.

शेंबाळ पिंपरी :

शाखेतर्फे दि. ८-११-८८ रोजी नागपूर दै. लोकमतच्या सहसंपादक सौ. शुभांगी भडभडे ह्यांचा "कादंबरीचे भावविश्व" ह्या विषयावर चर्चात्मक कार्यक्रम झाला. ह्यावेळी सुरेश गांजरे सह संपादक "विदर्भ मतदार" पुसद, गुणवंतराव देशमुख अध्यक्ष साहित्यांकुर, विजयमाला देशमुख वि. सा. संघ शाखा शें. पिंप्री, विजय वाकडे, पेटकर सर, तुकाराम अंबोरे सर, अस्मीताचे संपादक मिलींद उदेपूरकर पुसद ह्यांनी भाग घेतला. विजय वाकडे यांनी शेवटी आभार प्रदर्शन केले.

आजीव समासद दि. ३–१०–८८

श्री. बळीराम त्र्यंबक कोलते, डॉ. कुमार शंकर शास्त्री, सौ. सुनीती निळकंठ देव, सौ. सुरेखा सुरेश खटी, श्री. सुधाकर रामचंद्र दक्षिणदास, श्री. केशव श्रीराम क्षीरसागर, श्री. शिरीष यशवंत धर्माधिकारी, सौ. मनीषा आशुतोष शेवाळकर, शेख मोहम्मद कमर हयात, सौ. ज्योती राम आसटकर, श्री. सुरेश मूलचंद अग्रवाल, श्री. मोहम्मद अब्दुल कादर, श्री. काशीप्रसाद रामफल चौरासिया, श्री. रविभूषण कुमार, डॉ. विजय टिकमदास मदनानी, डॉ. राजीव वसंत वऱ्हाडपांडे, सौ. वसुमती वसंत वऱ्हाडपांडे, श्री. बबन भोजराज नाखले, डॉ. प्रमोद लक्ष्मण वनकर, श्री. विठ्ठलसिंग धुर्वे, श्री. गिरीष अनंत पाटील, श्री. गोविंद मुकुंद सहस्त्रबुद्धे, श्री. गुलाब पुसाजी लाऊत्रे, श्री. जालंदर प्रभाकर पुरोहित, अब्दुल हादीखान अब्दुल वाजिदखान, श्री. गिरीराव आनंद देशमुख, श्री. कमलाकर दिनकर धारप, डॉ. तुळशीदास विठूजी गेडाम, श्री. अरविंद गजानन किडे, श्री. श्याम वंड, श्री. अशोक विष्णू जोशी, श्री. आसनदास बन्सीलाल कल्याणी, डॉ. पी. के. रांगोळे, श्री. रामकुमार श्रीवास्तव. श्री. मधुकर निळकंठ देशपांडे, सौ. वनीता वसंत यावलकर, (सर्व नागपूर), श्री. सुहास भगवंत तिडके, श्री. चिंतामण गणपत कांवळे. (सर्व मूर्तिजापूर), श्री. विजय रामाजी गजभिये (उमरेड), श्री. सुरेश विठ्ठल दवंडे. (कारंजा [लाड]). सौ. मृणालिनी वासुदेव देशपांडे, सौ. मालती रामराव देशमुख, श्री. कृष्णा वासुदेव तारे, श्री. अशोक रामराव वोंडे, श्री. राजाराम भास्कर महाजन, श्री. वसंत नारायण तोंडगावकर, सौ. विजया अ. जोशी, श्री. भिमराव सिताराम इंगळे, (अचलपूर, परतवाडा). श्री. ज्ञानेश्वर विठोबा टंकाडे, श्री. नटराज व्यंकटरमन अय्यर, श्री. जयंती रावजी पटेल, (नरखेड), श्री. रा. वा. जतकर (अमरावती.) प्रा. र. ल. त्रिडवई (उमरखेड), श्री. विजय देवराव पाटील (चोंढीकर) (पुसद), श्री. वेनीराम तुकाराम आगाशे, श्री. वसंत नत्थुजी वोरकर, श्री. शिवशंकर विश्वनाथ बावणकुळे, श्री. निलकंठ किसन कटकवार (साकोली), श्री. रमेश पुंडलीक रोकडे (सडक अर्जुनी).

विदर्भाबाहेरील आजीव समासद

श्री. भूपाळेश्वर रुक्मानंद देशपांडे, मुंबई, डॉ. सौ. अंजनी रत्नाकर कुळकर्णी, मुंबई प्रा. बाबुराव दत्तात्रय गायकवाड, धारवाड.

मनोहर म्हैसाळकर

सरचिटणीस

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

शाखा व सभासदांना सूचना

सर्व शाखा व सभासदांना सूचित करण्यात येते की, रविवार दिनांक १० जानेवारी ८८ रोजी केन्द्रीय कार्यालयात झालेल्या विशेष साधारण सभेत संमत झालेल्या घटनेतील दुरुस्त्या व फेरबदलाला रविवार दि. १७ जुलै १९८८ च्या विशेष साधारण सभेत कायम (कन्फर्म) करण्यात आले हे आपणास विदीतच आहे.

त्यानुसार नवीन आर्थिक वर्षापासून (१ एप्रिल १९८९ पासून) वि. सा. संघाच्या सभासदांच्या वार्षिक तसेच आजीवन सभासदत्वाच्या शुल्कात पुढे दिल्याप्रमाणे वाढ करण्यात आली आहे, ह्याची संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी. व त्याप्रमाणे नवीन सभासद नोंदणी अथवा नूतनीकरण करावे.

सभासद शुल्क	घटना	
दिनांक १–४–८९ पासून	दुरुस्तीपूर्वी	दुरुस्तीनंतर
१. साधारण सभासदत्व	रु. १०/–	रु. १५/–
२. आजीवन सभासदत्व	रु. १५१/–	रु. २५०/–

घटनेनुसार नवीन सभासद होताना रु. १/– आवेदन शुल्क व रु. ५/– प्रवेश शुल्क वेगळे द्यावे लागते, ह्याची आपल्याला माहिती आहेच.

मनोहर म्हैसाळकर
सरचिटणीस, वि. सा. संघ, नागपूर

अनुक्रमणिका

प्रकाशक : मनोहर म्हैसाळकर, सरचिटणीस; विदर्भ साहित्य संघ, नागपूर – ४४
मुद्रक : मधूसूदन पांडुरंग बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धंतोली, नागपूर – ४
मुखपृष्ठ मुद्रक : मधुकर आर्टस्, धंतोली, नागपूर – ४४०

अनुक्रमणिका